म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २५५७०

REFBK-0022755

4 DEC 1985
22 DEC 1985

संदर्भ शाखा
२२७५५
२५७०
राजकीय लेख/निबंध
१६।११।७९

# शिवरात्र

नरहर कुरुंदकर

REFBK-0022755

साधना प्रकाशन, ४३०/३१ शनिवार पेठ, पुणे ३०

*Most certainly the rebel does not deny the history which surrounds him; it is in terms of this that he attempts the affirmation of himself.* — Albert Camus.

प्रकाशक
भाल कोरगावकर
साधना प्रकाशन,
४३०।३१ शनिवार,
पुणे ३०

मुद्रक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रेस,
४३०।३१ शनिवार,
पुणे ३०

मुखपृष्ठ
सुभाष अवचट
पुणे

©
प्रा. नरहर कुरुंदकर
नांदेड

प्रथमावृत्ती
१४ नोव्हेंबर
१९७०

द्वितीयावृत्ती
जुलै
१९७२

किंमत
सहा रुपये

जागरनंतर येणारा हा माझ्या राजकीय लेखांचा दुसरा संग्रह. जागरच्या प्रस्तावनेत जे मी म्हटले आहे, त्यापेक्षा निराळे असे काहीही या संग्रहाबाबत मला म्हणावयाचे नाही. तो संग्रह काय किंवा हा संग्रह काय, दोन्हींचीही निर्मिती राष्ट्र सेवा दल शाखांवर घेतल्या गेलेल्या बौद्धिकांतून झालेली आहे. त्यामुळे माझ्या समजुतीप्रमाणे जातिधर्मातीत लोकशाहीची आणि समाजवादाची एकच बैठक या सर्व लिखाणाला आहे.

जागरमध्ये मुस्लिम जातीयवादासंबंधीचे माझे लिखाण व जातीयवादी मुस्लिम राजकारणाविषयीची माझी भूमिका तपशिलाने आली आहे. त्याच भूमिकेच्या वेगळ्या पैलूने विस्तार या संग्रहातील काही लेखांच्यामधून आढळेल. पण त्याखेरीज हिंदुत्ववादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजकारणाविषयीही या संग्रहात बराच विस्तार आहे. हिंदू जातीयवाद अगर मुस्लिम जातीयवाद असे जातीयवादाचे गट पाडणेच फारसे शास्त्रीय नाही. कारण कोणताही जातीयवाद हा एका प्रतिगामी राजकारणाचा बुरखा असतो. जागरमधील लेख वाचून मला हिंदुत्ववादी ठरवणे किंवा या संग्रहातील लिखाण वाचून मला हिंदुद्वेष्टा ठरवणे या दोन्ही प्रतिक्रिया स्थूल असल्या तरी मी वाचकांच्याकडून अपेक्षिलेल्या आहेत. चिकित्सकांना असल्या प्रकारच्या प्रतिक्रियेचा उथळपणा पुन्हा सांगण्याची गरज पडू नये.

सदर संग्रहाला नाव 'शिवरात्र' असे दिले आहे. शिवरात्र ही रात्रच असते, पण ती झोपण्याची रात्र नाही. शिवाच्या आराधनेत ही रात्र जागून

काढावयाची असते. असले जागरण करताना जीवनातील शिव या मूल्यावर पुरेशी श्रद्धा असणे आवश्यक होते. सेवादलात वावरताना माणसाच्या चांगुलपणावरील ही श्रद्धा मी पुष्कळ प्रमाणात शिकलो आहे, अशी माझी नम्र समजूत आहे. म्हणून मी निराशावादी नाही. या देशाच्या उज्ज्वल भवितव्यावर माझी श्रद्धा आहे. आणि अशा श्रद्धा कोणत्याही तर्कशास्त्रावर आधारलेल्या नसतात, याची मला जाणीव आहे.

हा संग्रह माझे मित्र श्री. हमीद दलवाई यांना अर्पण करण्यात आला आहे. मुस्लिम समाजात हमीद दलवाईंचा उदय ही मी या देशातील धर्मातीत लोकशाहीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण घटना मानतो. एक राष्ट्रनिष्ठ लोकशाही समाजवादी आणि निर्भेळ इहलोकवादी भूमिका घेऊन हमीद दलवाईंनी मुस्लिम राजकारणात एक नवे पर्व उघडलेले आहे. मुस्लिम समाज हे मनाचे आधुनिकीकरण किती प्रमाणात पचवतो यावर या देशात मुस्लिम समाजाचे भवितव्य तर अवलंबून आहेच, पण भारतीय लोकशाहीचेही भवितव्य अवलंबून आहे, असे मला वाटते.

सदर पुस्तकाची हस्तलिखित प्रत करण्यात माझे मित्र गोविंद कुलकर्णी यांनी फार मोठे श्रम घेतलेले आहेत. त्यांचे या निमित्ताने मी प्रकट आभार मानतो.

श्री. यदुनाथ थत्ते आणि साधना प्रकाशन या दोन्हींचाही माझा ऋणानुबंध घनिष्ठ व जुना आहे. त्यांचे आभार औपचारिकपणे मानले काय आणि न मानले काय दोन्हींचीही त्यांना फारशी चिंता नाही. मी मात्र दोघांचाही कृतज्ञ आहे.

— नरहर कुरुंदकर

प्रिय हमीद दलवाई यांस—

श्री गोळवलकर गुरुजी आणि महात्मा गांधी
श्री गोळवलकर गुरुजी आणि चातुर्वर्ण्य
गांधी-हत्या आणि मी
खान अब्दुल गफारखान
मौलाना आझाद : एक स्मरण
अच्युतराव पटवर्धनांच्या सहवासात एक दिवस
आधुनिक भारतीय राजकारणात मुसलमानांचा प्रश्न
मुसलमानांच्या विचारासाठी काही प्रश्न
इस्लामिक राज्य
श्री बनातवाला यांच्या मुलाखतीच्या निमित्ताने—

# श्री गोळवलकर गुरुजी आणि महात्मा गांधी

यंदाचे वर्ष महात्मा गांधींचे जन्मशताब्दीचे वर्ष आहे. जनतेच्या पातळी-वरून, पक्षीय पातळीवरून आणि शासकीय पातळीवरून हा शताब्दी-महोत्सव प्रत्येकाने आपापल्या पद्धतीनुसार पण उत्साहाने साजरा केला आहे. निदान आपण हा उत्सव उत्साहाने साजरा करत आहो, अशी जाहीर भूमिका घेतली आहे. शासनाने तर गरजेहून अधिक उत्सवप्रियता या प्रसंगाने दाखवली आहे. महात्मा गांधी हे एकदा 'राष्ट्रपिता' म्हणून मान्य केल्यानंतर त्यांच्याविषयी प्रत्येक भारतीय नागरिकाच्या मनात आदर व कृतज्ञता असावी, अशी रास्त अपेक्षा असते. काँग्रेसपक्षाने जरी गांधीजींना केवळ आपल्या पक्षाचे वंदनीय नेते ठरवण्याचा घाट घातलेला असला, तरी गांधीजींचे राष्ट्रपितेपण काँग्रेसच्या मान्यतेवर फारसे अवलंबून नाही. शासनाच्या पातळीवरून उत्सव साजरा करण्यात येऊ लागला म्हणजे त्या सगळ्या कार्यक्रमात जो एक दंभ शिरतो आणि अशा दंभाची प्रतिक्रिया म्हणून जो राग येतो तेवढ्या बाबी सोडल्या तर सर्वसामान्य भारतीय जनतेचे मन महात्मा गांधींविषयीच्या आदराने, श्रद्धेने व कृतज्ञतेने ओतप्रोत भरलेले आहेच. १

या ठिकाणी राष्ट्रपिता या कल्पनेबाबत थोडेसे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. सर्वसामान्य तुमच्या–आमच्या कौटुंबिक जीवनात जे पित्याचे स्थान– तेच राष्ट्र हे जर एक मोठे कुटुंब मानले तर त्या कुटुंबात राष्ट्रपित्याचे स्थान समजले पाहिजे. आपल्या कौटुंबिक जीवनात ज्याप्रमाणे बापाची सर्वच मते मुलाला मान्य असतील अशी खात्री देता येत नाही, त्याचप्रमाणे राष्ट्रपित्याची सर्वच मते सर्वांना तंतोतंत प्रमाण वाटतील याची खात्री देता येत याही. पाश्चात्य संस्कृती आपल्यासारखी विभूतिपूजक नाही. जर ती विभूतिपूजक असती तर जॉर्ज वॉशिंग्टन, जेफरसन, किंवा अब्राहम लिंकन ह्यांपैकी कोणाला तरी अमेरिकेने राष्ट्रपिता मानले असते. विभूतिपूजा अमान्य करता करता रशियाने लेनिनला राष्ट्रपिता मानलेच आहे; पण लेनिन झाला काय किंवा

लिंकन झाला काय, यांची सर्वच मते कोणी तंतोतंत प्रमाण मानणार
नाहीत. महात्मा गांधी जरी झाले तरी त्यांचे एक व्यक्तिमत्त्व होते. या
व्यक्तिमत्त्वातील अनेक घटक वादग्रस्त असू शकतात, तसे ते आहेत.
अशा वादग्रस्त कारणांच्यासाठी गांधींना कुणी राष्ट्रपिता मानीतही नाही,
राष्ट्रपिता म्हणण्याचे कारणही नाही. उदाहरणच द्यावयाचे तर, कुटुंब-
नियोजनाकडे पाहण्याच्या गांधीजींच्या दृष्टिकोणाचे देता येईल. कुटुंब-
नियोजन-कार्यात संयम आणि ब्रह्मचर्य यांखेरीज कोणत्याही बाबीला
मान्यता देण्यास गांधीजी तयार नव्हते. कुटुंबनियोजनाच्या प्रश्नावर
गांधीजींची मते आपण मान्य करण्याची गरज नसते. कारण ह्या प्रश्नासाठी
काही गांधींना आम्ही राष्ट्रपिता म्हणत नाही. गांधीजींना राष्ट्रपिता
मानण्याची नेमकी कारणे कोणती याचेही एकदा आपण प्रामाणिक उत्तर २
दिले पाहिजे; आणि या कारणांच्या संदर्भात एकदा आपली विचार
करण्याची पद्धतही तपासून पाहिली पाहिजे.

महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांनीही त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. खरे म्हणजे गांधीजी हे एकदा राष्ट्रपिता म्हटल्यानंतर त्यांच्यावर सर्व भारतीय नागरिकांचा हक्क आपण मान्य केला पाहिजे. गांधींना श्रद्धांजली विनोबांनी वाहावी; पण इंदिरा गांधींनी वाहू नये; काँग्रेसने वहावी, पण कम्युनिस्टांनी वाहू नये; निदान कुणीही गांधींना आदरांजली अर्पण केली तरी हरकत नाही, गोळवलकर गुरुजींनी मात्र त्यांना आदरांजली वाहता कामा नये, असे काही जणांना वाटते. हा एक प्रकारचा करंटेपणा आहे! जर गांधी जन्मशताब्दीच्या वर्षात गोळवलकरांनी गांधीजींना श्रद्धांजली अर्पण केली नसती तर आपण म्हणालो असतो, "पहा, हे भारताचे नागरिक आहेत; आणि भारताच्या राष्ट्रपित्याचा शताब्दीमहोत्सव चालू आहे– व हे करंटे त्यात सहभागी न होता सुतक आल्याप्रमाणे बाजूला बसून आहेत!" मुस्लिम समाजासंबंधी ही तक्रार आपण नेहमी करतोच,– ज्याविषयी देशाला प्रेम आहे त्याविषयी त्यांना प्रेम नाही. ज्याविषयी देशाला शत्रुत्व आहे, त्याविषयी त्यांना शत्रुत्व नाही. मध्यवर्ती राष्ट्रीय प्रवाहाशी मुस्लिम समाज कधी एकरूप होतच नाही, अशी आपली तक्रार असते. गोळवलकरांच्या बाबतीत कुणाचे काही मतभेद असले तरी त्यांच्या धैर्याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातसुद्धा ते स्वच्छपणे वर्णव्यवस्थेला पाठिंबा दाखवण्याचे धैर्य करू शकतात! त्यांच्या मनात असते, जर गुरुजींची इच्छाच असती तर गांधी हे आमचे राष्ट्रपिता नव्हेत असे गोळवलकरांनी जाहीरपणे सांगितले असते.

या देशातील समाजवादी म्हणवणाऱ्यांनी दर वेळी भांडवलशाहीशी

इतक्या तडजोडी केल्या आहेत, व सेक्युलर म्हणवणाऱ्यांनी जातीयवाद्यांना इतके वेळा शरणागती दिली आहे की, सेक्युलर आणि समाजवादी मंडळींना कुणी फारसे भिण्याची गरज उरलेली नाही. जर जाहीररीत्या एखादा मुस्लिम लेखक महंमद पैगंबर व गांधी ह्यांची तुलना होताच पैगंबराला ' सम्राट ' आणि गांधींना ' टरबूजविक्या ' ठरवू शकतो व हे गांधी जन्मशताब्दीपर्वात सुसह्य मानले जाते;–तर मग गोळवलकरांना भिण्याचे काहीच कारण नव्हते. सेक्युलर आणि समाजवादी ह्यांच्या दडपणामुळे नव्हे तर त्यापेक्षा फारच निराळ्या कारणांनी गोळवलकरांनी गांधींना आदरांजली अर्पण केली आहे. या देशातील कोट्यवधी लोक याच देशातील एका सुपुत्राची जन्मशताब्दी साजरी करत असताना कोटी– सव्वा
कोटी मतदानावर प्रभुत्व असणारा एक नेता उदासीन न राहता गांधींच्या २
जयजयकारात सहभागी होतो ही घटना महत्त्वाची आहे. करायचा असेल तर या घटनेविषयी आनंद व्यक्त केला पाहिजे; त्याबद्दल कुणाचे पोट दुखण्याचे काहीच कारण नाही !

गोळवलकरांनी महात्मा गांधींना आधुनिक भारताचे राष्ट्रपिताही म्हटले आहे, आधुनिक भारतातील प्रातःस्मरणीय, प्रातर्वंदनीय पुरुषही म्हटले आहे. यंदाच्या वर्षापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आणि जनसंघाचा गांधीजींच्याकडे पाहण्याचा सगळा दृष्टिकोण एकदम बदलल्यासारखा वाटू लागतो. या देशातील हिंदुत्ववाद्यांनी गांधीजींना भगतसिंगाच्या हौतात्म्याबद्दल नेहमीच जबाबदार धरलेले होते. नजीकच्या काळात या आरोपातून गांधींची मुक्तता करण्यात आलेली आहे. महात्मा गांधींनी लॉर्ड आयर्विनकडून भगतसिंगाच्या मुक्ततेचे आश्वासन मिळवले होते; पण याबाबत आवश्यक ती गुप्तता पाळली गेली नाही,– असे सांगून आता नव्याने दोषारोप काँग्रेस वर्किंग कमिटीतील त्या वेळचे मुस्लिम सदस्य, विशेषतः बॅ. असफ अली यांच्यावर टाकण्यात येत आहे ! राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखांना गांधींनी भेट कशी दिली, संघकार्याला गांधींनी आशीर्वाद कसा दिला, संघाच्या स्वयंसेवकांनी स्वातंत्र्योदय-पर्वात म्हणजे इ. स. १९४६–४७ मध्ये काँग्रेसनेत्यांचे संरक्षण कसे केले,– याचीही माहिती आता नव्याने दिली जात आहे; किंबहुना गुंडगिरी व अत्याचार हे मुस्लिम समाजाला अंगभूत आहेत असा ध्वनी असणारी महात्मा गांधींचीच काही वाक्ये या नियतकालिकांना नव्याने उपलब्ध होत आहेत. ' ऑर्गनायझर 'ने तर गांधींचेच कार्य आता संघ चालवत असून सध्या गांधींचा आत्मा गोळवलकरांच्या शरीरातून बोलत आहे, अशी एका लेखात नोंद केली आहे !

एकीकडे गोळवलकर गुरुजींनी गांधीजींना राष्ट्रपिता आणि पुण्यश्लोक

म्हणावयाचे, दुसरीकडे अनुयायांनी गोळवलकरांनाच गांधीजींच्या आत्म्याचे विश्वस्त मानावयाचे, असा एक नवीन कार्यक्रम सुरू झालेला आहे. गोळवलकर गुरुजींना गांधीजींच्याविषयी वाटणारा हा आदर खरा आहे काय, की हा सगळा जन्मशताब्दीचा उपचार आहे? क्षणभर आपण असे गृहीत धरू की,– हा सगळा आदर खरा नसून जन्मशताब्दीचा एक उपचार आहे. उपचार म्हणून का होईना, जर भारतीय नागरिक राष्ट्रपित्याच्याविषयी आदराने काही चांगले बोलू लागले,– तर त्याला माझी हरकत असण्याचे कारण नाही. विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या मुखपत्रात गोळवलकर गुरुजींचा एक लेख छापलेला आहे. वर्तमानपत्रात आलेल्या गुरुजींच्या व्याख्यानाच्या वृत्तान्ताच्या मानाने हा लेख अधिक स्पष्ट आहे. या लेखात गोळवलकरांनी म्हटले ४
आहे की, गांधींचे मुस्लिमविषयक धोरण संपूर्णतया चुकीचे होते. चुकीचे असल्यामुळे ते अयशस्वी झाले. त्यांनी असेही म्हटले आहे की, गांधींचा अतिरेकी अहिंसावाद राष्ट्राला अहितकारक आहे. गांधींना केवळ 'पुण्यश्लोक व राष्ट्रपिता' या मखमली संबळीत गुंडाळून ठेवण्यापेक्षा या कारणांसाठी गांधींना आम्ही राष्ट्रपिता मानतो, या कारणांसाठी त्यांना पुण्यश्लोक मानतो, त्यांच्या या बाबी आपणाला पटत नाहीत, असा मोकळा हिशेब देणे केव्हाही इष्ट असते.

गोळवलकर गुरुजींच्या मते, महात्मा गांधींनी या देशातील जनतेच्या मनात स्वातंत्र्याची प्रबळ मूर्ती निर्माण केली. भारतीय जनतेला उत्कटतेने स्वातंत्र्योत्सुक केले; यामुळे ते खरोखरी राष्ट्रपिता ठरतात. गोळवलकरांची ही भूमिका मला मान्य आहे. फक्त ही भूमिका प्रामाणिकपणे गोळवलकर व त्यांचे अनुयायी यांना मान्य आहे काय– एवढाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे! राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यसुद्धा आता चाळीसहून अधिक वर्षे जनतेच्या समोर आहे. या मागच्या चाळीस वर्षांत संघाच्या कार्यकर्त्यांनी आणि संघाच्या नेत्यांनी गांधीजींचे कोणते मूल्यमापन केले, हा प्रश्न मला फारसा महत्त्वाचा वाटत नाही. गेली ४० वर्षे परंपरेने एखादे मूल्यमापन आपण करत आलो असलो म्हणून काय झाले? आज जर ते मूल्यमापन पूर्णपणे चुकीचे वाटत असले, तर नवे निर्णय मोकळेपणाने स्वीकारले पाहिजेत. यात लाजण्याजोगे काहीच नाही. आपण तर सर्व छोटी माणसे आहोत. फार मोठमोठ्या मंडळींना जीवनाच्या एका टप्प्यावर मूलगामी बदल घडवून आणणारे निर्णय घ्यावे लागले आहेत. महात्मा गांधी आफ्रिकेत गेले आणि लवकरच त्यांना राजकारणात पडावे लागले. आपल्या राजकीय आयुष्याची पहिली सुमारे २५ वर्षे गांधींनी या श्रद्धेने व्यतीत केली आहेत की, भारतावरील इंग्रजी राज्य हा ईश्वरी आशीर्वाद आहे, इंग्रज मूलतः न्यायी आहेत, इंग्रज राजवटीविषयी निष्ठा बाळगणे हे भारती-

यांचे नैतिक कर्तव्य आहे. वयाची पन्नाशी उलटल्यानंतर व दोन तपे राजकारण केल्यानंतर गांधींना निर्णय मुळात बदलावा लागला व गांधीजी म्हणाले, “ भारतावरील इंग्रजी राजवट ही मूलतः सैतानी राजवट आहे. ती भारतावरून समाप्त करणे हेच प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे. ”

असे मूलगामी निर्णय घ्यावे लागतात, ते घेतले जातात. आज जर संघाच्या चालकांना आपण ४० वर्षे केलेले गांधीजींचे मूल्यमापन मुळातच चुकीचे वाटत असेल तर ते बदलून घेण्याचा त्यांना अधिकार आहे. आणि जर परंपरेने संघ जे गांधीजींचे मूल्यमापन करत आला तेच त्यांना बरोबर वाटत असेल, तर उपचार म्हणून शताब्दी साजरी होताना संघाने काही औपचारिक गोष्टी शिष्टाचार म्हणून पार पाडल्या असल्या तरी त्या ५
शक्य तो लवकर सोडून दिल्या पाहिजेत. गोळवलकर आणि संघ यांपैकी काहीच करणार नाही ! आज गोळवलकर गांधीजींच्याविषयी आदर दाखवण्यास पुढे सरसावले आहेत, ते कुणाच्या भीतीपोटी नव्हे. या देशातील ग्रामीण भागांत राहणाऱ्या अचिकित्सक कोट्यवधी जनतेने गांधींचा ‘ संत ’ म्हणून स्वीकार केलेला आहे. श्रद्धाळू भारतीयांनी गांधींना अर्धवट ‘ ईश्वरी ’ अवतार जवळ जवळ ठरवूनच टाकलेले आहे. गांधींच्या राजकारणापासून, गांधींच्या समाजकारणापासून जर गांधी तोडून मोकळा करता आला, तर गोहत्येच्या विरोधी असणारा हिंदू धर्मावर श्रद्धा असणारा एक महान हिंदू संत म्हणून गांधींना पचवणे संघाला जड जाणार नाही. कारण श्रद्धाळू जनतेच्या मनात श्रद्धास्थान म्हणून जी माणसे उभी आहेत, ती सगळीच संघाने आत्मसात केलेली आहेत !

ज्या राजकारणाचा प्रवाह जनतेला वास्तविक प्रश्नांच्याबद्दल शहाणे करण्याच्या खटपटीत नसतो, तर याउलट जनतेच्या श्रद्धा बेमालूमपणे आपल्या राजकारणासाठी ज्यांना वापरायच्या असतात, त्यांना सगळेच संत आत्मसात करणे भाग असते. द्वैतमतवादी मध्व संघाला प्रमाण आहेत. मध्वांनी ज्यांना कलियुगातील राक्षस म्हटले ते शंकराचार्यही संघाला मान्य आहेत. यज्ञवादी वेद संघाचेच, यज्ञविरोधक बुद्ध हा तर खास संघाचा. शिवाजी आणि राणाप्रताप हे तर हिंदूंचे राज्यकर्ते म्हणून संघाला वंदनीय आहेतच; पण पंजाबात मराठ्यांच्या विरुद्ध लढलेले शीखही संघाचेच ! सगळेच आमचे म्हणून टाकल्यानंतर एकेकाचे कार्य, त्याचे वेगळेपण तपासण्याची गरजच काय ? हिंदू समाजाची ही जुनी परंपरा आहे. आम्ही एकेकाला संत, देव, महात्मा असे म्हणून पूजनीय करतो, देवळात बसवतो, त्यानंतर आमचे रस्ते सरळ होतात. कारण कुणालाच समजून घेण्याची गरज नसते, कुणाच्या अनुकरणाची गरज नसते. गांधींचा देव बनवण्याचा उद्योग काँग्रेस शासनाने कसोशीने चालवलेला

आहे. साधुसंतांच्या भोळ्या, प्रेमळ कथा सांगाव्या तशा गांधीजींच्या मनोरम कथा घोळून घोळून सांगितल्या जात आहेत. जर शासनानेच गांधींना राजकारण–समाजकारणापासून तोडून संत करायचे ठरवले असेल तर हा अख्खा हिंदू संत या देशातील धर्मातीत समाजवादी राजकीय प्रवाहाला पचण्यास जड जाईल. आणि हा संत हिंदुत्ववादी राजकारणात पार पचवला जाईल. शिवाजी हा या देशातील स्वातंत्र्य-लढ्याला विरोध करणाऱ्या हिंदुत्ववाद्यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात जसा वापरला तसा गांधी हा धार्मिक राजकारणाच्या सोयीसाठी वापरला जाण्याचा धोका आहे. गांधींना 'राष्ट्रपिता' म्हणण्याचे कारण जर राजकीय नसेल आणि संतत्व असेल तर मग हा पोरबंदरचा संत या श्रद्धाळू देशात ज्याप्रमाणे संघ गोवधबंदी आन्दोलनात वापरू शकेल, ६
त्याप्रमाणे इतर कुणाला गांधी वापरणे सोपे जाणार नाही. म्हणूनच महात्मा गांधींच्याबाबत आपण त्यांना 'राष्ट्रपिता' का म्हणतो या प्रश्नाचा नेहमी स्वच्छपणे विचार केला पाहिजे.

म. गांधींना आपण 'राष्ट्रपिता' का मानतो ? या प्रश्नाच्याकडे वळण्याच्या पूर्वी एक-दोन मुद्द्यांच्याबाबत थोडासा खुलासा करणे आवश्यक आहे. त्यांपैकी पहिला मुद्दा म्हणजे, मुस्लिम प्रश्नांच्याबाबत महात्मा गांधींना आजवर अनेकांनी अनेक प्रकारे बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे. गांधीजींच्यावर मुख्य आरोपच मुसलमानधार्जिणेपणाचा आहे. हा आरोप स्वातंत्र्यपूर्वकालात मोठमोठ्या व्यक्तींनी उच्च स्वरात केला आहे. इ. स. १९२० च्या सुमाराला खिलाफत चळवळीचे रूप पाहून किंवा १९४५ साली जिनांना वारंवार भेटण्यासाठी जाणारे गांधीजी पाहून समकालीनांनी गांधीजींच्यावर मुस्लिमधार्जिणेपणाचा आरोप केला असेल, तर तो समर्थनीय मानला नाही तरी त्या वातावरणात आपण क्षम्य मानू शकतो. समकालीनांनी केलेले मूल्यमापन महत्त्वाचेही असते, तसेच ते चुकीचेही असू शकते. पण स्वातंत्र्योत्तर काळात आता गांधीजींच्या मृत्यूला २० वर्षे उलटून गेलेली आहेत. इतक्या दूरच्या काळातील लोक ज्या वेळी गांधीजींना मुस्लिमधार्जिणे मानू लागतात त्या वेळी त्यांना अडाणी तरी म्हटले पाहिजे, किंवा अप्रामाणिक तरी म्हटले पाहिजे ! आणि मुख्य म्हणजे, अप्रामाणिकच म्हटले पाहिजे. कारण असा आरोप करणारी माणसे पुरेशी शहाणी व जाणकार आहेत.

गांधीजी स्वतःला गोखल्यांचे शिष्य म्हणवत. शिष्य म्हणवणे स्वाभाविक होते. कारण आयुष्याची पहिली पन्नास वर्षे गांधी हे इंग्रजी राज्य ईश्वरी वरदान मानत. पण गांधीजींच्या हातात देशाच्या राजकारणाची सूत्रे गोखल्यांच्याकडून आलेली नाहीत. इ. स. १९१४ नंतर देशातील प्रमुख

राजकीय संघटना जी काँग्रेस तिचे सर्वश्रेष्ठ नेते लोकमान्य टिळक होते. इ. स. १९२० साली टिळक वारले नसते तर काय झाले असते, यावर चर्चा करता येईल. पण टिळक या साली वारले आणि नंतर गांधीजी काँग्रेसचे नेते झाले. जे गांधीजी देशाचे नेते झाले ते गोखल्यांचे शिष्य व इंग्रज राजवटीला ईश्वरी वरदान मानणारे गांधीजी नव्हते. टिळकांच्या राजकारणाचा वारसा चालवणारे व इंग्रज राजवटीला सैतानी शाप मानणारे महात्मा गांधीच स्वातंत्र्यलढ्याचे नेते होणे शक्य होते. गांधीजी काहीही म्हणोत, त्यांच्याकडे वारसा आला होता टिळकांच्या राजकारणाचा. गोखलेपंथीय मंडळी गांधींची अनुयायी कधीच झाली नाही. गांधींना अनुयायी मिळाले त्यातील बहुतेक सर्व जण टिळकानुयायी होते. गोखल्यांचे अनुयायी त्यापूर्वीच काँग्रेसमधून बाहेर पडले होते. टिळकांच्या ७
राजकारणाचा वारसा गांधीजींच्याकडे कसा आला याचे फार तपशीलवार विवेचन पंचवीस वर्षांपूर्वी कै. आचार्य जावडेकर यांनी करून ठेवलेले आहे.

लो. टिळक व ना. गोखले हे दोघेही महाराष्ट्रीय व गांधीपूर्वीच्या पिढीतील भारतीय राजकारणातील श्रेष्ठ नेते. ज्याला आपण मुस्लिम प्रश्न म्हणतो तो मुख्यत्वेकरून या दोघांनी करून ठेवलेल्या महान चुकांचा गांधींकडे आलेला व निस्तरता न येणारा वारसा होता! सर्व मुस्लिम राजकारण विभक्त मतदार संघाच्या मागणीभोवती गुरफटलेले राजकारण आहे. विभक्त मतदार संघामुळे लीग बळकट झाली, ती देशविभाजनाची मागणी करू शकली, व या मागणीला तडीपर्यंत नेऊ शकली. पाकिस्तानची निर्मिती विभक्त मतदार संघ मान्य केल्यामुळे अस्तित्वात आलेली आहे. इ. स. १९०६–७ इतक्या जुन्या साली गोखले काय किंवा लोकमान्य टिळक काय, या मंडळींना पुढच्या पन्नास वर्षांत घडणाऱ्या घटनांचा आगाऊ प्रत्यय आला नसेल. सद्भावना म्हणून, सौजन्य म्हणून, डावपेच म्हणून कारणे कोणतीही असोत; पण या दोघांनी विभक्त मतदार संघाला मान्यता दिलेली होती! गोखल्यांच्या चरित्रकाराला विभक्त मतदार संघाचे गोपाळ कृष्ण गोखले समर्थक व पुरस्कर्ते होते याचा सोयीस्कर विसर पडतो! प्रत्यक्षात विभक्त मतदार संघ जाहीर झाला इ. स. १९०९ साली. त्या वेळी लोकमान्य टिळक तुरुंगात होते; पण पुढे टिळक तुरुंगातून सुटून आले व त्यांनी पुढाकार घेऊन लीगबरोबर इ. स. १९१६ साली 'लखनौ करार' केला. टिळकांच्या या कराराने नवा सिंध प्रांत अस्तित्वात आणण्यास मान्यता दिली. सिंध अस्तित्वात आला नसता तर राजकारणाचे चित्र बदलले असते. हा सिंध इ. स. १९१९ साली वेगळा झाला. टिळकांनी विभक्त मतदारसंघही मान्य केला. मुसलमानांना मध्यवर्ती कायदेमंडळात लोकसंख्येपेक्षा महत्त्वानुसार अधिक प्रतिनिधित्वही मान्य केले. या सगळ्याच घटना इ. स. १९२० पूर्वी म्हणजे गांधी देशाचे

नेते होण्यापूर्वी घडून गेलेल्या होत्या.

भारताचे नुकसान व्हावे अशी बुद्धी गोखले किंवा लो. टिळक यांच्यापैकी कुणाच्या मनात होती असे त्यांचा शत्रूसुद्धा म्हणणार नाही. टिळक जहाल पक्षीय असतील, गोखले मवाळ असतील; पण दोघांचेही भारतमातेवरील प्रेम अतिशय उत्कट व निर्मळ असे होते, याहीविषयी वाद नाही. पण प्रश्न आहे तो असा की, या दोघांच्या कारकीर्दीत जे मान्य केले गेले त्याविषयी कधी कुणी चकार शब्दही काढीत नाही; आणि लखनौ कराराच्या मूलतः पुढे जाईल असा कोणताही करार ज्या गांधींनी केला नाही ते मात्र मुसलमानधार्जिणे म्हणून ओळखले जातात! ‘ सिमला योजना ’ निश्चितपणे ‘ लखनौ करारा ’च्या पुढे जाणारी होती; पण पुरावा ८
खरा मानावयाचा तर गांधीजींनी आपले वजन ‘ सिमला योजना ’ फेटाळून लावण्यासाठी खर्च केले, ती टिकवण्यासाठी खर्च केले नाही. गांधी २७ वर्षे काँग्रेसचे नेते होते. या २७ वर्षांत क्रमाने एक एक मुस्लिम गट काँग्रेसपासून फुटून बाहेर गेला. प्रथम जीना गेले, नंतर मौ. शौकत अली, महंमद अली गेले, नंतर चौधरी खली कुज्जमान गेले. हा क्रम चालू राहिला. सर्वांत शेवटी कय्यूमखान गेले. ज्या गांधींच्या नेतृत्वकाळात एकेक मुस्लिम गट फुटून काँग्रेसविरोधी होत गेला, आणि ज्यांच्या काळात मुसलमानांना अधिक काही देणारा एकही करार नाही तो गांधी, मृत्यूनंतर वीस वर्षे ‘ मुसलमान-धार्जिणा ’ म्हणून बदनाम असावा; आणि ज्यांनी विभक्त मतदारसंघ दिले, मान्य केले, ती माणसे अत्यंत धूर्त, मुत्सद्दी म्हणून गाजलेली असावीत, यासारखा राजकीय चिकित्सकपणाचा दुसरा दिवाळखोरपणा असणार नाही.

असाच एक मुस्लिमधार्जिणा म्हणून ओळखला जाणारा पापी जवाहरलाल नेहरू नावाचा होता. या माणसाने भारत स्वतंत्र होताच विभक्त मतदारसंघ रद्द केले. मुसलमानांच्यासाठी असणाऱ्या सर्व आधिक्याच्या सोयी रद्द करून टाकल्या. ज्यांनी मुसलमानांना दिले ते हिंदुत्ववादी, ज्यांनी नवे काही दिले नाही, उलट दिलेले काढून घेतले ते मात्र मुसलमानधार्जिणे,—हा न्याय कोणत्या प्रामाणिकपणामधून येतो हे समजणे कठीण आहे! राजकारणाच्या व्यवहारात जे काही द्यायला तयार असतात ते खडखडीत भाषेत इतके मिळेल, तितके मिळणार नाही असे बोलतात व व्यवहारवादी ठरतात. जे काहीच द्यायला तयार नसतात ते नेहमीच ‘ सगळे घरच तुमचे आहे ’ अशा उदार भाषेत बोलतात, देत-घेत मात्र काहीच नाहीत! राजकीय व्यवहार म्हणून उदार भाषेत बोलणारे ते लोक मात्र भोळसर ठरतात!! गांधींनी भाषेच्या बाबतीत नेहमीच औदार्याची परिसीमा गाठली. शक्य त्या सर्व प्रकारांनी गांधीजी नेहमीच मुसलमानांना

अनुकूल बोलत राहिले. गांधींची शेकडो वचने याला साक्ष म्हणून उद्‌धृत करता येतील. गांधीजी म्हणाले, "अफगाणिस्तानच्या अमीराने जर भारतावर स्वारी केली व भारत जिंकून घेऊन इंग्रजांना हाकलून दिले तर मी स्वागत करीन!" हिंदू मंडळी चिडली. अफगाणिस्तानचा अमीर हाच इंग्रजांच्या हातांतील बाहुले होता, इतके समजण्याची शुद्ध त्या वेळी कुणालाच नव्हती! गांधीजी म्हणाले, "निझाम जर दिल्लीपती झाला तर मला चालेल." हिंदू लोक अधिक चिडले! निझामाला इंग्रजांना विचारल्याशिवाय स्वतःच्या राज्यात मंत्री नेमता येत नव्हता, हे कुणीच ध्यानात घेतले नाही!! चार प्रांत मुस्लिम बहुसंख्येचे, मागच्या पिढ्यांनी विभक्त मतदारसंघ तोडून दिलेला, डोक्यावर परकीय राजसत्ता, या वातावरणात कोणताही देशाचा नेता एखादा गट फुटून पडू नये म्हणून ९
जसे बोलतो, तसे गांधीजी बोलले. मात्र त्यांनी कोणताही करार केला नाही.

गांधींचे मुस्लिमविषयक धोरण मान्य नाही, असे मोठ्या गर्वाने सांगणे सोपे आहे. पण मान्य नाही म्हणजे काय मान्य नाही? टिळकांनी झुकते माप देणारा एक करार केला. असे असून नवीन करार गांधींनी करायचे होते काय? गांधींचे मुस्लिमविषयक धोरण हे की, मागे झाले ते झाले, यापुढे नवा करार नाही. आणि संधी मिळताच जे मागे झाले ते मिटवून टाकावयाचे. इ. स. १९२८ साली गांधींनी विभक्त मतदार संघ मोडण्याचा प्रयत्न केला. गोलमेज परिषदेत गांधींनी हाच प्रयत्न केला. गांधींच्या अनुयायांनी स्वातंत्र्य मिळताच विभक्त मतदारसंघ रद्द केले. नवा करार नाही, हे पहिले धोरण. संधी मिळताच जुने घातक करार रद्द करावेत, हे दुसरे धोरण. देणे घेणे काहीच नसल्यामुळे नेहमीच बोलावे उदार, हे तिसरे धोरण. ह्यातील नेमके कोणते धोरण मान्य नाही, हे एकदा स्पष्ट झाले पाहिजे. सत्याशी संबंध नसणाऱ्या मंडळींनी प्रथम गांधींना मुसलमानधार्जिणे ठरवले, आणि नंतर गांधींचे हे धोरण मान्य नाही अशी फुशारकी सांगितली!

शेवटी गांधी हा कुणाचा नेता होता? माझा धर्मावर विश्वास नाही ही माझी वैयक्तिक बाब झाली; पण या देशातील ८५ टक्के लोक धर्माने हिंदू आहेत, त्यांचा हिंदू धर्मावर विश्वास आहे, हे सामाजिक सत्य आहे. गांधींच्या मागे मुसलमान होतेच किती? भारतातील मुसलमान नेहमीच प्रामुख्याने काँग्रेसविरोधी राहिले. शेवटच्या काळात लीगच्या मागे उभे राहिले. मुसलमानांची शक्ती गांधींच्या मागे कधीच नव्हती. जो कोट्यवधी हिंदूंचा नेता होता, त्याच्या मागे कोट्यवधी गेले कसे, याचा विचार न करता, ज्यांना हिंदूंनीही कधी आपला नेता मानले नाही, पण जे स्वतःला नेते समजत, अशा स्वयंभू मंडळींनी स्वतःला हिंदू रक्षक मानावे व गांधींना मुस्लिमधार्जिणे मानावे याहून मोठा राजकीय विनोद कोणता

असेल? गोळवलकर गुरुजींना गांधींचे हे मूल्यमापन मान्य आहे काय?

गांधीजींच्या बाबत दुसरा नेहमी चर्चिला जाणारा प्रश्न अहिंसेच्या अतिरेकाचा आहे. गांधीजी अहिंसेच्या तत्त्वाचे लोकविलक्षण आग्रही प्रतिपादक होते. अहिंसेच्या शक्तीवर त्यांचा अलोट विश्वास होता; पण गांधीजींचा हा अहिंसावाद ही त्यांची वैयक्तिक श्रद्धा होती. ती वैयक्तिक या अर्थाने म्हणावयाची की, गांधीजींनी श्रद्धा म्हणून अहिंसेचा स्वीकार काँग्रेसने करावा, त्याखेरीज काँग्रेसचे नेतृत्व आपण करणार नाही, अशी कधी अट घातलेली नव्हती. एखाद्या राजकीय सत्तासंघर्षात अशा अटी घालणे व्यवहारतःच अशक्य असते. जनतेच्या चळवळीला अटी घालून असे कधी सांगता येत नाही की, ह्या अटी मान्य असतील तरच मी तुमच्याबरोबर येईन. काठावर बसून युद्ध करणाऱ्या जनतेला अटी घालणारे सज्जन अटींची चर्चाच करत बसतात. चळवळीचे प्रवाह अशांची उपेक्षा करतात! काँग्रेसने शान्ततामय मार्गाचा स्वीकार म्हणजेच अहिंसेचा स्वीकार धोरण म्हणून केलेला होता. तो व्यवहाराचा भाग होता. श्रद्धा म्हणून अहिंसावाद काँग्रेसने कधीच स्वीकारला नाही. गांधीजींचे नेतृत्व १९१८ ते १९२२ च्या कालखंडात क्रमाने घडत गेले. या कालखंडात गांधीजींनी पुनःपुन्हा काँग्रेसला अहिंसेची दीक्षा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण हा प्रयत्न करताना गांधीजी नेहमी म्हणाले, "अहिंसक सत्याग्रहाच्या कार्यक्रमाचा तुम्ही विचारपूर्वक व्यवहारवादी राजकीय शहाणपण म्हणून स्वीकार करा." व्यक्तिशः गांधींनी अहिंसेचा स्वीकार एक श्रेष्ठ नैतिक श्रद्धा म्हणून केला; पण काँग्रेसने तसा स्वीकार करावा यावर गांधीजी अडून बसले नाहीत. किंबहुना १९३४ साली गांधीजींनी याच एका मुद्द्यावर काँग्रेसच्या सभासदत्वाचा त्याग केला. या कालखंडानंतर गांधीजी काँग्रेसचे मार्गदर्शक राहिले, सल्लागार राहिले, जनतेचे नेते राहिले; पण ते काँग्रेसचे प्राथमिक सभासदसुद्धा राहिले नाहीत!

ज्या मंडळींनी गांधीजींचे नेतृत्व स्वीकारले ती माणसे मूर्ख, अडाणी, खेडवळ आणि अंधश्रद्ध नव्हती. गांधींचा अनुयायी वर्ग बॅरिस्टर, डॉक्टर आय. सी. एस. अधिकारी, प्रोफेसर अशा पाश्चात्य विद्याविभूषित चिकित्सक मंडळींचा बनलेला होता. ही माणसे आंधळी नव्हती, तशी अव्यवहारीही नव्हती. त्यांच्या मनात गांधीजींविषयी केवढीही श्रद्धा असली तरी त्यांचा सैन्यावर विश्वास होता, पोलिस शक्तीवर विश्वास होता, भारताच्या आधुनिकीकरणावर विश्वास होता. काँग्रेस नेहमीच संसदीय लोकशाहीची पुरस्कर्ती होती. गांधीजींची ग्रामप्रधान लोकशाही काँग्रेसने कधी स्वीकारली नव्हती. म्हणून असे दिसते की, गांधींच्या अनुयायांत सर्वात निष्ठावंत सरदार पटेल होते. सरदार कधीच अहिंसा-

वादी नव्हते, आणि त्यांची भाषाही अहिंसक नव्हती! १९२४ पासून १९३८ पर्यंत सुभाषचंद्र गांधीजींचे अनुयायी होते. तेही अहिंसक नव्हते. जयप्रकाश, लोहिया, अच्युत पटवर्धन ही सगळी समाजवादी मंडळी गांधीजींची अनुयायीच होती; पण त्यांची अहिंसेवर श्रद्धा नव्हती. इ. स. १९४२ पर्यंत कम्युनिस्टांनीही पहिली अठरा वर्षे गांधींच्या नेतृत्वाखालीच काढली, तेही कधी अहिंसक नव्हते. संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा नेता म्हणून जेव्हा आपण गांधीजींच्याकडे पाहू लागतो तेव्हा ते नेतृत्व अहिंसेचा धोरण म्हणून स्वीकार करणारे आहे, अहिंसेचा अतिरेक करणारे नाही, ही गोष्ट ध्यानात येते.

लो. टिळक आणि भारतातील क्रांतिकारक यांचे संबंध नेहमीच घनिष्ठ ११
राहिले. या टिळकांच्या अनुयायांपैकी किंवा मित्रांच्यापैकी बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय, किंवा खाडिलकर, शिवरामपंत परांजपे ही माणसे टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीजींच्या नेतृत्वाखाली जमा झाली. निष्ठा म्हणून अहिंसेचा स्वीकार करणारा यांच्यात कोण होता? लो. टिळकांनीही कधी अहिंसेचा निष्ठा म्हणून स्वीकार केलेला नव्हता, पण जाहीरपणे तेही शांततामय मार्गावर आपला विश्वास प्रतिपादन करत असत. एका परतंत्र राष्ट्रातील स्वातंत्र्यलढा नेहमी असाच असतो. सशस्त्र क्रांतिकारकांची चळवळ परतंत्र राष्ट्रात नेहमीच गुप्त चळवळ असणे भाग असते. अशा गुप्त चळवळी फक्त मूठभर लोकांच्या होऊ शकतात, त्या जनतेच्या चळवळी होऊ शकत नाहीत. जनतेची जाहीर चळवळ नेहमी शांततावादाच्या घोषणा करतच वाढत असते. जनतेला जागे करणे, तिला संघटित करणे, तिच्यात बलिदानाची प्रेरणा जागृत करणे या बाबींचे पुरेसे महत्त्व कधी आपण लक्षात घेत नाही. जो माणूस शांतपणे काठ्या खाण्यासाठी, गोळ्या खाऊन मरण्यासाठी, तुरुंगात जाण्यासाठी लाख माणसे गोळा करू शकतो तो माणूस म्हणजे एक शक्ती असते. दहा वर्षे गोळ्या खाऊन मरा, ही घोषणा करणारा माणूस एक दिवस गोळ्या घाला आणि लढत लढत मरा, असेही सांगू शकतो! ज्या दिवशी हा नेता असे सांगतो त्या दिवशी लाख माणसे शस्त्रही हाती घेऊन उठत असतात. ही संघटना निर्माण करणे हे महत्त्वाचे काम असते. हा प्रश्न केवळ गांधीजींपुरता नव्हता, बादशहाखानांनाही हा प्रश्न लागू होता.

बादशहाखानांनी पठाणांना संघटित करण्यास आरंभ केला, त्या वेळी त्यांची भूमिका शैक्षणिक व सामाजिक सुधारणेचीच होती. राजकीय प्रश्नांच्याविषयी ते गप्प होते. कार्यक्रम शान्ततेचाच होता. इंग्रज अधिकारी बादशहाखानांना म्हणत, "तुमच्या मागे हजारो लोकांची संघटना उभी आहे, हीच आक्षेपार्ह गोष्ट आहे! आज तुम्ही शैक्षणिक व

सामाजिक गोष्टी बोलता. काय नेम सांगावा,–उद्या तुम्ही राजकीय हक्क मागू लागाल. आज तुम्ही पठाणांना शान्तपणे बलिदान करा म्हणून सांगता, उद्या जीव घ्या म्हणून सांगाल.” लक्षावधी लोकांच्या मनावर पकड असणारा माणूस, हीच घटना इंग्रज सरकारच्या दृष्टीने आक्षेपार्ह होती! कोणाही साम्राज्यवादी सत्तेला ती आक्षेपार्हच वाटेल. गांधी अहिंसावादी असले म्हणून काय झाले? कॉंग्रेससाठी अहिंसा हे धोरण होते, आणि वेळ आली असती तर कॉंग्रेसने हे धोरण बदलले असते, इतके समजण्याची बुद्धी महाराष्ट्रातील बुद्धिजीवी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंडळींना नसली तरी इंग्रजांना खास होती!! म्हणून गांधी युगात शान्ततेचा, अहिंसेचा जप करणारे कार्यकर्ते इंग्रज सरकारकडून पुनःपुन्हा पकडले जाताना, हद्दपार होताना दिसतात, आणि चोवीस तास हिंसेची भाषा बोलणारी हिंदुत्ववादी मंडळी राजरोस वावरतात, त्यांना पकडण्याची गरज इंग्रज सरकारला वाटत नाही! कॉंग्रेस कार्यकर्त्यांचा शान्ततावाद इंग्रज सरकारच्या मते जास्त धोकादायक होता. हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांच्या सशस्त्र क्रान्तीच्या घोषणा इंग्रजांना फारशा भीतिदायक कधीच वाटल्या नाहीत. वस्तुस्थिती अशी आहे की, इ. स. १९२० नंतरचे जे सशस्त्र क्रांतिकारक होते त्यांनीही आपली संघटना कॉंग्रेसच मानली होती, नेते गांधींनाच मानले होते.



अशा सशस्त्र क्रान्तिवाद्यांचे मुकुटमणी म्हणून बाबू सुभाषचंद्र बोस यांचा उल्लेख केला तर तो गोळवलकरांना आक्षेपार्ह वाटणार नाही अशी आशा आहे. सुभाषबाबूंना कॉंग्रेसच्या बाहेर पडावे लागले याचे कारण गांधीजी होत, ही सर्वप्रसिद्ध गोष्ट आहे. पण गांधीजींशी भांडून कॉंग्रेसबाहेर पडलेले सुभाषचंद्र भारतातून अफगाणिस्तान, रशिया या मार्गाने जर्मनीला जातात. जर्मनीतून ते जपानला येतात, आणि ब्रह्मदेशात सुभाषचंद्रांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकार कायम होते. या राष्ट्रीय मुक्ति-फौजेचा तर अहिंसेशी संबंध नव्हता ना? भारताच्या स्वातंत्र्यासाठी सरळ तोफा-बंदुका-रणगाडे घेऊन लढणारे हे सैन्य होते; पण भारताच्या या प्रतिसरकारने आपल्या ताब्यातील प्रदेशात गांधीजयंती हा सुटीचा दिवस जाहीर केला. गांधीजींना राष्ट्रपिता मानले, कॉंग्रेसला देशातील जनतेची एकमेव प्रातिनिधिक संघटना मानली! सुभाषचंद्रांच्या राष्ट्रीय फौजांच्या तोफा ज्या ध्वजाखाली आग ओकीत होत्या तो गांधींच्या सल्ल्याने स्वीकारलेला कॉंग्रेसचा तिरंगी चरखांकित ध्वज होता! सुभाषचंद्रांचे उदाहरण हे अखिल भारतीय कीर्तीचे फार मोठे उदाहरण झाले. या स्वातंत्र्यलढाईच्या वेळी मी आणि माझ्यासारखे अनेक जण तर केवळ अल्पवयीन पोरे होतो. हैद्राबादच्या मुक्ति-आंदोलनात जमेल तितका शस्त्रांचा वापर स्टेट कॉंग्रेसनेच केला. मीच अनेकदा गांधींचा जयजयकार

करत शस्त्रे वापरणारी पथके पाहिली, ऐकली आहेत.

याचा थोडक्यात अर्थ असा की, इ. स. १९२० पूर्वी जे वंगभंगाच्या बहिष्कारात होते आणि जे देशात अगर परदेशांत सशस्त्र क्रान्तीचा प्रयत्न करत होते, त्या सर्वांनीच टिळकांना आपला नेता मानले होते. १९२० नंतर जे जनतेचे प्रतिनिधी कायदेमंडळात होते, जे लाखो सत्याग्रही तुरुंगात होते, आणि जे सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नात होते, त्या सर्वांचे नेते गांधीच होते. अहिंसेने असो, की हिंसेने असो, जे इंग्रजांच्या विरुद्ध लढत होते, त्यांचे नेते गांधीच होते. जे इंग्रजांच्याविरुद्ध लढत नव्हते, ज्यांना सरहद्द प्रांतात मुस्लिम लीगशी हातमिळवणी करून काँग्रेसचा पाडाव करण्यात संकोच कधीच वाटला नाही, जे जनतेची चळवळही करत १३
नव्हते, लढतही नव्हते, फक्त हिंसेच्या आवश्यकतेवर व्याख्यानें देत होते, ही क्रियारहित माणसे फक्त गांधीजींची विरोधक होती !

शेवटी भारतासारख्या निःशस्त्र व निस्त्राण केलेल्या समाजाला सशस्त्र लढा तरी कसा देता येईल,– या घटनेचेही एक व्यवहारवादी तर्कशास्त्र असते. हिंदुस्थानसारखा देश इंग्रजांनी जिंकलेला असतो हे जितके खरे तितकेच इंग्रजांनी जिंकलेला नसतो हेही खरे आहे ! इंग्रजांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैनिकच भारत जिंकण्याचे काम करत असतात, गुलामगिरीत भारत शिल्लक ठेवण्याचे काम करत असतात. पोलिस, सेना आणि सहकारी यंत्रणा ही राष्ट्रीयत्वशून्य, आत्मग्लानी आलेल्या भारतीय जनतेचीच बनलेली असते. फौजा जरी झाल्या तरी त्यांच्यात त्या देशातील जनताच असते. हिंसेच्या मार्गाने असो की अहिंसेच्या मार्गाने असो, देशातील कोट्यवधी जनतेच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याची उत्कट इच्छा निर्माण करणारा जो या जनतेचा नेता असतो, तोच शेवटी पोलिस व फौजांचाही नेता होत असतो. इ.स. १९४३ नंतर भारतीय सेनेची साम्राज्यनिष्ठाच संशयास्पद झालेली आहे, ही गोष्ट इंग्रजांना दिसू लागलेली होती. फौजेतील लक्षावधी तरुणांना गांधी, नेहरू आपले नेते वाटत. डॉ. लोहियांनीसुद्धा आठवणी सांगताना असे म्हटले आहे की, जर इ. स. १९४५ नंतर भारतात पुन्हा एखादा प्रचंड लढा द्यावा लागला असता तर ब्रिटिश विमाने आणि ब्रिटिश बाँब यांचा भारतीय वैमानिकांनी साम्राज्यविरोधी केलेला विलक्षण वापर दिसण्याची वेळ जवळ आली होती ! फौजांची एवढी मोठी निष्ठा गांधींना मिळते याचे कारण गांधी फौजांच्यामध्ये छुपा प्रचार करत होते हे नसते; फौजा जनतेच्या बनतात, भारतीय जनता गांधींच्या मागे संघटित होत गेली हे त्याचे कारण असते. अहिंसेच्या कठोर निष्ठा ही व्यक्ती गांधींची उच्च, उदात्त आध्यात्मिक निष्ठा असते. ती समाजाला पेलेल, कदाचित पेलणार

नाही. गांधींचे सार्वजनिक नेतृत्व मात्र या निष्ठेशी निगडित नसते. ज्यांनी गांधींचा आर्थिक, राजकीय कार्यक्रम स्वीकारला अशी सर्वोदयवादी मंडळीही त्या काळी होतीच; पण या मंडळींना काँग्रेस संघटनेत कधीच फारसे वजन नव्हते.

मुस्लिमधार्जिणेपणा आणि अहिंसेचा अतिरेक हे गोळवलकर गुरुजींचे गांधीजींच्या संदर्भातील दोन्ही मुद्दे फोल आहेत; पण हे मुद्दे फोल असले काय किंवा हे मुद्दे म्हणजे फार मार्मिक सत्य असले काय त्याला फारसे महत्त्व नाही. भारतीय जनता गांधींना ते अहिंसक होते म्हणूनही राष्ट्रपिता मानत नाही, ते मुस्लिमधार्जिणे होते म्हणूनही राष्ट्रपिता मानत नाही. मोगल राजांशी सोयरिक करणारे रजपूत राजे आणि त्यांचे राज्य वाढवण्या-टिकवण्यासाठी झटणारे रजपूत सरदार मुस्लिमधार्जिणे होते. पण ते आदरणीय कधीच ठरले नाहीत. अनेक जैन मुनी कमालीचे अहिंसक होते, ते आदरणीय ठरले तरी राष्ट्रपिते मानले गेले नाहीत. गांधींना आम्ही राष्ट्रपिता मानतो, त्याचे कारण कोणते, याचे उत्तर याहून निराळे असले पाहिजे. १४

एखादा माणूस राष्ट्रपिता ठरण्याचे कारण त्याची मते हे नसते. मते बरोबर किंवा चूक असू शकतात. ती कुणाला पटतील, कुणाला पटणार नाहीत. मतावरून कुणी माणूस राष्ट्रपिता होत नाही, तो कर्तृत्वामुळे राष्ट्रपिता होतो. ज्याच्या कर्तृत्वामुळे परतंत्र झालेल्या देशातील कोट्यवधी लोक नवा विश्वास, नवा उत्साह घेऊन जागे होतात, स्वातंत्र्याच्या लालसेने उद्दीपित होतात, त्याच्यावरील श्रद्धेने बलिदानाला तयार होतात, त्याच्यामागे संघटित होतात, तो माणूस ‘ राष्ट्रपिता ’ असतो. गांधींनी हे कार्य केले किंवा नाही, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. गोळवलकरांनीच असे म्हटले आहे की, गांधीजींनी या देशातील जनतेला स्वातंत्र्याची प्रबल प्रेरणा दिली. नेमक्या याच कारणामुळे गांधींना आम्ही राष्ट्रपिता मानतो.

जनतेला स्वातंत्र्याची प्रबल प्रेरणा देणे म्हणजे तरी नेमके काय ? भारतीय स्वातंत्र्यलढ्यात जनतेचा विचार खऱ्या अर्थाने गांधीजींच्यापासूनच सुरू होतो. हिंदुस्थान हा औद्योगिक दृष्ट्या, शैक्षणिक दृष्ट्या मागसलेला, धर्मश्रद्ध जनतेचा, शेतीप्रधान, ग्रामप्रधान देश आहे. देशातील ७८ टक्के जनता आजही खेड्यातून राहते. या ७८ टक्के जनतेला जर इंग्रजांचे राज्य संपले पाहिजे, भारत स्वतंत्र झाला पाहिजे असे वाटले नाही तर हा देश स्वतंत्र होणेही शक्य नव्हते. आणि या देशात लोकशाही नांदणेही शक्य नव्हते. इंग्रजांच्या राज्यासारखे बलाढ्य साम्राज्य शस्त्रबलाने पराभूत करणे

कुणालाच शक्य नव्हते. सशस्त्र क्रांतिकारकांची सशस्त्र चळवळ इंग्रज राजसत्तेविरुद्ध निषेध व्यक्त करू शकत होती, ती इंग्रजांची राजवट समाप्त करू शकत नव्हती.

सशस्त्र क्रान्तीच्या प्रयत्नात नेहमीच दोन धोके फार मोठे असतात. पहिला धोका म्हणजे सशस्त्र क्रान्तीचा कार्यक्रम हा विध्वंसाचा कार्यक्रम असतो. रेल्वे, पूल, कारखाने, तारायंत्रे यांचा विध्वंस करतच सशस्त्र क्रान्तीचा कार्यक्रम वाटचाल करत असतो. भारतासारख्या मागसलेल्या देशात सुधारणा आणि आधुनिकीकरण यांचे प्रमाण आधीच फार थोडे असते. हे थोडे असणारे आधुनिकतेचे प्रमाणही जर स्वातंत्र्यलढ्यात नष्ट होऊ लागले किंवा नष्ट करावे लागले तर अशा स्वातंत्र्यलढ्याचा ज्या वेळी यशस्वी शेवट होत असतो तो वेळपर्यंत सगळे आधुनिकीकरण उध्वस्त होऊन देश मध्ययुगात मागे फेकला गेलेला असतो. मागसलेले देश मागसलेले असतात म्हणूनच परतंत्र झालेले असतात, आणि परतंत्र असतात म्हणून त्यांचे मागसलेपणा लवकर संपत नाही. अशा देशाच्या स्वातंत्र्याची स्वप्ने जे पाहतात ते मग नेहरू असोत की सावरकर असोत, त्यांना स्वतंत्र देश आधुनिक व बलवान करावयाचा असतो. आधीच जेत्या सरकारच्या गरजेपोटी अस्तित्वात आलेले छोटेसे आधुनिकीकरण उपलब्ध असते, ते संपवण्याचा पिसाटपणा विचारी नेत्याला करता येत नाही. म्हणून प्राप्त झालेले आधुनिकीकरण शक्य तो जतन करत स्वातंत्र्य लढा पुढे रेटायचा असेल, तर शांततामय मार्ग हाच शहाण-पणाचा मार्ग असतो. नेहरूंसारखी समाजवादी माणसे या कारणासाठीच सत्याग्रहाची पुरस्कर्ती झालेली असतात.

मागसलेल्या देशात दुसरा धोका हुकूमशाहीचा असतो. जनता जागीही नसते, संघटितही नसते. तिला हक्काची जाणीव प्राप्त झालेली नसते. हक्कांसाठी झगडण्याची परंपराही नसते. कोणत्याही चळवळीची शक्ती कार्यकर्त्यांच्या चर्चा-शिबिरातून वाढत नसते. शक्तीचा विकास लढ्या-मधून होत असतो. जनतेला जागे करावयाचे असेल तर लढ्याचे स्वरूप जनतेला पेलण्याजोगे असावे लागते. कायदा तोडायचाच असेल तर लक्षावधींना चटकन तोडता येईल, असा कायदा तोडावा लागतो. सभा घेण्याची, शिस्तबद्ध रीतीने कायदे तोडण्याची आणि कायदे पाळण्याची नवी परंपरा निर्माण करावी लागते. कायदेही छोटे असतात, ते तोडणाऱ्यांना शिक्षाही छोटी मिळते; पण ती लक्षावधींना नवे धैर्य देत असते ! नेते सांगतील तेवढेच कायदे तोडा, उरलेले कायदे प्रामाणिक-पणे पाळा; कायदे चोरून तोडू नका, जाहीर तोडा; त्याचे परिणाम तक्रार न करता भोगा, असे गांधीजींच्या सत्याग्रह-चळवळीचे स्वरूप होते. या

चळवळीने केवळ लोकांना कायदे तोडण्यासच शिकवले नाही, सामाजिक जबाबदारीने कायदे पाळण्यासही शिकवले आहे. सत्याग्रहींना पोलिस, आम्ही तुम्हांला अटक केली म्हणून सांगत. पुष्कळ वेळा कैदी तुरुंगापर्यंत चालत जात, पळून जात नसत. जेलचे नियम पाळत; तोडीत नसत. तुरुंगातून पळून जात नसत. आपल्या सभांना आपण शिस्त लावत. गांधींनी खेड्यापाड्यांना सभा घेणे शिकवले. ठराव, चर्चा, मतदान, निवडणूक जिंकणे, अल्पमतवाल्यांनी पराभव सहन करणे ही सगळीच शिकवण गांधीजींच्या चळवळींनी दिली. गांधींच्या चळवळीतून लोकशाही थोडी फार अंगवळणी पडलेले लाखो लोक निर्माण झाले, म्हणून देशात निवडणुका शांतपणे पार पडतात. सरकारविरोधी चळवळीही खूपच संयमाने, शांततेने होतात. भारताच्या ग्रामीण भागाला गांधींनी हलवून जागे केले, संघटनेची सवय लावली, शांततामय चळवळीची सवय लावली, हक्कांची जागृती आणली, हे सारे करणारे गांधी हिंदुस्थानात होते म्हणून आशिया–आफ्रिकेत फक्त भारतातच लोकशाहीचा प्रयोग काहीसा टिकलेला दिसतो. गांधीच्या विशिष्ट पद्धतीमुळे सरकारला जनमतासमोर नमण्याची सवय लागली आहे, लोकशाही शक्य झाली आहे. लाखो लोक संघटित व जागृत करणे हे काम महत्त्वाचे असते. ही लाख मने पेटून उठल्यानंतर रस्ता शांततेचा स्वीकारावयाचा की हिंसेचा, याचा निर्णय घेण्याचा नेत्यांना वाव असतो. हे कार्य करण्यापूर्वीच जे लोक सशस्त्र क्रांतीच्या घोषणा करतात, त्यांना लोकशाहीही नको असते आणि जनतेची जागृतीही नको असते.



गांधीजींच्या कार्याचे हे सगळे मूल्यमापन गोळवलकरांना मान्य आहे काय ? कारण हे मूल्यमापन मान्य करणे म्हणजे गांधीजींच्या पूर्वी शहरी सुशिक्षितांच्यामध्येच चुळबूळ करणारी सशस्त्र व निःशस्त्र क्रान्तिकारकांची पिढी अपरिपक्व होती, हे मान्य करणे होय. आणि त्या तुलनेने गांधीजींचे राजकारण अधिक व्यवहारवादी, वस्तुनिष्ठ व परिपक्व होते, हे मान्य करणे होय. रानडे, गोखले, टिळक यांच्या मानाने गांधी राजकीय नेते म्हणून अधिक विकसित, परिपक्व व व्यवहारी होते हे मान्य करण्याची गुरुजींची तयारी आहे काय ? गांधी स्वतः इंग्रजांच्या विरुद्ध अहिंसेच्या शस्त्राने लढत होते; पण ज्यांना शस्त्रच हाती घ्यावयाचे होते, त्यांना तेही मार्ग मोकळे होते. ज्यांना निःशस्त्रही लढावयाचे नव्हते, सशस्त्रही लढावयाचे नव्हते, ज्यांना मुळात लढावयाचेच नव्हते, त्या सर्व मंडळींनी फक्त गांधींची चेष्टा करण्यावर भर दिला ! सुदैवाने यांपैकी कुणालाही यश आले नाही, हा प्रश्न निराळा; पण निष्क्रिय मंडळींचा हा गांधीजींच्यावर टीका करण्याचा उद्योग फक्त इंग्रजी राजवटीचे हात बळकटच करत होता. गांधींची चेष्टा करणाऱ्या हिंदुत्ववाद्यांनी इंग्रजांच्या विरुद्ध एकही सशस्त्र

उठाव केला नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कार्य इ. स. १९१० पूर्वीचे होते. पुन्हा सावरकर राजकारणात आले इ. स. १९३७ साली !

इ. स. १९३७ ते इ. स. १९४७ सावरकरांनी जे लढे दिले, त्यांचे स्वरूप भागानगर निःशस्त्र प्रतिकाराचे तरी होते किंवा निवडणुका लढवण्याचे तरी होते. केळकरांच्यासारख्या टिळकानुयायांनी तर कोणताच लढा दिला नाही ! राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संघटना फक्त संघटनाच बांधत बसली !! हे सगळेच हिंदुत्ववादी इ. स. १९२० नंतर फक्त प्रति-सहकारवादी झाले. इंग्रजांच्या विरुद्ध एकही हिंदुत्ववादी लढ्यात कधी उतरलाच नाही. हा स्वातंत्र्याच्या चळवळीशी असणारा सर्व हिंदुत्व-वाद्यांचा बेजबाबदार घटस्फोट आज तरी गोळवलकर मोकळेपणाने स्वीकारण्यास तयार आहेत काय ? लढले गांधीजी. तो लढा करणारे किती बावळट आहेत याची मिटक्या मारत वर्णने केली हिंदुत्ववाद्यांनी ! न लढणाऱ्यांचा हा वाचाळपणा सतत २५ वर्षे टिकलेला एक स्वातंत्र्य-द्रोह होता, हे मान्य करण्याची ज्यांची तयारी नसते त्यांनी गांधींना स्वातंत्र्यलढ्याचे नेते म्हणण्यात अर्थ नसतो ! कारण ज्यांनी स्वातंत्र्य-लढ्याशी फक्त वैरच केले ते तुमचे जिव्हाळ्याचे जिवलग असतात. निदान हैद्राबादचा लढा हा तर मुस्लिमविरोधी होता. भारताची एकात्मता निर्माण करणारा होता. हिंदुत्ववाद्यांनी या लढ्यात तरी काय भाग घेतला ? शक्ती लहान असणे हा गुन्हा नसतो. स्वातंत्र्यलढा चालू असताना शक्ती न वापरणे हा मात्र गुन्हा असतो ! निझामवर बॉंब फेकणारा पुन्हा गांधींचा जयघोष करणाराच असतो. हिंदुत्ववाद्यांच्या पिस्तुलांना कासिम रझवी दिसला नाही. निझाम व जिना दिसले नाहीत. या पिस्तुलातील गोळी इ. स. १९२० नंतर इंग्रजांच्याही विरोधी झाडली गेली नाही. जणू ही गोळी फक्त गांधींसाठी होती !



गांधींना हिंदुत्ववाद्यांनी नेहमीच द्वेष्य मानले. मुसलमान फाळणी करून वेगळा तुकडा मागत होते, त्यांचा फारसा द्वेष हिंदुत्ववाद्यांना वाटला नाही. त्यांचा सगळा तिरस्कार अखंड भारत टिकवण्यासाठी सतत मुसलमानांना सांभाळून घेणाऱ्या गांधींच्या विरुद्ध उफाळून आला ! अखंड भारतात बंगाल, पंजाब, सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांत हे चार प्रांत मुस्लिम बहुसंख्येचे होते. काश्मिर हे संस्थानही मुस्लिम बहुसंख्येचे होते. या भागात अखंड भारतवादी शक्तींनी निवडणूक जिंकल्याशिवाय अखंड भारत निर्माण होणे शक्यच नव्हते. शनिवारवाड्यासमोर ‘ हिंदुस्थान हिंदुओंका ’ अशी घोषणा करणे सोपे होते; पण या घोषणेवर सिंध, पंजाबच्या निवडणुका कशा जिंकता आल्या असत्या,

याचा विचार करण्यास हिंदुत्ववादी शुद्धीवर होते कुठे? हिंदू हे एक स्वयंभू राष्ट्र असून मुसलमान हे आपल्यापेक्षा पृथक राष्ट्र आहे, हेच तर हिंदुत्ववाद्यांचे कायमचे तुणतुणे होते! जर मुसलमान हे वेगळे राष्ट्र असतील तर त्यांचा बहुसंख्य असणारा प्रदेश हिंदुस्थानच्या बाहेर जाणारच, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ होती.

भारताची फाळणी टाळण्यात गांधींना अपयश आले हे कुणीच नाकबूल करणार नाही. पण हे अपयश का आले? मुसलमानांशी करारामागून करार करत टिळक–गोखल्यांच्या वाटेने गांधी निघाले असते तर भारत अखंड राहिला असता, पण मग ४० कोटी हिंदूंचे जीवित सांस्कृतिक दृष्ट्या उध्वस्त झाले असते; आणि भारताचे भवितव्य राजकीय दृष्ट्या अंधारले असते! हिंदूंचे भवितव्य उध्वस्त होऊ देण्यास गांधीजी तयार नव्हते, म्हणून फाळणी टळू शकली नाही. मुस्लिम समाजाला वेगळे राष्ट्र मिळत असताना त्यांना अल्पसंख्य म्हणून राहण्यात प्रेम कसे वाटावे? शिवाय त्यांच्या मदतीला इंग्रजांची फुटीर नीती होतीच. म्हणून गांधी अखंड भारत टिकवण्यात अयशस्वी झाले. गांधींचे अपयश मान्य केले तरी अखंड भारत टिकवण्याची लढाई ते सर्व सामर्थ्यानिशी खेळले होते. जे लढत राहिले आणि शक्ती अपुरी पडल्यामुळे पराभूत झाले त्यांचे नेते गांधी होते; पण ज्यांनी लढाच दिला नाही, अखंड भारत टिकवण्याची लढाई देण्यापूर्वी ज्या मंडळींनी मुस्लिम लीगचा द्विराष्ट्रवादाचा सिद्धान्त मान्यच करून टाकला त्यांचे वर्णन कसे करावे? हिंदुत्ववाद्यांनी नेमके हेच कार्य केले. अखंड भारताचा तोंडाने जयघोष करत या मंडळींनी द्विराष्ट्रवाद मान्य केला आणि अखंड भारत टिकवण्यासाठी लढण्याऐवजी युद्धापूर्वीच रणातून पळ काढला! पराक्रमी जखमी वीराला तो पराभूत झाला म्हणून सज्जात बसून चकाऱ्या पिटणाऱ्यांनी हिणवावे अशातलाच हा प्रकार होता. ही मीमांसा गोळवलकरांना मान्य आहे काय? ही मान्य असेल तर गांधी प्रातःस्मरणीय ठरवण्यात अर्थ असतो. एरव्ही जे लढताना मेले आणि जे अंथरुणावर झोपून मेले त्या दोघांनाही सारखेच वंदनीय ठरवण्यात अर्थ नसतो.



या सर्व विवेचनावर एक आक्षेप असा घेतला जाऊ शकतो की, हिंदुत्ववादी लढणार म्हणजे काय करणार होते! त्यांच्यामागे जनतेचे फारसे पाठबळ नव्हते. त्यांची शक्तीच अपुरी होती. जनता गांधींच्या मागे होती, निवडणुका काँग्रेसने जिंकल्या होत्या. म्हणून जबाबदारी हिंदुत्ववाद्यांची नव्हती. जबाबदारी गांधीजींची होती. असे म्हणणाऱ्यांना मी फक्त एकच प्रश्न विचारीन की, जनता गांधीजींच्या मागे होती हे तुम्ही मान्य करता काय? शेवटी गांधींची शक्ती कशात होती? शस्त्र आणि

सेना हे काही गांधीजींचे बळ नव्हते. जनतेचे गांधीजींवर असणारे प्रेम हेच गांधींचे एकमेव सामर्थ्य होते. जनतेचे प्रेम हेच ज्याचे एकमेव सामर्थ्य, त्याला गोळी घालणारा माणूस जनतेलाच गोळी घालत असतो; तो हुतात्मा नसतो, फक्त राजकीय खुनी असतो, हे तरी मोकळेपणानें हिंदुत्ववाद्यांनी कधी मान्य केले आहे काय? शेवटी जनता गांधींच्या मागे गेली म्हणजे तरी काय? मुस्लिम समाज गांधीजींच्या मागे कधीच नव्हता. गांधीजींचे नेतृत्व हे हिंदू समाजाचे नेतृत्व होते. या देशात ८५ टक्के लोक हिंदू होते. हिंदू जर हिंदुत्ववाद्यांच्या मागे गेले असते तर गांधींची राजकीय किंमत शून्य झाली असती. कारण हिंदूंचा पाठिंबा हेच गांधींचे सामर्थ्य होते. हिंदुस्थानातील हिंदू लोक हिंदू धर्मावर निष्ठा ठेवणारे होते व आहेत; ही हिंदू धर्माची हिंदू धर्मनिष्ठ माणसे हिंदुत्व- १९
वाद्यांच्या मागे न जाता गांधींसारख्यांच्या मागे काय म्हणून गेली? हिंदुस्थानातील हिंदू हिंदुत्ववाद्यांच्या मागे का नाहीत, हा या चर्चेतील मूलभूत प्रश्न आहे.

गोळवलकर काय किंवा गांधीजी काय, दोघेही शुद्ध चारित्र्याचे प्रामाणिक असे नेते आहेत, याविषयी माझ्या मनात शंका नाही; पण या दोघांच्या रूपाने दोन राजकीय प्रवाह आणि प्रवृत्ती परस्पर विरोधी आहेत. या स्पर्धेत माणसे महत्त्वाची नाहीत. कारण गांधींना मरून वीस वर्षे झाली तरी पुढच्या काळात नेहरूंचे नेतृत्व म्हणजे पुन्हा हिंदूंचेच नेतृत्व होते. आपल्या राजकारणात हिंदू जनता विरुद्ध हिंदुत्ववाद हाच एक महत्त्वाचा प्रश्न आहे! जे हिंदू जनतेच्या वतीने उभे आहेत, ते हिंदुत्ववादाच्या विरोधी उभे आहेत. ह्या प्रवृत्तीचे महान नेते महात्मा गांधी होते, आणि जे हिंदुत्ववादाच्या बाजूने उभे आहेत ते हिंदू जनतेच्या विरोधी उभे होते. गोळवलकर या हिंदुत्ववादी, पण हिंदू जनताविरोधी प्रवृत्तीचे प्रमुख नेते व प्रतिनिधी आहेत!

आज स्वातंत्र्योत्तर भारतात हिंदूंची लोकसंख्या फार प्रचंड आहे, हे तर खरेच; पण फाळणीपूर्वीच्या अखंड भारततही हिंदूंची लोकसंख्या इतकीच प्रचंड म्हणजे ७५ टक्क्यांच्या आसपास होती. स्वातंत्र्यपूर्वकाळी काय किंवा स्वातंत्र्योत्तरकाळी काय, या देशात असणाऱ्या प्रचंड हिंदू लोकसंख्येने भारतासमोरील सर्व प्रश्नांचे स्वरूप हिंदूंच्या प्रश्नासारखे करून टाकले आहे. आपण नुसता शिक्षणाचा प्रश्न जरी घेतला तरी या देशातील प्रचंड लोकसंख्या अशिक्षित आहे. लोकसंख्येतच हिंदूंचे प्रमाण प्रचंड असल्यामुळे अशिक्षितांच्यामध्येही बहुसंख्याक हिंदूच असणार हे उघड आहे. या सर्व हिंदू जनतेला जर आपण शिक्षणाच्या पुरेशा सोयी उपलब्ध करून देऊ शकलो, तर त्या कार्यासाठी काढलेल्या शाळांच्या-

मधून अल्पसंख्य असणाऱ्या सर्वांच्या शिक्षणाच्या सोयी आपोआप होऊन जातात. बोलायचे कोणत्या भाषेत या प्रश्नाचे उत्तर राजकीय नेत्यांनी द्यावयाचे आहे; पण प्रत्यक्ष व्यवहारात भारत सुशिक्षित करण्याचे काम आणि भारतातील हिंदूंना सुशिक्षित करण्याचे काम या दोन्ही कामांसाठी जवळ जवळ तितक्याच शाळा उघडाव्या लागतील, तेवढाच पैसा खर्च करावा लागेल. आपण म्हणतो, हा देश मागसलेला आहे, या देशातील लोकांची मने मागसलेली आहेत. आपण कधी याचा विचार करत नाही की, मागसलेली मने असणाऱ्यांत बहुसंख्या कोणाची असेल ? त्याही क्षेत्रात बहुसंख्यांक हिंदूच असणार हे उघड आहे. ८५ टक्के हिंदूंची मने आधुनिक करण्यासाठी जे वैचारिक व भौतिक अशा
उभय पातळीवरून प्रचंड आंदोलन उभे करावे लागेल, त्या प्रक्रियेतच २०
साऱ्या अल्पसंख्याकांचे आधुनिकीकरण होऊन जाईल. नेमका हाच प्रश्न दारिद्र्याचा आहे. या देशातील दरिद्री लोकांच्यामध्ये पुन्हा बहुसंख्या हिंदूंचीच आहे.

वरील विवेचनाचा अर्थ हिंदूंना साक्षर करावे, इतरांना करू नये, हिंदूंचे दारिद्र्य दूर करावे, इतरांचे करू नये असा घ्यावयाचा नाही. या विवेचनाचा अर्थ असा आहे की, हिंदूंची प्रचंड लोकसंख्या या देशात असल्यामुळे हिंदूंचे दारिद्र्य दूर करण्याचा कार्यक्रम व भारताचे दारिद्र्य दूर करण्याचा कार्यक्रम हे दोन्ही कार्यक्रम व्यवहारतः एकच आहेत. ही परिस्थिती एवढ्या भारताचीच आहे असे नाही, पाकिस्तानची हीच परिस्थिती आहे. तेथील प्रत्येक प्रश्न हा मुसलमानांचा प्रश्न आहे. इजिप्तमधील प्रत्येक प्रश्न हा उघडच मुसलमानांचा प्रश्न आहे. कोणत्या तरी एका धर्मगटाची प्रचंड बहुसंख्या असणाऱ्या देशात त्या धर्मगटातील जनतेचे प्रश्न आणि देशाचे प्रश्न वेगळे नसतात, एकच असतात.

गांधीजींच्या काळी नव्हे, आजही जर एखाद्या राजकीय पक्षाच्या मागे बहुसंख्यांक हिंदू समाज उभा राहिला तर लोकशाही असो की हुकूमशाही असो, शासनावर प्रभुत्व अशा पक्षाचेच राहते. दुर्दैवाने आमच्या देशातील हिंदुत्ववादी पक्षांना हिंदू जनतेविषयी कवडीइतकी आस्था पूर्वी कधी वाटली नाही, आजही जनतेची आस्था हिंदुत्ववादाला दिसत नाही ! जर अशी परिस्थिती नसती आणि हिंदुत्ववाद्यांना हिंदू जनतेची चिंता वाटली असती तर या देशात हिंदुत्ववादी पक्षांचा पराभव होणे पूर्वीही शक्य नव्हते, आजही शक्य नाही.

जनतेचे मन नेहमीच परंपरावादी असते. पण या परंपरावादी मनाला व्यावहारिक वस्तुस्थितीचे प्रश्न त्रस्त करत असतात. परंपरेने मान्य केलेला

एखादा मुद्दा जनता जेव्हा सोडते, तेव्हा ती केवळ नाइलाज म्हणून सोडीत असते. आजचे प्रश्न आणि परंपरा यांचा सांधा जे जोडू शकतात अशा मंडळींचा पराभव विकासोन्मुख देशात जवळ जवळ अशक्यच असतो. हिंदू जनतेचे काही ज्वलंत प्रश्न होते. इंग्रज राजवटीच्या आगमनानंतर आणि इंग्रजी शाळा सुरू झाल्यानंतर सर्वच गुलामांच्या मनात आपल्या बेड्या तुटाव्या अशी अदम्य इच्छा निर्माण झाली.

अस्पृश्यांना आपल्याला मानवतेचे हक्क मिळावेत, समान वागणूक मिळावी असे वाटू लागले. स्त्रियांनाही हक्कांची जाणीव होऊ लागली. सुशिक्षित भारतीयांना इंग्रजांच्या गुलामगिरीचा तिटकारा वाटू लागला. पण सगळेच गुलामगिरीच्या विरुद्धचे झगडे होते. या विविध झगड्यांच्यापैकी इंग्रजी राजवटीविरुद्ध स्वातंत्र्याकांक्षेने प्रेरित झालेला जो राजकीय लढा होता, त्याला जसा धर्माचा पाठिंबा मिळाला तसाच इतर लढ्यांना धर्माचा पाठिंबा मिळाला नाही. अस्पृश्यांच्या समोर प्रमुख प्रश्न तीन होते. एक तर त्यांना शिक्षण हवे होते, दुसरे म्हणजे पिढ्यान्-पिढ्यांच्या दारिद्र्यातून मुक्तता हवी होती, तिसरे म्हणजे जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील बरोबरीचे हक्क हवे होते. हिंदू धर्मावरच्या बळकट अभिमानामुळे आणि इतर हिंदूंच्या बरोबर सहकार्य केल्यामुळे या गुलामगिरीच्या बेड्या लवकर तुटतील, एवढा विश्वास जर अस्पृश्यांना वाटू शकला असता तर मग हिंदुत्ववादी राजकारणाला कोट्यवधी अस्पृश्यांचे पाठबळ मिळाले असते. २१

पण असे कधी घडलेच नाही. ज्या ज्या वेळेला अस्पृश्यांचा प्रश्न उभा राहिला त्या त्या वेळेला धर्म अस्पृश्यांच्या विरोधात उभा राहिला. महाडच्या चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा आपला हक्क बजावण्यासाठी गेलेल्या हरिजनांना समाज आपल्या विरोधी उभा राहणार हे माहीतच होते. कारण समाज परंपरावादी असतो. पण जे हिंदूंचे हिंदू धर्माभिमानी जाणते सुशिक्षित नेते होते तेही जेव्हा बुद्धिवाद सांगत अस्पृश्यांच्या विरोधी उभे राहिले, तेव्हा अस्पृश्यांना बंड करण्याशिवाय दुसरा रस्ताच उरला नाही. आंबेडकरांच्या कहाणीपेक्षा फुल्यांची कहाणी निराळी नाही. भारतरत्न कर्वे यांची कहाणी मूलतः महात्मा फुले यांच्याहून निराळी नाही. धर्माच्या नावाने सर्व प्रकारच्या सामाजिक सुधारणेला जनतेचे जीवनमान उंचावण्याच्या प्रत्येक कार्यक्रमाला फक्त विरोधच होत राहिला. तेव्हा जीवनाचा संघर्ष धार्मिक राजकारणाच्या बाहेर जाऊन सोडवणे भाग पडले.

आपण महाराष्ट्रापुरता विचार केला तर काय दिसेल? महाराष्ट्रातील धार्मिक राजकारण नेहमीच सामाजिक सुधारणाविरोधी असल्यामुळे या राजकारणाच्या कक्षेतून मराठा, साळी, माळी असा बहुजनसमाज बाहेर

जाणे भाग होते. सगळा अस्पृश्य समाज बाहेर जाणे भाग होते. आदिवासी समाजाकडे हे राजकारण कधी गेलेच नाही, तो समाजही या राजकारणात आला नाही. सर्व सुशिक्षित स्त्रियांना आणि त्यांना शिक्षित करण्यासाठी झटणाऱ्या वरिष्ठवर्गीय नेत्यांना धार्मिक राजकारणातून बाहेर पडणेच भाग होते. शेवटी हिंदू धर्मातील राजकारणात पुरोहित, जमीनदार व हित-संबंधीय असे मुठभर लोक सोडल्यास कुणी येणेच शक्य नव्हते. हिंदूंचे प्रश्न हाती घेऊन सोडवल्याशिवाय हिंदुत्ववादी बळकट होणे शक्यच नव्हते. निदान लोकमान्य टिळक होते त्या वेळी हिंदू धर्मवादी राजकीय स्वातंत्र्यासाठी झटत होते, झगडत होते. टिळकांच्या मृत्यूनंतर या धार्मिक राजकारणाने स्वातंत्र्यासाठी झगडा कधीच दिलेला नाही. आपल्याच अवयवांच्या प्रत्येक विकासाला विरोधी असणाऱ्या शरीराप्रमाणे हिंदुत्ववाद्यांची वागणूक राहिली. या राजकारणामागे हिंदू जाणे शक्य नव्हते. 

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्यामध्ये या परिस्थितीची थोडीफार जाणीव दिसते. त्यांनी मात्र सर्व प्रकारच्या सुधारणांचा पुरस्कार आपल्या भाषणातून केला, लिखाणातून केला; पण सामाजिक जीवनात अशा पुरस्काराला अर्थ नसतो. स्वातंत्र्यवीरांनी एक नवीनच पतितपावन मंदिर उभे केले ही गोष्ट कौतुकास्पद नसते हेच पुष्कळांना कळत नाही! अशा घटना चिंता-जनक असतात. सर्व जातीजमातींना मोकळे असणारे मंदिर शेवटी फक्त अस्पृश्यांचे मंदिर उरते आणि पुढे तेही तिथे येणे सोडून देतात!! स्वातंत्र्यवीरांनीसुद्धा हिंदूंची प्रतिष्ठित मंदिरे हरिजनांच्यासाठी मोकळी करण्याचे लढे दिले नाहीत. सावरकरांच्यावर बंधने होती हे मान्य केले, तरी ही सारी बंधने १९३७ ते ४७ ला संपलेली होती. या दशकात सार्व-जनिक विहिरी व तळी हरिजनांना मोकळी व्हावीत, मोठी मंदिरे हरि-जनांना मोकळी व्हावीत यासाठी लढण्यास त्यांना वेळ मिळालेला दिसत नाही! पंढरपूरच्या विठोबाचे मंदिर हिंदू हरिजनांच्याकरता मोकळे करण्याचे काम शेवटी श्रेष्ठ साने गुरुजींसारखा गांधीनिष्ठ माणूस करतो. श्रेष्ठ हिंदुत्ववाद्यांना, हरिजन बुद्ध झाले तरीही बुद्ध हरिजन म्हणजे हिंदूच होत, असे लेख लिहिण्याने कर्तव्यकर्म केल्याचे समाधान मिळते!

शेतमजुरांचे लढे हे शेवटी दरिद्री हिंदू शेतकऱ्यांना सुरक्षित जीवन देणारे लढे होते. कामगारांचे लढे हे दरिद्री हिंदू मजुरांना किमान जीवन उपलब्ध करून देणारे लढे होते. हिंदू संस्थानिकांच्या विरुद्ध झालेले प्रजेचे लढे हे सरंजामशाहीच्या गुलामीतून मुक्त होऊ पाहणाऱ्या पुन्हा हिंदूंचेच लढे होते. हिंदुत्ववाद्यांना यांपैकी कशातच रस नव्हता. निदान हैद्राबाद, भोपाळ, जुनागढ येथील लढे हिंदू जनतेचे मुसलमानविरोधी

लढे होते; पण त्यातही या धर्मवाद्यांना रस नव्हता. भारतात विलीन होण्याची टाळाटाळ करणाऱ्या काश्मीरच्या महाराजांना यांत रस होता ! नेपाळ हे भारतापेक्षा भिन्न असे सार्वभौम राष्ट्र आहे, ही नेपाळ नरेशाची भूमिका होती. एकमेव स्वतंत्र हिंदू राज्य म्हणून हिंदुत्ववाद्यांना नेपाळ नरेशांचे कौतुक होते ! ठीक आहे. नेपाळचा राजा हिंदू होता, तसा कोल्हापूरचा राजा हिंदू होता. कोल्हापूरच्या राजाने बहुजनसमाजाच्या-साठी वसतिगृहे, शाळा, नोकऱ्या यांची खास सोय केली होती. तसे अस्पृश्यांसाठीही कोल्हापूरचे शाहूमहाराज झटत होते. कोल्हापूरचा राजा ब्राह्मणविरोधी असेल (असलाच तर) पण तो हिंदूविरोधी नव्हता, शिवाजीचा वंशज होता. हिंदुत्ववाद्यांना या राजाविषयी प्रेम का वाटले नाही ? नोकरी म्हणजे सेवा, ही तर शूद्रांच्यासाठी म्हणून सांगितलेली. ब्राह्मणांच्या नोकऱ्या कमी करणारा कोल्हापूरचा राजा ब्राह्मणांना सुखासुखी शूद्र होऊ देत नाही. म्हणून तर हिंदुत्ववाद्यांचा जास्त आवडता व्हावयास पाहिजे होता; पण तसे घडलेले दिसत नाही ! 

सनातन्यांचा धर्म अध्यात्मिक असतो व त्यांचा आत्मा सर्वत्र एकच असतो; पण ही आत्म्याची एकता व अध्यात्मिकता बायका पुनर्विवाह करू लागल्या की भंगते. तसेच हिंदुत्ववादी राजकारणाचे ! प्राचीन भारताच्या गौरवशाली महान इतिहासाचे प्रेम असते. या मंडळींना भारतीय संस्कृती जपावयाची असते. या संस्कृति-संगोपनाच्या कार्यात भांडवलदारांनी यंत्रोद्योगांच्या जोरावर सगळे ग्रामीण जीवन दरिद्री व उध्वस्त केले तरी अडथळा येत नाही ! मात्र कूळ कायद्याने भारतीय संस्कृतीचा भंग होतो ! हरिजनांना शिकण्याच्या सवलती असल्या की संस्कृती दुखावते ! बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले की मग तर भारतीय संस्कृतीचा आत्माच लोप पावतो ! सगळ्या राजेशाहीचा, जमीनदारशाहीचा गुणगौरव करणाऱ्या या संस्कृतीवाल्यांनी अचानक लोकशाहीप्रेमी व्हावे आणि इंदिरा गांधी देशात हुकूमशाही आणीत आहेत म्हणून ओरडावे, हे हास्यास्पद नाही का ? यांचे लोकशाही प्रेम अचानक इतके उचंबळून का येते ?

या देशातील हिंदुत्ववाद नेहमीच या देशातील हिंदू जनतेचा द्रोह करत आला आहे आणि असे घडणे अपरिहार्यच होते. हिंदुत्ववादाला हिंदू धर्माचे प्रेम आहे, हा धर्म ज्या जनतेने सहस्रावधी वर्षे प्रेमाने व निष्ठेने जतन केला त्या जनतेचे प्रेम नाही ! कारण सगळेच धर्म राजेशाहीच्या, सरंजामशाहीच्या वातावरणात विकसित होतात, तसे हिंदू धर्माचेही स्वरूप आहे. जगात कुठेही जरी आपण गेलो तरी सरंजामशाही विषमता व माणसाची गुलामगिरी यांवरच आधारलेली असते. हिंदुस्थानचेही चित्र यापेक्षा निराळे नव्हते ! या देशात इतिहासाचा पुरावा सापडतो तेव्हापासून

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत जनावरांचे आठवडी बाजार भरावेत तसे माणसांचे बाजार भरत असत, आणि या बाजारांच्यामधून राजरोस स्त्री-पुरुषांची खरेदी-विक्रीच होत असे. राजे-रजवाडे आणि जमीनदार यांना देव-देवळे आणि धर्म यांची गरज असे. या सर्व सरंजामदारांनी दासी, बटकी, कलावंतिणी, नर्तिका, वेश्या, देवदासी यांचा एक प्रचंड ताफ्याच्या ताफा, राजवाड्यातील राजे आणि देवळातील देव यांच्या मनोरंजनार्थ निर्माण केला होता! धर्माच्या नावाखाली मध्ययुगीन भारतात केवढा व्यभिचार चालू असे याचे पुरावे मठात जमणाऱ्या वैष्णवी, भैरवी आणि रस्त्यातून भोग-भिक्षा मागत हिंडणाऱ्या योगिनींच्या तांड्यातून वाटेल तितके मिळतात. ज्यांना जिज्ञासा असेल त्यांनी प्राचीन
विक्रमशीला विद्यापीठाचा अभ्यासक्रम चाळून पहावा. मोक्षप्रद रतिक्रीडा २४
शिकवणे हा या विद्यापीठात अभ्यासक्रमाचा भाग होता!

प्राचीन भारतात कालिदास आहे; शंकराचार्य, कबीर, ज्ञानेश्वर आहेत. चंद्रगुप्त, शिवाजी, राणा प्रताप आहेत. अजिंठा, वेरूळ, आणि मीनाक्षी-सुंदरम् आहेत. या सगळ्यांविषयी माझ्या मनात आदर आणि अभिमान आहे. कारण ही माझ्याच संस्कृतीची विजयगाथा आहे; पण अभिमान असला म्हणजे जे सडके, गलिच्छ आणि गुलामगिरीचे जीवन त्या संस्कृतीने निर्माण केले होते त्याहीविषयी अभिमान वाटावा, याचे मला काहीच कारण दिसत नाही! ज्यांचे हितसंबंध या संस्कृतीने सांभाळले होते त्यांनी ती मेली म्हणून खुशाल आक्रंदन करावे; पण ज्या नव्वद टक्के लोकांच्या दारिद्र्य व गुलामगिरीवर ही संस्कृती उभी होती त्या गुलमांनीही या संस्कृतीविषयी प्रेम व अभिमान बाळगावा असे म्हणण्याचा आपल्याला काय हक्क आहे? माणसांचे बाजार चालू असणाऱ्या मध्ययुगाविषयी अभिमान जर बाळगण्यास आपण कुणऱ्यांना सांगणार असू तर मग भारताला गुलाम करणाऱ्या, लुटालूट व अत्याचार करणाऱ्या घोरी, खिलजी आणि इंग्रज राजवटीविषयी तेवढाच अभिमान ब्राह्मणांनी बाळगायला काय हरकत आहे? बुटाची लाथ स्वकीयांनी मारली म्हणजे ती मखमली होते आणि परकीयांनी मारली म्हणजे मात्र ती लोखंडी होते, असा फरक लाथ खाणाऱ्याला कसा करता येईल? गुलामांना बेड्या घालणारे आपलेच बहुजन आहेत याचे समाधान काय म्हणून वाटावे?

म. गांधींनी राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्याला सामाजिक समतेचा आशय दिला आणि या लढ्यात अस्पृश्यांना, आदिवासींना, बहुजनसमाजाला दाखल करून घेतले. या लढ्याला गांधीजींनी सामाजिक समतेचा आशय दिला व या लढ्यात शेतकरी व मजूर दाखल करून घेतले. गांधीजींनी खेड्याखेड्यातून स्वातंत्र्याची आकांक्षा जागृत केली हे खरे आहे. पण हे

कार्य करणे त्यांना काय म्हणून जमले ? गांधीजी समाजवादी होते की नव्हते याची चर्चा करणे व्यर्थ आहे. गांधींच्या चळवळीत असणाऱ्या चंपारण्यातील शेतमजुरांनी आणि बार्डोलीच्या शेतकऱ्यांनी या चळवळीत स्वतःच्या उद्धाराची हमी पाहिली. मुंबईच्या, सोलापूर-अहमदाबादच्या मजुरांनी या चळवळीत नवी आशा पाहिली, ही घटना खरी महत्त्वाची आहे.

भारतात हिंदूंची प्रचंड बहुसंख्या असल्यामुळे राजकीय स्वातंत्र्यामुळे हिंदू स्वतंत्रच होणार होते. अस्पृश्योद्धाराच्या चळवळीमुळे हिंदूंनाच माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त होणार होता. गांधींनी राजकीय स्वातंत्र्याची चळवळ निर्माण केली, तिच्या पोटात हिंदूंच्या सर्व सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक उद्धाराच्या आकांक्षा सामावलेल्या होत्या. ही भूमिका घेऊनच गांधींना खेड्यापर्यंत जाणे शक्य होते. ही भूमिका असली तरच कोट्यवधींच्या मनात स्वातंत्र्याची आकांक्षा जागी करता येत असते. धर्माच्या पोथ्या सांभाळून धरण्यासाठी, ज्यांच्या कल्याणासाठी या पोथ्या आहेत त्यांच्या चिता पेटवाव्या हा एक मार्ग असतो. हिंदू माणसाच्या संरक्षणासाठी धर्माच्या पोथ्या गुंडाळून ठेवाव्यात हा दुसरा मार्ग असतो. गांधी हिंदू जनतेच्या वतीने उभे राहिले. सगळे हिंदुत्ववादी या हिंदू जनतेच्या कळत न कळत विरोधी उभे राहिले ! खरे म्हणजे वरिष्ठवर्ग धर्माचा नेहमी सोयीस्कर अर्थ लावत असतो. आमच्या धर्माने ब्राह्मणांना इस्टेट ठेवण्याची परवानगी दिलेली नाही, नोकरी करण्याचीही परवानगी दिलेली नाही. खोती, सावकारी आणि शासनातील सर्व थरांच्या मिळून ऐंशी टक्के नोकऱ्या ताब्यात ठेवणे हे ब्राह्मणांचे कर्तव्य आहे, किंवा हा त्यांचा हक्क आहे, असे कोणत्याही स्मृतीत लिहिलेले दिसत नाही ! वरिष्ठ वर्ग आपले हितसंबंध सांभाळताना पोथ्या पायदळी घालतोच, सर्वसामान्य जनतेच्या उद्धाराचे कार्यक्रम हे मात्र पोथ्यांनी मान्य केलेले असावेत अशी या वर्गाची इच्छा असते ! ! हिंदुत्ववादी राजकारण पोथ्यांच्या बाजूने उभे राहताना वरिष्ठवर्गीय राजकारण झाले.

जे धर्माचे रक्षण करतात त्यांचे धर्म रक्षण करतो, असे पोथीत लिहिलेले असते. जर राजे आपल्या राज्याचे रक्षण करू शकले तर राजे आणि प्रजा यांचा धर्म सुरक्षित राहतो, हे इतिहासाचे सत्य आहे. हिंदू माणसे जगली तर हिंदू धर्म जगतो. हिंदू माणसाच्या जगण्याला हिंदू धर्माने हातभार लावला तर हिंदू माणसे हिंदू धर्म प्रेमाने जगवतात, हे समाजाचे सत्य आहे. गांधींनी हिंदू जनतेच्या सर्व कार्यक्रमाच्या मागे हिंदू परंपरेचा आशीर्वाद उभा करण्याचा प्रयत्न केला. हिंदू धर्माच्या नावे उभे असणाऱ्यांनी हिंदू जनतेच्या जीवनाला विरोध करून हिंदू धर्माचा द्वेष करण्यास शिकवले !

उत्कटतेने करण्याची शिकवण दिली ! मुसलमानांच्या तरवारी आणि धार्मिक अत्याचार जे सातशे वर्षांत करू शकले नाहीत, इंग्रजांच्या आधुनिक विद्या जे शंभर वर्षांत करू शकल्या नाहीत, ते कार्य हिंदुत्ववादी शक्तींनी पन्नास वर्षांत सफल केले ! हिंदुत्ववाद्यांची इच्छा होती, हिंदूंनी मुसलमानांचा, इंग्रजांचा द्वेष करावा. प्रत्यक्षात घडले ते इतकेच की, या जनताद्रोही राजकारणाच्या परंपरेने हिंदू लोकांना हिंदू धर्माचा द्वेष करण्यास शिकवले.

कोणता धर्म सरंजामशाहीशी एकरूप झालेला नव्हता ? सगळेच धर्म तसे होते. ख्रिश्चन धर्माने तर ख्रिस्ती जनतेवर जेवढे अत्याचार मध्ययुगात केले, तेवढे एकाही धर्माने आपल्या अनुयायांवर केले नसतील; पण आजचा ख्रिश्चन माणूस ख्रिस्ती धर्मद्वेष्टा नाही. तो धर्मश्रद्ध असो की नसो, त्याला धर्म अनावश्यक वाटेल; पण त्याचा द्वेष वाटणार नाही. कारण ख्रिस्ती धर्माने शाळाही चालवल्या, दवाखाने, अनाथालये, जनसेवा यांच्या भव्य परंपराही चालवल्या. हिंदू धर्मात तशी आपल्या जनतेची सेवा करण्याची परंपराच नव्हती. शंकराचार्यांचे मठ संस्कृत पाठशाळाही धड चालवू शकले नाहीत, मग त्यांनी इतर कार्य काय करावे ? आमचे धर्मगुरू पारतंत्र्याच्याही विरोधी उठू शकले नाहीत. जे कधी स्वातंत्र्यवादी नव्हते, समतावादी तर नव्हतेच, सेवावादीही नव्हते, त्यांच्याविषयी कुणाला आदर वाटावाच कसा ?

हिंदुत्ववादी राजकारणाची ही मीमांसा गोळवलकरांना मान्य आहे काय ? गांधींना राष्ट्रपिता मानण्याचे खरे कारण हे आहे. त्यांची मते बरोबर किंवा चूक असतील. त्यांनी देशातील जनतेचा स्वार्थ आणि देशाचा स्वार्थ एकजीव करून राष्ट्र उभे करण्यासाठी राष्ट्रातील कोट्यवधी लोक पेटवून जागे केले; पण हे वाक्य खरे असायचे तर स्वातंत्र्यलढा, मुस्लिम प्रश्न, अहिंसावाद, हिंदुत्व या सर्वच प्रश्नांच्या बाबत फेरविचार करावा लागेल. विचार करण्याची गेल्या पंचवीस वर्षांतील दिशाच मुळात चुकली, असे समजून नव्या पद्धतीच्या चिंतनाला सामोरे जावे लागेल. गोळवलकर गुरुजी यातील काहीच करू इच्छिणार नाहीत. कारण त्यांचा कार्यक्रम पूर्वी स्वातंत्र्यलढ्याबद्दल उदासीन राहून संघटना बांधण्याचा होता; आता सामाजिक क्रान्तीबद्दल उदासीन राहून राष्ट्र बळकट करण्याची त्यांची इच्छा आहे ! गांधी मरून वीस वर्षे झाली; पण अजून समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेचे रहस्य गोळवलकरांना पटलेले दिसत नाही. एक वस्तुस्थिती अशी आहे की, जलद गतीने समाजपरिवर्तन घडणे ही आज राष्ट्रवादाची गरज बनली आहे. जलद गतीने परिवर्तन करण्यात जर आपल्याला यश आले नाही तर इंडोचीनप्रमाणे या देशातील काही

भाग कम्युनिस्टांच्या ताब्यात जाईल. उरलेला भाग लष्करी हुकूमशाहीच्या ताब्यात जाईल. छोट्या इंडोचीनचे चार तुकडे उडाले. मद्रास, केरळ, काश्मिर, पंजाब, बंगाल, आणि उरलेला भारत असे राहिलेल्या देशाचे सात-आठ तुकडे उडतील. भारताला राष्ट्र म्हणून टिकावयाचे असेल तर शुद्ध राष्ट्रवादाची गरज म्हणूनसुद्धा समाजपरिवर्तन अत्यावश्यक झालेले आहे. ही बाब ज्यांना अजून पटत नाही, त्यांनी महात्मा गांधींना प्रातःस्मरणीय म्हटले काय की सायंविस्मरणीय म्हटले काय, दोन्हींलाही सामाजिक प्रवाहात अर्थ नसतो !

गांधींचे राष्ट्रपितेपण सोडून दिले तरी अजून पुष्कळ गोष्टी शिल्लक राहतात. खादी, ग्रामोद्योग, भूदान, ग्रामपंचायती, मोठ्या यंत्रांना विरोध, ब्रह्मचर्य, मौन इत्यादी अनेक बाबी गांधीजींशी संबंधित आहेत. तसे पाहिले तर गांधींपेक्षा विनोबा हिंदुत्ववाद्यांना फार जवळचे वाटावेत. वेद, उपनिषदे, गीता, शंकराचार्य या वर्तुळातूनच विनोबा बोलतात. या सर्व ग्रंथांचा ते भूदानाला पाठिंबा मिळवतात. गोरक्षण हाही गांधीजींचा कार्यक्रम होता. गांधीजींच्या राष्ट्रपितेपणाशी या बाबीचा काही संबंध नाही. या बाबी गांधीजींच्या जीवनात असल्या काय आणि नसल्या काय, गांधींना भारतीयांनी राष्ट्रपिताच मानले असते. यांतील गोहत्याबंदी सोडल्यास गोळवलकरांना इतर काही पटलेले दिसत नाही ! हिंदू धर्मावरील गाढ विश्वास आणि गोहत्याबंदी एवढाच गोळवलकरांना गांधीजींचा खराखुरा मोठेपणा वाटत असावा असे दिसते. त्यातही पुन्हा दोन बाबी आहेत. गांधीजींची भूमिका गोवंशाच्या विकासातून गोहत्या-बंदीकडे जाणारी होती. ते कायद्याच्या गोवधबंदीला विरोधी होते. गोळवलकरांना गोरक्षणावर गांधी अप्रमाण, तो फक्त गोहत्याबंदीवरच प्रमाण आहे ! हिंदू धर्म मुळातच अत्यंत उदार आणि व्यापक आहे. म्हणून गांधीजी उदार व व्यापक झाले असे गुरुजींचे म्हणणे आहे. यांतील हिंदू धर्माच्या मूलभूत उदार असण्यासंबंधी एकदा पुन्हा विचार केला पाहिजे. कारण गांधीच उदार झाले; ह्या धर्माचे चाहते गोळवलकर मात्र उदार झालेले दिसत नाहीत.



सहिष्णुता आणि औदार्य यांबद्दल हिंदू धर्माची फार स्तुती केली जाते. इतरांना आपल्या धर्मात घेण्याची हिंदूंची प्रथा नाही. त्यामुळे हिंदू धर्म सहिष्णू वाटतो, इतकेच त्यातील सत्य आहे. हजार-हजार वर्षे उभे गंध लावणारे गंध उभेच लावतात, आडवे गंध लावणारे गंध आडवेच लावतात. अत्यंत कर्मठ, असहिष्णू, परंपरावादी आणि इतरांच्या अस्तित्वा-विषयी कमालीचे उदासीन असणारे शे-दीडशे गट असे हिंदू धर्माच्या उदार सहिष्णुतेचे खरे रूप आहे ! या हिंदू धर्माच्या श्रद्धेतून गांधी

उदार होत नसतो. धर्मश्रद्धा ही जर माणसाला उदार करती तर सारे हिंदुत्ववादी प्रामुख्याने उदारमतवादी झाले असते. गोळवलकरांच्या विवेचनात सत्याची थोडी उलटापालट झाली आहे ! सत्य असे आहे की, गांधी उदारमतवादी होते म्हणून त्यांनी हिंदू धर्म उदार करण्याचा प्रयत्न केला. हिंदू धर्म नेहमीच अनुदार व उदासीन असल्यामुळे हिंदुत्ववादी जनतेच्या प्रश्नांच्या विषयी उदासीन राहिले, गांधींविषयी अनुदारपणे बोलले व त्यांनी या महात्म्याला धर्मभ्रष्ट म्हणून विरोध केला !

गांधी समजून घ्यायचा असेल तर त्यासाठी एक मोठी चांगली गोष्ट गांधींच्या चरित्रात आहे. त्या गोष्टीचा उल्लेख करून हे विवेचन मी संपवतो. गांधीजी रवीन्द्रनाथ टागोरांच्या भेटीसाठी शांतिनिकेतनमध्ये गेले होते. रवीन्द्रनाथांच्या मनात स्वातंत्र्याविषयी आस्था असली तरी खादीग्रामोद्योगाचे प्रेम फारसे नव्हते. सकाळच्या वेळीं गुरुदेव टागोर आणि गांधीजी फिरत होते. वेळ सूर्योदयाची होती. पूर्वेला लाल रंग पसरत होता. पाखरे आनंदाने किलबिलत होती. कवी म्हणाले, “ गांधीजी, या सौंदर्याला, या आनंदाला तुमच्या तत्त्वज्ञानात काही जागा आहे काय ? ” राष्ट्रपित्याने उत्तर दिले, “ निश्चितच जागा आहे. सूर्योदयाचे रमणीय रंग पाहून पाखरांनी गाणी गावीत यासाठीच तर माझे तत्त्वज्ञान आहे. मात्र तुम्ही सूर्योदयाच्या वेळीं गाणारी पाखरे पाहता अन् मी सूर्योदयाच्या वेळीं पाखरांना गाण्याची इच्छा व्हावी म्हणून सायंकाळी ती पोटभर जेवून झोपलेली असावीत याचीही काळजी घेतो. ”

# गोळवलकर गुरुजी आणि चातुर्वर्ण्य



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघचालक श्री गोळवलकर गुरुजी हे विज्ञान व कायदा यांचे पदवीधर असून कुशल संघटक म्हणून प्रसिद्ध आहेत. राष्ट्रीय स्वयंवसेवक संघाचे लक्षावधी स्वयंसेवक त्यांच्या नावाचा उल्लेख करताना परमपूजनीय असे विशेषण लावूनच करतात. ज्या राजकीय नेत्यांनी केवळ आपल्या तत्त्वज्ञानावरच नव्हे तर व्यक्तिमत्त्वावर श्रद्धा असणारे सुशिक्षित तरुण आपल्याजवळ गोळा केले, त्यांत गोळवलकरांचे नाव अग्रभागी घालावे लागेल. गोळवलकर हे नुसते हिंदूंचे नेते नव्हेत, ते सुशिक्षित हिंदू तरुणांचे नेते आहेत. शंकराचार्यांच्या मागे ज्याप्रमाणे शतकांच्या परंपरांची मान्यता असते अशी कोणती मान्यता किंवा एखाद्या साधू-संतांच्या मागे ज्या प्रकारची लोकांच्या भाबड्या श्रद्धेची मान्यता असते तशी मान्यता गोळवलकरांच्या मागे उभी नाही. लोक गुरुजींच्याकडे अधि-भौतिक, अधिदैविक, किंवा अध्यात्मिक दुःखे घेऊन जात नाहीत. त्यांच्या आशीर्वादाने अधनाला धन लाभेल, निपुत्रिकाला पुत्र होईल, किंवा ईश्वरी साक्षात्कार होईल, मोक्ष मिळेल अशी श्रद्धा त्यांच्या अनुयायांची नाही. हिंदू समाजात प्रतिष्ठित असणारे इतर नेते आणि गोळवलकर यांच्यातील हा फरक महत्त्वाचा आहे. गोळवलकरांनी आपल्या अनुयायांना पारलौकिक कल्याणाची हमी दिलेली नाही. त्यांनी हिंदू धर्माच्या, हिंदू संस्कृतीच्या, हिंदू राष्ट्राच्या इहलोकातील संरक्षणाची हमी घेतलेली आहे. एक तर गोळवलकरांची हमी इहलौकिक आहे; दुसरे म्हणजे, ही हमी देताना गुरुजींचा दावा आपल्याजवळ कोणत्या दैवी शक्ती आहेत असा नसून इहलौकिक हमींची पूर्तता गोळवलकर इहलोकातील निष्ठावंतांच्या बळकट संघटनेच्या जोरावर करू इच्छितात.

गोळवलकर म्हणजे कुणी परंपरागत शिक्षण घेतलेला मठाधीश, पीठाधीश नव्हे. गोळवलकरांचे सामर्थ्य, ज्या विचारसरणीसाठी ते उभे आहेत त्या विचारसरणीसाठी त्यांनी जोपासना केलेल्या संघटनेत आहे. ही संघटना परंपरागत धर्म मानणाऱ्यांची संघटना नव्हे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात

कर्मठ परंपरावादी माणसाचे पटणारही नाही. संघ सार्वजनिक कार्यक्रम म्हणून यात्राजत्रा भरवीत नाही, किंवा यज्ञ-यागही करीत नाही. संघातील तरुणांना हिमालयात जाऊन तप करण्याची किंवा योग-साधना करण्याची प्रेरणा दिली गेलेली नाही. शेंडी, जानवे, संध्या, एकादशी, वैश्वदेव, श्रद्धपक्ष या बाबतीत फार मोठा आग्रह धरणारी संघ ही संघटना नव्हे. आधुनिक सुशिक्षितांची ही संघटना असून हे सर्व तरुण हिंदू राष्ट्राच्या संरक्षणाच्या प्रतिज्ञेने गोळवलकरांच्या भोवती जमलेले आहेत. शंकराचार्य, स्वामी करपात्रीजी, यांच्या नेतृत्वापेक्षा गोळवल-करांचे हे नेतृत्व वेगळे आहे. ही बाब आपण नीट समजून घेतली पाहिजे.

परवाच गोळवलकर गुरुजींनी एक मुलाखत देताना हिंदू धर्मातील ३०
चातुर्वर्ण्याचे समर्थन केले. असे समर्थन केल्याबरोबर व जाहीररीत्या चातुर्वर्ण्याला पाठिंबा दिल्याबरोबर गोळवलकरांच्या विरुद्ध फार मोठ्या प्रमाणात निषेधाचा आवाज उठवण्यात आला. हा निषेध करण्याचा खरोखरी ज्यांना अधिकार नाही, ती माणसे निषेधाच्या कार्यक्रमात सर्वांच्या पुढे होती. तसे गोळवलकर पुरोगामी नेते म्हणून कधीच प्रसिद्ध नव्हते. गोळवलकरांचा उगम पावसाळी छत्रीप्रमाणे एकाएकी झालेला उगम नाही. पंचवीसहून अधिक वर्षे त्यांचे कार्य समाजात चालू आहे. फार जुन्या काळी स्वातंत्र्यपूर्वकाळात त्यांचे ‘ We ’ हे पुस्तक प्रकाशित झालेले होते. अलीकडे स्वातंत्र्योत्तर काळात त्यांचे ‘ Bunch of thoughts ’ हे पुस्तकही प्रकाशित झालेले आहे. ह्या दोन्ही पुस्तकांकडे पाहताना गोळवलकर गुरुजी पुरोगामी किंवा बुद्धिवादी आहेत. असे कधीच कुणाला वाटण्याचे कारण नव्हते. इतिहासकारांनी सांगितलेला इतिहास गुरुजींनी कधी मान्य केलेला नाही. भले इतिहासकार भारतात आर्यांचे आगमन ध्रुवीय प्रदेशातून झाले असे म्हणोत, असल्या प्रकारच्या बाबी गुरुजींना कधीच मान्य नव्हत्या. त्यांच्या समजुतीप्रमाणे आर्य हे या देशातले मूळ रहिवासी असून ते कुठून बाहेरून आलेले नाहीत. उलट गोळवलकरांचे असे म्हणणे आहे की, अति प्राचीनकाळी उत्तरध्रुवच भारतात होता. म्हणजे ध्रुव सरकून बाहेर गेला; पण आर्य म्हणजे येथील मूळचेच रहिवासी होत. गोळवलकरांच्यासाठी शास्त्रांनी उपलब्ध करून दिलेले ज्ञान स्वीकारार्ह नसते. जेवढ्या बाबी सोयीस्कररीत्या त्यांना स्वीकारावयाच्या आहेत, तेवढ्याच बाबी स्वीकारार्ह असतात. गुरुजी म्हणतील ते विज्ञान, ते सांगतील तो इतिहास, त्यांची लहर फिरेल त्याप्रमाणे मान्य धर्मग्रंथ कोणते ह्याचा निर्णय लागणार. अशा परिस्थितीत एक नेता जाहीररीत्या पाव शतक काम करतो, आपले नेतृत्व उभे करतो, त्याच्या सोयीखातर त्याने चातुर्वर्ण्य-विरोधी असावे, ही अपेक्षाच चुकीची आहे. शंकराचार्यांची मुलाखत घेतल्यानंतर ते श्रुति-स्मृती प्रामाण्य सांगणारच. याखेरीज वेगळे

काही त्यांनी बोलावे, ही अपेक्षा आपल्या भाबड्या मनाचा भाग होता. गोळवलकरांनी स्पष्ट स्वतःला चातुर्वर्ण्य मान्य असल्याचे सांगून टाकले, तो त्यांच्या दर्शनी जीवननिष्ठेचा पवित्रा आहे. तुमचे निषेध, पुतळे जाळणे, यामुळे गुरुजीत फारसा बदल होण्याचा संभव नाही. धार्मिक मुसलमान म्हटला की, तो ज्याप्रमाणे त्याचा धर्मग्रंथ सर्वश्रेष्ठ, त्याचा धर्म परिपूर्ण म्हणून सांगणार, तसे गोळवलकरांचे आहे. जगातील सर्वश्रेष्ठ राष्ट्र म्हणजे हिंदूंचे. सर्वश्रेष्ठ धर्म म्हणजे हिंदूंचाच. हा धर्म निर्दोष असणारच. माणसे आत्मग्लानीमुळे विकृत होतात, धर्माला विकृत रूप देतात, जीवनात सर्व बाजूंनी पराभूत होतात. मूळच्या उज्ज्वल धर्मावर त्यांच्या श्रद्धा व निष्ठा जागृत केल्या पाहिजेत. म्हणजे हिंदू राष्ट्र तेजस्वी, बलवान व विजयी होईल, हे गोळवलकरांचे प्रतिपादन आहे. अशी श्रद्धा असणारा माणूस धर्मात काही दोष आहेत, त्याचा काही भाग कालबाह्य झाला आहे हे कबूल करणारच नाही. गोळवलकरांनी चातुर्वर्ण्याचा आग्रह सोडावा ही अपेक्षा एखाद्या मौलवीने महंमद पैगंबर शेवटचा प्रेषित नव्हता हे कबूल करावे या अपेक्षेसारखी खुळी अपेक्षा आहे.

पण गोळवलकर गुरुजींचा निषेध करण्याचा हक्क कुणाला निर्माण होतो याचाही विचार केला पाहिजे. जे आपापले धर्म सर्वश्रेष्ठ, निर्दोष व परिपूर्ण मानतात त्या मंडळींना गोळवलकरांनी स्वतःचा धर्म सर्वश्रेष्ठ, निर्दोष व परिपूर्ण मानल्याबद्दल तक्रार करण्याचा हक्क नाही. ख्रिश्चन व मुसलमान तर सोडाच; पण अलीकडे अस्पृश्य समाज बुद्ध धर्म स्वीकारून हेच करू लागला. बुद्धधर्म हा जगात एकमेव निर्दोष धर्म असून सर्वांनी ह्याचा स्वीकार करावा हे म्हणणाऱ्यांना गोळवलकरांच्या विरुद्ध बोलण्याचा अधिकार नाही. कारण गोळवलकर चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करतात म्हणजे करतात काय ? ते वेगळ्या शब्दांत हिंदू धर्म निर्दोष व परिपूर्ण आहे असे सांगतात. गोळवलकरांचे म्हणणे हे की, या देशात आक्रमक मुसलमानांनी केलेले अत्याचार व बलात्कार यांचे अपत्य म्हणजे मुसलमान. मुसलमानांनी या भूमीतील मान्य श्रद्धा व परंपरांचा स्वीकार करावा म्हणजे ते राष्ट्रवादी होतील. ही पद्धत म्हणजे सर्वांनी हिंदू धर्म स्वीकारावा हे सांगण्याची वेगळी पद्धत आहे. जी मंडळी आपापले धर्म सर्वश्रेष्ठ व निर्दोष मानत नाहीत, धर्मातील काही भाग इतिहासजमा व कालबाह्य झालेला आहे असे ज्यांना वाटते, त्यांनाच गोळवलकरांचा निषेध करण्याचा हक्क आहे. या निषेध करणाऱ्यांना हेही विचारले पाहिजे की, इतरांनी ज्या वेळी आपापले धर्म निर्दोष जाहीर केले आणि सर्वांना आपापल्या धर्मात येण्याचे आमंत्रण दिले, त्या वेळी तुमचे आवाज काय म्हणून बंद झाले होते ? ज्यांनी जातीच्या अहंता वाढवल्या, ज्यांनी उभा जन्म जातीच्या संकुचित डबक्यात आपले

हितसंबंध सुरक्षित ठेवणे रास्त व समर्थनीय मानले, निदान व्यवहारात ज्यांनी जातीयवाद जपला, त्यांना गोळवलकरांच्या निषेधाचा हक्क कसा पोहोचतो हे समजणे कठीण आहे.

मोठ्या प्रमाणात लोकांनी गोळवलकरांचा निषेध केला याबाबत माझी तक्रार नाही. उलट हा निषेधही फारच सौम्य प्रमाणात झाला; पण झाला हे बरे झाले, असेच मला वाटते. मराठीत एक म्हण आहे : "काशीस जावे, नित्य वदावे". काशीस जाणे घडणार नाही; पण निदान तसे रोज म्हणावे. जाती-जमाती मोडणे जमेल, जमणार नाही; पण निदान लोकलज्जा म्हणून किमान जाहीर सभेत जातीयवाद-विरोधी बोलावे हे तर आवश्यकच आहे. तक्रार गोळवलकर निषेधाबद्दल नाही, तक्रार चातुर्वर्ण्य हा मुद्दा ३२
नीट समजून न घेतल्याबद्दल आहे. गोळवलकर हे काही चातुर्वर्ण्याचे एकमेव समर्थक नव्हेत; भारतातील सगळे शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, सगळे मठाधीश, पीठाधीश हे चातुर्वर्ण्याचे समर्थकच आहेत. सगळा भारतीय समाज मनाने धर्मश्रद्ध आहे. या समाजातील सर्व तीर्थक्षेत्री असणारा ब्राह्मण पुरोहितवर्ग हाही चातुर्वर्ण्याचा समर्थक आहे; आणि मराठ्यांना ब्राह्मणाचे राजकीय वर्चस्व मान्य नसले तरी त्यांना धर्मकृत्यांना अजूनही ब्राह्मणच लागतो. हे सगळेच परंपरावादी चातुर्वर्ण्याचे पुरस्कर्ते आहेत. यांपैकी कुणाकुणाचा निषेध आपण करणार आणि कुणाकुणाचे पुतळे जाळणार, याची यादी जर करावयाची म्हटली तर सगळ्या जन-गणनेची यादी करावी लागेल. काशीला दरसाल जाणारे हजारो यात्रेकरू आणि कुंभमेळ्याला २०-२० लाख लोक वर्णव्यवस्थेवर श्रद्धा नसल्यामुळे त्या ठिकाणी जमत नसतात. वर्णव्यवस्थेवर श्रद्धा ठेवणारे मन हे हिंदूचे परंपरागत मन आहे. मनापासून जर वर्णव्यवस्थेवर श्रद्धा नसणारे कुणी असतील तर ते गोळवलकर आहेत. गोळवलकरांच्यासाठी वर्णव्यवस्थेचा स्वीकार व पुरस्कार हा एक धोरणाचा भाग असतो. धार्मिक व राजकीय नेते जन्मभर धर्मावर श्रद्धा जाहीर करत असतात हे पहिले सत्य आहे; त्यांच्याजवळ खरोखर धर्मश्रद्धा असतीलच असे नाही, हे दुसरे सत्य आहे.

•

आधुनिक काळात आर्य समाजाने वर्णव्यवस्थेचा पुररकार केलेला होता. आजही आर्य समाज वर्णव्यवस्था आदर्श मानतो. लोकमान्य टिळक महात्मा गांधी, विनोबा यांना चातुर्वर्ण्य ही आदर्श समाजव्यवस्था वाटतच होती. गीतारहस्याच्या प्रस्तावनेत लोकमान्य टिळकांनी ही भूमिका नमूद केलेली आहे. वर्णव्यवस्थेचा पुरस्कार करणारे लोक वर्णव्यवस्थेच्या बाजूने नेहमी एक मुद्दा मांडतात. परस्पर सहकार, परस्पर सहयोग यांनी भरलेली संघर्षशून्य, स्पर्धाशून्य समाजव्यवस्था म्हणजे वर्णव्यवस्था. निर्दोष समाज

हा असा स्पर्धा व संघर्ष नसलेलाच असणार. येऊन-जाऊन अशा वेळी एक प्रश्न उरतो, तो असतो व्यक्तीच्या विकासाला अडथळा होण्याचा. वर्णव्यवस्था जन्मावरून न ठरवता गुणकर्मावरून ठरवली म्हणजे हाही अडथळा दूर होतो. गुणकर्मावरून असणारे चातुर्वर्ण्य हा गांधी, टिळक, विनोबा यांच्या आकर्षणाचा विषय होता. ज्या वेळी गोळवलकर चातुर्वर्ण्य-व्यवस्थेचा पुरस्कार करतात, त्या वेळी ते जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य मानतात, गुणकर्मावरून ते ठरवावे असे मानतात हा मुद्दा पुरेसा स्पष्ट नाही. भगवद्‌गीतेत चातुर्वर्ण्य गुणकर्म विभागशः आहे, असा उल्लेख केलेला आहे. हा उल्लेख नीट समजून घेतला पाहिजे. परमेश्वर एकेकाचे गुणकर्म पाहून त्यांच्या त्यांच्या गुणकर्माप्रमाणे त्याला चार वर्णांत जन्माला घालतो. हे गुणकर्मानुसार असणारे चातुर्वर्ण्य मी निर्माण केले आहेत असे गीतेला म्हणावयाचे आहे. भगवद्‌गीतेतील ही भूमिका नीट समजून घेतली पाहिजे. गीतेप्रमाणे वर्ण चार आहेत. कारण गुणकर्म चार प्रकारचे आहेत. एकेका गुणकर्मविभागावर एकेक वर्ण उभा आहे. ही रचना परमेश्वरी असल्यामुळे माणसाच्यासाठी ती फक्त स्वीकारार्ह, पूजनीय वस्तू असते, परिवर्तनीय असू शकत नाही. आता राहिला प्रश्न एकेका वर्णातील माणसाचा. त्याचे गतजन्मीचे कर्म पाहून परमेश्वर त्यांना ह्या जन्मी वर्ण देतो. म्हणजे वर्ण जन्माने मिळतो. त्यासाठी या जन्मीचे गुणकर्म विचारात घेतलेले नसतात, गतजन्मीचे गुणकर्म विचारात घेतलेले असतात. याही ठिकाणी निवाडा करणारा परमेश्वर आहे. म्हणून या निर्णयाविरुद्ध तक्रार करणे हेच पाप आहे, अशी गीतेची भूमिका आहे. भगवद्-गीतेतसुद्धा चातुर्वर्ण्य जन्मसिद्ध आहे. तेथील गुणकर्माचा संबंध परमेश्वराने विचारात घ्यावयाच्या गतजन्मीच्या गुणकर्माशी आहे. ३३

गीता-ग्रंथ धर्मग्रंथ आहे, तो आजच्या राजकीय नेत्यांच्या सोयी सांभाळण्या-साठी सोयीस्कर भाषेत लिहिलेला ग्रंथ नाही. चातुर्वर्ण्य गुणकर्मावरून असू शकत नाही, हे गीतेला कळत होते. आधुनिक काळात माणसे न कळत तरी, मोकळेपणाने तरी, किंवा ढोंग म्हणून तरी गुणकर्मावरून चातुर्वर्ण्य अशी भूमिका घेतात. गुणकर्मावरून चातुर्वर्ण्य या भूमिकेतील मुख्य अडचण ही आहे की, म्हातारपणापर्यंत एकेकाचे जीवनमान तपासून पाहिल्याशिवाय त्याचा वर्णच ठरवता येणार नाही. गुणकर्मावरून चातुर्वर्ण्य म्हणजे षष्ठ्यब्दपूर्तीसारखा समारंभ करून एकेकाला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असल्याचे प्रशस्तिपत्रक देणे. असे प्रशस्तिपत्रक देताना बुद्धाला जन्मभर अध्ययन-अध्यापन केल्याबद्दल व ज्ञानसाधनेबद्दल ब्राह्मण असल्याचे प्रशस्तिपत्र द्यावे आणि बाईचे काय करावे ? तिला घरकाम केल्याबद्दल शूद्रत्व बहाल करावे की ब्राह्मणाची बायको असल्याबद्दल ब्राह्मण्य

द्यावे ? आणि कोण ब्राह्मण हे ठरवल्याशिवाय मौंज कशी करावी ? मौंजीशिवाय, वेदाध्ययन करण्याची सर्वांना परवानगी असल्याशिवाय या अध्ययनात टिकतील कोण हे ठरणार नाही. असे जन्मभर वेदाध्ययनात टिकल्याशिवाय ब्राह्मणपद मिळणार नाही. समाज ब्राह्मण असल्याची कबुली म्हातारपणी देईल. यानंतर मौंज, ही तरी पद्धत स्वीकारावी किंवा जन्माला आलेल्या सर्वांच्याच मौंजी करून टाकाव्यात. आता म्हातारपणी या मौंज झालेल्यांपैकी कोण कोण ब्राह्मण होतात ते पाहावे. आमच्या धर्मशास्त्राप्रमाणे माणूस जन्मतः शूद्र असतो, संस्काराच्या नंतर तो द्विज होतो; एरवी तो नव्हे. या भूमिकेप्रमाणे शूद्रांच्याही मौंजी करून त्यांना ब्राह्मण करता आले असते; पण हे धर्मशास्त्राला मान्य नव्हते. म्हणून
भाष्यकारांनी ' जन्मना जायते शूद्रः ' याचा अर्थ ' शूद्र इव जायते ' असा ३४
लावला. जन्मतः माणूस शूद्राप्रमाणे समजावा. पुढे मौंज करावी. **ज्याच्या आई-वडिलांची मौंज झाली आहे त्याची मौंज करावी. मौंजीनंतर बटू बापाच्या वर्णात जाऊन ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्य ठरतो. एरवी मौंज झाली नाही तर तो शूद्र आहेच.** वर्ण जन्मावरून ठरवावा. या जन्मीच्या गुणकर्मावरून वर्ण ठरवणे शक्य नाही. असा गुणकर्मावरून वर्ण ठरवावयाचा तर जन्म वर्णविहीन अवस्थेत जाईल, आणि शेवटी शेवटी वर्ण कुणाचा कोणता यावर मतभेद होईल. या बाबी प्राचीनांना कळतच होत्या. आधुनिकांना जन्मसिद्ध विषमतेला चिकटावयाचे असले म्हणजे ते गुणकर्माची सोयीस्कर भाषा वापरतात. कोणत्याच समाजव्यवस्थेत चातुर्वर्ण्य गुणकर्मावरून नसते. ते असले तर जन्मतःच असते.

पण समजा, चातुर्वर्ण्य गुणकर्मावरून म्हटले तरी त्याची सदोषता कमी होत नाही. आधुनिक जगातील यांत्रिकतेमुळे कर्म व ज्ञान एकत्र आले आहे. अव्वल दर्जाची बुद्धिमत्ता असणारा तरुण पहिल्या वर्गात उत्तीर्ण होत जातो, मग इंजिनीयर, तंत्रज्ञ किंवा डॉक्टर होऊ शकतो. विकेंद्रित अर्थव्यवस्थेत उत्पादनाच्या साधनांच्या सुधारणेची प्रक्रिया नव्हती. त्या ठिकाणी उत्पादनाचे सर्व कर्म परंपरागत विकेंद्रित साधनाचे म्हणजे अकुशल कर्म होते. नव्या जगात विज्ञानामुळे व यंत्रांमुळे कुशल कर्म निर्माण झाले. त्यामुळे कर्माने ज्ञान वाढवीत न्यावे लागते. ज्ञानाच्या गतीबरोबर कर्माची उपकरणे बदलतात. बीजांच्या नव्या जाती प्रयोगशाळेत शोधल्या जातात. प्रयोगशाळेतल्या शेतात शेती करणारे विज्ञानाच्या सर्वोच्च पदव्या घेतलेले असतात. आता मूळ युद्धच कुशल कर्म झालेले आहे. त्यामुळे पायलट किंवा रणगाडा चालवणारा लढाऊ जातीतील नसला तरी चालतो. मात्र त्याच्याजवळ उपकरणाचे कुशल ज्ञान असावे लागते. आधुनिक जगात ज्ञानकर्माची ही विभागणी रद्द झाल्यामुळे कर्म

व ज्ञान एकजीव झाले; आणि युद्ध सर्वव्यापी झाल्यामुळे ते रणांगणावर लढले जात नाही. दोन युद्धमान राष्ट्रे लढत असतात त्या वेळी शेतातील शेतकरी, कारखान्यांतील मजूर, वैद्य, परिचारिका— सगळे राष्ट्रच युद्धात गुरफटलेले असते. विज्ञानाने Total war निर्माण केली. Total war ने सर्व नागरिकांना क्षत्रिय होणे अपरिहार्य करून टाकले. सगळा समाज क्षत्रिय होतो तेव्हा राष्ट्रे जगतात. जेव्हा 'सर्वोच्च शूद्र' या स्थानी देशातील 'सर्वश्रेष्ठ ब्राह्मण' बसतात तेव्हा आधुनिकीकरण होते व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय वैश्य वृत्तीचा विचार लोकसभेत बसून कायद्याने करावा लागतो, तेव्हा आर्थिक नियोजन होते. वर्णव्यवस्था गुणकर्मावरून कधी नव्हतीच, गुणकर्मावरून असणे शक्य नव्हते. गुणकर्मावरून जरी ती होती असे म्हटले, तरी आधुनिक जगाला ती निरुपयोगी होऊन जाते. कारण आधुनिक जगात ज्ञानकर्माची विभागणीच शिल्लक राहत नाही.



वर्णव्यवस्थेमुळे संघर्षशून्य, स्पर्धाशून्य जग अस्तित्वात येते, ही भूमिकाच खोटी आहे. वर्णव्यवस्था जरी झाली तरी तिच्यात क्षत्रियाचा कर लादण्याचा व गोळा करण्याचा हक्क गृहीत आहेच. कर जास्त लादले, किंवा कर वसूल करून प्रजारक्षण केले नाही म्हणजे स्पर्धा आलीच. वर्णव्यवस्थेत वैश्यांचा व्यापार करण्याचा, सावकारी करण्याचा हक्क आहेच व सावकारी म्हटली की, व्याज लुबाडणे त्यात गृहीत असतेच. जुन्या धर्मराज्यात व्याजाचे दर ६ %, ९ % असे क्षुद्र नव्हते. त्या महान धार्मिक जगात व्याजाचे किमान दर शेकडा २५ असत. सामान्य व्यवहार शेकडा ५० ने होई. संकटकाळी बिनतारणाचे कर्ज असले की शेकडा १०० व्याज मान्य होते. पडत्या भावाने धान्य घ्यावे, वाढत्या भावाने विकावे ही पद्धत तिथेही होती. ह्याखेरीज राजांनी राजांना मारावे, व्यापाऱ्यांनी व्यापाऱ्यांना बुडवावे हाही उद्योग वर्णव्यवस्थेत चालू असणार. वर्णव्यवस्था म्हणजे सर्व उत्पादनाची साधने व म्हणून नफा जनतेच्या मालकीचा करणारी सहकारी पद्धत नव्हे. किंवा उत्पादनाची साधने राष्ट्रीय मालकीची करणारी समाजवादी पद्धत नव्हे. वर्णव्यवस्था ही सरंजामशाहीतील खाजगी मालमत्ता मान्य असणारी पद्धत होती. ती स्पर्धाशून्य समाज निर्माण कशी करू शकेल ?

तरीही स्पर्धाशून्यतेच्या नावावर गुणकर्माचा आधार देऊन वर्णव्यवस्थेची तरफदारी केल्याशिवाय राहवतच नाही, हा मनाच्या दर्शनी सनातनत्वाचा भाग आहे, हे खरेखुरे सनातनत्व नव्हे. हा सनातन धर्माचे धोरण म्हणून पुरस्कार आहे. गोळवलकरांनी केवळ वर्णव्यवस्थाच पुरस्कारिली नव्हती, त्यांना पुनर्जन्माचा सिद्धांतही मान्य आहे. पुनर्जन्माचा सिद्धांत मान्य न करता चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करता येतच नसतो. वर्णव्यवस्थेचा

पुरस्कार करणारे मन मागसलेल्यांनी मागासले राहावे, गुलामांनी गुलाम राहावे, दरिद्र्यांनी दरिद्री राहावे इतकेच सांगत नसते. ते मूलतः दारिद्र्य पापाचे प्रायश्चित्त आहे, असे सांगणारे मन असते. गतजन्मीच्या पापामुळे या जन्मीची गुलामी व दारिद्र्य ह्या भूमिकेचा अर्थ, 'शब्दा'त काहीही असला तरी व्यवहारात पैसा लुटण्याची शक्ती, मारण्याची शक्ती म्हणजे पुण्य असा होतो. दारिद्र्य म्हणजे पाप, म्हणून दरिद्री पापी आहेतच. श्रीमंती हे गत-जन्मीचे पुण्य म्हणून श्रीमंत पुण्यवान आहेतच, या अमानुष जंगली सिद्धांताचे सोज्ज्वळ रूप पुनर्जन्माचा सिद्धांत असतो. हा सिद्धांतही गुरुजींना मान्य आहेच. यातील एक गंमत पाहण्याजोगी आहे. गत-जन्मीच्या गुणकर्माप्रमाणे या जन्मी माणूस शूद्र होतो येथवर ठीक आहे;
पण या जन्मी माणूस ख्रिश्चन, मुसलमान हा कोणत्या गुणकर्माने होतो? ३६
हिंदू धर्मातील सर्व शूद्र आणि इतर सर्व धर्मांचे सर्व लोक हे सगळे मिळून शूद्र आहेत असे प्रतिपादन केल्याशिवाय चातुर्वर्ण्य स्पष्ट कसे होणार? हिंदू पुण्यवानांना हिंदू ब्राह्मण करणारा परमेश्वर मुस्लिम पुण्यवानांचे काय करतो? त्यांना मुस्लिम उलेमा करतो की हिंदू-धर्मशास्त्रज्ञ करतो? हिंदू पाप्याला परमेश्वर पुढच्या जन्मी हिंदू शूद्र करतो की महमद गझनीचा जन्म देऊन मूर्ती फोडण्याचा हक्क देतो हे कळल्याशिवाय वर्णव्यवस्थेसंबंधीची गुरुजींची भूमिका पुष्कळच संदिग्ध राहते असे म्हटले पाहिजे. कधी तरी गुरुजींनी हा मुद्दा स्पष्ट करून आपला सिद्धांत परिपूर्ण केला पाहिजे.

खरे म्हणजे, आपण निष्कारणच साप साप म्हणून दोरी झोडपून काढीत आहोत; कारण हिंदुस्थानच्या व हिंदूंच्या इतिहासात चातुर्वर्ण्य कधी अस्तित्वात नव्हतेच. वर्णव्यवस्थाही शास्त्रग्रंथांत, पोथ्यांत लिहिण्याची व्यवस्था असते; ती अस्तित्वात असणारी व्यवस्था नसते. एखाद्या समाजात वर्णव्यवस्था अस्तित्वात असेल ही गोष्ट समाजघटनेच्या दृष्टीनेच अशक्य आहे. ब्राह्मण हा वर्णही आहे आणि ब्राह्मण ही जातही आहे, म्हणून ब्राह्मण अस्तित्वात होता. वैश्याचे तसे नाही. कारण वैश्य आणि क्षत्रिय यांच्यात मूलतः कोणताही फरक नाही. आपण पोथ्यांतून समाजरचनेचा विचार करतो, त्यामुळे हा मुद्दा नीट स्पष्ट होत नाही. हा मुद्दा व्यवहारात विचारात घ्यावा लागतो. समजा, एखादा माणूस पाच एकरांच्या शेतीचा मालक आहे. हा छोटा शेतकरी वर्णव्यवस्थेत कोठे बसवावयाचा? हा ब्राह्मण क्षत्रिय नव्हे हे उघड आहे; पण हा शेतकरी वैश्य म्हणावा की शूद्र म्हणावा हे सांगणे कठीण आहे. पाच एकर जमीन असणारा शेतकरी स्वतः जमीन कसेल; पण तो कुणाची सेवा करणारा नोकर नाही. कृषी हे वैश्यकर्म मानलेले आहे. १०० एकर जमीन असणारा शेतकरी जमीनमालकही असतो, पशुधनाचा मालकही असतो, तो अन्नधान्य विकणाराही

असतो, विकत घेणाराही असतो– मूळ म्हणजे हा छोटा जमीनदार असतो. जुन्या जगात जमीनदार हेच गावाचे मालक असत. लढतही, रक्षणही करीत. किती एकर जमीन-मालकाला शूद्र म्हणावे, किती एकरांपासून किती एकरांपर्यंत वैश्य, आणि केवढी मोठी जमिनदारी असली म्हणजे क्षत्रिय, ह्याचे गणित ठरल्याशिवाय पोथीतील वर्णव्यवस्था समाजरचना होत नसते. धर्मशास्त्रकारांचे काय– त्यांनी सर्व वैश्य शूद्र करून टाकले आहेत. धनवान, संपत्तिवान, शेकडो दासदासी– नोकर घरी असणाऱ्या, भोगविलासात जीवन कंठणाऱ्या वेश्याही शूद्र म्हटल्या आहेत.

तुम्ही पुष्कळ शूद्र म्हणाल, पण सोन्याचे अलंकार घडवणारा सोनार ३७
स्वतःला दास्य करणाऱ्या गुलामांच्या बरोबर कसा समजेल? म्हणून दिसते काय की, लोक क्रमाने वैश्यांचे क्षत्रिय होतात, क्षत्रियांचे वैश्य होतात, वैश्यांचे शूद्र होतात, शूद्रांचे वैश्य होतात. त्या जुन्या विकेंद्रित जीवनात शेती हा सर्वांत मोठा व्यवसाय होता. दुसरा व्यवसाय पशु-पालनाचा होता. हा मेंढपाळ धनगर शूद्र समजावा की वैश्य समजावा याचे उत्तर देणार कोण? पुढे केव्हा तरी वर्णव्यवस्था भ्रष्ट झाली असे म्हणण्यात अर्थ नाही. ऋग्वेदातील अपालेचा बाप ब्राह्मण होता, चरितार्थ चालवण्यासाठी शेती करीत होता. गरजेनुसार प्रत्येकालाच जमीन नांगरून शेती करणे किंवा उपाशी मरणे हे पर्याय स्वीकारावेच लागतात. म्हणून जुन्या जगात क्षत्रिय जमीनदार आहेत, गोधनाचे मालक आहेत. शिवाय ते राजे असले की क्षत्रिय, एरवी वैश्य; आणि छोटा धंदा करणारे असले की शूद्र. धंदा मोठा करणारे असले म्हणजे वैश्य. त्या विकेंद्रित जीवनात उत्पादन न करणारे फक्त उत्पादित वस्तूंच्या खरेदी-विक्रीची यंत्रणा उभारणारे व्यापारी अस्तित्वात असणे शक्य नव्हते. त्या जगातील व्यापारी उत्पादनसाधनांचा मालक असणारा आणि खरेदी-विक्री करणारा असे.

जुन्या जगात वर्णव्यवस्था कधी अस्तित्वातच नव्हती. शक, पुलिंद, बर्बर, निषाद, नाग– अशा अनेक टोळ्या होत्या. त्या टोळीवाल्यांची राज्ये होती. वर्णव्यवस्थेत ही माणसे बसतच नाहीत. त्यांच्यात संस्कार नव्हते, म्हणून त्यांना व्रात्य क्षत्रिय म्हणावयाचे. गावांत शस्त्र तयार करणारे असत, रथकार असत, सोन्याहिऱ्यांचा व्यापार करणारे असत. त्यांना सोयीनुसार वैश्य किंवा शूद्र म्हणावयाचे. हिऱ्यांना पैलू पाडणारा वैकर्तन, मेलेली ढोरे ओढून टाकणाऱ्या माणसाप्रमाणे शूद्र आहे हे पोथ्यांनी म्हटले तरी अस्तित्वात कसे येणार?

अनेक समाजशास्त्रज्ञांनी वर्णव्यवस्थेचे अस्तित्व मान्य केले आहे, हे मला

ज्ञात आहे. वर्णव्यवस्था अस्तित्वात होती असे म्हणणारे लोक वर्णाच्या संकरातून जाती निर्माण झाल्या असे प्रतिपादन करतात. जणू एका गावी ब्राह्मण व क्षत्रिय असा बेकायदेशीर विवाह झाला की त्या संततीसाठी अशाच प्रकारची बेकायदेशीर संतती शोधून काढून लग्न लावीत व एकत्र जमवीत. वर्णसंकरातून जातींचा उदय ही कल्पनाच पोथीनिष्ठ व व्यवहार-दृष्ट्या अशक्य आहे. तसे तर ब्राह्मणांनी ब्राह्मणांच्यासाठी पोथ्या लिहून, आपण सर्व वर्णांचे गुरू आहोत, अशीही घोषणा केली होती. ज्याच्या-जवळ सत्ता नसते, संपत्ती नसते, उत्पादनाची साधनें नसतात, ती माणसे सत्ता–संपत्ती हातात असणाऱ्यांच्या सर्व गरजा सांभाळीत, त्यांचे आश्रित म्हणून जगत असतात. जुन्या काळातील हा ब्राह्मणवर्ग, क्षत्रिय वैश्यांचा आश्रित होता, आपल्या पोथ्यांत आपणच अग्रजन्य आहोत असे सांगत ३८
होता, इतकेच काय ते. विकेंद्रित अर्थव्यवस्थेत फुटकळ फुटकळ वसाहतींच्या टोळ्या असतात, वंशपरंपरागत चालणारे विकेंद्रित उद्योगधंदे असतात. यांतून साकार होणाऱ्या समाजात धंद्याचा आधार असणाऱ्या जाती असतात. वंशाचा, प्रदेशाचा आधार असणाऱ्या टोळ्या असतात. अशा या समाजाच्या जडणघडणीत सर्व सत्ता व संपत्ती ताब्यात ठेवून समाजावर गुलामगिरी लादणारे वरिष्ठवर्गीय गट असतात. कारण सरंजामशाहीत माणसांची गुलामी असतेच. या वरिष्ठवर्गीयांचा आश्रित पुरोहितांचा वर्ग असतो. तो वरिष्ठांनी वरिष्ठ रहावे, गुलामांनी बंड करू नये, या मुद्द्याच्या प्रतिपादनार्थ ईश्वराच्या नावे सोयीस्कर तत्त्वज्ञान उभे करतो. अशा रीतीनें वरिष्ठ वर्गाचे हितसंबंध जपताना आश्रित म्हणून जगण्याची या पुरोहित वर्गाला संधी मिळते. वरिष्ठ वर्गीयांचे हितसंबंध जपावेत म्हणजे आपले जगणे सुरक्षित राहते. या वास्तविक पातळीवरील जाणीवेचा ‘ईश्वरप्रणीत चातुर्वर्ण्य व्यवस्था व पुनर्जन्माचा सिद्धान्त हा गोंडस तात्त्विक आविष्कार आहे. वर्णव्यवस्थेचा पुरस्कार समाजाच्या परिवर्तनाला विरोध करून हितसंबंधीयांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी असतो, ती साध्याभोळ्या ईश्वरनिष्ठ धार्मिकतेची बाजू नाही, त्यामुळे क्रान्तिविरोधी प्रतिगामी तत्त्वज्ञान उभे आहे.

गोळवलकरांना भारतीय आत्मा नसणाऱ्या परदेशी अनुकरणाची चीड आहे, म्हणून त्यांना आर्थिक नियोजन नको; त्यांना परदेशी कल्पना म्हणून समाजवाद नको. प्रौढ मतदानावर आधारलेल्या लोकशाहीचा झुंडशाही, हुल्लडबाजी असा उपहास त्यांनी केलेलाच आहे. प्रौढ मतदान, आर्थिक नियोजन व समाजवाद नको, त्याऐवजी भारतीयत्व व वर्णव्यवस्था हवी आहे. या भूमिकेचा अर्थ उघड आहे. जुन्या काळात काय किंवा नव्या काळात काय, उघड्या नागड्या स्वार्थाचे हितसंबंध स्पष्ट व्यवहार बोलून टिकवणे शक्य नसते, त्यांना कोणता तरी आडपडदा लागतो. मग

मजुरांच्या पगारवाढीला विरोध करावयाचा असला की, माणसे जडवाद किती अनैतिक आहे, धर्मच शेवटी माणसाचे कसे कल्याण करील या बाजूने बोलू लागतात. धर्म हे मागसलेल्या समाजजीवनात एक नशा आणणारे द्रव्य आहे. या द्रव्याचे सेवन समाज-जीवनात करून गुलाम प्राणपणाने मालकाचे रक्षण करतात, गुलामांच्या मुक्ततेसाठी येणाऱ्यांचे प्राण घेण्यास तयार होतात. धार्मिक, राजकीय नेत्यांना धर्म हा धार्मिक आचरण करून मोक्षाला जाण्यासाठी नको असतो, तर धर्माचा आधार घेऊन इहलोकातील हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी हवा असतो. चातुर्वर्ण्यनिष्ठा ही गोळवलकरांची जीवननिष्ठा आहे, अशी त्यांची घोषणा आहे. खरोखरच जर ती त्यांची जीवननिष्ठा असती तर गोळवलकर मोक्ष मिळवण्यासाठी विजनात तप करण्यासाठी निघून गेले असते. हिंदू धर्म- ३९
शास्त्राने ब्राह्मणांना धर्मचर्चेचा अधिकार दिला आहे. राजकीय संघटनांचे नेते होण्याचा अधिकार धर्मशास्त्र देत नसते, हा अधिकार धर्माचा सोयीस्कर वापर करण्याच्या प्रवृत्तीतून येतो.

धार्मिक माणूस आणि धार्मिक राजकारणाचा राजकीय नेता यांच्यात एक मूलभूत फरक असतो. धार्मिक माणसाचे हितसंबंध कुठे तरी परलोकात गुंतलेले असतात. त्या हितसंबंधाच्या पूर्ततेसाठी इहलोकातील धार्मिक माणसाचे जीवन ही एक साधना असते. धार्मिक माणसाला प्रेरणा जन्म-मृत्यूच्या चक्रातून सुटण्याची असते. हा मनाने रूढीवादी, परंपरावादी आणि धार्मिक माणूस सामाजिक प्रगतीला अडथळा असतोच. पण हा अडथळा त्याच्या स्वतःच्या मनात असतो. परिस्थितीच्या दडपणाने किंवा समजावून सांगून धार्मिक माणसाचे मन बदलता येत असते. धार्मिक राजकारण करणाऱ्या राजकीय नेत्यांचे मात्र असे नसते. हा नेता राजकारण धर्माच्या नावे करतो, पण याचे हितसंबंध इहलोकात गुंतलेले असतात. तो भूत-कालीन धर्माच्या नावे राजकारण करीत असला, तरी वर्तमानकालीन परिस्थितीच्या गरजा त्याने जाणून घेतलेल्या असतात. असा नेता काही इहलौकिक प्रश्न आणि पारलौकिक श्रद्धा ह्यांची बेमालूम सांधेजोड करून देतो. आपल्या गरजेला अनावश्यक असलेला धर्माचा भाग तो फटक्यात रद्द करतो आणि आवश्यक असलेला भाग धर्मात नसला तरी स्वीकारतो. हा मूलभूत फरक असल्यामुळे बहुसंख्याक समाज धर्मप्रभावाखाली असला तरी त्याच्या संघटित निषेधाची प्रतिकाराची गरज नसते. तिथे गरज सातत्याने सुधारणा करण्याची असते. राजकीय नेतृत्व असे चर्चांनी सुधारले जात नसते. तिथे धोरणांचे पवित्रे विचारपूर्वक घेतलेले असतात. त्यामुळे संघटित प्रतिकार करून हे राजकारण मोडून काढावे लागते. तिथे समजावून सांगून चर्चांनी काही बदलण्याचा संभव नाही. अर्थात हे धार्मिक राजकारणाच्या नेत्यांसंबंधी झाले आहे. अनुयायी याहून निराळा

असतो. त्याचा विचार स्वतंत्रपणे करावा लागतो.

गोळवलकर गुरुजींच्या चातुर्वर्ण्य विचारातील एक खोच लक्षात घेण्याजोगी आहे. त्यांना अस्पृश्यता नको. अस्पृश्यता संपवण्यासाठी ते देशातील सर्व धर्माचार्यांना एकत्रित आणून काही तोड काढण्यास तयार आहेत. गोळवलकर वर्णव्यवस्थेचे पुरस्कर्ते आहेत. अस्पृश्यतेचे पुरस्कर्ते नाहीत. यातील फरक आपण नीट समजावून घेतला पाहिजे हा धार्मिक नेता आणि धार्मिक राजकारणाचा नेता यांतील फरक आहे. दहा कोटी अस्पृश्य हिंदू स्वतःपासून दूर ठेवावेत व आपली संघटना कच्ची करून घ्यावी, विरोधकांची शक्ती वाढू द्यावी हे गोळवलकरांना नको आहे. अस्पृश्यता नसावी. सर्व अस्पृश्य हिंदूसमाजात खेळीमेळीने पचवले जावेत, हे गोळवलकरांना मान्यच ५० आहे. अस्पृश्यांची सामाजिक परिस्थिती सुधारावी, यासाठी गोळवलकर प्रयत्न करण्यास तयार आहेत. पण त्यांचा अस्पृश्यांना मिळणाऱ्या शिक्षणातील सवलती, नोकऱ्यांतील सवलती, त्यांच्यासाठी असलेल्या संसदेतील विधान सभेतील राखीव जागा, ह्यांना विरोध आहे. थोडक्यात म्हणजे, गोळवलकरांना वर्णव्यवस्था हवी आहे. म्हणून समाजात शूद्रही हवे आहेत. फक्त शूद्र अस्पृश्य राहावेत, हे त्यांना नको आहे. शूद्र स्पृश्य झाल्याशिवाय त्यांच्याकडून सर्व प्रकारची सेवा करून घेता येणे शक्य नसते. गुलामाची गुलामी कायम राहावी, फक्त त्यांचा विटाळ मात्र जावा अशी ही मोठी आक्रमक भूमिका आहे. ती मांडलेली मात्र अत्यंत सोज्ज्वळ शब्दात दिसते. रूढी बदलतात, हे गोळवलकरांना मान्यच आहे. कारण हे मान्य केल्याशिवाय संघाचे शिबिरच चालणार नाही. त्यांच्या संघस्थानी होणारा एक हात छातीशी आडवा करून घडणारा नमस्तेच भारतीय परंपरेत नाही. भारतीय परंपरेत बरोबरींच्याशी गळाभेट आहे. उरलेल्यांना साष्टांग नमस्कार आहे. जुन्या रूढी बदलतात, नव्या रूढी येतात. ही भूमिका घेतल्याशिवाय उगवत्या सूर्याला अर्घ्य देण्याचे सोडून व संध्येचे नित्य कर्म सोडून सर्वांनी शाखास्थानी जमावे व ओळीत उभे राहून नमस्ते करावा हेच शक्य नाही. फक्त त्यांना रूढी बदलण्याची चळवळ नको आहे. रूढी आपोआप बदलत जातातच, त्या बदलणाऱ्याच असतात, रुढी मोडण्याची चळवळ मात्र करण्याची गरज नाही, ही भूमिका घेतल्याशिवाय सुधारणेच्या सर्व चळवळींविषयी तुच्छता दाखवता येत नाही.

सुधारणेची कोणतीही चळवळ आपण हाती घ्यावयाची नाही, इतरांनी चालवल्यास तिला पाठिंबा द्यावयाचा नाही, हीच संघाची परंपरा राहिली. त्यांनी अस्पृश्यता निवारणाच्या आंदोलनात किंवा मंदिर-प्रवेशाच्या आंदोलनात भाग घेतला नाही. ज्यामुळे हिंदू समाजातील

सनातनी मन दुखावले जाईल असे काही करायचे नाही, ज्यामुळे वरिष्ठ-वर्गाच्या हितसंबंधाला बाधा येईल असेही काही करावयाचे नाही. लोकांच्या समोर विचार ठेवून त्यांना जागृत करावे, ही संघाची पद्धतच नाही. सर्व हिंदूंनो संघटित व्हा आणि संघटित होण्यासाठी संघात या, यापलीकडे संघ काही सांगण्यास तयार नाही. त्याचा अर्थ संघाजवळ विविध प्रश्नांवर मते नाहीत, विचार नाहीत असा नाही. सर्व प्रश्नांचा अतिशय तपशीलवार विचार संघाच्या कार्यकर्त्यांनी केलेला आहे. त्यांच्यातील बुद्धिमान तरुण यज्ञयाग, आश्रम-जीवन यांचा भोक्ता नाही. तो औद्योगीकरणाचा आणि यांत्रिकीकरणाचा समर्थक आहे. फक्त हे करण्यासाठी शेत-मजुरांना घेऊन जमिनदारांचे हितसंबंध धोक्यात आणणे संघाला नको, तसेच त्यांना मजुरांच्या संघटना उभारून भांडवलशाही-विरुद्धचा लढाही नको. खाजगी मालकीच्या पवित्र हक्कावर व खाजगी मालकीच्या तत्त्वानेच व्यक्तिस्वातंत्र्य सुरक्षित राहते, यावर संघाचा विश्वास आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात संघ तटस्थतेच्या विरोधी, अलिप्ततावादाच्या विरोधी असून इस्रायलला त्यांचा पाठिंबा आहे, त्यांचा कम्युनिझमविरोधही प्रसिद्ध आहे. संघाजवळ मते नाहीत असे नाही, मते आहेत; ती निश्चित आहेत, सुसंगत आहेत, फक्त ते तत्त्वज्ञान घेऊन त्यांना जनतेत उतरावयाचे नाही. जनतेसमोर हिंदुत्व, राष्ट्रीयत्व, पूर्वपरंपरा, असे फक्त प्रचंड धुके उभे केले तरच आपण वाढू शकू असे संघाला वाटते. बुद्धिवादी जनतेला सांगून पराभूत होण्याची सावरकरांच्याप्रमाणे संघाची इच्छा नाही. म्हणून गुरुजींच्या भूमिकेतील 'रूढी बदलतच असतात.' हे वाक्य संघ काही परंपरेहून निराळे काम करतो आहे याचे बोधक आहे, व 'रूढीविरुद्ध चळवळी नकोत' हे वाक्य संघाला जनतेची शक्ती वरिष्ठ वर्गाविरुद्ध संघटित व्हायला नको याचे बोधक आहे. 

ग्रामीण भागात पसरलेल्या अशिक्षित सनातनी, आणि शहर भागात संघटित होऊन क्रमाने ग्रामीण भागाकडे सरकणारा हा सुशिक्षित हिंदुत्ववादी यांच्यात फार मोठा फरक आहे. तो सनातनी, परंपरेत बदल करू न इच्छिणारा, आधुनिकताविरोधी पण धार्मिक बाबतीत उदार व सहिष्णू आहे. हा सुशिक्षित हिंदुत्ववादी, परंपरा मोडून आधुनिकतेचे युग निर्माण करू इच्छिणारा व धार्मिक बाबतीत अत्यंत असहिष्णू असा आहे. पहिल्याची मागणी सर्वांना समाधानाने जगता यावे इतकीच राहील, दुसऱ्याची मागणी हिंदूतील वरिष्ठ वर्गाच्या हितसंबंधाचे रक्षण करून हिंदूंना सुखमय जीवन उपलब्ध करून द्यावे, इतरांचा विचार वेगळा करावा अशी राहील.

कधी कधी लोक विचारतात, वर्णव्यवस्थेला आधुनिक विज्ञानाचा पाठिंबा आहे काय? हा प्रश्न एका चमत्कारिक विसंवादातून निर्माण झालेला आहे. सनातनी मन मूलतः उत्क्रान्तिवादाचे द्वेष्टे असते. क्रमाक्रमाने ज्ञान वाढत आहे, माणूस अधिक परिपूर्ण होत आहे, त्याची उत्पादकता वाढत आहे, हेच या सनातनी मनाला मान्य नसते. त्याच्यासमोर भूतकाळात कुठे तरी समाजाची परिपूर्ण अवस्था असते. सगळे ज्ञान-विज्ञान कुठे तरी पूर्वीच परिपूर्ण झालेले असून त्यात आता काहीही भर पडण्याचा संभव नाही, असे उगीचच या मनाला वाटते. आधुनिक विज्ञानाचे सर्व शोध आमच्या प्राचीन ऋषि-मुनींना ज्ञात होतेच. पाश्चात्यांनी आमचा अथर्ववेद चोरला, आमची शास्त्रे चोरली, व स्वतःची प्रगती करून घेतली; हे सांगताना कुठे तरी समाधान वाटते. फ्रॉइडचे मानसशास्त्र, हॅवलॉक इलिसचे काम-विज्ञान, ऋग्वेदातील नासकीय सूक्तात गृहीत आहेच, हेच सिद्ध करण्याची अहिताग्नी राजवाडे यांची अशीच धडपड होती. हिंदू धर्मातील प्रत्येक कल्पनेला वैज्ञानिक आधार शोधून काढण्याची काही कमी खटपट गो. म. जोशी यांनी केलेली नव्हती. आजही संत पाचलेगावकर महाराज प्राचीन भारतात विमानविद्या कशी होती याचे सुरस मनोरम वर्णन सभांच्यामधून करीत असतातच. एकेक जुनी कल्पना घ्यायची आणि ती आधुनिक विज्ञानाने कशी बरोबर उतरते हे सांगावयाचे हा सुधारणाविरोधी सनातनी मनाचा आवडता छंद आहे. त्यापैकीच वर्णव्यवस्थेला वैज्ञानिक पाठिंबा दाखवण्याचा एक प्रयत्न चालू असतो. ४२

विज्ञान काय सांगत असते ह्याबाबतच्या सारासार विचारसरणीला तिलांजली दिल्याशिवाय वर्णव्यवस्थेला विज्ञानात आधार हुडकता येत नसतो. स्त्री-पुरुष संयोगातून अपत्यनिर्मिती होते हे सांगण्याचे काम विज्ञानाचे आहे. एखाद्या स्त्रीला विवाहपूर्व मातृत्व आले तर हे मातृत्व नैतिक समजावे की अनैतिक समजावे हे विज्ञान सांगत नसते. गतजन्मीच्या गुणकर्मानुसार या जन्मी जन्म लाभतो की नाही हे सांगण्यापूर्वी विज्ञानाला मृतोत्तर जीवन प्रयोगशाळेच्या कक्षेत आणून स्वर्ग-नरकांचे व लिंगदेहाचे त्याच्या भोवती गुंडाळलेल्या कर्मभोगाच्या गाठोड्याचे प्रयोगशाळेत निरीक्षण करावे लागेल. वर्णव्यवस्थेला विज्ञानाचा पाठिंबा आहे की नाही, हा प्रश्न माणसाने मिशा ठेवाव्यात की ठेवू नयेत याबाबत रसायन विज्ञानाचे, म्हणणे काय आहे, हे विचारण्याइतके हास्यास्पद आहे. वर्णव्यवस्थेला मानववंशाचा आधार नसतो, ब्लड-ग्रुपचा आधार नसतो, तसाच विज्ञानाचाही आधार नसतो. विज्ञान नर-मादी हा भेद टाकू शकेल, ब्राह्मण-क्षत्रिय भेदाचे घटक विज्ञानात नसतात. वर्णव्यवस्था माणसाची प्रवृत्ती-धर्माप्रमाणे चार गटांत विभागणी करते. लढणे, व्यापार करणे, सेवा करणे आणि ज्ञान वाढवणे, ज्ञानार्जन करणे अशा चार कुठल्याही समाजातील

मूलभूत प्रवृत्ती आहेत, हे म्हणणे तरी बरोबर आहे काय ? कारण या गटात कला-प्रवृत्तीला जागा नाही, क्रीडा-प्रवृत्तीला जागा नाही, अनेक प्रवृत्तींना या गटात जागाच नाही. ठराविक पोथ्या पाठ कराव्यात, ठराविक पद्धतीने कर्मकांड सांभाळावे, व त्यावर धनार्जन करून आपला चरितार्थ चालवावा ही ब्राह्मणवर्गाची प्रवृत्ती. ज्ञान-जिज्ञासा व्यक्तीची प्रवृत्ती असते, एखाद्या समाजगटाची नसते. ज्या समाजाने सगळा धर्मच चरितार्थ चालवण्यासाठी व्यापाराचे साधन म्हणून बाजारात मांडला व सत्यनारायणाचा सव्वा आणा, श्राद्धाचा एक रुपया असे ज्यांनी भाव ठरवले, त्यांनी आपली मूलभूत प्रवृत्ती ज्ञानविज्ञान व ज्ञानार्जन आहे असे म्हणावे यापेक्षा हास्यास्पद काय असेल ? प्राचीन काळी जेव्हा अजून कलियुगातील पाखंड वाढलेले नव्हते त्याही वेळी उपनिषदातील तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मविद्या समजून घेण्यासाठी अनेकदा ब्राह्मणांना क्षत्रियांच्या पायांशी जाऊन उभे राहावे लागले आहे. ४३

आधुनिक यंत्र-उद्योगांनी उत्पादनाची शक्ती वाढवल्याशिवाय व छपाईच्या सोयी निर्माण झाल्याशिवाय सर्वांना कापड, सर्वांना शिक्षण ही कल्पनाच विकसित होऊ शकत नाही. व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा व समतेचा विचारच आधुनिक विज्ञानाच्या उदयातून बळकट होत असतो. हे आधुनिक विज्ञान जुनी समाजव्यवस्था उध्वस्त करतच विकसित होते, हे ऐतिहासिक सत्य नजरेआड करून वर्णव्यवस्थेला वैज्ञानिक आधार हुडकण्यात अर्थ नाही. फार जुन्या काळी चार्वाकांनी सरळच हा प्रश्न विचारलेला होता की, जर या यज्ञात मारलेला बोकड स्वर्गाला जात असेल हे खरे असते, तर स्वर्गसुखाची इच्छा असणाऱ्या यजमानांनी आधी आपले बलिदान करावे, असा हट्ट धरला असता. धर्माचा तार्किक उलगडा करता येत नसतो. त्याला वैज्ञानिक पाठिंबा नसतो. विज्ञान हे खरे आहे हे ज्यांना पटते, पण सनातनी मोह सुटत नाहीत अशी माणसे सर्वमान्य खरे विज्ञान घेऊन धर्म खरा सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. सोवळ्यामध्ये जेवावे हा उपदेश करणाऱ्यांना रेशमात वीज असते, तिचा आरोग्याला फायदा घ्यावा हे प्रतिपादन करावयाचे होते काय ? मागासलेल्या समाजात परंपरेने प्रस्थापित हितसंबंध टिकवून धरण्याची जी धडपड असते त्याचे हे वेगवेगळ्या पायरीवर आविष्कार आहेत.

पण वर्णव्यवस्थेचे खोटेपण सिद्ध करणे, जातिव्यवस्थेचा प्रतिगामीपणा मांडणे यामुळे गोळवलकरांचा पराभव करता येईल, अशी जर कुणाची समजूत असेल तर तो भोळेपणाचा कळस मानला पाहिजे. संघाजवळ वरिष्ठवर्गीयांचे हितसंबंध रक्षण करणारे तत्त्वज्ञान आहे. पण कनिष्ठ अगर वरिष्ठ मध्यमवर्गीय लाखो तरुण जे संघात जातात ते जमीनदारी आणि

भांडवलशाहीच्या रक्षणासाठी जात नाहीत. गुरुजींचे खरे सामर्थ्य स्वतः भोवती सुशिक्षित हिंदू तरुण उभा करण्यात आहे. हा सुशिक्षित हिंदू तरुण एका जाणिवेने पछाडलेला आहे. त्याला असे वाटते की, या देशातील सरकार दुबळे आणि मुसलमानधार्जिणे आहे. या सरकारच्या हातात बहुसंख्याक हिंदूंचे जीवित सुरक्षित नाही, म्हणून हा तरुण संघाच्या भोवती जमत असतो. सर्व सेक्युलर पक्षांनी सुधारणाद्रोही, राष्ट्रद्रोही आक्रमक मुस्लिम जातीयवादाविषयी नेहमीच जे शरणागतीचे, तडजोडीचे, मूक पाठिंब्यांचे धोरण स्वीकारले आहे, त्याची चीड म्हणून सुशिक्षित हिंदू संघात जातो. ही लाखोंची फौज मग गुरुजी त्यांना योग्य वाटणाऱ्या राजकारणासाठी वापरू शकतात. गोळवलकरांचा विजय हा हिंदू समाजातील आधुनिकतावादाचा पराजय आहे. मुस्लिम जातीयवादाच्या प्रश्नाबद्दल स्पष्ट व न्याय्य भूमिका घेतल्याशिवाय आणि मुस्लिम समाजातील कर्मठपणाच्या भिंतीला तडे गेल्याशिवाय गोळवलकरांचा पराभव होऊ शकणार नाही. वर्णव्यवस्था हे गोळवलकरांचे बुजगावणे आहे.

उद्या जर संघाच्या ताब्यात भारतीय राज्य आले तर ते राज्य धनुर्वेद शिक्षणाच्या शाळा काढणार नाही. विद्यालयाचे नाव द्रोणाचार्य विद्यालय असले तरी अभ्यासक्रमात आधुनिक शस्त्रविद्या शिकवली जाईल. संघाची राजवट स्मृतींचा कायदा लागू करणारी, स्त्रियांचे शिक्षण बंद करणारी, व बालविवाह सुरू करणारी राजवट असणार नाही. ती राजवट लोकशाही मान्य नसलेली; पण आधुनिक राजवट असेल. संघ वर्णव्यवस्थेचा पुरस्कार वर्णव्यवस्थेच्या प्रेमापोटी करीत नाही, ग्रामीण भागातील धार्मिक माणूस आपल्या ध्वजाखाली गोळा करण्यासाठी करतो. आधुनिक सुशिक्षितांचा हा सोयीस्कर धर्मवाद ही खरी भीतीची, चिंतेची बाब आहे.

# गांधी-हत्या आणि मी

म. गांधी यांची ३० जानेवारी १९४८ ला झालेली हत्या ही मानवी इतिहासातली एक अमानुष आणि क्रूर घटना आहे. त्याचप्रमाणे म. गांधींच्या जीवनातील ही एक परम उज्ज्वल नाट्यमय घटनाही आहे. सॉक्रेटिस, भगवान येशू या महामानवांचा ज्याप्रमाणे आपल्याच देशबांधवांकडून अंत करण्यात आला त्याचप्रमाणे म. गांधींचाही शेवट झाला. या दिव्य बलिदानामुळे गांधीजींचे नाव मानवतेच्या वेदीवर बलिदान करणाऱ्या महात्म्यांच्या यादीत कायम समाविष्ट झाले. पू. बापूंच्या जीवनाच्या शेवटाची इतकी समर्पक अशी रचना कुणालाही करता आली नसती. ज्यांनी अनंत अपकार केले त्यांच्यावरही उपकार करण्याचा हट्ट धरणारा हा महात्मा, आपल्या वेड्या ध्येयवादाची ज्योत व्यवहारवादी जीवनाला पेलणे शक्य नाही याची जाणीव ठेवून प्रज्वलित करत होता. ही ज्योत त्या व्यक्तीच्या निधनाने अधिक प्रज्वलित झाली !



पुढच्या वर्षी या घटनेला दोन दशके पूर्ण होतील; आणि त्यानंतर लवकरच गांधीजींची जन्मशताब्दी साजरी होईल. आपल्या हयातीत कोट्यवधींच्या श्रद्धेचे स्थान झालेला हा महापुरुष आपल्या निधनानंतर त्यापेक्षा अधिक लोकांच्या श्रद्धेचे स्थान झालेला आहे. आज तर काँग्रेस-पक्षावर टीका करण्यासाठी जनसंघापासून कम्युनिस्टांच्यापर्यंत प्रत्येक जण महात्मा गांधींचे नाव घेत असतो व काँग्रेस गांधीजींच्या ध्येयापासून बाजूला सरकली आहे असे सांगत असतो ! म. गांधी हे ज्यांचे एक श्रद्धास्थान आहे अशा या देशातील कोट्यवधी लोकांच्यापैकी मी एक आहे. हा प्रचंड आदर मनात असताना गोपाळ गोडसे यांच्या पुस्तकासंबंधी निर्विकारपणे विचार करणे मला कठीण आहे. पण हे जरी कठीण असले तरी एका अप्रिय ऐतिहासिक घटनेचा अभ्यास म्हणून हे कार्य करणे भाग आहे.

म. गांधी हे आमचे श्रद्धास्थान आहे, ही गोष्ट मोकळेपणाने मी वर नोंदवली आहे. याचा अर्थ गांधीजींची सर्वच मते मला पटतात असा

होत नाही. खरी गोष्ट अशी आहे की, ज्या दिवशी महात्माजींचा वध
झाला त्या दिवशी योगायोगाने मी एका सशस्त्र उद्योगात गुरफटलेला
होतो ! त्या काळात हैद्राबाद संस्थानात मुक्ती-आंदोलन चालू होते, व
हे आंदोलन अहिंसक कधीच नव्हते ! निर्भेळ अहिंसेच्या तत्त्वज्ञानावर
त्या वेळी आणि आजही माझी श्रद्धा नव्हती आणि नाही. त्या वेळी
आर्थिक प्रश्नांचा तपशीलवार विचार करण्याइतकी बुद्धी प्रगल्भ नव्हती.
आज त्या वेळच्या मानाने विचार करण्याची शक्ती थोडी वाढलेली
आहे. ग्रामोद्योगप्रधान विकेंद्रीकरण आणि ग्रामप्रधान समाजरचना
या दोन्ही कल्पना मला पटत नाहीत; पण असे असूनही गांधीजी
हे आमचे श्रद्धास्थान होते व आहे. त्यांचे विचार पटण्या न पटण्याचा
प्रश्नच नव्हता. ते आमच्या दृष्टीने नव्या भारत राष्ट्राचे उद्गाते होते; ४६
राष्ट्रपिता होते, भारतीय जनतेचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी होते. आणि हीच
गोष्ट भारतातील शेकडो कार्यकर्त्यांची होती. त्यांना गांधीवाद पटत नव्हता.
गांधीजींच्या अंत्ययात्रेत सामील झालेल्या दिल्लीतील दहा लाख नागरिकांना
कुणी गांधीवादी म्हटले नसते ! कॉंग्रेसमध्येही गांधीवादी फारच थोडे होते.
गांधीवादी असणे या घटनेपेक्षा पू. गांधींना श्रद्धेय मानणे ही गोष्ट
अगदीच निराळी होती. ही श्रद्धा, मत आणि विचार यांच्याशी निगडित
नसून राष्ट्राच्या उत्थानात गांधींचे स्थान व जनतेच्या मनात असणारी
त्यांच्याविषयीची श्रद्धा यांच्याशी निगडित होती.

ज्या वेळी म. गांधींची हत्या घडली त्या वेळी थोर नेत्यांनीसुद्धा आपला तोल सोडलेला होता. गांधीहत्येबद्दल महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाला जबाबदार धरण्यात आले आणि निर्लज्जपणे अनेकांनी हे गृहीत धरणे रास्त मानले ! महाराष्ट्र हा गांधीजींचा कडवा विरोधी प्रांत, आणि कडवा अनुयायी प्रांत; ही दुहेरी वस्तुस्थिती समजून घेण्याची कुणाची तयारीच नव्हती. गांधींना जे अंतेवासी मिळाले, आणि जे निष्ठावंत अनुयायी मिळाले त्यांत महाराष्ट्रीयांच्याइतकी संख्या कुणाचीच नाही. अप्पा पटवर्धन, दादा धर्माधिकारी, अण्णा सहस्रबुद्धे, शंकरराव देव, किंबहुना, आचार्य विनोबा भावे ही सगळी महाराष्ट्री ब्राह्मण मंडळी होती. आचार्य जावडेकर, भागवत, साने गुरुजी, आचार्य भन्साळी अशी अनेक कार्यकारी मंडळी पुन्हा ब्राह्मणच होती. महाराष्ट्रात हिंदू समाज हिंदू महासभेमागे नव्हता, तो कॉंग्रेसमागेच होता ! महाराष्ट्रीय ब्राह्मण समाजातसुद्धा कॉंग्रेस, समाजवादी व कम्युनिस्ट याचीच बहुसंख्या होती. हिंदू महासभेमागे ब्राह्मणवर्गही पुरेसा नव्हता, ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रातील ब्राह्मणवर्ग, देव, दास्ताने, काका गाडगीळ, सोमण इत्यादींच्या मागे होता. विदर्भात अभ्यंकर, काळे, बारलिंगे, वामनराव जोशी, सगळे ब्राह्मणच होते. कॉंग्रेसमध्ये ब्राह्मणेतर समाज मोठ्या संख्येने आलाच १९३६

च्या नंतर. हा सर्व ब्राह्मणेतर समाज तोपर्यंत स्वातंत्र्यापासून दूर, टिळकांच्या विरोधी, चिरोलच्या आणि गांधीजींच्या विरोधी, सजातीय संस्थानिकांचे कौतुक करण्यातच रंगलेला होता ! १९३६ नंतर केशवराव जेधे यांच्या नेतृत्वाखाली बहुजनसमाज काँग्रेसच्या जवळ आला. स्वातंत्र्याच्या लढ्यात धैर्याने व ईर्षेने हा समाज लढत होता. त्यांचा त्याग, देशनिष्ठा यांचे कौतुक केल्यानंतर एक प्रश्न विचारावासा वाटतो, यांच्यातील किती जण गांधीवादी होते ? गांधीजींच्या तत्त्वज्ञानाला वाहून घेतलेले किती कार्यकर्ते आणि नेते ब्राह्मणेतर समाजाने महाराष्ट्रातून दिले आहेत ? गांधीहत्येची जबाबदारी ब्राह्मणवर्गावर टाकण्याचा ब्राह्मणेतरांना काहीच नैतिक अधिकार नव्हता, तरी ती टाकली गेली.

४७

महाराष्ट्राबाहेर गांधीजींच्या हत्येबद्दल जनतेला शोक झाला नाही की काय ? पण तिथे दंगली झाल्या नाहीत; उलट चालू दंगली बंद पडल्या. निजामी राजवटीतील पाच मराठी भाषिक जिल्ह्यांत कोणतीही दंगल झाली नाही. दिल्ली, बिहार व कलकत्ता येथील हिंदू-मुसलमानांच्या जातीय दंगली महात्माजींच्या हत्येच्या प्रचंड धक्क्याने एकदम थांबल्या. महाराष्ट्र हाच एक असा प्रांत होता की, जिथे गांधीवधामुळे दंगली झाल्या, आणि या दंगलींचे नेतृत्व गांधीजींच्याविषयी ज्यांच्या मनात कधीच फारशी श्रद्धा नव्हती त्यांनी केले ! साने गुरुजींच्यासारख्या थोर आत्म्याने गांधीहत्येबद्दल संपूर्ण महाराष्ट्रालाच जबाबदार धरले व एकवीस दिवसांचे उपोषण केले. राष्ट्र सेवा दलाचा एक पाईक म्हणून गुरुजींच्या विषयीसुद्धा माझ्या मनात अलोट श्रद्धा आहे; पण साने गुरुजी यांचे हे उपोषण मला त्याही वेळी पटले नव्हते. आज इतक्या वर्षांनंतरसुद्धा ते अवास्तव वाटते. महात्मा गांधींच्या हत्येनंतर जातीय दंगलींच्याविषयी माझे स्पष्ट मत नोंदवल्यानंतर अजून दोन-तीन भोवतालच्या प्रश्नांविषयी आधीच मी मत देऊन टाकतो. महात्मा गांधी यांची हत्या ही एक राजकीय हत्या होती. नथूराम गोडसे या माणसाने स्वार्थापोटी अगर वैयक्तिक शत्रुत्वामुळे किंवा संतापाच्या भरात केलेली ती हत्या नव्हती. या हत्येमागे एक प्रवृत्ती उभी होती.

हा संघर्ष नथूराम गोडसे आणि म. गांधी या दोन व्यक्तींतील संघर्ष नव्हता; तर राजकीय वस्तुवाद आणि सांप्रदायिक भावनाप्रधान जातीयवाद यांच्यातील हा संघर्ष होता. आरोपींना न्यायासनासमोर खेचले गेले, त्यांच्यावर खटला झाला, त्यांना शिक्षा झाल्या. या खटल्याचे कागदपत्र छापील स्वरूपात सर्व भारतभर उपलब्ध आहेत. अशा अवस्थेत नथूराम गोडसे यांच्या शेवटच्या जबानीवर बंदी घालणे या कृत्याचा अर्थ मला समजू शकत नाही ! गोडसे यांची जबानी वाचल्यामुळे लोक म. गांधींना

हिंदुद्रोही व नथूरामला हिंदू राष्ट्राचा त्राता मानू लागतील अशी भीती सरकारला वाटते काय ? गांधीजींची अठ्ठावीस वर्षांची देशसेवा आणि गांधीवादाचा साडेचार दशकांचा या देशावरील प्रभाव एका खुनी माणसाची ही जबानी पुसून टाकील अशी भीती सरकारला वाटते काय ? म. गांधींची प्रतिष्ठा सरकार पुस्तक-जप्तीने सांभाळू इच्छिते काय ? असे असेल तर मग ही लोकप्रियता संपली तरी चालेल, असे मानणारा मी आहे. हयातभर गांधीजींना बदनाम करण्याचा प्रयत्न हिंदू महासभा व मुस्लिम लीग यांनी संयुक्तरीत्या केला. देशातील बडी सरकारधार्जिणी वर्तमानपत्रे, मवाळ पक्षाचे नेते सतत त्यांच्यावर कठोर टीका करीतच होते. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि महंमदअली जिना, सगळे ब्रिटिश सरकार, आणि त्यांचे देशी हस्तक मिळून महात्मा गांधींना संपवण्याचे



जे कार्य करू शकले नाहीत ते सारे कार्य नथूरामचे एक भावनाप्रधान व्याख्यान करील ही धास्ती बाळगणे हाच मनाचा कमजोरपणा आहे ! नथूरामची जबानी चर्चा-चिकित्सेला मोकळी झाली पाहिजे, असे मानणारा मी माणूस आहे. सावरकरांच्या अलौकिक काव्यमय आणि भावनाप्रधान भाषणाची जशी कठोर चिकित्सा त्या काळी आचार्य जावडेकरांनी केली तशीच कठोर चिकित्सा नथूरामच्या जबानीची होईल. तिथे मूल्य तरी समजून येईल. जे नथूरामविषयी तेच गोपाळ गोडसेविषयी. गोपाळ गोडसे यांच्याही ग्रंथाविषयी तो प्रसिद्ध झाल्यापासून सरकार हे पुस्तक जप्त करणार आहे असे ऐकतो. सरकारी जप्त्या विचाराच्या प्रवाहाला फार काळ रोकू शकत नसतात. विचार उघड्यावर आव्हान म्हणूनच स्वीकारायचे असतात; उघड्यावर त्याची चर्चा करायची असते. गोपाळ गोडसे यांचेही पुस्तक असे उघड्यावर चर्चिले जावे या मताचा मी आहे, बंदी घालण्याच्या मताचा नाही.

गोपाळ गोडसे यांचे सगळेच पुस्तक भावशैलीच्या दृष्टीने अतिशय प्रभावी व आकर्षक आहे. या पुस्तकातील मजकूर मात्र अत्यंत धूर्तपणे व क्वचित प्रसंगी खोडसाळपणे लिहिलेला आहे ! त्या मजकुराचे काही परीक्षण मी करणार आहेच, पण त्यापूर्वी एका मुद्द्यावर गोपाळ गोडसे यांचे जाहीररीत्या अभिनंदन करणे हे माझे कर्तव्य आहे. ही गोष्ट म्हणजे कोणाही व्यक्तीच्या जीवनातील एक योगायोग असतो. दैवयोगाने सौ. सिंधू गोडसे यांच्यासारख्या निष्ठावंत व करारी स्त्रीची गोडसे यांना जोड झालेली आहे. म. गांधींच्या हत्येचा कट शिजतो आहे याची जाणीव सौ. सिंधूबाईंना आधी होती की नव्हती याविषयी निश्चित मत देणे कठीण आहे. पण या करारी स्त्रीने ज्या धैर्याने व स्वाभिमानाने आपले जीवन घालवले आहे, त्याचे कौतुक करणे भाग आहे. गांधीहत्येनंतर गोपाळ गोडसेची पत्नी म्हणून अवमानित होण्याचे या महिलेवर

अनंत प्रसंग आले असतील; पण ती सिंधू गोडसे म्हणून जगली. या नावाने जगण्याचा तिचा निर्धार होता! गोडसेची पत्नी म्हणून जे पाप-पुण्य, कलंक तिच्या वाट्याला आले असतील त्यांतून सुटण्याची तिची इच्छा नव्हती. गोडसे म्हणूनच उभे राहण्याची, आणि पडले तरी गोडसे म्हणून पडण्याची तिची जिद्द होती. नथूराम आणि नाना आपटे यांना ती हुतात्माच समजत होती. आपल्या पतीलाही जर फाशी झाली असती तर तिने हुतात्माच मानले असते. या हौतात्म्याच्या पूजेसाठी व्यावहारिक नफा-नुकसान गुंडाळून ठेवण्याची तिची तयारी होती. कुणाच्या दयेवर जगण्यापेक्षा आपला स्वतंत्र उद्योग करण्याइतके हिचे कतृत्व होते. पदवीधर असणारी ही स्त्री कुणाची दया स्वीकारण्यापेक्षा मोलमजुरी करून जगणे सन्मानाचे मानीत होती. ऐन तारुण्यात हिचा पती जन्मठेपेवर गेला आहे, बारा वर्षांचा जिवंतपणीचा विधवा भोग हिने दर क्षणी जळत जळत भोगलेला आहे, आणि तरीही 'सारे जग जरी फिरले तरी मी तुझ्या पाठीशीच आहे,' असे आश्वासन देण्याचे हिचे सामर्थ्य आहे! या एकनिष्ठ, करारी आणि स्वाभिमानी स्त्रीला अभिवादन केल्याशिवाय मी राहू शकत नाही. नवऱ्याच्या सुख-दुःखात, पाप-पुण्यात वाटेकरी होणारी अशी पत्नी मिळणे हे आमच्या परंपरेत भाग्याचे लक्षण मानतात. गोडसे यांचे हे भाग्य कुणालाही हेवा वाटावा असे आहे. जमल्यास गोडसे यांनी पुढल्या आवृत्तीत ही व्यक्तिरेखा अधिक तपशिलाने रंगवावी; कारण या पुस्तकात कौतुक करण्याजोगा भाग इतकाच आहे! 

गोपाळ गोडसे यांची एक तक्रार अशी की, सरकारने सूड घेण्याचा प्रयत्न केला. ही त्यांची तक्रार कुठपर्यंत खरी आहे, हा या पुस्तकातील एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. आणि आपण वस्तुनिष्ठ भूमिकेवर लिहितो आहो हे त्यांचे म्हणणे कुठवर बरोबर आहे, हाही विचार करण्याजोगा दुसरा प्रश्न आहे. ३० जानेवारीच्या रात्री नथूरामच्या घराची झडती घेतली गेली व चौकशीसाठी गोपाळ गोडसे याला पोलिस स्टेशनवर नेण्यात आले. १ फेब्रुवारीची सकाळ विविध प्रश्न विचारण्यात संपली, आणि गोपाळ गोडसेला सोडून दिले. पुन्हा गोपाळ गोडसे याला ५ फेब्रु. १९४८ ला अटक झाली. १० फेब्रुवारी १९४९ ला जन्मठेप आणि इतर १५ वर्षे अशी शिक्षा झाली. ही सगळी शिक्षा भोगून गोपाळ गोडसे आता मुक्त झालेले आहेत. गांधीजींच्या हत्येचा कट शिजला होता काय? आणि या कटाचे ते भागीदार होते काय? या-विषयी आजही स्पष्टपणे गोडसे यांना काही म्हणायचे नाही! ज्या अर्थी न्यायालयाने कट सिद्ध मानला आहे त्या अर्थी कट होता, व

ज्या अर्थी आवश्यक तेवढ्या पुराव्यानिशी माझ्यावर आरोप सिद्ध झाला आहे त्या अर्थी या कटाचा मी भागीदार होतो, असे म्हणणे आता क्रमप्राप्त आहे, असे गोडसे यांचे स्पष्टीकरण आहे! इतिहास लिहिणाऱ्या माणसाने आता इतकी जरतारी भाषा का वापरावी? आपण या कटाचे भागीदार होतो की नव्हतो, हे मोकळेपणे सांगण्याची भीती गोडसे यांना आता वाटण्याचे काय कारण? खालच्या न्यायालयाने, हायकोर्टाने, प्रिव्ही कौन्सिलने गांधीहत्येचा कट होता, व गोडसे कटाचे भागीदार होते असे मानले आहे; जन्मठेप देण्याइतक्या महत्त्वाच्या गुन्ह्याचे गुन्हेगार मानले आहे. ज्या अर्थी न्यायालयाने हे केले आहे त्या अर्थी तसाच पुरावा असला पाहिजे हे उघड आहे. कट सिद्ध
करणारा पुरावा कोणता? गोपाळ गोडसेला कटाचा भागीदार निर्णायक- ५०
रीत्या ठरवणारा पुरावा कोणता होता? जो पुरावा या ग्रंथात नोंदवला गेला आहे, तो कोणत्याही न्यायालयाने दूरान्वित मानला असता. आपल्या विरोधी खरोखर पुरावा काय होता, हेही सांगण्याची त्यांची तयारी नाही. पुरावा नसताना त्यांना अन्यायाने शिक्षा झाली असे आरोपीचे म्हणणे आहे काय? न्यायालयीन निर्णयाविषयी आरोपीची तक्रार दिसत नाही!

मग जर बिनतोड पुराव्याने गुन्हा शाबीत झाला होता तर तो पुरावा कोणता, हे सांगण्याची इतकी टाळाटाळ का? या कटाचे आपण खरोखर भागीदार होतो, अमुक कारणामुळे भागीदार झालो, व कटात आपण अमुक प्रकारचा भाग घेतला, हे सांगण्याचा संकोच गोडसे यांना का वाटतो? खरोखरी कट आपल्याला माहिती नव्हता, आपण कटाचे भागीदार नव्हतो; पण जे घडले ते रास्त घडले असे वाटल्यामुळे जबाबदारी झटकण्यापेक्षा आपण शिक्षा भोगण्यात धन्यता मानली. तरीही आपण खरोखरी गुन्हेगार नव्हतो असेही गोडसे यांना म्हणावयाचे नाही. अशा परिस्थितीत गुन्हेगारी कबूल असणाऱ्या गुन्हेगाराने जरतारी भाषेत बोलावे व त्याला इतिहास म्हणावे, ही गोष्ट वस्तुनिष्ठही मानता येत नाही; इतिहासही मानता येत नाही. जाणीवपूर्वक घेतलेला हा एक धोरणी पवित्रा आहे, इतकेच म्हणावे लागते! गोडसे यांना १० फेब्रुवारीला जन्मठेपेची शिक्षा झाली. या शिक्षेनंतर ज्या वेळी त्यांना तुरुंगात पाठवले गेले त्या वेळी त्यांच्या गळ्यात जेलचा बिल्ला अडकवलेला होता; पण या बिल्ल्याविषयी स्पष्ट काही लिहिण्यास गोडसे तयार नाहीत. या बिल्ल्यावर सुटकेचा कोणता दिवस दाखवला होता, हे गोडसे यांनी स्पष्टपणे सांगितले पाहिजे. नेमके हेच सांगण्याचे त्यांनी टाळलेले आहे! हे टाळण्याची गरज त्यांना भासावी यातच त्यांच्या विवेचनाचा कच्चेपणा दिसून येतो. हे सगळे प्रकरण आपण अंदाजाने

तर्क शकतो. माझे तर्क असे आहेत;-कधी तरी गोडसे यांनी हे तर्क बरोबर आहेत की चूक आहेत याविषयी इतिहास म्हणून जाहीर मत दिले पाहिजे.

न्यायालय जन्मठेपेची शिक्षा देते. जन्मठेप म्हणजे किती वर्षे हे ठरवण्याचा अधिकार सरकारचा असतो. जन्मठेप म्हणजे मरेपर्यंत कैद, जिवंतपणी सोडावयाचेच नाही असाही निर्णय सरकार घेऊ शकते. कारण तोच कोर्टाच्या शिक्षेचा अर्थ असतो. काही गुन्हेगारांच्याबाबत असा निर्णय सरकार घेतेही; पण बहुधा असा निर्णय घेत नाही. सर्वसामान्य पद्धत २० वर्षे म्हणजे जन्मठेप असे गृहीत धरण्याची आहे, आणि म्हणून गोडसे यांच्या गळयातील बिल्ल्यावर सुटकेचा दिनांक १०–२–१९६९ नोंदवलेला असावा ! जन्मठेप म्हणजे २० वर्षे हा निर्णय ही काही फार मोठी दया नव्हे, हा सामान्य व्यवहार झाला. पण गांधीजींच्या खुनातील गुन्हेगारालासुद्धा १९६९ साली सोडून देण्यात येईल, ही सरकारची घोषणा याचा पुरावा होती, की सरकार गांधीजींच्या मारेकऱ्यांना 'सत्कृत्य' केल्याबद्दल दया दाखवण्यास तयार नसले तरी सरकार या गुन्हेगाराला विशेष सूड म्हणून मरेपर्यंत तुरुंगात डांबूही इच्छित नाही ! कोणत्याही गुन्हेगाराला सरकारने जसे वागवले असते त्यापेक्षा विशेष क्रौर्याने गोडसे यांना वागवले आहे काय ? आकसाने वागवले आहे काय ? याचे उत्तर इथवर तरी नकारार्थीच द्यावे लागते. तुरुंगाच्या सर्वसामान्य नियमाप्रमाणे कोणत्याही कैद्याची एकूण सूट मूळ शिक्षेच्या ⅓ पेक्षा अधिक होऊ शकत नाही. जादा कामामुळे मिळणारी सूट, रक्तदानामुळे मिळणारी सूट अशा सर्व प्रकारच्या सुटी; पंजाबच्या जेल आरक्षकाने दिलेली ५५ दिवसांची सूट. प्रजासत्ताक दिनानिमित्त मिळालेली ४० महिन्यांची सूट, ही सगळी सुटी जरी एकत्र केली तरी त्याची एकूण बेरीज केव्हाही २० वर्षांची शिक्षा भोगण्यासाठी ६ वर्षे ८ महिन्यांहून अधिक होऊ शकत नाही. यामुळे कोणत्याही परिस्थितीत सुटीचा फायदा मिळून गोडसे यांची सुटका १० जून १९६२ पूर्वी होणेच शक्य नव्हते. पण गोडसे तर ५६ सालापासून आपल्या सुटकेची वाट पाहात होते. सर्व सूट गृहीत धरून ८ वर्षांत १४ वर्षे शिक्षा भोगून झाली; त्यामुळे आपली सुटका होईल अशी त्यांची मागणी होती ! तुमच्या सुटकेचा विचार १५ वर्षे प्रत्यक्ष शिक्षा भोगल्यानंतर करण्यात येईल असे सरकारने ५० सालीच गोडसे यांना कळवले होते. म्हणजे या दृष्टीने त्यांची सुटका १० फेब्रुवारी १९६४ नंतर होईल हेही त्यांना कळवले होते. प्रत्यक्षात यानंतर ८ महिन्यांनी त्यांची सुटका झाली. म्हणजे सरकारने जन्मठेप २० वर्षांवर आणली आणि २० वर्षांची शिक्षा १५ वर्षे ८ महिन्यांवर आणली व गोडसे यांना मुक्त केले. हा सरकारी व्यवहार दयाळूपणाचा आहे असे माझे मुळीच म्हणणे नाही ;

पण हा व्यवहार दुष्टाव्याचा आहे; आकसाचा आहे, हेतुपुरस्सर सूड घेण्याचा आहे, ही गोडसे यांची भूमिका मात्र पटणे कठीण आहे! गोपाळ गोडसे सामान्य गुन्हेगार नव्हते, ते राजकीय गुन्हेगार होते.

राजकीय हत्यांच्यामागे खराखोटा ध्येयवाद असतो. गोडसे यांना घडलेल्या कृत्याचा पश्चात्ताप होण्याचा कधीच संभव नव्हता. आजही त्यांना पश्चात्ताप होतो असे मी तर काय, ते स्वतःसुद्धा मानणार नाहीत! कारण अशा राजकीय हत्येत पश्चात्तापाला जागाच नसते. सामान्य गुन्हेगाराप्रमाणे पॅरोलची सवलत आम्हांला मिळावी– ही मागणी आपण समजू शकतो; पण जो गुन्हेगार बाहेर सुटल्यामुळे सार्वजनिक शांततेला बाधा येईल असे सरकारचे मत आहे, त्याला पॅरोल नाकारणे हा सूड घेण्याचा प्रयत्न म्हणणे कठीण आहे. गोडसे फार तर महाराष्ट्र सरकारने मला विशेष दयेने वागवले नाही असे म्हणू शकतील. सरकारने त्यांना विशेष दयेने वागवणे ही अपेक्षा करणेच चूक होते. (सरकारची बाजू अशी समजली तरी गोडसे यांना पॅरोलवर सोडले असते तर बरे झाले असते असे वाटत राहतेच.) ५२

गोडसे यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे ५७ ते ६४ या कालखंडात वेगवेगळी २२ आवेदने केली. पैकी २१ आवेदने सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. २२ वे आवेदन प्रश्न संपला म्हणून फेटाळले! समजा, २२ वे आवेदन चालू असेपर्यंत गोपाळ गोडसे तुरुंगातच असते तर काय घडले असते? हेही आवेदन न्यायालयाने फेटाळून लावले असते, ही गोष्ट उघड आहे. ज्या मुद्द्यावर गोडसे भांडत होते तो मुद्दाच भारत सरकारच्या प्रचलित विधिप्रणालीत बसणारा नाही. 'शिक्षेतील सूट कैद्याला दया म्हणून मिळू नये तर हक्क म्हणून मिळावी.' असा गोडसे यांचा मुद्दा होता. भारतीयच नव्हे तर पृथ्वीवरील कोणतेही न्यायालय गुन्हेगाराच्या न्यायालयीन शिक्षेतील सूट हा गुन्हेगाराचा हक्क आहे हे कधीच कबूल करणार नाही! जन्मठेप म्हणजे किती वर्षे, हे ठरवण्याचा अधिकार कार्यकारी सत्तेचा आहे. दयेचा अधिकार कार्यकारी सत्तेचा आहे. या सत्तेत हस्तक्षेप करून जन्मठेप म्हणजे इतकी वर्षे, आणि दया म्हणजे पुढील पद्धतीनुसार करण्यात येणारी शिक्षेतील कपात असा निर्णय देण्याचा अधिकार विधान सत्तेलाही नाही, आणि न्यायसत्तेलाही नाही. न्यायालय फक्त हेतुपूर्वक आकसाच्या प्रश्नाचा कायद्याच्या चौकटीत बसवून विचार करू शकले असते व हा विचार बहुधा न्यायालयाने १९६९ नंतर केला असता. कायद्याचे हे स्वरूप लक्षात घेता मागच्या आवेदनाप्रमाणे हे २२ वे आवेदनही फेटाळलेच जाणार होते; हे सर्वांनाच माहिती होते. तरी गोडसे यांचा दावा असा आहे की, हे २२ वे आवेदन

फारच बिनतोड होते! पळवाटेला त्यात जागाच नव्हती. म्हणून न्यायालयात उत्तर देण्याची वेळ येण्यापूर्वी सरकारने माझी सुटका केली! असल्या प्रकारची समजूत मनात बाळगायचीच असेल तर ती बाळगण्याचा हक्क आहे; पण ती वस्तुस्थिती नव्हे. सुटकेचे कारण एकच असू शकते व ते म्हणजे १५ वर्षांनंतर सुटकेचा विचार करण्यात येईल, असे सरकारचे आश्वासन होते. कैद्याची वागणूक शिस्तबद्ध होती. सरकारला झाली इतकी शिक्षा पुरे वाटली. व्यक्तिशः माझे असे मत आहे की, सरकारने १३ वर्षे ४ महिने होताच गोडसे यांना १०-६-१९६२ ला मुक्त केले असते तर ते कृत्य अधिक वस्तुनिष्ठ झाले असते; पण १५ वर्षे ८ महिन्यांनी मुक्तता हा सूडाचा प्रयत्न होय हे मान्य करता येत नाही.



गोडसे यांची सुटका म्हणजे शांतताभंगाचा संभव, हे सरकारी मत चुकीचे नव्हते, ही गोष्ट ६४ लाही सिद्ध झाली. कदाचित ही गोष्ट १९५२-५४ साली अधिक तीव्रतेने सिद्ध झाली असती. कारण पुष्कळशी कटुता संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात बोथट झालेली आहे! गोडसे यांनी विनाप्रतिदान रक्तदानाचा उल्लेख केला आहे. ते त्यांचे कृत्य त्यांच्या ध्येयवादाला शोभेसेच होते. गोडसेबंधूंच्या हिंदू राष्ट्रनिष्ठेविषयी किंवा भारतनिष्ठेविषयी कोणाच्याच मनात शंका नाही. माझ्याही नाही. प्रश्न फक्त एखाद्या व्यक्तीचे देशप्रेम हत्येला हौतात्म्याच्या पातळीवर केव्हा नेते, हा असतो. पृष्ठ २६३ वर गोडसे यांनी फाशी व जन्मठेप यांचा विचार केला आहे व जन्मठेपेची शिक्षा फाशीच्या खालच्या क्रमाची आहे, असे मत दिले आहे. फाशी ही जिवंतपणा हिरावण्याची शिक्षा, जन्मठेप ही स्वातंत्र्य हिरावण्याची शिक्षा आहे. म्हणून जन्मठेपेची परिणती मृत्यू नव्हे. ठराविक कालमर्यादेनंतर जिवंतपणी सुटका ही या शिक्षेची स्वाभाविक परिणती असली पाहिजे, असे त्यांना वाटते. जन्मठेपेची शिक्षा भोगून आलेल्या व नुकत्याच सुटलेल्या गुन्हेगाराशी पुन्हा एकवार या प्रश्नावर तार्किक चर्चा करणे मला काहीसे निष्ठुरपणाचे वाटते; पण तात्त्विक प्रश्न म्हणून ही चर्चा करणे भाग आहे. शिक्षांना दंडनीतीचा एक लांबरुंद इतिहास आहे. पूर्वीच्या काळी शिक्षांचे विविध प्रकार होते. आज जग सुधारलेले आहे, असे आपण मानतो व म्हणून हे प्रकार गर्हणीय समजतो. फाशीचेच पूर्वी विविध प्रकार होते. कडेलोट, तोफेच्या तोंडी देणे, हत्तीच्या पायांखाली देणे, घशात शिशाचा रस ओतणे, डोक्यात मेख मारणे, विष देणे, भिंतीत चिणून टाकणे, जिवंत जाळणे, दगडांचा वर्षाव करून ठार करणे, तलवारीने डोके उडवणे, हे सगळे फाशीचेच प्रकार होते. सर्वच शिक्षांचा शेवट मरण हाच आहे; पण म्हणून या सगळ्या शिक्षा एका दर्जाच्या कधीच मानल्या जात नसत. घशात शिशाचा रस ओतणे, जिवंत जाळणे, दगडांनी ठेचणे या शिक्षा धर्मद्रोहाच्या

मानीत व त्या अधिक गंभीर मानीत. कडेलोट, तोफेच्या तोंडी देणे, इ. शिक्षा राज-द्रोहाच्या होत्या.

फासावर लटकवणे ही सामान्य गुन्हेगाराची शिक्षा होती. म्हणूनच पुष्कळदा क्रान्तिकारक आपणास फाशी देऊ नये, गोळी घालण्यात यावी, अशी विनंती करतात. सर्व शिक्षांचे फळ मरण असले तरीही त्यांत क्रम असतो. एक मरण दुसऱ्यापेक्षा गौण मानले जाते. हीच गोष्ट पूर्वीच्या अवयवविच्छेदाची आहे. डोळे काढणे, हातपाय तोडणे, नाक-कान कापणे, जीभ कापणे, या अवयवविच्छेदाच्या शिक्षा आहेत. व्यथा भोगण्याच्या दृष्टीने त्या फाशीपेक्षा भयानक होत्या; पण नेहमीच त्या फाशीहून हलक्या मानल्या गेल्या !

५४

जन्मठेप आणि फाशी यांत जन्मठेप हलकी मानली जाते. याचे कारण कैदी जिवंतपणी सुटतो हे नव्हे, तर जिवंत राहतो हे आहे ! दया म्हणून आपल्या फाशीची जन्मठेप करण्यात यावी असा कैदी अर्ज करतात. तो सुटण्यासाठी नव्हे तर जगण्यासाठी ! तुरुंगात का होईना; पण जिवंत राहण्याचा हक्क व संधी हे जन्मठेपेचे फाशीपेक्षा हलकेपण आहे. मरेपर्यंत तुरुंगात ठेवले तरीही ती शिक्षा फाशीपेक्षा हलकीच असते; पण इथेही सुधारलेल्या जगाने अमुक मुदतीनंतर कैदी जिवंत सोडावा हा संकेत मान्य केलेला आहे. जेव्हा गोडसे कोर्टात गेले तेव्हा कोर्टातील बचाव सरकारच्या वतीने हा होता की, जन्मठेप म्हणजे मृत्यूपर्यंत कैद, ही शिक्षा न्यायालयाची आहे. यातून सूट वजा कशी करणार ? पण ही झाली कायद्याची तांत्रिक बाजू. व्यावहारिक भूमिका २० वर्षांनंतर सुटण्याचीच होती. १५॥ वर्षांनंतर गोडसे आज मोकळे आहेत. सर्व कसोटीला उतरून बावनकशी ठरलेली पत्नी त्यांची जीवनसाथी आहे. तिच्या सहवासात उरलेले आयुष्य व्यतीत करावे हा योग गोडसे यांना आलेला आहे. त्यांचे तारुण्य या शिक्षेत जळाले असेल, पण त्यांचे वार्धक्य पत्नीच्या सहवासात, मुलींच्यावर छत्र धरीत समाधानात जाणार आहे ! नाना आपटे यांच्या पत्नीची हानी कधी भरून निघणारी नाही. सिंधू गोडसेला तिचे सौभाग्य उशीरा का होईना परत मिळाले आहे. जन्मठेप ही फाशीपेक्षा सौम्य शिक्षा असली तरी उरलेल्या सर्व शिक्षांच्यापेक्षा ती मोठीच शिक्षा मानली जाते. जन्मठेपेचा सौम्यपणा जिवंतपणी सुटण्याच्या हक्कावर ठरवण्याचा गोडसे यांचा मुद्दा न्यायालयात टिकणारा नाही, तो न्यायालयाच्या कक्षेच्या पलीकडचा आहे. जिवंत राहण्याचा हक्क व संधी हेच या शिक्षेच्या सौम्यपणाचे स्वरूप आहे. इतकीच न्यायालयीन कक्षा असते. उरलेली कार्यकारी सत्तेची कक्षा आहे.

या पुस्तकाकडे इतिहास म्हणून पाहण्यात यावे असे प्रकाशकाचे व

लेखकाचेही म्हणणे आहे.

इतिहास लिहिणाऱ्याजवळ काही इतिहासनिष्ठा असावी लागते. तशी ती नसली म्हणजे मग त्या ग्रंथाकडे इतिहास म्हणून पाहता येत नाही. अशी कोणतीच निष्ठेची शिस्त पाळण्यास गोपाळ गोडसे तयार नाहीत, ही सगळ्यात मोठी अडचण आहे! साधी गोष्ट म्हणजे म. गांधींच्या हत्येतील कटाचे भागीदार म्हणून एक आरोपी स्वातंत्र्यवीर सावरकर होते. स्वातंत्र्यवीरांचा या हत्येतील कटाशी संबंध असेल असे व्यक्तिशः मला वाटत नाही. पण हे झाले माझे व्यक्तिगत मत. स्वातंत्र्यवीर सावरकरांशी माझा कोणताच व्यक्तिगत संबंध नव्हता. त्यामुळे या व्यक्तिगत मताला फारशी किंमत नाही. न्यायालयाने सावरकरांना निरपराध म्हणून किंवा निर्दोष म्हणून सोडून दिले ही गोष्टही आपण जमेच्या बाजूने गृहीत धरू. प्रश्न न्यायालयीन निर्णयाचा नाही. फिर्यादी पक्षाला पुरेसा पुरावा सापडला नाही म्हणजे न्यायालय, समोर असलेल्या पुराव्यावरून आरोप सिद्ध होऊ शकत नाही, असा निवाडा देते. न्यायालयाची कक्षा 'फाऊंड नॉट गिल्टी' इतकीच आहे. आता तुम्ही इतिहास लिहिता. आज सावरकर काळाच्या पडद्याआड गेलेले आहेत. स्वातंत्र्यवीरांच्याविषयी गोडसे यांचे काय म्हणणे आहे? त्यांचा या कटाशी संबंध होता की नाही? गोपाळ गोडसे अधून मधून अशी शब्दरचना करतात की, ज्यामुळे कोर्टात सिद्ध झाले नसले तरी स्वातंत्र्यवीरांचा संबंध खुनाच्या कटाशी होता, असा भास चालू राहावा! चौकशी चालू असताना पोलिसांच्या छळवादापुढे आपण टिकलो नाही व आपण माहीत होते ते सगळे सांगितले, असे सांगता सांगता मध्येच गोडसे म्हणतात, याही अवस्थेत सावरकरांना गोवण्याचे काम माझ्याकडून झाले नाही याचे मला समाधान आहे! या कटाशी गोडसे यांचा संबंध होता काय? हे गुलदस्तात राहून जाते, व फक्त 'न्यायालयीन निर्णय गृहीत धरणे क्रमप्राप्त आहे–' 'माझा या घटनेशी संबंध जो गृहीत धरला तो वस्तुस्थितीशी फारसा विसंगत नव्हता असेच म्हटले पाहिजे. –' ही वाक्ये शिल्लक राहतात! ५५

स्वातंत्र्यवीरांचा या कटाशी काहीही संबंध नव्हता, त्यामुळे त्यांचे नाव घेणे मला शक्य नव्हते असे गोडसे म्हणत नाहीत; तर मी सावरकरांच्याकडे जाऊन आलो असे पोलिसांचे म्हणणे होते. ते म्हणत हे सिद्ध करणारा त्यांच्याजवळ पुरावा आहे; तसा पुरावा असण्याचा संभव मला दिसत नव्हता, असे गोडसे यांचे म्हणणे आहे. पुढे पृष्ठ १८५ वर गोडसे पुन्हा म्हणतात,– "सावरकरांची आणि माझी भेट झाली होती किंवा नाही ही गोष्ट आज कालाच्या उदरात लुप्त झाली आहे!" ती भेट झाली नव्हती असे आजही गोडसे म्हणत नाहीत. सावरकरांचा

नथूरामकडे पाहण्याचा दृष्टिकोण कोणता होता ? 'म. गांधींची हत्या करा,' हे सावरकरांनी सांगितले नसेल. असा कट शिजला हे सावरकरांना कदाचित ज्ञात असेल; पण गांधीजींची हत्या घडली ही घटना नैतिक दृष्ट्या सावरकर रास्त मानीत होते की गर्ह्य मानीत होते ? स्वातंत्र्य-वीरांच्या दृष्टीने नथूराम हुतात्मा होता की खुनी होता ? याचे उत्तर लेखक गोडसे मोठ्या सफाईने देतात ! पृष्ठ १४३ वर सावरकरांच्या तोंडी एक वाक्य घालून, सावरकर गोडसे यांना हुतात्मा मानीत असे सुचवले आहे. पृष्ठ १४४ वर गांधी हे मुस्लिम राष्ट्राचे सेनानी, व काँग्रेस सरकार हे मुस्लिम राष्ट्राचे प्रतिनिधी, आणि सावरकर हे हिंदू राष्ट्राचे सेनानी असे सुचवून हिंदू राष्ट्राच्या संरक्षणार्थ बलिदान करणारा नथूराम हा सैनिक व सावरकर यांचा संबंध सूचित केला आहे ! पृष्ठ १३३ वर सावरकरांच्या तोंडी कारण नसताना अगाऊ बोलून मान अडकवून घेण्याचा उद्योग नाना आपटे यांनी केला, ते सावरकरांना पसंत नसल्याचे दाखवले आहे. नथूरामने कबुलीजबाब द्यावा हे सावरकरांना मान्य नव्हते, असे सुचवले गेले आहे ! पृष्ठ १३९ वर सावरकरांनी सरळच मदनलाल धिंग्रा आणि नथूराम गोडसे यांना एकत्र गुंफले आहे. जणू कर्नल वायली आणि म. गांधी भारताचे सारखेच शत्रू होत, असे सावरकरांचे मत होते ! ५६

सावरकरांच्याविषयी गोडसे यांनी काय करायचे ठरवले आहे, हेच स्पष्ट होत नाही. स्वातंत्र्यवीर या कटाचे सहभागी होते; पण कौशल्याने कट रचल्याने स्वातंत्र्यवीरांवर आरोप सिद्ध करता येण्याजोगा पुरावाच सरकार उपलब्ध करू शकले नाही. म्हणून सावरकर निर्दोष सुटले, असे गोडसे यांना म्हणावयाचे आहे काय ? हेच त्यांचे मत असेल तर मग तसे त्यांनी स्पष्ट म्हणावे. सावरकरांना नथूराम हुतात्मा वाटले किंवा वाटत इतकेच म्हणून थांबू नये. कै. काका गाडगीळांनी या संदर्भात 'लाल किल्ल्याच्या छायेत' या पुस्तकात पृष्ठ १६२ वर सूचक विधान करून टाकले आहे. ते म्हणतात, 'अपराधी व्यक्ती सुटली असेल; पण एकाही निरपराध्याला शिक्षा झालेली नाही !'

काका गाडगीळांचे वाक्य पुरेसे स्पष्ट आहे. जर हीच गोडसे यांची धारणा असेल तर भारत सरकारने सावरकरांच्यावर आकसाने खटला भरला, असे त्यांनी म्हणू नये. आणि जर या कटाशी स्वातंत्र्यवीरांचा काहीही संबंध नव्हता असे गोडसे यांना म्हणायचे असेल तर संदिग्धपणे हा संबंध त्यांनी सुचवू नये. ढोबळ वाचणाऱ्यांना स्वातंत्र्यवीरांवर अन्याय झाला असे जाणवावे, सूक्ष्मपणे वाचणाऱ्यांना या कटाशी स्वातंत्र्यवीरांचा संबंध होता, पण कोणता व कसा होता हे सांगण्याची वेळ अजून आली नाही असे जाणवावे, अशी दुहेरी सोय करण्याचे गोडसे यांना काहीच कारण

नव्हते ! आणि समजा, या शैलीतील लिखाणाला कारण होते, असे आपण मान्य केले तरी मग हा प्रामाणिक वस्तुनिष्ठ इतिहास-कथनाचा प्रयत्न कसा ठरेल ? कुणाला कसे बदनाम करावे, किती बदनाम करावे, याच्या काही किमान सीमा आपण मानल्या पाहिजेत. सरदार पटेल यांचे या ग्रंथात ठिकठिकाणी अशा पद्धतीने उल्लेख आले आहेत की, वाचकांना वाटावे सरदार गांधींना विटले होते ! गांधीजींची हत्या झाली नसती तर सरदार मंत्रिमंडळाचा राजीनामा देऊन बाहेर पडणार होते ! गांधी-हत्येमुळे सरदारांच्या मनावरचे ओझे उतरले. सरदारांनी मुद्दाम आम्हांला 'अ' वर्ग दिला. सरदार हयात असते तर आमच्यावर अन्याय झाला नसता ! जणू सरदारांना गांधीहत्येतील आरोपींच्याविषयी सहानुभूती वाटत होती, असे दाखवण्याचा हा प्रयत्न अत्यंत बेजबाबदारपणाचा आहे ! गांधीहत्येतील आरोपींना 'अ' वर्ग मिळाला याचे कारण उघड होते, ते म्हणजे ही एक राजकीय हत्या होती, आणि त्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्यासारखा विख्यात देशभक्त आरोपी म्हणून उभा होता. गांधीजींचे आणि सरदारांचे जिव्हाळ्याचे संबंध, गांधी-हत्येचा सरदारांवर झालेला परिणाम, त्या हत्येनंतर सुमारे २॥। वर्षे सरदारांनी भोगलेल्या असह्य मानसिक व्यथा, सरदारांच्या मनातील हिंदू महासभेविषयी चीड, सरदारांनी घेतलेली संघविषयक भूमिका, या साऱ्या बाबी आता लोकांच्या समोर आलेल्या आहेत. सरदार मुसलमानांच्या जातीय वादाने चिडले होते हे जरी खरे असले तरी ते हिंदुत्ववादी कधीच नव्हते ! सेक्यु-लॅरिझमवरचा त्यांचा विश्वास कधी ढळलेला नव्हता. गांधीजींच्या मारे-कऱ्यांना हुतात्मा मानण्याकडे सरदारांच्या मनाचा कल किंचितही वळण्याचा संभव नव्हता. मुळात आरोपी कुणाला करावे हा प्रश्न केंद्र सरकारमध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चिला गेला हीच एक थाप आहे ! असे प्रश्न मंत्रिमंडळात चर्चिले जात नसतात. या मुद्द्यावर मंत्रिमंडळात मतभेद होते ही एक दुसरी थाप आहे ! सरदारांनी औदार्य दाखवले याचा अर्थ इतकाच की, त्यांनी गांधी हत्येला महाराष्ट्र जबाबदार धरला नाही, ब्राह्मणवर्ग जबाबदार धरला नाही, दिल्लीतील रक्षाविसर्जन काका गाडगीळांना करू दिले; पण महाराष्ट्रातील हिंदुत्ववाद सरदारांनी नेहमीच गांधी हत्येला जबाबदार धरलेला होता. त्यांच्या निकटवर्तीयांचे लिखाण पाहिले म्हणजे ही बाब स्पष्ट होते. ५७

म. गांधींच्या वधाचा कट केव्हा शिजला ? हा प्रश्न अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. फिर्यादीच्या मते हा कट १ डिसेंबर १९४७ नंतर निर्माण झाला. न्यायालयाने या कटाचे अस्तित्व १ जानेवारीपासून गृहीत धरले आहे. म्हणजे यापूर्वी केव्हा तरी कट अस्तित्वात आला असे ठरवले आहे. या मुद्द्यावर पुन्हा उच्च न्यायालयाने वेगळा विचार

केल्याचे दिसत नाही. अशा अवस्थेत न्यायालयीन निर्णय म्हणून गांधी-हत्येचा कट १ जानेवारीपासून अस्तित्वात होता, असे मानणे गोपाळ गोडसे यांना क्रमप्राप्त का वाटू नये ? त्यांनी हा कट १२–१३ जानेवारीच्या सुमारास निर्माण झाला असावा, असे मत दिले आहे ! हे मत देण्याचे कारण आहे. पाकिस्तानला ५५ कोटी रुपये न देण्याचा निर्णय भारत सरकारच्या मंत्रिमंडळाने घेतला होता. हा निर्णय फिरवून घेण्यासाठी गांधीजींनी प्राणांतिक उपोषण केले होते. हे उपोषण १२-१३ तारखेस आरंभ झालेले आहे. गोडसे यांना असे म्हणायचे आहे की, भारताची फाळणी झाली, कोट्यवधी हिंदूंच्या जीवनाची राखरांगोळी झाली, लाखो स्त्रिया अपहृत झाल्या, प्रत्यक्ष पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमण केले, काँग्रेस मंत्रिमंडळालासुद्धा यामुळे चिडून जाऊन ५५ कोटींचे देणे नाकारावेसे वाटले; पण गांधीजी आक्रमक शत्रू-राष्ट्राला ५५ कोटींची मदत करू इच्छित होते, म्हणून त्यांच्या वधाचा निर्णय नथूराम याला घ्यावा लागला. ही सगळी मीमांसाच मुद्दाम दिशाभूल करणारी आहे. खरे तर भारत सरकारचा निर्णय पाकिस्तानचे ५५ कोट रुपये देणे नाकारण्याचा नव्हता. तर पाकिस्तानकडून काही येणे यावयाचे होते त्यात हे पैसे वळते करून घ्यावे असा भारत सरकारचा खरा निर्णय होता. हा मुद्दा काका गाडगीळांनी स्पष्ट शब्दात नोंदवला आहे. एखाद्या युद्धात ५५ कोटी ही रक्कम फारशी महत्त्वाची नसते. पाकिंस्तानजवळ हे पैसे मिळाले नसते तर युद्धसामुग्री विकत घेण्यास पैसा नव्हता असे नाही. या ५५ कोटींच्या मागचे सगळे राजकारण अजून समाधानकारक रीत्या उलगडलेले नाही. आठवड्यापूर्वी पैसे न देणे हाही निर्णय एकमताने, आठवड्यानंतर पैसे द्यावेत हाही निर्णय एकमताने झाला. ह्यातील सगळी गुंतागुंत नीट समोर आलेली नाही. समोर जे आले आहे ते नीट जुळवणे फार कठीण आहे. वाटणीच्या वेळचे येणे-देणे, घेणे-वाटप इ. प्रश्नावर लोकसमजुती काय आहेत व खरोखरी घडले काय, याविषयीही पुष्कळ बाबी अजून अंधारात आहेत. उदा – फाळणीच्या वेळी १६० गाड्या दारूगोळा भारताने पाकीस्तानला द्यावा असे ठरले होते; पण तो मिळाला नाही असा अयूबखानांचा आरोप आहे. ५८

अजूनही भारत सरकार या आरोपाचे खंडन करत नाही. प्रश्न ५५ कोटी द्यावेत हा आग्रह गांधींनी धरला हे त्यांचे करणे रास्त होते की नाही हा नसून गांधीहत्येचा कट केव्हा शिजला असावा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. याच ठिकाणी काश्मीरात भारत सरकारने फौजा पाठवल्या होत्या, आणि फौजा पाठवण्याचे महात्माजींनी समर्थन केले होते, हेही लक्षात घेतले पाहिजे. खरे तर गांधीहत्येचा कट म्हणजे काय, हेच गोडसे सांगण्यास तयार नाहीत ! मदनलाल पहवा याने गांधीजींवर २०

जानेवारीला बॉंब टाकला. नथूरामने ३० तारखेला गोळी घातली. दोघांच्यावरही खटला एकत्र झाला. एका कटाचा भाग म्हणून खटला झाला. न्यायालयाने दोन्ही घटना एका कटाचा भाग हे सिद्ध मानले. गांधीजींवर बॉंब का टाकण्यात आला? बॉंब टाकून गांधींना घाबरवावयाचे होते की उडवावयाचे होते? की त्यांना पळवून न्यायचे होते? प्रार्थनेसाठी जमलेल्या समुदायात बॉंब टाकणाऱ्यांनी निरपराध्यांना इजा होऊ नये अशी आमची इच्छा होती, हे तरी निदान सांगू नये! मदनलाल स्वतंत्र काम करीत होता, नथूराम स्वतंत्र काम करीत होता, कट नव्हताच; सरकारने विनाकारण कट गृहीत धरला, असे गोपाळ गोडसे यांना म्हणावयाचे आहे काय? तसेही त्यांना म्हणावयाचे नाही. मग एकच स्पष्टीकरण शिल्लक राहते. बॉंब टाकून गांधी-हत्या करावी, मग त्यासाठी काही निरपराध बळी पडले तरी हरकत नाही हा मूळ कट. तो विफल झाला, तेव्हा गोळी घालण्याचा निर्णय घेण्यात आला.

समजा, मदनलाल सफल झाला असता तर मदनलालने स्वतःला पकडून घेऊन फाशी जायचे ठरवले होते काय? गोपाळ गोडसे तसेही म्हणत नाही! नथूरामची नोंद असलेली दैनंदिनी सापडली नसती तर मग नाना आपटे फाशी गेले नसते असे यांनी सुचवले आहे! नाना आपटे कटाचे सूत्रधार नव्हते असे गोडसे यांना म्हणावयाचे आहे काय? तसेही नाही. शेवटी कट काय ठरला होता? कटाच्या सूत्रधारांनी जाहीररीत्या पुढे येऊन बलिदान करायचे नक्कीच ठरवले नव्हते. जर नथूरामजवळ दैनंदिनी नसती, जर नाना आपटे गरजेहून अधिक बोलले नसते, तर उरलेले कटाचे आरोपी सापडले नसते. कदाचित आपटेही सापडले नसते, सापडूनही निर्दोष सुटले असते, असे गोडसे यांचे म्हणणे आहे. जर हा सगळा मिळून एकच कट असेल तर मग मदनलाल पहवा ज्या वेळी डॉ. जैन यांना भेटला त्या वेळी कट शिजलेला होता असे म्हणावे लागेल. ता. १३ जानेवारी रोजी नथूरामने आपला विमा सौ. चंपूताई आपटे यांच्या नावे केल्याचा पुरावा आहे. म्हणजे १३ जानेवारीपर्यंत गांधीजींचा खून बॉंब टाकून करावा, तो न जमल्यास त्यांना गोळी घालून मारावे, हे दोन्ही निर्णय ठरलेले दिसतात. हे निर्णय ठरण्यापूर्वी निदान एक आठवडा तरी चर्चा झाली असेल की एकाकी हे निर्णय ठरले? स्वाभाविक गोष्ट दिसते ती ही की, मदनलाल डॉ. जैन यांना तारीख १०–११ जानेवारीला भेटला. त्याच्या पूर्वी काही दिवस कट निश्चित झालेला होता. तपशिलाने कटाची रचना करणे संपले होते. म्हणजे गांधीहत्येचा कट पाकिस्तानला ५५ कोटी भारत सरकारने नाकारण्यापूर्वी आणि गांधीजींनी उपोषण करण्यापूर्वी निश्चित झालेला होता.

मग गांधीजींच्या हत्येची गरज या मंडळींना का वाटली असावी हा प्रश्न उद्भवतो. ५५ कोटींचा विचारही हा कट रचताना कुणाच्या मनात असण्याचे कारण नव्हते. गांधीजी जानेवारीच्या प्रारंभापासूनच दिल्लीत होते. त्यांच्या प्रार्थनासभेत अडथळे आणण्याचे कार्य काही हिंदुत्ववादी मंडळी सतत करीत होती, असा पुरावा उपलब्ध आहे प्यारेलालनीच हा पुरावा मांडलेला आहे. गांधीजी दिल्लीत आले होते याचे कारणच दिल्लीतील दंगली हे होते. त्यापूर्वी काही महिने कलकत्त्यातील दंगली गांधीजींनी थांबवल्या होत्या. १९४७ च्या सप्टेंबरमध्ये कलकत्ता येथे गांधीजींनी उपोषण केले होते. या उपोषणाच्या दडपणाखाली कलकत्त्या-तील जनतेने शस्त्रे खाली ठेवली. बळकावलेल्या मशिदी मुस्लिम समाजाला परत केल्या. गल्लीतील पळून गेलेले मुसलमान परत आपापल्या घरी ६०
वसवण्याचे कबूल केले. मौंटबॅटन यांनी या उपोषणाला उद्देशूनच 'वन मॅन बाउंडरी फोर्स' असे महात्माजींचे वर्णन केले आहे! हा माणूस दिल्लीला येऊन पुन्हा तेच करणार. पुन्हा येथेही त्याचे उपोषण होईल. त्या दडपणाखाली लोक नमतील, मशिदी परत करा, पळून गेलेल्यांना परत बोलवा, शस्त्रास्त्रे टाकून द्या याच अटी दिल्लीलाही गांधीजी घालतील, हे सर्वांना माहीतच होते. तशा अटी पुढे त्यांनी १२ जानेवारीला घातल्यासुद्धा. पाकिस्तानात हिंदूंवर जे अत्याचार झाले त्याचा सूड हिंदुस्थानात पुरेपूर उगवण्याची इच्छा होती. या सूडाच्या थैमानाला हा माणूस आटोक्यात आणील, सूडाचे समाधान मिळू देणार नाही; म्हणून पुरेपूर सूड घ्यायचा असेल तर त्याला मारले पाहिजे, या भूमिकेतून गांधी-हत्येचा निर्णय घेण्यात आला असे दिसते. पाकिस्तानला ५५ कोट रुपये देण्याचा प्रयत्न केल्यामुळे गांधी मेला हा शुद्ध कांगावा आहे. लाहोरचा सूड दिल्लीत घेण्यासाठी हा सज्जन मरणे आवश्यक आहे असा निर्णय **सूडवादी यांनी** घेतला. दुसरे स्पष्टीकरण पुराव्याला जुळणारे नाही. क्षुब्ध जातीयवाद जो सूड इच्छीत होता त्याला गांधींच्या मरणाने मोकळीक सापडेल या अंदाजावर किंबहुना खात्रीवर खुनाची योजना आखण्यात आली.

**हिंदुत्ववाद्यांना हे कधी कळलेच नाही का?** गांधीजी जगले असते तरच मुसलमानांचा सूड उगवता येणे शक्य होते. (मी शक्य होते असे म्हणतो आहे, समर्थनीय होते असे म्हणत नाही, हे या ठिकाणी ध्यानात ठेवणे बरे.) कलकत्ता शांत करून गांधीजी दिल्लीला आले. दिल्ली शांत करून ते पंजाबला जाणार होते. शेवटी एकटे गांधीजी कुठे कुठे जाऊ शकले असते? ते पंजाबात गेले असते तरी इकडे बिहार कलकत्ता, दिल्ली येथील दंगली चालूच राहिल्या असत्या. लोकही क्षुब्ध झाले होते. उपोषणाचे शस्त्र भावनात्मक धक्का देण्यावर अवलंबून असते.

ते वारंवार वापरता येत नाही. दर वेळी गांधींनी उपोषण करावे व मग शांतता व्हावी असे घडले नसते. लोकांनी गांधीजींच्या उपोषणाची उपेक्षा करण्यास आरंभ केला असता. त्यांचा सल्ला टाळून स्वातंत्र्याच्या वाटाघाटी झाल्या. त्यांच्या इच्छेविरुद्ध पाकिस्तानला ५५ कोट रुपये न देण्याचा निर्णय झाला. हा निर्णय आपण घेतला तर गांधीजी उपोषण करतील याची जाणीव असून मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला! असामान्य उंचीवर असलेल्या या महात्म्याची पातळी जनतेला व काँग्रेस सरकारला— कुणालाच परवडत नव्हती! पंजाबातून गांधीजींना पाकिस्तानात जायचे होते. पाकिस्तानने त्यांना येऊ दिलेच नसते. भारतातील मुसलमानांना सावरण्याचे गांधींचे सामर्थ्य या ठिकाणी येऊन ओसरू लागले असते. परिस्थितीच अशी होती की, गांधींचा पराभव ते जिवंत राहण्यानेच घडू शकला असता! गांधीजी हुतात्मा झाले आणि त्यांचा विजय झाला!! गांधींना गोळी घातल्याची बातमी आली त्या वेळी खुनी कोण हे कळलेले नव्हते. मौंटबॅटनना ही वार्ता समजताच घाईघाईने घटनास्थळी आले. तेथे कुणी तरी कुजबुजत होते, गांधींना मुसलमानांनी गोळी घातली असे म्हणतात. मौंटबॅटन जोराने मागे वळले आणि मोठ्याने म्हणाले, “गांधीजींचा खुनी हिंदू आहे, आणि तो हिंदू आहे हे सर्वांना माहीत आहे.” अजून मौंटबॅटनला खुनी कोण आहे याची जाणीव नव्हती. त्यांच्या शेजारचा अधिकारी म्हणाला, “आपण इतक्या खात्रीनं कशाच्या आधारावर सांगता?” मौंटबॅटनचे उत्तर मार्मिक आणि धूर्त होते. ते म्हणाले, “खुनी हिंदूच असला पाहिजे. तो जर मुसलमान असला तर मग आपण संपलेलेच आहोत!” कल्पना करा. गांधींचा खुनी मुसलमान असता तर काय झाले असते? पण तो हिंदू होता! गांधीजींच्या खुनाचा धक्का इतका मोठा होता की, सारा भारत हादरला. जातीय दंगली बंद पडल्या. निर्वासित हिंदूंचे लोंढे याहीनंतर येत राहिले. भारतीय मुसलमान मात्र एकदम सुरक्षित झाले. हिंदूंच्यावर फेकण्यासाठी मुसलमानांच्या हातात कायमचे हत्यार जाऊन बसले! ६१

मुस्लिम समाजाचे १९४८ नंतरचे सारे प्रचारतंत्र ज्या वाक्याभोवती गुरफटलेले आहे ते वाक्य असे : “ज्यांना पाकिस्तानात जायचे होते ते पाकिस्तानला निघून गेले आहेत, जे शिल्लक आहेत ते देशाशी एकनिष्ठ आहेत. विश्ववंद्य महात्म्याचा खून करण्याइतका पिसाट जातीयवाद मुसलमानांच्या जवळ कधीच नव्हता!” हिंदुत्ववाद्यांना हवा असणारा सूड उगवण्याची आवश्यक अट गांधीजी जिवंत असणे ही होती. म्हणून वर असे म्हटले आहे की, गांधीजींचा मृत्यू ही एक उज्ज्वल घटना होती. या वाक्याचा उत्तरार्ध असा आहे की, या घटनेमुळे या देशात सेक्युलॅरिझम शिल्लक राहिला आहे. असे झाले नसते तर घटना परिषदेत सेक्युलर

घटना मांडता आली असती की नाही याचीच शंका होती. जनता गांधीजींवर रागावे; पण तिची त्यांच्यावर उत्कट श्रद्धा होती. नेहरूंच्यावर लोक कमी चिडत नसत; पण त्यांच्या दर्शनासाठी लाखो स्त्री-पुरुष पिसाटाप्रमाणे उन्हातान्हात उपाशी-तापाशी उभे राहत. फाळणीच्या अत्याचाराने उद्विग्न झालेले भारतीय मन महात्म्याचे ओघळणारे रक्त पाहिल्यानंतर इतके ओशाळून जाईल की, फाळणीचे सर्व घाव विसरून मुकाट्याने स्वातंत्र्यपूर्व जातीयवाद्यांना क्षमा करील, हा दुःखद परिणामच हिंदुत्ववाद्यांना कधी जाणवला नाही. नथूरामला तर हे जाणवणे कधी शक्य नव्हते ! नथूराम गोडसे, गोपाळ गोडसे, नाना आपटे इ. मंडळींचे या भारतावर अनन्यसाधारण प्रेम नव्हते काय ? ह्याचे उत्तर ' होते ' असे आहे. स्वतःच्या जबानीतच नथूराम म्हणतात, " आपल्या देशावर भक्तिभाव ठेवणे हे जर पाप असेल तर ते पाप मी केले आहे. जर देशप्रेम हे पुण्य असेल तर त्या पुण्यावर माझा अधिकार आहे. " गोडसे यांच्या भारतावरील प्रेमाविषयी कोणीच कधी शंका घेतली नव्हती. त्यांचे देशावर प्रेम आहे की नाही हा मुद्दाच गांधी-हत्येच्या चर्चेत गैरलागू आहे. भारत-पाक संघर्ष चालताना गोपाळ गोडसे यांनी विनाअट रक्तदान केले. हे देशप्रेम कौतुकास्पद नाही, असे कोण म्हणेल ? भारत-पाक संघर्षाच्या वेळी लाहोरच्या दिशेने कूच करणाऱ्या भारतीय सैन्याला जीव धोक्यात घालून ज्यांनी चोरवाटा दाखवल्या त्यांचेही देशावर प्रेमच होते. गोडसे तेव्हा तुरुंगात होते. बाहेर असते तर ही माणसे कोण होती हे त्यांनाही कळले असते. शेजारच्या इस्टेटीसाठी खून करणाऱ्या माणसाच्या मनातील देशप्रेम थोडेच संपलेले असते ? पण एखाद्याचे आपल्या देशावर प्रेम असणे ही गोष्ट त्याला हुतात्मा ठरवण्यास पुरेशी कशी होईल ? नथूराम गोडसे हा सामान्य खुनी नव्हे, राजकीय हत्या करणारा खुनी आहे, हे कुणीही मान्य करील. तो हुतात्मा आहे का ? या प्रश्नाचे उत्तर कसे देणार ? निर्भेळ अहिंसावादावर ज्यांची श्रद्धा आहे, ते कुणालाच हुतात्मा मानणार नाहीत. भगतसिंग, धिंग्रा, आझाद, हे कुणीच त्यांना हुतात्मे वाटणार नाहीत. शुद्ध अहिंसावाद्यांना बाबू गेनू, गणेश शंकर विद्यार्थी, स्वामी श्रद्धानंद हेच हुतात्मा वाटतील ! माझी ही भूमिका नाही. ६२

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील बलिदान करणाऱ्या शेकडो सशस्त्र क्रांतिकारकांना मी हुतात्मा मानतो. जे प्रत्यक्ष फासावर गेले त्यांनाही, आणि जे जवळ जवळ फासावर गेल्यातच जमा होते त्यांनाही मी हुतात्मा मानतो. पण मी नथूरामला हुतात्मा मानू शकत नाही. हौतात्म्यालाही एक नैतिक चौकट असते. आरोपी नथूराम गोडसे ह्यांनी मोहनदास करमचंद गांधी यांची हत्या करून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा केला आहे, म्हणून त्याला फाशी द्यावी या न्याय्य निर्णयावर कुणाचाच आक्षेप नाही.

गोडसे यांचाही नाही. स्वतः नथूरामचाही या न्याय्य निर्णयाला आक्षेप नव्हता. कायद्याच्या बाजूने शिक्षा रास्त झाली यावर सर्वांचे एकमत आहे.

प्रश्न कायद्याचा नसून नैतिक समर्थनाचा आहे. नसत्या उदात्ततेची झिलई देण्याचा मी प्रयत्न करणार नाही. गांधीजींचे पोस्टमार्टेम झालेले नव्हते. म्हणून नथूरामच्या पिस्तुलातील गोळ्यांनीच गांधीजींचा वध झाला हे कशावरून, असा बचाव करण्याची वकिलांची इच्छा होती. पण नथूरामने ती फेटाळली, याची मोठ्या गौरवाने गोडसे यांनी नोंद केली आहे! कायद्याची थोडी जाणकारी असणाऱ्यांना हा बचाव हास्यास्पद होता, इतके भान असायला हवे होते. जिथे गुन्हा घडताना पाहिलेले शेकडो साक्षीदार असतात तिथे हा बचाव गृहीत धरला जात नसतो. असा नसता उदात्तपणा मी चिकटवणार नाही. बॉम्ब फेकणाऱ्यांनी बलिदानपूर्वक गांधी-हत्या करण्याचे ठरवले होते हे मी मान्य करणार नाही; पण नथूरामला मरणाची भीती नव्हती, तो धैर्याने फासावर गेला हे मी नाकारणार नाही. कारण सत्य नाकारण्यात अर्थ नसतो; पण या धैर्यामुळे नथूराम हुतात्मा ठरतो काय?

नथूराम गोडसे याला हुतात्मा म्हणणे म्हणजे हत्येचा कायदेशीर सदोषपणा मान्य करणे; पण हत्येला नैतिक दृष्ट्या रास्त व समर्थनीय मानणे. स्वातंत्र्यवीर सावरकर ही हत्या समर्थनीय मानत होते काय? असे ते मानत असतील तर ती फारच दुःखद बाब म्हटली पाहिजे. हे जर सावरकरांचे खरोखरच मत असेल तर सावरकरांच्या अनुयायांनी केलेल्या खुनाच्या दोषारोपात स्वतः सावरकरच नैतिक दृष्ट्या कटाचे नेते ठरतील. हत्येचे नैतिक समर्थन करण्यासाठी दोन महत्त्वाच्या बाबी सिद्ध कराव्या लागतात. पहिली बाब म्हणजे विरोधकांचे सामर्थ्य पाशवी होते हे सिद्ध करावे लागते. फौजा, तोफा, बंदुका, गोळ्या व अत्याचार या जोरावर जे जनतेला दडपू इच्छितात; त्यांचा प्रतिकार जनतेच्या वतीने स्वतःला जनतेचा स्वयंभू प्रतिनिधी मानून एक जण उठून करतो, कायदा स्वतःच्या हातात घेतो, आणि अत्याचाऱ्याचा शस्त्राने विनाश करून स्वतः धन्यतेत फासावर लटकतो, तिथे हत्या करणाराही हुतात्मा होतो. अशा वेळी हत्या करणारा जनतेचा आवाज असतो. आणि वध्य जनतेचा शत्रू असतो. नथूराम भारतीय जनतेचा आवाज होता काय? नथूरामने जेव्हा गांधीजींवर गोळ्या घातल्या त्या वेळी भारतीय जनतेला मनातून आनंद वाटला, मनातून हायसे वाटले असे म्हणता येईल काय? ३१ जानेवारी रोजी निघालेल्या १० लाखांच्या प्रचंड प्रेतयात्रेतील लोक भाडोत्री होते, पैसे देऊन विकत आणलेले होते, सरकारची इतराजी नको म्हणून भीतीने

अंत्ययात्रेत सामील झाले होते, किंवा या अंत्ययात्रेत आपण गेलो नाही तर आपली काही व्यावहारिक हानी होईल म्हणून ही गर्दी जमली होती काय ? सगळा देश या आघाताने इतका सुन्न झाला की, मुस्लिमांचा सूड घेणे समर्थनीय आहे असे मानणारेही गांधी-हत्येने पार विरघळले व रडू लागले ! सावरकरांच्यावर ही गुन्हेगारी लादून त्यांचे अनुयायी काय मिळवणार आहेत ? स्वातंत्र्यवीरांची मृत्यूनंतरही विटंबना केलीच पाहिजे का ? गांधी, नेहरू, सरदारांच्यावर जनतेचे प्रेम किती होते हेच आपण समजून घेत नाही.

सशस्त्र दंगलखोर जमावावर नेहरू अनेकदा धावून गेले. त्यांनी लोकांच्या हातांतील शस्त्रे हिसकावून घेतली. हे दिल्लीतील लोक पाकिस्तानी अत्याचारांनी क्षुब्ध झालेले व सूडाने पिसाट झालेले होते. आपले दंगली करणे रास्त आहे असे त्यांना वाटे; पण या पिसाट अवस्थेतही त्यांचे नेहरूं-वर प्रेम होते. सशस्त्र जमाव नेहरूंना पाहताच दुसरीकडे पळून जाई, शस्त्र खाली टाकी. नेहरूंना इजा करावी असे त्यांना वाटले नव्हते ! ही जनता वेडी असेल, भाबडी असेल, मूर्ख असेल; पण ती भारतीय जनता होती. १७ वर्षांचा काळा बाजार, देशाची फाळणी, चीनचे आक्रमण, अनंत भानगडी विसरून लक्षावधींच्या संख्येने ही जनता पुन्हा १९६४ साली नेहरूंच्या मृत्यूनंतर मोकळेपणाने रडली. तिचे अश्रूही प्रामाणिक होते. गांधी-हत्येतील वध्य म. गांधी जनतेचे श्रद्धास्थान होते. हत्यारा नथूराम जनतेचा आवाज होता, असे फाळणीने भाजून निघालेल्या पंजाब, बंगाललाही अजून वाटत नाही,— मग उरलेल्या भारताची गोष्ट तर सोडाच ! ६४

म. गांधींचे सामर्थ्य होते कशात ? गांधी भारत सरकारचे मंत्री नव्हते, प्रधानमंत्रीही नव्हते. ते सेनापतीही नव्हते. दंगली बंद करा, नसता मार्शल लॉ पुकारू, दिसेल त्याला गोळी घालू, आणि शस्त्रबळाने शांतता निर्माण करू, ही त्यांची प्रतिज्ञा नव्हती. ही प्रतिज्ञा करण्याच्या कोणत्याही अधिकारावर ते नव्हते. पोलिसांच्या जोरावर बिहार, दिल्ली, कलकत्ता, पंजाब शांत करण्याचे प्रयत्न झाले होते. ते प्रयत्न करणारे इतर लोक होते. कुणी जर असे म्हणाला असता की, सूड घेणे मला रास्त वाटते, तुमची बंदूक मला सूड घेऊ देत नाही; म्हणून मी तुम्हांला गोळी घालतो. तर हे म्हणणे समजण्याच्या आटोक्यात होते. गांधींनी स्वतः शस्त्र वापरले नाही. शस्त्रबळावर शांतता निर्माण करा असा आग्रह धरला नाही. त्यासाठी दडपणही आणले नाही. शस्त्र हे त्यांचे सामर्थ्य नव्हतेच ! त्यांच्या विरोधी जाणाऱ्या भारत सरकारला किंवा जनतेतील हिंसेच्या प्रवृत्तीला आवर घालण्याची गांधींजवळ एकच

शक्ती होती, ती म्हणजे उपोषण! भारताचे मंत्रिमंडळ जर असे म्हणाले असते की, ठीक आहे, तुम्ही उपोषण करा. आमचे निर्णय ठरलेले आहेत. तर त्यामुळे भंगी कॉलनीत हा माणूस उपोषण करीत मरून गेला असता! जतीन्द्रनाथ उपोषण करताना असाच मेला नाही काय? टेरेन्स मॅक्स्विनी असाच अमर झाला नाही काय? गांधी असाच बसल्या जागी संपला असता. त्याला मारण्यासाठी गोळीची गरजच नव्हती- कलकत्त्यातील जनता जर म्हणाली असती की, तुम्ही उपोषण करीत मरा, आम्ही दंगली करणार, तर गांधीजी काय करणार होते? पोलिसांची पाशवी शक्ती कलकत्ता शांत करण्यात विफल झालेली होती. तरीही गांधीजींचे उपोषण हे एक सामर्थ्य होते. त्यांच्यावरील प्रेमामुळे, त्यांच्यावरील श्रद्धेमुळे लोक हवालदिल होते. जनतेचे प्रेम, जनतेची श्रद्धा इतकेच ज्याचे एकमेव भांडवल, आत्मक्लेश हेंच ज्याचे एकमेव हत्यार त्याची समाप्ती गोळीने करणारे हुतात्मे ठरू शकत नाहीत! जनतेचे प्रातिनिधिक सरकारसुद्धा ज्याच्यासमोर नमते, पिसाट सुटलेला क्रोधही ज्याच्यासमोर शरण जातो,—असा गांधी हा भारताच्या उदात्त, सदसद्विवेकबुद्धीचा प्रतिनिधी होता. 

खरी गोष्ट अशी आहे की, लोकशाहीचे सगळे मार्ग मोकळे होते. ते मार्ग चोखाळण्याची हिंमत अखंड भारतवाद्यांना नव्हती. फाळणीच्या योजनेविरुद्ध जनतेचे आंदोलन उभे करण्याची शक्ती हिंदुसभेत नव्हतीच. कारण जनतेवर तिची तेवढी पकडच नव्हती. फाळणीविरुद्ध आंदोलन फक्त गांधींच्या नेतृत्वाखाली उभे राहू शकले असते. स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास असा आहे की, अखिल भारतीय आंदोलन गांधीजींच्या नेतृत्वाशिवाय कोणालाच उभारता येणे शक्य नव्हते! एवढा त्यांचा प्रभाव भारतावर होता. सभांचे मार्ग मोकळे होते, निवडणुकांचे मार्ग मोकळे होते, आत्मक्लेशाचे, आत्मदहनाचे मार्ग मोकळे होते, पण फाळणी टाळण्यासाठी यांतले काहीच कुणी करण्यासाठी तयार नव्हते! लोकशाही मार्ग जेव्हा बंद असतात त्या वेळी सशस्त्र अत्याचाराचा मार्ग नाइलाजाने स्वीकारावा लागतो. निवडणुकीत पराभूत झालेल्या शक्ती आंदोलनाची हिंमत नसलेल्या शक्ती ज्या वेळी अध्यात्मिक बळ पिस्तुलातील गोळीने संपवू इच्छितात, त्याला नैतिक समर्थन नसते. म्हणून अशी हत्या करणारा माणूस ध्येयवादी असला, निःस्वार्थी असला, देशप्रेमी असला, तरी त्यामुळे तो हुतात्मा होऊ शकत नाही. राजकीय हत्या करणारे निःस्वार्थ असतात, ध्येयवादीही असतात, मरणाला सामोरे जाण्याइतके करारीही असतात. नथूराम जेलमधील दिवस कसे घालवत होता याचे चित्र लेखकाने काढले आहे. बाल-

पणापासूनच्या जीवनाचे दर्शन घडवले आहे. न्या. खोसला यांचा नथुरामचे वक्तव्य ऐकत असताना प्रेक्षकांवर जो प्रभाव झाला त्याचे वर्णन करणारा उतारा पुस्तकात आहेच! गीतेचे वाचन करीत, पतंजलीच्या योगाची चर्चा करीत आपटे व गोडसे यांनी दिवस काढले. आपली रक्षा सिंधूत टाकण्याचा आग्रह धरला. वंदेमातरम् म्हणत ते फासावर गेले. हैद्राबादेत फौजा घुसल्या तेव्हा त्यांनी सरदारांचे अभिनंदन केले. या सगळ्या नोंदी पाहिल्या तरी त्यामुळे चित्र अधिक स्पष्ट कसे होणार? भावनेच्या आहारी जाऊन, स्वार्थाच्या पोटी, वेड्या मनःस्थितीत घडलेली ही एक सामान्य हत्या आहे, असा जर लोकसमज असता तर गोडसे यांच्या नोंदी ही सामान्य हत्या नसून राजकीय हत्या आहे, ध्येयवादापोटी केलेली हत्या आहे, हे सांगण्यास उपयोगी ठरल्या असत्या. ही राजकीय हत्या हौतात्म्य आहे, ती नैतिक दृष्ट्या समर्थनीय होती, अशी आपली भूमिका गोडसे यांना मांडायची असल्यास ज्या प्रश्नाचे उत्तर त्यांना द्यावे लागेल तो प्रश्न वर आला आहे. त्याचे या पुस्तकात उत्तरच नाही.



व्यक्तिशः मी म. गांधींना जीवनातील एक श्रद्धास्थान मानतो; पण या माझ्या भूमिकेचा परिणाम परीक्षणावर होऊ नये याची मी काळजी घेतली आहे. गांधीजी ज्या पद्धतीने वागले, जी धोरणे त्यांनी घेतली त्या धोरणांचे समर्थन करण्याचा मोह मी टाळलेला आहे. या सर्व चर्चेत गांधीजींचे समर्थन न करता, गांधीवादाचे समर्थन न करता, किंवा आरोपीच्या गुन्ह्यामागील हेतूंना हीन न लेखता इतिहास म्हणून हा प्रश्न पाहण्याची माझी ही वस्तुनिष्ठ धडपड होती. या धडपडीचा निष्कर्ष एवढाच की, या पुस्तकाचे वस्तुनिष्ठ मूल्य फारसे नाही!

लेखकाजवळ सत्य मांडण्याचा प्रामाणिकपणा फारसा नाही. गांधी-हत्या अभियोगातील पुरावा मांडण्यातील निःपक्षपातीपणा फारसा नाही. हौतात्म्याचा दिलेला रंग समर्थनीय नाही. सरदार, सावरकर यांच्याविषयींचे उल्लेख बेजबाबदार आहेत. म. गांधीविषयींचे शेरे पूर्वग्रहदूषित आहेत. आपल्यावर सरकारने फार मोठा अन्याय केला ही भूमिका असमर्थनीय आहे. भाषाशैली व मांडणी मात्र फार चांगली आहे!

# खान अब्दुल गफारखान

सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आज सुमारे २१–२२ वर्षांनी पुन्हा भारतात येत आहेत. यंदाच्या वर्षी त्यांना 'नेहरू शांतता पारितोषिक'सुद्धा देण्यात आले आहे. सुमारे पाच महिने या थोर राजकीय कार्यकर्त्याचा भारतात मुक्काम राहील. ६७

सरहद्द गांधींचे ज्या संदर्भात आगमन होत आहे, तो सगळा संदर्भ विसरून या आगमनाकडे पाहण्यात काही अर्थ नाही. एकीकडे सरहद्द गांधींचे स्वागत करताना भारतीयांच्या मनात पश्चात्तापबुद्धी बळावत असताना दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतीय नेत्यांनी आमचा विश्वासघात केला व पाकिस्तानी लांडग्यांच्या हवाली आम्हांला निःशंकपणे केले, आमची वास्तपुस्त केली नाही, गांधीजी असते तर त्यांनी आम्हांला वाऱ्यावर सोडले नसते, असा आरोप आहे. हा आरोप स्वतः गफारखानांनीच केलेला आहे. आणि अनेकांना मनातून असे वाटते की, गफारखान म्हणतात ते बरोबरच आहे. या शूर पठाणाचा आपण जो विश्वासघात केला त्या पापाचे परिमार्जन करण्याची, पश्चात्ताप करण्याची ही एक उचित संधी आहे, असे अनेक भारतीयांना वाटते.

याच्या अगदी विरोधी, दुसऱ्या टोकाची प्रतिक्रिया मुस्लिम वृत्तपत्रांनी व्यक्त केलेली आहे. त्यांचे म्हणणे असे की, गफारखानांनी त्यांना शांतता पारितोषिक द्यावे असे कोणतेच कार्य केलेले नाही. उलट गेली वीस वर्षे हा माणूस आपल्या पितृदेशात कायम अशांतता निर्माण करीत आहे. तंटे-बखेडे माजवीत आहे. पख्तुनिस्तानचा प्रश्न हा पाकिस्तानचा अंतर्गत प्रश्न आहे. या प्रश्नावर भारत सरकारने कोणतीही भूमिका घेणे म्हणजे परराष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणे आहे. गफारखानांना मुद्दाम बोलावणे, त्यांचा सत्कार करणे या बाबी पाकिस्तानशी जाणीवपूर्वक शत्रुत्व करणाऱ्या, शांततेचे वातावरण दूषित करणाऱ्या, ताश्कंद कराराचा भंग करणाऱ्या आहेत. उद्या जर नागालँडचा बंडखोर नेता फिजो याला

पाकिस्तान सरकारने एखादे पारितोषिक देऊन गौरविले, त्याचा पाकिस्तानभर उदो उदो केला तर ते ज्या जातीचे कृत्य ठरेल त्याच जातीचे भारताचे हे कृत्ये आहे. सध्याचा सूर जर लक्षात घेतला तर भारतीय मुसलमान गप्प बसून, कार्यक्रमावर बहिष्कार टाकून, गफारखानांच्या सत्काराशी संपूर्णपणे असहकार करील असे दिसते.

सामान्यत्वे गफारखानांच्या कार्यक्रमाला भारतात एवढा मोठा प्रतिसाद मिळणार आहे की, त्या जल्लोशात सर्वसामान्य मुस्लिम समाजाची वागणूक कशी राहील याकडे लक्ष जाणे कठीण होऊन जाईल. गफारखान हे मुसलमानांचे धर्मपीठ– देवबंदचे जुने विद्यार्थी व कार्यकर्ते. अगदी थोडा काळ का असेना, ते अलिगडचे विद्यार्थी होते. आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवलेल्या या महान नेत्याचे स्वागत करण्यात तथाकथित राष्ट्रवादी मुस्लिम संघटना, देवबंद व अलिगड ही विद्यापीठे किती मर्यादेपर्यंत सहभागी होतात याचे चित्र येत्या काही महिन्यांमध्ये स्पष्ट होऊन जाईल.



या देशातील फुटीर राजकारण चालू ठेवणाऱ्या मंडळींना काय वाटावे हा त्यांच्या इच्छेचा प्रश्न आहे. हा देश स्वतंत्र झाला त्या अर्थी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी कुणी तरी बलिदान केले असेल; त्या स्वातंत्र्ययुद्धाच्याविषयी त्यांची मते आपणास पटोत किंवा न पटोत, कृतज्ञ असण्याची गरज असते. याची जाणीवच अजून या फुटीर राजकारणाला नाही. गेल्या वीस वर्षांत गफारखान येथे येवोत अगर न येवोत, पाकिस्तान भारताचे मित्र कधीच नव्हते. पाकिस्तानने नेहमीच आपले शत्रुत्व जागते ठेवले. भारतीय समाजाचा द्वेष हा पाकिस्तानच्या राजकारणाचा एक महत्त्वाचा आधार राहिला, हेही अजून फुटीर राजकारणातील दांभिक नेत्यांना मान्य नाही. ज्यांनी पाकिस्तान अस्तित्वात आल्याबरोबर त्याच्याशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली ते सरहद्द गांधी आणि फिजो यांच्यातील फरक या राजकीय प्रवाहाला कळणे शक्य नाही. राजकीय जीवनातील प्रामाणिकपणाशी फारकत घेतलेल्या या प्रवाहाला सरहद्द गांधीसारख्यांच्या जीवनात सचोटी नावाचा एक दुर्मिळ पदार्थ असतो, हे पटण्याची शक्यता फार कमी आहे.

पण जे राष्ट्रवादी राजकारणात सतत मुरलेले आहेत, त्यांना पापमार्जनाची भावना काय म्हणून असावी, हे समजणे मात्र कठीण आहे, सरहद्द गांधींचा विश्वासघात झाला ही राजकारणाच्या सोयीची भाषा असते. तिला अक्षरशः सत्य मानण्याची गफलत आपण करण्याचे काहीच कारण नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी वायव्य सरहद्द प्रांतात जे मतदान

झाले ते मतदान आपण नीटपणे समजून घेतले पाहिजे. अत्यंत प्रचंड बहुमताने पठाणांनी पाकिस्तानात जाण्याचा निर्णय घेतलेला होता. हा निर्णय अनपेक्षित नव्हता. त्या वातावरणात तो अपेक्षित होता. असा निर्णय घेतल्याबद्दल पठाणांच्याविषयी कुणाच्या मनात राग, द्वेष असणे वेडेपणाचे ठरेल; पण असा द्वेष असणे जितके वेडेपणाचे आहे, तितकेच पठाणांचा विश्वासघात झाला हे म्हणणे हास्यास्पद आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

ज्या वायव्य सरहद्द प्रांतात गफारखानांचा जन्म झाला, तो वायव्य सरहद्द प्रांत नेहमीच स्वतःला सांस्कृतिक दृष्ट्या अफगाणिस्तानशी एकरूप मानत आलेला प्रांत आहे. स्वतः गफारखानसुद्धा पठाणांची मातृभाषा पुश्तू मानतात आणि अफगाणिस्तानची भाषासुद्धा पुश्तू मानतात. रक्ताने, वंशाने, भाषेनें, संस्कृतीनें आपण अफगाणिस्तानशी जोडले गेलेले आहोत असे पठाणांना मनातून वाटते. ऐतिहासिक दृष्टीने त्यांचे हे वाटणे बरोबर आहे की चूक आहे या मुद्द्यावर अनुकूल-प्रतिकूल अशी चर्चा करता येईल; पण या चर्चेचा उपयोग नाही. पठाणांना जे वाटते ते हे आहे. गफारखानांच्याही जन्माच्या पूर्वीपासून वायव्य सरहद्द प्रांत हा मुसलमानांच्या धार्मिक राजकारणाचा एक आधार होता. हिंदुस्थानवर इंग्रजांचा ताबा वाढत आहे, जवळजवळ हिंदुस्थान इंग्रजांच्या ताब्यात गेल्यातच जमा आहे, असे मानणाऱ्यांनी मुसलमानांच्यासाठी पुन्हा सर्व भारत मुक्त केला पाहिजे, या श्रद्धेने जी खिलाफत सुरू केली तिची राजधानी याच प्रांतात पेशावर ही होती. पठाण हा नेहमीच कठोर धर्म-श्रद्धा असणारा मुसलमान, स्वातंत्र्यप्रेमी आणि लढाऊ राहिला आहे. हा प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात आल्यानंतर दीर्घकाळपर्यंत कायद्याचे राज्य स्थापन करणे इंग्रजांना कधी जमले नाही. शेवटी पठाणांना स्वतंत्र रीत्या हाताळण्यासाठी कर्झनच्या काळात वायव्य सरहद्द हा नवा प्रांत निर्माण करण्यात आला. आणि जवळ जवळ निम-लष्करी प्रशासनाखालीच हा प्रांत ठेवण्यात आला.



अशा या पठाण प्रांतात गफारखानांसारख्या नेत्याचा उदय होणे हीच एक आश्चर्यकारक घटना आहे! स्वतः गफारखानही एकाएकी 'सरहद्द गांधी' झालेले नाहीत. त्यांच्याही जीवनाला एक विकासक्रम आहे. स्वातंत्र्यप्रिय पठाणांना इंग्रजांची अर्ध-लष्करी राजवट अन्याय्य व असह्य वाटतच होती. त्या राजवटीविषयी पठाणांच्या मनात आरंभापासूनच विरोध होता. या पठाण प्रांतातील निरनिराळ्या जिरग्यांचे अधिपती पुरेसे सामर्थ्यवान होते. त्यांनाही इंग्रजांचा हस्तक्षेप आवडत नव्हता. या सर्व पार्श्वभूमीतून गफारखानांच्या मनात आपल्या धर्मबंधूंची सेवा आणि

इंग्रज राजवटीचा विरोध या प्रवृत्ती वाढीस लागल्या. ते नेहमीच अत्यंत श्रद्धाळू आणि प्रामाणिक मुसलमान होते. मौ. आझादांचे लिखाण वाचून गफारखान त्याकडे आकर्षित झाले. भारतभर चाललेल्या खिलाफतच्या चळवळीकडे ते आस्थेने पाहात होते. आपल्याही प्रांतात त्यांनी या चळवळीसाठी शक्य ते प्रयत्न केले; या चळवळीत सहभाग घेतला. इंग्रजी राज्य खलिफांच्या विरोधी असल्यामुळे या राज्यात मुसलमानांनी राहू नये, त्यांनी सहकुटुंब सहपरिवार एखाद्या मुसलमान देशात कायमचे निघून जावे, अशी चळवळ त्या वेळी चालू होती. याही चळवळीवर गफार-खानांचा विश्वास होता. ते स्वतःच आपला परिवार घेऊन अशा प्रकारे देशत्याग करून अफगाणिस्तानला निघून गेले होते.

गफारखानांना वाटणारी देवबंद या धर्मपीठाविषयीची आस्था, मुसलमान ७०
धर्मावर असणारा त्यांचा दृढ विश्वास, त्यांच्या मनाची धार्मिक प्रवृत्ती या बाबी पाहिल्या तर गफारखान गांधीजींच्या इतके जवळ आले ही बाबच चमत्कारिक वाटू लागते. हे असे का घडले ? याचे उत्तर कोणताही संकोच न ठेवता स्वतः गफारखानांनीच दिलेले आहे. ते म्हणतात, "आमच्या प्रांतात असह्य असा जुलूम व अन्याय चालू होता. आम्ही मुक्ततेसाठी झटत होतो. स्वाभाविकच आम्ही आशेने मुस्लिम लीगकडे पाहात होतो; पण मुस्लिम लीग इंग्रजांच्याविरुद्ध झगडण्यास तयार नव्हती. लीगला आमच्या स्वातंत्र्यात रस नव्हता. कॉंग्रेस स्वातंत्र्यासाठी झगडण्यास तयार होती. आम्ही कॉंग्रेसकडे आलो."

गफारखानांचे खरे मोठेपण या ठिकाणी आहे. जर लीग इंग्रजांच्या विरुद्ध झगडण्यास तयार झाली असती, जर लीगने पठाणांच्या स्वातंत्र्यात रस घेतला असता तर आपण लीगबरोबर गेलो असतो हे सत्य त्यांनी कधीही नाकारलेले नाही. गफारखानांच्या जीवनातील ही सचोटीच फार महत्त्वाची आहे. इ. स. १९३० नंतर गफारखान आणि भारतीय कॉंग्रेसचे संबंध अधिकाधिक घनिष्ठ होत गेले. गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा गाढ परिणाम या पठाणांच्या जीवनावर झाला. एकनिष्ठ मुसलमान असूनसुद्धा त्यांना गीता-ग्रंथ पारायण करावासा वाटला, गीता त्यांच्या अभ्यासाचा भाग झाली. गांधी हिंदू असून सर्वधर्मसमभाववादी झाले. गफारखान मुसलमान असून त्याच पातळीवर जाऊन पोहचले. हा मनाचा विकास होता. हा विकास होत असतानाच सामाजिक व आर्थिक सुधारणांच्या प्रश्नांनी त्यांचे लक्ष वेधले गेले. उदारमतवादी, सर्वांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी न्याय्य समाजव्यवस्था निर्माण करण्यात त्यांना रस वाटू लागला. गफारखान किंवा मौ. आझाद यांच्यासारखे नेते एकनिष्ठ मुसलमान राहिले. या घटनेत फारसा अर्थ नसतो. कारण अशा वेळी शब्द शिल्लक राहतात आणि

आशय पूर्णपणे बदलून जातो. या नेत्यांनी कोणता अर्थ गृहीत धरला, इस्लाम या नावाने ते कोणत्या भूमिकांना अनुसरते झाले ही गोष्ट महत्त्वाची असते.

इस्लाममध्येही उदात्त नैतिक आज्ञा आहेत. या आज्ञा पाळल्या जात नाहीत हा प्रश्न निराळा; पण म्हणून त्या आज्ञा नाहीत असे नाही. एक आज्ञा अशी आहे की, " तुझ्या गावात कुणी उपाशी नाही याची खात्री करून घेऊन मगच तू जेव. " उद्या जर कुणी माणूस आपण कडवे मुसलमान असल्यामुळे सर्व गावातील एकूण एक माणूस पोटभर जेवला पाहिजे हे पाहण्याची आपली जबाबदारी समजू लागला आणि त्यासाठी दारिद्र्यविमोचनाच्या कार्यक्रमाला निष्ठेने हातभार लावू लागला तर त्याचा विरोध करण्याचे कारण नाही. कारण अशा वेळी वरचे ' लेबल ' शिल्लक राहते, मधला सगळा आशयच बदलून जातो. गांधींच्या सहवासात गफारखानांचे असे झाले आहे; म्हणून ते सरहद्द गांधी झालेले आहेत. हिंदुत्ववाद्यांनी जसा हिंदू गांधींचा उत्कट द्वेष केला तितकाच उत्कट द्वेष इस्लामवादीयांनी गफारखानांचा केला. सामान्य हिंदू जनता जशी गांधींच्या मागे आपला त्राता म्हणून श्रद्धेने गेली, तसा पठाणही श्रद्धेने आपल्या नेत्याच्या मागे गेला.



मौ. आझादांचा तुच्छतेने उल्लेख करणे सोपे होते. कारण आपल्या समाजावर आझादांचा प्रभाव फारच बेताचा होता. गफारखानांच्याकडे असे तुच्छतेने पाहणे शक्य नव्हते. कारण पठाण समाजात त्यांचा फार मोठा अनुयायी वर्ग होता. मात्र याचा अर्थ पठाण शंभर टक्के गफारखानांच्या मागे होते. असा करावयाचा नाही. वायव्य सरहद्द-प्रांतातही लीगचे सामर्थ्य पुष्कळच मोठे होते. जे स्वतंत्र म्हणून निवडून येत त्यांच्याही भूमिका लीगच्याच होत्या. हजारा जिल्हा तर लीगच्या बहुमताचा होता; पण उरलेल्या प्रांतांतसुद्धा लीग कधी उपेक्षणीय नव्हती. १९३७ साली अगर १९४५ साली लीगला या प्रांतात बहुमत मिळाले नाही. अल्पसंख्य हिंदूंच्या पाठिंब्याच्या जोरावर नेहमीच वायव्य सरहद्द प्रांतात मंत्रिमंडळ काँग्रेसचे राहिले; पण १९३७ सालीसुद्धा लीग व लीगवादी मनोवृत्तीचे १७ आणि काँग्रेसची संयुक्त आघाडी १९ असे तौलनिक बल होते. सर्वसामान्य जनतेत निरनिराळ्या कारणांमुळे गफारखानांच्या विरोधी काही प्रवाह होतेच.

विशेषतः गफारखानांचे वडील बंधू डॉ. खानसाहेब ह्यांची पत्नी युरोपियन होती ही गोष्ट समाजाला आवडण्याजोगी नव्हती. डॉ. खानांच्या मुलीने एका शिखाशी लग्न केले, या मुद्द्यावर इतका प्रक्षोभ वाढलेला होता की,

अनावर जमावाला आवरण्यासाठी काँग्रेस मंत्रिमंडळाला तिथे गोळीबार करावा लागला. वायव्य सरहद्द प्रांतातील छोटे-मोठे टोळी-नायक आणि सरंजामदार यांना गफारखान आपले शत्रूच वाटत. कारण गफारखानांचे राजकारण हे सगळ्याच वतनदारांच्या विरोधी असणारे राजकारण होते. असल्या प्रकारच्या या प्रांतात पाकिस्तान होणे शक्य नाही, असे दिसेपर्यंत जी परिस्थिती होती त्या परिस्थितीत पाकिस्तान होणे आटोक्यात आल्याबरोबर मूलभूत बदल झालेला होता. याच सरहद्द प्रांतात पंडित नेहरूंना प्रक्षुब्ध जमावाकडून दगडविटांचा मारा सहन करावा लागला. या प्रांतातीलच आफ्रिडी टोळ्यांनी लीगच्या प्रेरणेमुळे काश्मीरवर चाल केलेली होती.



१९४७ साली वायव्य सरहद्द प्रांतात मतदान झाले. या मतदानात ८९ हजार २४४ मतदारांनी पाकिस्तानच्या बाजूने कौल दिला. २ हजार ८७४ मतदारांनी भारताच्या बाजूने कौल दिला. या दोन आकड्यांतील अंतरच इतके मोठे आहे की, मतदानावर गफारखानांनी बहिष्कारही घातला नसता तरी मतदानाचे चित्र फारसे बदलले नसते. गफारखानांचे म्हणणे असे की, मतदान पाकिस्तान, भारत, की पख्तुनिस्तान या मुद्द्यावर घेतले जायला हवे होते. ही गोष्ट अगदीच अशक्य अशी होती. कारण असेच मतदान बंगालमध्ये घेतले असते तर ते स्वतंत्र बंगालच्या बाजूने गेले असते. पाकिस्तानच्या बाजूने गेले नसते. एकेका संस्थानाच्या समोर जर हा पर्याय ठेवला असता तर काय घडले असते याचे चित्र आजही उघड आहे. एकेक संस्थानिक ज्या प्रचंड मतांनी निवडून येतो ती मते पाहिली तर जनमताचा कौल कसा गेला असता हे सांगणे कठीण नाही. प्रत्येकाला स्वतंत्र राहण्याचा पर्याय जर मोकळा, शिल्लक राहिला असता व तो पर्याय मान्य केला असता तर पाकिस्तानच नाही, तर हिंदुस्थानचेसुद्धा शेकडो तुकडे उडाले असते. हे बाल्कनायझेशन कुणी मान्य करणार नव्हते. ते कुणाच्याच हिताचे नव्हते. अशा अवस्थेत आपला विश्वासघात झाला, हे वाटल्यास गफारखानांनी म्हणावे. आमच्या नेत्यांनी पठाणांचा विश्वासघात केला अशी समजूत आपण करून घेण्याचे काही कारण नाही. पख्तुनिस्तानची मागणी गफारखानांनीच १९३० नंतर सोडून दिली होती व अखंड भारतात राहणे पत्करले होते. १६ वर्षांनंतर कालचक्र उलट फिरवणे गफारखानांनाही शक्य नव्हते.

आज सरहद्द गांधी पख्तुनिस्तानसाठी लढत आहेत. त्यांना पाकिस्तान अंतर्गत पुश्तू भाषेचा एक प्रांत हवा आहे. यांपैकी कोणतीच मागणी तशी गैर नाही. या मुद्द्यावर झगडण्याचा सरहद्द गांधींचा हक्क आपण

मान्य केला पाहिजे. पण सरहद्द गांधी पख्तुनिस्तानसाठी लढत आहेत हे काही त्यांना वंदनीय मानण्याचे कारण असू शकत नाही. पठाणांसारख्या परंपरेने नित्य शस्त्राचा वापर करणाऱ्या समाजात या माणसाने शिस्तबद्ध अहिंसक लढ्याची जी उज्ज्वल परंपरा निर्माण केली आहे ती त्याच्या वंदनीयतेचे कारण आहे.

गफारखान हे भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचे एक महान सेनानी होते. सचोटी, त्याग आणि बलिदान या कोणत्याही कसोटीवर ते इतर कुणालाही कमी भरणारे नाहीत. पण त्याबरोबरच ते एका नव्या परंपरेचे पाईक आहेत. 'मरणे आणि मारणे' हा ज्यांच्या जीवनाचा रोजचा भाग होता, त्या समाजातील कित्येक लाखांना त्यांनी तत्त्वासाठी निर्भयपणे मरण्याची शिकवण दिली. हजारो वर्षांच्या परंपरेने माणसाचा एक गट अजून भटक्या टोळ्यांच्या अर्धरानटी संस्कृतीतच वावरत होता. हे टोळीवाले हिंदू असतानाही हिंस्रच होते. बुद्ध झाल्यावरही हिंस्रच राहिले. मुसलमान झाल्यानंतर तर ते हिंस्र राहणारच. या शस्त्रोपजीवी संस्कृतीत मानवता-धर्माचा दिवा गफारखानांनी प्रज्वलित केला. आणि आपल्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाने पठाणांच्यामध्ये झोपलेले 'माणूसपण' जागे केले. माणसाच्या जातीवर गांधींचा पगडा किती उत्कट असू शकतो, वासना आणि क्षुधेच्या समर्थनाच्या काळात 'विवेकाचा आवाज' केवढा भव्य असू शकतो याचा साक्षात्कार म्हणजे गफारखानांचे जीवित.



गांधी-जन्मशताब्दीच्या या वर्षात गांधी ही नुसती स्वप्न-कल्पना नव्हती, ते हाडा-मासाचे वास्तविक जीवनातले व्यक्तिमत्त्व होते. हे समजावून सांगावयाचे असेल तर त्याचे उत्तर विनोबा जिवंत आहेत हे नाही, 'गफारखान जिवंत आहेत' हे त्याचे खरे उत्तर आहे. गांधी म्हणजे विचार प्रचार करीत हिंडणारा आणि अंमलबजावणीची जबाबदारी न घेणारा उपनिषदातील संघटनाशून्य ऋषी नव्हता. गांधी म्हणजे आपल्या प्रामाणिकपणाला साक्ष ठेवून लाखोंना बरोबर घेऊन चालणारा, अन्यायाच्या प्रतिकाराचा एक चारित्र्यवान आविष्कार होता. गांधी जन्मशताब्दीला गफारखानांहून मोठा पाहुणा कोण मिळणार?

# मौलाना आझाद : एक स्मरण

माझा आणि राष्ट्रीय चळवळीचा संबंध अगदी लहान वयात आला. ७४
ज्या काळात घरात राष्ट्रीय वातावरण असते की त्या श्रद्धेनुसार मुलेही बोलू लागतात, विचार करू लागतात, त्या काळापासून म्हणजे ७-८ व्या वर्षापासून मी एक छोटा स्वयंसेवक म्हणून घोषणा देणे, व्याख्यानांना हजर राहणे, स्वातंत्र्यलढ्याची स्वप्ने रंगवणे यात गुरफटलेला होतो. सगळ्याच लहान मुलांची ही परिस्थिती असते तशी माझी होती. वडिलांचा पक्ष तो आपला राजकीय पक्ष, घरातले राजकीय वातावरण हे जगातले एकमेव न्याय्य राजकारण अशी दृढ समजूत असण्याचा तो काळ असतो, इतक्या लहान वयापासून ज्या आदरणीय नेत्यांविषयी कोणतीही चिकित्सा न करता श्रद्धा बाळगण्यास आम्ही शिकलो त्यांत पै. मौलाना अबुल कलाम आझाद हे एक होते. स्वातंत्र्य मिळेपर्यंत या श्रद्धांची फेरतपासणी करण्याची गरजच वाटली नाही. स्वातंत्र्योत्तर काळात ज्या प्रश्नांचा विचार करण्यात दीर्घकाळ मन गुंतलेले होते, त्यात मौलानांचा समावेश नव्हता. ही परिस्थिती माझी एकट्याचीच आहे असे नसून माझ्या बहुतेक सहकाऱ्यांचीसुद्धा परिस्थिती अशीच आहे. मौलाना आझादांच्याविषयी फारसा विचार त्यांनी केलेला नसतो. आज इतक्या दिवसांनंतर पुन्हा एकदा मौलानांचा चिकित्सक विचार करायचा असे म्हटले तर त्या थोर चारित्र्यवान माणसाविषयी हळहळ वाटल्याशिवाय राहत नाही. मौलानांची देशनिष्ठा, त्यांचे चरित्र, त्यांची विद्वत्ता याबाबत आजही माझ्या मनात संपूर्ण आदराशिवाय दुसरे काहीच नाही. चिकित्सक विचार करूनसुद्धा याबाबत मौलानांविषयी कुठे श्रद्धेला तडा जावा, त्यांच्या जीवनात एखादा हिणकस भाग आढळावा असे काही घडलेले नाही. पण एक राजकीय नेतृत्व म्हणून मौलानांचा विचार करू लागलो की, त्यांच्या कार्यातील प्रचंड आत्मविसंगती आणि त्यांना आलेले लोकविलक्षण अपयश यापलीकडे शिल्लक काहीच राहात नाही. मौलानांच्या एवढा मोठा कार्यकर्ता आणि विचारवंत आपल्या समाजावर कोणताही ठसा न ठेवता नामशेष होऊन जावा ही गोष्ट अत्यंत करुण आणि

दुःखाची आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात हळूहळू मौलानांविषयी फारसे बोलणेच लोकांनी बंद करून टाकले. मराठीत मौलानांची फारशी चरित्रे लिहिली गेली नाहीत. पण उर्दू आणि इंग्रजीतही आवर्जून नाव घ्यावे असे कोणतेही मौलानांचे चरित्र उपलब्ध नाही. अगदी अलीकडे खान अबदुल गफार-खान यांचे बृहत्‌चरित्र तेंडुलकरांनी लिहिलेले आहे. तसे हेही चरित्र फारसे चिकित्सक नाही, व सत्यावर फारसा प्रकाशही टाकीत नाही. पण निदान सरहद्द गांधींचे एक बृहद् चरित्र उपलब्ध आहे. सरहद्द गांधी हे मौलानांचे राजकीय शिष्य. मौलाना ज्या धार्मिक विचारसरणीचे होते त्याचे एक अनुयायी. पण शिष्याला ज्या अर्थाने चरित्रनायक होण्याचा मान मिळाला तोही प्रेरक गुरूला मिळालेला नाही. अधूनमधून एखाद दुसरा लेख मौलानांवर आढळतो. या लेखात मौलानांची अतिरिक्त स्तुती किंवा अतिरिक्त निंदा असते, पण त्यांच्या जीवनाचा व कार्याचा फारसा तपशील कुठे नोंदवलेला दिसत नाही. ७५

स्वातंत्र्योत्तर काळातील मौलानांचे सगळे आयुष्य एका चमत्कारिक दयनीय अशा परिस्थितीतील आयुष्य आहे. स्वतंत्र भारतात मध्यवर्ती सरकारचे शिक्षणमंत्री म्हणून ते राहिले. मौलानांचे कर्तृत्व, लायकी आणि काँग्रेस वर्तुळातील त्यांची ज्येष्ठता पाहिल्यानंतर त्यांना कायम शिक्षणमंत्री राहावे लागावे ही काही त्यांची योग्य बूज झाली असे म्हणता येणार नाही. सरदार आणि राजगोपालाचारी निवृत्त झाल्यानंतर गृहखाते क्रमाने कटजू आणि पंत यांच्याकडे गेले. पण मौलानांना कधी गृहखाते देण्यात आले नाही. सरदार पटेलांच्या मृत्यूनंतर उपपंतप्रधान होण्याचा मौलानांचा हक्क होता. पण त्यांना कधी उपपंतप्रधानही करण्यात आले नाही. ते पदच रद्द करण्यात आले. विभक्त मतदार संघाचे मौलाना पुरस्कर्ते होते. काँग्रेसनेही विभक्त मतदार संघाला मान्यता दिलेली होती. मौलानांसमोर याचा सल्ला न घेता विभक्त मतदार संघ रद्द झाले. काश्मीर व हैद्राबाद प्रकरणी किंबहुना भोपाळ प्रकरणीही त्यांचा सल्ला विचारण्यात आलाच नाही. भारताची राष्ट्रभाषा देवनागरी लिपीतील हिन्दी असावी या गोष्टीचा पुरस्कार मौलानांना करावा लागला. वस्तुतः देवनागरी व पर्शियन अशा उभय लिपीतील हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा असावी असे मौलानांचे व काँग्रेसचे स्वातंत्र्यापूर्वी दोन दशके सतत एकमत होते. मौलानांच्या एकेक कल्पना स्वातंत्र्यानंतर उद्‌ध्वस्त झाल्या. आपण काही जणांच्या दयेवर मंत्रिमंडळात आहोत याची वाढती विदारक जाणीव त्यांना सतत होत गेली; आणि तरीही भारतीय मुसलमानांचे हित डोळ्यां-समोर ठेवून ते मंत्रिमंडळात राहिले. ज्या माणसाने उम्मतूलवाहिदांचे

स्वप्न पाहिले, जे स्वप्न मनाशी अखंड बाळगले, त्या स्वप्नाबद्दल आपली खास जबाबदारी आहे असे मानले, त्या माणसाला शेवटची दहा-अकरा वर्षे अशा वातावरणात काढावी लागली ही गोष्ट दुर्दैवाची म्हटली पाहिजे. जे घडले ते काही चुकीचे घडले, वाईट घडले असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. पण या सगळ्या गोष्टी घडत असताना मौलानांवर कमालीचा अविश्वास दाखवण्यात आला. पं. नेहरूंसारख्या मौलानांच्या जिवलग मित्रांनीसुद्धा मुस्लिम प्रश्नांखेरीज इतर बाबतीत मौलानांचा सल्ला घेण्याची कधी गरज मानली नाही. जणू स्वतंत्र भारतात मौलाना सगळ्या राष्ट्राचे नेते म्हणून विचारातच घेतले गेले नाहीत ! ते फक्त मुसलमानांचे एक नेते एवढेच त्यांचे स्थान राहिले. मौलानांना हे प्रचंड अपयश का आले ? याचा विचार केल्याशिवाय आजची हिंदू–मुस्लिम समस्याही नीट समजू शकणार नाही. 

मौलाना हे मुस्लिम समाजातील विद्वानांच्या, मौलवींच्या श्रेष्ठ वंदनीय घराण्यातील एक अपत्य होते. भारतात मुल्ला–मौलवींची जी सर्वश्रेष्ठ घराणी आहेत त्या घराण्यांच्या वारसदारांनी कधी राजकारणात इतक्या हिरीरीने व सातत्याने भाग घेतलेला दिसत नाही. मौलानांचे घराणे इतिहासात सम्राट अकबराच्या काळापासून प्रसिद्ध असणारे घराणे होते. सम्राट अकबराच्या वेळी जे ख्यातनाम मुस्लिम धर्मपंडित धर्माच्या संरक्षणासाठी अकबराच्या विरुद्ध लढा देण्यास उभे राहिले, ज्यांनी अकबराच्या दीने-इलाहीच्या कल्पनेविरुद्ध प्रखर संघर्ष दिला, व अकबर-विरुद्ध राजपुत्र सलीम याने केलेल्या बंडात ज्यांनी राजपुत्राला पाठिंबा दिला, अशा प्रसिद्ध मुल्ला–मौलवींत जमालुद्दीन हा एक महत्त्वाचा धर्म-पंडित होता. सम्राट अकबराच्याही काळापूर्वीपासून मुस्लिम धर्मपंडित मुस्लिम राजसत्तेच्या विरुद्ध काही मुद्द्यांवर भांडत होते. अशा भांडणाऱ्या मंडळींपैकी शेख उल इस्लाम सय्यद नुरुद्दीन मुबारक गझनवी हा एक प्रसिद्ध पंडित होता. मुसलमानांच्या धार्मिक इतिहासाप्रमाणे परमेश्वरा-वरील श्रद्धेमुळे व कठोर धर्माच्या आचरणामुळे मुसलमानांनी पासष्ट वर्षांत एक-तृतीयांश जग जिंकले, आणि जिंकलेले जग एका शतकात इस्लामच्या कायम छायेखाली आणले.

हिंदुस्थानात मात्र हा देश जिंकण्यासाठी कैक शतके लागतात, आणि देश जिंकून शतक उलटून गेले तरी अजून हिंदुस्थान इस्लाममय होत नाही याचे कारण काय ? मुस्लिम धर्मपंडितांचे असे म्हणणे की, भारतात मुसलमानांचा विजय होत नाही याचे कारण भारतीय मुसलमान प्रामाणिकपणे धर्माचरण करीत नाहीत हे आहे. म्हणून सय्यद नुरुद्दीन सुलतान अल्तमशकडे गेला व त्याने अशी मागणी केली की, अल्तमशने

इस्लामच्या धर्मशास्त्राप्रमाणे वागले पाहिजे. धर्मशास्त्राप्रमाणे हिंदू लोक अहिलुल किताब नाहीत. म्हणून ते जिम्मी होऊ शकत नाहीत. कर देऊन गैर मुस्लिम त्यांना राहता येत नाही. म्हणून हिंदूंनी एक तर मरण पत्करावे किंवा मुसलमान व्हावे; तिसरा पर्याय नाही. ही मागणी करणारा शेख उल इस्लाम हा एकटाच नव्हता. ही मागणी करणारी एक चळवळ होती. ही चळवळ ' मेहदवी ' म्हणून ओळखली जाते. चौदाव्या शतकाच्या आरंभाला निर्माण झालेल्या या चळवळीची वारसदारी अकबरच्या काळात मौलाना जमालुद्दीन चालवीत होते. या जमालुद्दीनच्या वंशात मौलाना आझादांचा जन्म झाला.

परंपरेने मौलानांचे पूर्वज बंगालमध्ये धर्मगुरू म्हणून मानले गेले. हा बंगाल ज्या वेळी इंग्रजांच्या ताब्यात गेला त्या वेळी बंगालमधील मुस्लिम धर्मपंडितांनी इंग्रजी राजसत्तेच्याविरुद्ध अनेकवार उठाव करण्याचे प्रयत्न केले. हे प्रयत्न करणाऱ्या मंडळींत फरादिया चळवळीत मौलानांचे काही पूर्वज होते. मौलाना आझादांचे वडील मौलाना खैरुद्दीन हे आपल्या काळातील प्रसिद्ध इमाम होते. त्यांचे शिष्य भारताच्या विविध प्रांतांत पसरलेले होते. इंग्रजी राजवटीविरुद्ध उलेमांनी जे संघर्ष केले त्याचा शेवट १८५७ च्या उठावणीत उलेमांनी केलेला उठाव व घेतलेला भाग हा होता. १८५७ चे शिपाईयुद्ध संपल्यानंतर मौलाना खैरुद्दीन अधार्मिकांच्या हातात गेलेल्या भारताचा कायमचा त्याग करून मक्केत राहण्यासाठी म्हणून गेले. एकटे मौलाना खैरुद्दीनच असे गेलेले नव्हते, त्यांच्याबरोबर अनेक धर्मपंडित गेलेले होते. पण सगळेच धर्मपंडित अशा रीतीने भारत सोडून हिजर करू शकत नव्हते. जे धर्मपंडित भारतात शिल्लक राहिले त्यांनी भारतात इ. स. १८६७ साली ' देवबंद ' या मुस्लिम धर्मशिक्षणाच्या केंद्राची स्थापना केली. मेहदी व वाहबी चळवळींचे वारसदार हे या ' देवबंद 'चे निर्माते, चालक व सूत्रधार होते. देवबंदचे हे धर्मपीठच जमेतुल उलेमाचे प्रमुख सामर्थ्यस्थान होते. जमेतुल उलेमाचे नेते व कार्यकर्ते देवबंदचे विद्यार्थी तरी असत किंवा शिक्षक तरी असत. आजही देवबंद हे धर्मपीठ उत्तर प्रदेशात चालू आहे, आणि मुस्लिम जातीयवादाचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून काम करीत आहे. देवबंद या धर्म-केंद्राशी मौलाना आझादांचा संबंध वंशपरंपरेने होता. कारण देवबंदचे निर्माते मौलाना खैरुद्दीन यांच्यावर श्रद्धा ठेवणारेच होते. परागंदा मौलाना खैरुद्दीन मक्केत गेले, तिथेच त्यांचे लग्न झाले. मौलाना आझादांचा जन्म खैरुद्दीन यांचे पुत्र म्हणून मक्केत इ. स. १८८८ साली झाला. प्रथेप्रमाणे त्यांची दोन नावे ठेवण्यात आली. एक तर सामान्य मुस्लिम म्हणून त्यांचे नाव मोहियुद्दीन अहमद होते. पण हा माणूस सामान्य मुसलमान नव्हता. तो कलकत्त्याचा इमाम व मुस्लिम धर्मगुरूपीठाचा एक वारसदार

होता. हे इमामपद लक्षात घेऊन फिरोजबख्त हे त्याचे दुसरे नाव ठेवण्यात आले. वाहाबी व मेहदी या चळवळी केवळ भारतीय स्वरूपाच्याच नव्हत्या. ती परंपरा सर्वत्र पसरलेली होती. या परंपरेतच मौलानांचे बालपण गेले, धर्मशिक्षण झाले.

मौलानांच्यावर बालवयात आधुनिक शिक्षणाचे संस्कार झालेच नाहीत. त्यांनी मुस्लिम धर्मशिक्षणच घेतले. हे धर्मशिक्षण घेऊनच ते लहानाचे मोठे झाले. लोक-विलक्षण बुद्धिमत्ता आणि मुस्लिम धर्मशास्त्रातील पांडित्य यामुळे मौलाना आझाद हे आपल्या बालपणातच सर्व अरबस्तान-मध्ये ख्यातनाम पंडित म्हणून मानले जाऊ लागले. मक्केतील मुल्ला-मौलवींनी आपल्या मध्यवर्ती धर्मक्षेत्रात त्यांचा सत्कार करून विद्या-वाचस्पती म्हणजे अबुल कलाम ही पदवी त्यांना दिली; त्या वेळी त्यांचे वय केवळ अठरा वर्षांचे होते. जर हाच क्रम चालू राहिला असता तर मौलाना अरबस्तानात राहिले असते, आणि मुस्लिम धर्मशास्त्राचे जगद्-विख्यात पंडित म्हणून सर्व जगभरच्या मुसलमानांनी त्यांचा गौरव केला असता. मुस्लिम धर्मशास्त्रात नवव्या शतकातील अल्बुखारीचे 'हदीस' आणि तेराव्या शतकातील आरंभाचा इसम फक्रुद्दीन राझी याचा 'कुराण भाष्य' हा ग्रंथ हे दोन ग्रंथ—फार महत्त्वाचे मानले जातात. हिंदू धर्मातील मनुस्मृती आणि वेदाचे सायनभाष्य यांची जी प्रतिष्ठा आहे, ती मुस्लिम धर्मात या दोन ग्रंथांची मानली जाते. या दोन्ही ग्रंथांचे गाढे व्यासंगी आणि प्रभावी भाष्यकार म्हणून अबुल कलाम आझाद पहिल्या विशीतच मान्य केले गेले होते. त्यांच्या प्रज्ञेचा दरारा एवढा मोठा होता की, त्यांची दोन्ही जन्मनावे पूर्ण विस्मृत झाली व हा विद्यावाचस्पती सर्वत्र मौलाना अबुल कलाम आझाद या नावानेच ओळखला जाऊ लागला. बालवयातील दुर्मिळ महापंडिताचा हा आधुनिक काळातील एक दृश्य नमुना होता. यामुळे भारतीय धर्मपंडितांचेही प्रेम त्यांच्याविषयी सारखे उचंबळून येत होते. मौलाना खैरुद्दीन यांनी परत भारतात यावे म्हणून कसोशीचे प्रयत्न चालू होते. या प्रयत्नांना यश आले व खैरुद्दीन आपल्या दिग्विजयी अलौकिक पुत्रासह भारतात परत आले. ७८

हिंदुस्थानातून इंग्रजांची राजवट समाप्त झाली पाहिजे ही श्रद्धा मौलानांनी परंपरेने प्राप्त केली होती. भारतातील सगळेच धर्मपंडित इंग्रज राजवटीचे कडवे शत्रू होते. त्यांच्यासमोर इंग्रज हा ख्रिश्चनांचा प्रतिनिधी होता. ख्रिश्चन आणि मुसलमानांनी सातव्या शतकाच्या शेवटी धर्मयुद्धाला प्रारंभ केला. ही धर्मयुद्धे ग्रानदाच्या लढाईपर्यंत म्हणजे इ. स. १४९८ पर्यंत सतत चालूच होती. या धर्मयुद्धाच्या आठवणी सर्वच मुसलमानांच्या मनात सदैव ताज्या होत्या. म्हणून इंग्रज राजवटीविषयीचा द्वेष मुस्लिम

धर्मपंडितांच्या मनात रोमरोमात भिनलेला होता. इ. स. १८०३ सालीच शाह अब्दुल अजीजने भारत दारूल एर्ब झाल्याचा फतवा देऊन इंग्रजी राजसत्तेच्या विरुद्ध जिहाद सुरू केलेला होता. हा जिहाद मुस्लिम धर्मपंडितांनी कधी मागे घेतला नाही. त्यांचा पराभव झाला असेल; पण इंग्रज हे त्यांचे कडवे शत्रू ही खूणगाठ कधी मुस्लिम धर्मपंडित विसरले नाहीत. इ. स. १८८५ साली अखिल भारतीय काँग्रेसची स्थापना झाली. ही स्थापना झाल्याबरोबर देवबंद या मुस्लिम धर्मपीठाने काँग्रेसला संपूर्ण पाठिंबा आणि सहकार्य घोषित केले. मौ. आझाद भारतात आले त्या वेळी देवबंद हिरीरीने काँग्रेसचा पुरस्कार करीत होती. जवळपास सर्व उलेमा काँग्रेसच्या पाठीशी उभे होते. देवबंदशी मौलानांचा संबंध होता, तेही मनाने इंग्रजांविरुद्ध जिहादमध्ये सामील झाले. फक्त इतर धर्मपंडित आणि मौलाना यांच्यात एकच अंतर होते. मौलाना अरबस्तानात राहून आले होते. ९८ टक्के मुस्लिम लोकसंख्या असणाऱ्या मुस्लिम राज्य व धर्मक्षेत्र असणाऱ्या व देवभाषा बोलणाऱ्या अरबस्तान-मध्ये त्यांचे बालपण व्यतीत झालेले होते, तारुण्य उगवलेले होते. त्यांनी मुसलमानांचे पराभव, त्यांचे दैन्य, दारिद्र्य मोठ्या प्रमाणात पाहिलेले होते. आजच्या वर्तमान जगात जगावयाचे असेल तर आधुनिक विद्या आत्मसात केल्याशिवाय गत्यंतर नाही अशी मौलानांची खात्री पटलेली होती. त्या दृष्टीने भारतात आल्याबरोबर मौलानांनी सर सय्यद अहमदखान यांचे सगळे लिखाण बारकाईने अभ्यासून टाकलेले होते. ते बारकाईने आधुनिक जगाचा अभ्यास करण्यात गुंतले. हिंदी, उर्दू ही त्यांना शिकायची होती. इंग्रजी शिकणेही त्यांना भाग होते. मौलानांनी इंग्रजीचा चांगलाच व्यासंग केलेला होता, ही गोष्ट कुणाला खरी वाटत नाही. कारण जन्मभर मौलाना हट्टाने त्यांच्या कल्पनेतील हिंदुस्थानातील म्हणजे मुसलमानांनाही समजण्यास कठीण जाईल अशा अरबी-फारसी मिश्र-उर्दूत बोलत राहिले. त्यांना अरबी शब्द जितक्या सुलभतेने आठवत तितक्या सुलभतेने साधे उर्दू शब्द आठवतच नसत. पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रवीड मराठी बोलू लागले, म्हणजे ज्या मराठीतून ते बोलतात त्या उर्दूतून मौलाना बोलू लागले. मौलानांच्या कुराण भाष्यात अनेक पाश्चात्य सिद्धांतांचे खंडनमंडन व इंग्रजी ग्रंथांचे पृष्ठवार आधार दिलेले आहेत. ते पाहिल्यानंतर मौलानांचा इंग्रजीचा व्यासंग मान्य करावा लागतो. दिवसेंदिवस मौलाना आधुनिक शिक्षणाच्याबाबत आग्रही होत गेले. नव्या तंत्रज्ञानावरचा त्यांचा विश्वास आयुष्याच्या अंतापर्यंत वाढता होता. या आधुनिकीकरणाच्या बाबतीत त्यांचे मन गांधीजींच्यापेक्षा पं. नेहरूंना जास्त जवळ असे होते. मध्य आशियातील आंतरराष्ट्रीय राजकारणाचा त्यांचा व्यासंग फार मोठा होता. भारताच्या परराष्ट्रीय राजकारणात मध्य आशियाबाबतचे धोरण हे पं. नेहरूंचे धोरण असल्या-

पेक्षा मौ. आझादांचेच धोरण होते याचा उल्लेख मायकेल ब्रिचरसह अनेक पंडितांनी केला आहे.

मौलाना भारतात आले आणि लवकरच त्यांनी इ. स. १९१२ साली कलकत्त्यावरून 'अल हिलाल' या नियतकालिकाचा आरंभ केला. अल हिलाल वाचूनच सरहद्द गांधी राष्ट्रीय राजकारणात खेचले गेले. अल हिलालवरूनच प्रेरणा घेऊन त्यांनी देवबंदमध्ये शिक्षण घेतले. अल हिलालच्या तरुण संपादकाला भेटण्यासाठी गफारखान वायव्य सरहद्द प्रांतातून उंटावरून, पायी प्रवास करीत लाहोर तुरुंगापर्यंत आले होते; जेथे मौ. आझाद कैदी होते. मौलानांचे कुराण भाष्य या अज्ञात प्रवाशाला पहिल्या आवृत्तीत अर्पण केलेले आहे. अल हिलाल या नियतकालिकाची 
सूत्रे मौलानांनी आपल्या हाती घेतली आणि या नियतकालिकाने उर्दू वृत्तपत्रसृष्टीत एक नवा इतिहास निर्माण केला. यापूर्वी कधीही उर्दू नियतकालिकाचा एवढा प्रचंड खप कुणी पाहिलेला नव्हता. पहिल्या सहा महिन्यातच या नियतकालिकाचा खप अकरा हजार प्रतींपर्यंत गेला व दोन वर्षांत त्याच्या सव्वीस हजार प्रती खपू लागल्या. ऐन पंचविशीतील तरुण संपादक, उर्दूसारखी भाषा, लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण फारसे नसणारा, वाचनाची फारशी आवड नसणारा, तो इ. स. १९१४ च्या सुमाराचा काळ लक्षात घेतला तर मौलानांचे हे कर्तृत्व फारच विलक्षण म्हटले पाहिजे. मौलानांच्या मागे त्यांच्या वडिलांची पुण्याई उभी होती. देवबंदचे धर्मपीठ उभे होते. त्याबरोबरच मौलानांच्या ज्वलज्जहाल लेखणीमुळे मुस्लिम मने पेटून उठलेली होती, हेही नाकारण्यात अर्थ नाही. सगळ्या जगातील मुस्लिम राजकारणाचा ऊहापोह करणारे लेख, इंग्रज राजसत्तेविरुद्ध चाललेला प्रक्षोभक प्रचार, आणि कुराणाचे अधून मधून भाष्य व भाषांतर ही 'अल हिलाल'ची वैशिष्ट्ये होती. तरीही ते शिळा प्रेसवर छापले जाणारे नियतकालिक होते. लवकरच हे नियतकालिक सरकारने बंद पाडले, आणि मौलानांना तुरुंगात घातले. मौलाना पहिल्यांदा तुरुंगात गले त्याही वेळी ते काँग्रेसचे समर्थक होते; पण अजून प्रत्यक्ष काँग्रेस पक्षात राजकारणात भाग घेण्यास त्यांनी आरंभ केलेला नव्हता. तुरुंगातून सुटल्यानंतर मौ. आझादांनी 'अलबलाल' हे नवे नियतकालिक सुरू केले. पूर्ण जोमाने ते खिलाफत चळवळीत सामील झाले; या चळवळीचे अखिल भारतीय चिटणीस झाले. वयाच्या पस्तिसाव्या वर्षी इ. स. १९२३ साली मौलाना अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष होते. तेव्हापासून मरेपर्यंत राष्ट्रीय मुसलमानांचे सर्व श्रेष्ठ नेते म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाई. इ. स. १९१२ ते १९२३ हा मौलानांच्या मुस्लिम समाजातील लोकप्रियतेचा कळस होता. १९२३ सालापासून मौलानांच्या लोकप्रियतेला उतरती कळा लागली आणि १९३५ च्या नंतर मुस्लिम समाजात

मौलानांचे वजन जवळपास शून्य झाले.

मौलानांच्या जीवनाचा अभ्यास करीत असताना या जीवनातील दोन थर स्पष्ट दिसू लागतात : एक थर कुराणाचा भाष्यकार असणाऱ्या उदारमतवादी महापंडिताच्या विवेचनाचा आहे. हा थर हिंदूंनी अगर मुसलमानांनी कधीच मान्य केला नाही. कारण दोघांनाही तो मनातून आवडणारा नव्हता. दुसरा थर मौलाना ज्यांचे नेते होते, त्या मुस्लिम धर्मपंडितांशी वेळोवेळी मौलानांनी केलेल्या तडजोडीचा थर होता. या तडजोडी मौलानांना इतक्या विचित्र ठिकाणी घेऊन जात आणि घेऊन गेलेल्या आहेत की, मौलानांच्यापेक्षा महमद अली जीना परवडले, असे मनातल्या मनात वाटू लागले. आपल्या अंधश्रद्ध सहकाऱ्यांच्याबरोबर मिळते–जुळते घेताना मौलानांना स्वतःचेच कुराणभाष्य वेळोवेळी बाजूला सारावे लागले. हे दोन्ही थर नीट समजून घेतल्याशिवाय मौलानांच्या व्यक्तिमत्त्वाचा नीट उलगडा होणार नाही. यापैकी मौलानांचा शुद्ध विचार त्यांच्या कुराणभाष्यात आहे. तिथून आपण आकलनाला प्रारंभ करू.

कुराणभाष्याच्या बाबतीत आधुनिक राजकीय नेत्यांत मौलानांची गणना फक्त लो. टिळकांच्याबरोबर करता येईल. लोकमान्यांची हिंदू धर्मग्रंथातील तज्ज्ञता आणि मौलानांची मुस्लिम धर्मग्रंथातील तज्ज्ञता असाच आपण तौलनिक विचार करू लागलो तर कदाचित मौलाना लोकमान्यांनाही सरस मानावे लागतील. कारण लोकमान्यांचे शिक्षण परंपरागत पंडितांच्या पाठशाळेत झालेले नव्हते. मौलानांचे तसे झालेले होते. एखाद्या धर्मग्रंथाचे लोकसमजुतीविरुद्ध क्रांतिकारक स्पष्टीकरण या संदर्भात आपण पाहू लागलो तर मौलानांची गणना कदाचित म. दयानंदांच्या वेदभाष्याशी करावी लागेल. मात्र लोकमान्य आणि दयानंदसरस्वती यांना लक्षावधी अनुयायी मिळाले. मौलानांच्या कुराणभाष्याचे प्रामाणिक अनुयायी स्वतः मौलानाही राहू शकले नाहीत हा फरक लक्षात घेतला पाहिजे. स्वतःच्याच ग्रंथावर मौलानांची श्रद्धा किती होती हाच मुळी वादाचा प्रश्न होऊन बसला आहे. अलहिलालचे संपादन चालू असतानाच मौलानांनी कुराणाचे भाषांतर व भाष्य करण्यास प्रारंभ केला होता. इ. स. १९१६ साली त्यांनी संपूर्ण कुराणावर नवे भाष्य लिहून तयार असल्याची घोषणा केली. हे भाष्य जर त्या वेळी प्रकाशित झाले असते तर भारताच्या राजकारणावर त्याचे काय परिणाम झाले असते, हा एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. हे भाष्य पुनःपुन्हा इंग्रजांनी जाणीवपूर्वक नष्ट केले असे मानण्यास पुरावा आहे. १९१६ च्या जुलैमध्ये मौलानांना अटक झाली आणि भाष्याचा

पूर्वार्ध पोलिसांनी जप्त केला. तो पुढे बेपत्ता म्हणून सांगण्यात आला. जेलमध्ये मौलानांनी भाष्याचा उत्तरार्ध लिहिला, तो जेलमधून सुटताना जप्त करण्यात आला, व पुढे बेपत्ता झाला. तेच पुस्तक नव्याने लिहून काढणे हे कठीण काम होते. पुन्हा मौलानांनी सर्व लिखाण नव्याने लिहून काढले. १९२१ सालात छपाईस आरंभ झाला. मौलानांना अटक झाली त्या वेळी मुद्रिते व हस्तलिखिते पोलिसांनी जप्त केली. जेलमधून सुटल्यानंतर हे सारे लिखाण बेपत्ता असल्याचे सांगण्यात आले. तोच ग्रंथ मौलानांनी तिसऱ्यांदा लिहिण्यास आरंभ केला. त्याचे दोन खंड इ. स. १९३० ला प्रकाशित झाले आणि पुन्हा अर्ध्यावरच काम बंद पडले. ग्रंथ पूर्ण होऊ शकला नाही. जनतेतही त्याच्या फारशा प्रती उपलब्ध नव्हत्या. १९३० सालापासून मुस्लिम धर्म-पंडितांनी मौलानांच्यावर या भाष्याचे निमित्त करून कठोर टीका करण्यास प्रारंभ केला.



पुढील पंधरा वर्षे जनतेसमोर भाष्य नव्हते. बाजारात पुस्तक मिळत नव्हते. ग्रंथालयात उपलब्ध नव्हते. फक्त जनतेसमोर मुस्लिम धर्म-पंडितांनी केलेली कठोर टीका होती. मुस्लिम धर्मपंडितांनी मौलानांवर बिदात, इरतकाम, इरतदात्, हे तीन गुन्हे लावले; व या तीन गुन्ह्यांबद्दल मौलानांना दोषी गृहीत धरले. मुस्लिम धर्मशास्त्रात यातील कोणत्याही एका गुन्ह्याबद्दल जाहीररीत्या दगडांनी ठेचून मारण्याची शिक्षा सांगितली आहे. जणू धर्मपंडितांच्या मते हा माणूस तीनदा दगडांनी ठेचून मारण्याच्या लायकीचा होता! कलकत्त्यातील मंडळींनी एका ठरावान्वये मौलानांना धर्मपीठावरून बरखास्त करून टाकले. आता मौलाना खैरुद्दीनच्या गादीचे वारस व इमाम उरलेले नव्हते. ते फिरोजबख्त नव्हते. फक्त मोहियोद्दीन अहमद इतकेच राहिले होते. तरीही ते अबुल कलाम म्हणजे विद्यावाचस्पती होते याला कुणाचाच इलाज नव्हता. यामुळे सर्व धर्मपंडित मौलानांवर जळफळत, पण ते मुस्लिम धर्मशास्त्राचे गाढे पंडित नव्हेत असे म्हणण्याची कुणाची प्राज्ञा नव्हती. मौलानांचे कुराणभाष्य जनतेला खऱ्या अर्थाने इ. स. १९४५ साली उपलब्ध झाले. या वेळी भाष्याचा परिणाम होण्याचा काळ संपून गेलेला होता. हे भाष्य जर १९१६–१७ साली प्रकाशित झाले असते, तर कदाचित मौलानांचे अनुयायी असे एक नवे धर्मपीठ तयार झाले असते. आश्चर्याची गोष्ट अशी की, मौलानांच्या पुण्याईवर जगणारे आजचे अनेक दुसऱ्या तिसऱ्या दर्जाचे लोक रोज मौलानांचा जयजयकार करतात; पण त्यांचे कुराण भाष्य जनतेला समजावून सांगत नाहीत. याला अपवाद झाकीर हुसेनही नाहीत, हुमायून कबीरही नाहीत.

मौलानांच्या भाष्यावर एवढा गहजब का झाला, हे समजून घेण्यासाठी

काही पार्श्वभूमी लक्षात घेतली पाहिजे. महंमद पैगंबर इ. स. ५७१ ला जन्मले आणि मुस्लिम धर्म व मुस्लिम राज्य स्थापन करून इ. स. ६३२ ला प्रभुचरणी कायमचे विलीन झाले. महंमद पैगंबरांना वेळोवेळी ईश्वरी साक्षात्कार होत असे व त्यांच्याकडे देवदूतांकडून ईश्वरी वचनें पाठवली जात ( वही आणि इलहाम ). महंमदाच्या निधनानंतर ही सगळी ईश्वरी वचनें तोंडीच होती. ही वचने म्हणजे पवित्र कुराण. खलीफा उस्मानच्या काळात महंमदाचा चिटणीस जैद इब्नेसाबित ह्याने खलीफाच्या सांगण्यावरून सर्व कुराण एकत्र गोळा केले; पण त्यात अनेक पाठ, पाठांतरे व अनेक अशुद्धे घुसलेली होती. महंमदाची पत्नी हफशा ही अजून जिवंत होती. तिच्या तोंडी असणारा कुराणाचा पाठ पवित्र मानून मदिनेत जैद इब्नेसाबित ह्यानें कुराणाची अधिकृत संहिता निर्माण केली; पण याहीनंतर ८३
लिपी सदोष असल्यामुळे या ईश्वरी ग्रंथाचा पाठ अशुद्ध होत होताच. इब्ने मुकलाह इ. स. ९३३ मध्ये म्हणजे प्रेषिताच्या मृत्यूनंतर तीनशे वर्षांनी इब्ने इसा आणि इब्ने मुजाहिद यांनी कुराणाचा पाठ पुन्हा एकदा निश्चित केला. आज जो कुराण ग्रंथाचा पाठ आपल्यासमोर आहे तो इ. स. ९३३ चा पाठ आहे. मुसलमान धर्माच्या मते हा पाठ नुसता शुद्ध व पवित्र नसून परमेश्वराने प्रेषितालाच पाठविलेला जशाच्या तसा पाठ आहे. त्यातील कोणतेही अक्षर कमीजास्त झालेले नाही. परमेश्वरी वचनें ज्या सुऱ्यांच्यामध्ये विभागली गेली आहेत ते सर्व १४४ सुरे जसेच्या तसे शुद्ध आहेत. प्रत्येक सुऱ्यातील आयात, तिचा क्रम, सुऱ्यांचा क्रम सगळेच परमेश्वरप्रणित आहे. आणि या ग्रंथाचा अर्थ हदीसने निश्चित केलेला आहे, त्याहून वेगळा याचा अर्थ होऊ शकत नाही. परमेश्वरी पवित्र ग्रंथाचा अर्थ हदीसच्या परंपरेनें लावणे याला मुकलीद असे म्हणतात. मौलाना आझाद हे गैरमुकलीद म्हणजे परंपरा मान्य न करता अर्थ लावणारे होते. मुस्लिम धर्मशास्त्रात परंपरा मान्य करून इतर ठिकाणी परंपरेला अनुसरून तर्क चालवण्याची परवानगी आहे. हिंदू धर्मशास्त्रात ज्याप्रमाणे श्रुतीला अनुकूल तर्क करण्याची परवानगी आहे त्याप्रमाणे हा प्रकार आहे. या तर्क चालवण्याला इजतहद असे म्हणतात. मौलाना हे मुस्लिम धर्माच्या इतिहासात तेराशे वर्षांत प्रथम उदयास आलेले परंपरा सोडून तर्क चालवणारे गैरमुकलीद मुजतहीद होते. म्हणून त्यांच्याबद्दल एवढा प्रचंड गहजब करण्यात आलेला आहे.

मौ. आझादांचे म्हणणे असे की, माझा परमेश्वरावर व परमेश्वरी ग्रंथावर विश्वास आहे. त्यातील प्रत्येक वाक्यावर विश्वास आहे; पण मी परमेश्वरी ग्रंथ परमेश्वरी पुस्तक वाचून समजून घेईन. त्यासाठी मानवी भाष्यांची गरज नाही. सर्व हदीस ही मानवी भाष्ये आहेत. मानवी भाष्ये चुकू शकतात. हदीसनें चुका केलेल्या आहेत. मी पवित्र ईश्वरी ग्रंथाचा अर्थ

प्रेषित व प्रेषिताचे समकालीन ज्याप्रमाणे करीत त्याप्रमाणे करू इच्छितो. प्रेषिताच्या निधनानंतर दोन-अडीचशे वर्षांनी जन्माला येणारे लोक परमेश्वरी ग्रंथाचा अर्थ ज्याप्रमाणे करतात, तो अर्थ मान्य करण्यास मी बांधलेला नाही. सर्व धर्मशास्त्रे कोळून प्यालेल्या एका सर्वमान्य धर्मपंडिताने ईश्वरी ग्रंथाच्या नावे सर्व परंपरेलाच दिलेले हे आव्हान होते. हे मौलानाचे भाष्य फक्त सूरतूल फातिहावर म्हणजे प्रास्ताविक सात ओळींवरील भाष्य आहे. हे सात ओळींचे भाष्य ७६अधिक १७४ म्हणजे २५० पानांचे आहे. इ. स. १९४५ च्या नंतर मौलाना तेरा वर्षे हयात होते. त्यांना मोकळा वेळही भरपूर होता. पण त्यांनी आपले भाषांतर अठराव्या भागाच्या पुढे नेऊन पूर्ण केले नाही. प्रास्ताविक सात ओळींच्या पुढचे भाष्य लिहिले नाही. जणू भारताची फाळणी झाल्यानंतर मौलानांचे भव्य स्वप्न उद्ध्वस्त झालेले होते. आणि आता ते इमामही उरलेले नव्हते. या भाष्याची आता जगाला काही गरज उरलेली आहे असे शेवटच्या काळात मौलानांना वाटले नसावे ! कुराण भाष्याचा परंपरा सोडून असणारा; पण मुस्लिम धर्मशास्त्राच्या शिस्ती पाळणारा हा एकमेव प्रयोग दुर्दैवाने अपूर्ण राहिलेला आहे. ८४

मौलानांनी कुराणाचा अर्थ करीत असताना भाषाशास्त्र, व्याकरणाचा आधार घेऊन पवित्र ग्रंथातील वेगवेगळ्या अरबी शब्दांचा अर्थ सहाव्या शतकात काय होता, यावर प्रकाश टाकलेला आहे; व पुढील पंडितांनी या अर्थात परिवर्तन केल्याचे दाखवून दिले आहे. महंमदाच्याच इब्ने ईशाख व इब्ने हिशाम यांच्या अधिकृत चरित्राच्या आधारे व पाठ-चिकित्सेच्या आधारे पवित्र ग्रंथातील काही ओळींचे त्यांनी क्रम सिद्ध केले आहेत; व आजच्या धर्मग्रंथात हे क्रम बदलले, जागा बदलल्या, हे दाखवून दिले आहे. मौलानांचा आग्रह परमेश्वरी ग्रंथाचा अर्थ प्रेषिताच्या काळी जसा समजून घेतला गेला तसा समजून घेण्यावर आहे. मौलानाही स्वतः धर्मग्रंथापासून तेराशे वर्षे दूर होते. त्यांचा अर्थ अनेक ठिकाणी वादग्रस्त असू शकतो. मौलाना जो कुराणाचा अर्थ लावीत तो या पवित्र ईश्वरी ग्रंथाचा कदाचित मूळचा व खरा अर्थ असेल, पण जगातील तीस कोटी मुसलमान एक हजार वर्षे धर्म म्हणून जे पालन करीत आहेत, ज्यावर श्रद्धा ठेवीत आहेत, ज्यातून जगातील लोकांचे मुसलमानांच्याविषयी बरेवाईट मत बनले आहे तो अर्थ हा नव्हे. एखाद्या धर्मग्रंथाचे कोट्यवधी अनुयायी अनेक शतके जो अर्थ दृढ श्रद्धेने समजत आले तो समजावा की, आजचा एखादा विद्वान त्या धर्मग्रंथाचा भाषाशास्त्र, व्याकरण आदी इतिहास यांच्या आधारे जो अर्थ लावील तो समजावा, यावर मतभेद होण्याचा संभव आहे. कारण जगावर परिणाम धर्मग्रंथाचे होत नाहीत, त्या ग्रंथावर श्रद्धा ठेवणाऱ्या अनुयायांचे होतात.

मौलानांनी कुराणाचा अर्थ उम्मतुलवाहिदाच्या संदर्भात लावला आहे. प्रेषित महंमद मक्केवरून हिजर करून मदिनेला आले. ज्या वेळी महंमद पैगंबर मक्केत होते, त्या वेळी परमेश्वराने एकत्व मूर्तिपूजा-विरोध आणि परमेश्वराला संपूर्ण शरण जाणे यावरच प्रेषिताने भर दिलेला होता. आपल्या आधी आलेल्या सर्व प्रेषितांवर महमदाने विश्वास व्यक्त केला आहे आणि आपल्या आधीचे प्रेषित जे सांगत होते तेच आपण सांगतो आहो, मागच्या प्रेषितांच्यापेक्षा नवीन असे काही आपणास सांगावयाचे नाही, असे महमदाने सांगितले. बारापेक्षा अधिक वेळा देवदूतांनी महमदाला सांगितले की, संदेशदाता परमेश्वर तोच आहे, संदेश जनतेपर्यंत पोचवणारे प्रेषित त्या एकाच परमेश्वराचे संदेशवाहक आहेत; म्हणून या संदेशात नवीन काही नाही. परमेश्वर विश्वाचा निर्माता आहे, तो दयाळू आहे, त्याने न्यायाचा दिवस निश्चित केला आहे, त्या दिवशी सद्वर्तनी स्वर्गात जातील, पापी नरकात जातील, पश्चात्तापपूर्वक सद्वर्तनी झालेल्यांना पापाची क्षमा होईल. महमद म्हणाला, परमेश्वराचा संदेश जनता जी भाषा बोलते त्या भाषेत म्हणजे जनतेच्या भाषेत असतो. लोक म्हणाले, हे महमदा ! जर तू प्रेषित असशील तर काही चमत्कार करून दाखव. महमदाने सांगितले, ईश्वराच्या आज्ञेशिवाय मी चमत्कार दाखवणार नाही. महमदाच्या उपदेशात वाईट असे काहीच नव्हते. पण तो मूर्तिपूजेचा विरोधक होता. या मूर्तिपूजा विरोधामुळे मक्केतील काबाच्या पुजाऱ्यांना धोका होता. मूर्तिपूजा जर बंद झाली तर पुजाऱ्यांचे उत्पन्न बुडाले असते. म्हणून पुजारी प्रेषिताच्या विरुद्ध गेले. या कालखंडातील कुराण, परमेश्वराचे प्रार्थनागृह एका धर्मगटाच्या ताब्यात असू नये. सगळीच प्रार्थनागृहे सर्व धर्माला मोकळी असावीत यावर भर देणारी आहेत. मक्केच्या लोकांच्या त्रासामुळे प्राणरक्षणार्थ प्रेषित महमदाला आपले अनुयायी घेऊन पळावे लागले, याला ' हिज्र ' असे म्हणतात. येथून आपले अनुयायी घेऊन महमद यथ्रेबला आला. हेच गाव पुढे मदिना म्हणून ओळखले गेले. मदिनेत प्रेषिताला विरोध नव्हता. म्हणून त्याने तिथे एक रचना केली. समजा, जर मक्केत प्रेषिताला विरोध झाला नसता, तर जे मदिनेत घडले तेच महमदाने मक्केत घडवून दाखवले असते.

मदिना शहरात ज्यू, ख्रिश्चन, सबियान, मगियान आणि मूर्तिपूजक या पाच प्रमुख धर्मांचे व गटांचे लोक होते. तिथे इस्लामचे अनुयायी हा सहावा गट येऊन पोचला. या सर्वांना अशी विनंती करण्यात आली की, त्यांनी महमदाला प्रेषित मानावे. लोकांचा धर्म कोणताही असो, धर्मातील फरकामुळे एकही बिघाड नव्हता. सर्वांनी परमेश्वरासमोर शरण असावे. सर्वच धर्मांच्या मंडळींचा निवाडा करणारा ईश्वर शेवटी एकच आहे. ख्रिश्चन आणि ज्यूंना महमदाने ग्वाही दिली की, इस्लाम हे सर्वच

पूर्वीच्या प्रेषितांवर श्रद्धा ठेवणारे धर्ममत आहे. त्यामुळे इस्लामची ज्यू प्रेषित मुसावरही श्रद्धा आहे. ख्रिश्चन प्रेषित आसावरही श्रद्धा आहे. या मदिनेत सर्वधर्मीय संयुक्त प्रार्थना-पद्धती स्वीकारली गेली. ज्यू व ख्रिश्चन यांना जेरुसलेम वंदनीय असल्यामुळे व त्यांची बहुसंख्या असल्यामुळे सर्वांनीच जेरुसलेमकडे तोंड करून प्रार्थना करावी असे ठरले. आजवर महमदाचे अनुयायी मक्केकडे तोंड करून प्रार्थना करीत. त्यांना थोडे वाईट वाटले. प्रेषित महमद म्हणाला, "ईश्वर तर सर्वत्र आहे. मग जेरुसलेमकडे तोंड करण्यास काय हरकत आहे?" महमदाने बिगर मुसलमानांना असे आश्वासन दिले की, मुसलमान होण्याची सक्ती कुणावर करण्यात येणार नाही. ज्याला परमेश्वराने इस्लाम स्वीकारण्याची प्रेरणा दिली त्यांनीच इस्लामचा स्वीकार करावा. महमदाने असे हे बहुधर्मीय सरकार अस्तित्वात आणले. काही जुन्या अमानुष चाली बंद करण्यात आल्या. मुलींना जन्मतःच पुरून टाकत, ते बंद करावे असे सर्वानुमते ठरले. एखादा माणूस मयत झाल्यास वारसाला मयताची इस्टेट जात असे, त्याबरोबर मयताच्या स्त्रियाही दिल्या जात. इस्टेट जावी, स्त्रिया माणूस असल्यामुळे त्यांच्यावर वारसाचा हक्क नाही असे ठरले. व्याजाचे दर थोड्या वर्षांत मुद्दल दुप्पट करीत. ते दर रद्द करण्यात आले. गुलामगिरीतून गुलाम मुक्त करणे हे पुण्यकृत्य मानले गेले. सर्वांना समान न्याय मिळावा म्हणून सर्वच खटले राज्यसत्तेनें हाताळावे असे ठरले. सामाजिक सुधारणांमुळे सर्वांच्या मनात थोडे असमाधान होते. मक्कानिवासी महाजरीन स्वतंत्र मशीद बांधू लागले. त्याचा प्रेषिताने तीव्र शब्दांत धिक्कार केला. नाराज ज्यूंना सांगण्यात आले की, तुमचा धर्मग्रंथ 'तोरियद' यात हेच सगळे सांगण्यात आले आहे. त्यात नवीन काही नाही. एक दिवस ख्रिश्चन व ज्यू म्हणाले, ज्यू अगर ख्रिश्चन नसणाऱ्यांना स्वर्गात जागा कशी मिळेल? महमद म्हणाला, मुसापूर्वी आलेले प्रेषित इब्राहिम, इस्माईल, इसाक जेकोब तुम्हा-आम्हा सर्वांना वंदनीय आहेत. ते ख्रिश्चन अगर ज्यू नव्हते; पण त्यांना कायम स्वर्ग मिळाला. काही कर्मठ ज्यू म्हणत, ज्यूंना नर्क मिळणारच नाही. प्रेषित म्हणाला, तुम्ही कोणताही पंथ स्वीकारा. पुण्यवान असाल तर स्वर्ग मिळेल. पाप्यांना नर्क आहेच. काही मुसलमान ज्यूंवर रागावले. महमद म्हणाला, सर्व ज्यू वाईट नसतात. हे सर्व धर्मीय सरकार सर्व धर्मांचे खरेपण मानणारे; सरकार निर्माण करणे हे तर महमदाचे कार्य होते, असे मौलानांचे कुराणाआधारे मत बनले आहे व हेच कुराणाचे मुख्य प्रतिपादन आहे असे मौलाना आझादांना वाटते.

प्रेषित महमदाचे हे सर्व धर्मीय सरकार ख्रिश्चन-ज्यूंना पटले नाही. त्यांनी आपली प्रार्थनागृहे निराळी केली. मदिनेतील हा संघर्ष पाहून

मक्केच्या मूर्तिपूजकांनी मदिनेवर हल्ला केला. महमदाने स्वरक्षणार्थ लढण्याची परवानगी दिली; पण बजावले तुम्ही हल्ला करू नका. परमेश्वर आक्रमकांवर प्रेम करीत नाही. स्वसंरक्षणापुरतेच लढायचे या तत्त्वामुळे पराभूत मक्केचे लोक पळून जात, पुन्हा हल्ला करत, पुनःपुन्हा तट करीत, तो तोडून टाकीत; म्हणून नाइलाजाने महमदाला हल्ल्याची परवानगी द्यावी लागली. यानंतर लवकरच पुरा अरबस्तान मुसलमानांच्या ताब्यात आला. मौलाना आझाद म्हणत, प्राप्त परिस्थितीमुळे नाइलाज म्हणून प्रेषिताला जे करावे लागते तो खरा धर्म नव्हे, त्याने जे करण्याचे ठरविले ते सर्वधर्मीय सरकार उम्मतुलवाहिदा निर्माण करणे, टिकवणे हा खरा धर्म आहे आणि तोच पवित्र कुराणाने प्रतिपादन केलेला आहे. मौलानांच्या या प्रतिपादनावर मुस्लिम धर्मपंडित प्रतिवाद करू शकत नव्हते. कारण मदिनेत प्रेषिताने सर्वधर्मीय सरकार अस्तित्वात आणले हे कुणीच नाकारू शकत नव्हता. कारण पवित्र ईश्वरी ग्रंथात त्याचे अनेकदा उल्लेख आहेत. मक्कानिवासियांनी हल्ला केला नसता तर जिहाद व सैफ म्हणजे तलवारीचे धर्मयुद्ध सुरूच झाले नसते. शेवटी महमदाचे जीवितकार्य शत्रूंच्या हल्ल्यामुळे कसे ठरणार? प्रेषित जे करू इच्छित होता त्यावरूनच त्याच्या धर्माचे स्वरूप समजून घेतले पाहिजे असे मौलाना म्हणत. मौलानांचे हे कुराणाचे विवरण खोडणे कठीण होते. कारण त्याला भाषाशास्त्र व्याकरणाचा व कुराणाच्या शब्दांचा आधार होता. हे प्रतिपादन स्वीकारणे कठीण होते. कारण मग लोक ज्याला इस्लाम म्हणत तो इस्लामच धोक्यात आला असता. कुराणामधील सर्व प्रेषितांवर श्रद्धा ठेवा या वाक्याचा अर्थ मुस्लिम धर्मपंडित कुराणाने जे सांगितले आहे तेच सर्व प्रेषितांचे मत आहे असा करतात. आजचे बायबल अशुद्ध असून ते कुराणाच्या आधारे दुरुस्त केले पाहिजे. कुराणामध्ये आहे ते बायबलमध्ये नसेल, तर बायबलमधील तो लुप्त भाग स्वीकारावा. कुराणामध्ये नाही ते बायबलमध्ये असेल तर तो उत्तरकालीन प्रक्षेप समजावा, असे मुसलमानांचे म्हणणे आहे. मुस्लिम धर्मपंडित एकच धर्म मानतात, तो म्हणजे इस्लाम. इतर सर्व धर्म इस्लामच्या भ्रष्ट नकला असून तो भ्रष्टाचार संपला पाहिजे व सर्वांनी इस्लामचा स्वीकार केला पाहिजे असे या पंडितांना वाटते. त्यांना सर्वच धर्म खरे कसे वाटणार? सर्वधर्मीय सरकारात ख्रिश्चन ज्यू अधिक; म्हणून जर जेरुसलेमकडे तोंड करून प्रार्थना करायची; तर उद्या हिंदुस्थानात हिंदू अधिक म्हणून प्रार्थना काशी-रामेश्वराकडे तोंड करून करणे आले. सर्वांना समान सरकारी न्याय हे तत्त्व मान्य करायचे तर धर्मग्रंथापेक्षा न्याय मोठा हे मानावे लागेल. हादीस सोडून द्यायचा तर सगळे मुस्लिम धर्मशास्त्रच प्रासंगिक, परिवर्तनीय म्हणून सोडून द्यावे लागेल. यातील एकही गोष्ट मुसलमानांना पटत नव्हती आणि या सगळ्याच बाबी मौलानांचे कुराण भाष्य प्रति-

पादित होत्या. जणू हे कुराणभाष्य तेराशे वर्षांचा कचरा बाजूला सारून सेक्युलर स्टेट हेच परमेश्वरी धर्मग्रंथाचे प्रतिपादन करणारे आहे असा घोष करत होत्या. कुराणाच्या आधारे असले विवेचन करणारा माणूस दगडांनी ठेचून मारावा असे मुस्लिम धर्मपंडितांना न वाटते तरच ते एक नवल ठरले असते !

जगातील मुसलमान शेकडा नव्वद–ब्याण्णववर सुन्नी आहेत. हे सर्व मुसलमान खलीफाएराशदीन म्हणजे पहिले चार खलिफा अत्यंत पवित्र मानतात. मौलाना म्हणत, यांच्यातील कुणी प्रेषित नव्हता. त्यांना प्रमाण मानणे बंधनकारक नाही. इ. स. ६३२ ला प्रेषित महमदचा मृत्यू झाला आणि अबुबकर खलिफा झाला. या वेळी भिन्न भिन्न टोळ्यांनी बंड केले. ते निर्दयपणे कत्तली करून अबुबकरने चिरडून टाकले. हे करणे आवश्यक असेल तर तो मर्त्य अबुबकरच्या राजकारणाचा भाग होता. त्याच्याशी इस्लामचा काय संबंध ? या कालखंडात, युद्धाला उत्तेजन देणारी वचने महत्त्वाची ठरली. जे युद्धात मरतील त्यांना स्वर्ग सांगितला गेला. दुसरा खलीफा उमर याच्या काळात मुसलमानांनी एकामागोमाग एक देश पादाक्रांत केले. ख्रिश्चन–ज्यूंची हकालपट्टी केली. मुसलमानांनी जिंकलेला प्रदेश सक्तीने मुसलमानमय करण्यात आला. प्रेषिताचे मूळचे अनुयायी या राजकारणात भाग घेत नव्हते. त्यांना जिहाद व विजय यांच्यापेक्षा ईश्वर-आराधना महत्त्वाची वाटे. ते एकान्तात ध्यान, चिंतन करीत. त्यांना हनीफ म्हणत. त्यांचा मार्ग तरीकत मानला जाई; पण खरे महत्त्व लढणे, मारणे, तलवारीच्या जोरावर आक्रमण करणे या शर्यतीला आले. सर्व मुस्लिम धर्मग्रंथ म्हणजे हादीस शरीयत सांगतात. शरीयत उपयोगी असेल; पण ती मानवी, अपूर्ण व कालबाह्य आहे. शाश्वत काळपर्यंत मार्गक्रमण करणारा तो ईश्वराचा संदेश नव्हे. प्रेषिताच्या मृत्यूच्या नंतर वीस वर्षांनी कुराणाचा संग्रह करताना राजे मंडळींनी आपल्या गरजांप्रमाणे सुरे बनवले, आधीचे संदेश नंतर टाकले, नंतरचे संदेश आधी आणले, संदेशाचा संदर्भ बदलला व आपल्या सोयी करून घेतल्या. जे राजांना आवश्यक होते पण पवित्र कुराणात सापडत नव्हते, त्यासाठी हादीसमध्ये महमदाच्या तोंडी सोयीस्कर वचने घालण्याचा उद्योग प्रेषितांच्या मृत्यूनंतर दोनशे वर्षे चालू राहिला. (हा भ्रष्टाचार सर्व पातळीवर दिसतो. मुळात पवित्र कुराणात स्तुती आयेषाची आहे; पण इब्नेसाबिताने प्रमाणपाठ हाफशाचा स्वीकारला. सुऱ्यांचा क्रम खलीफा उस्मानाच्या नेतृत्वाने झाला. स्वतः आयेषा अलीविरुद्ध उंटाच्या लढाईत भाग घेत होती; म्हणजे प्रेषिताची प्रिय पत्नी जावयाविरुद्ध लढली. या सर्व धावपळीत मावियाने खलीफाचा निर्वंश केला आणि कळस म्हणजे इब्नेअबीदाऊदअलमामून याने आपण नवे प्रेषित असल्याची घोषणा केली. तिला खलिफाने मान्यता दिली.)

मौलाना म्हणत, परंपरेने कुराणाचे भाष्य समजून घ्या. परमेश्वरी आज्ञा समजून घेण्यासाठी मुल्लामौलवींचा आधार घ्या, असा संदेश परमेश्वरी ग्रंथाने कुठेच दिलेला नाही. मौलानांच्या मते धर्माधर्मातील फरक स्थल-कालवातावरणाचा आणि जनतेच्या मानसिक अवस्थेचा असतो. कालौघात धर्माचे अनुयायी धर्मभ्रष्ट करतात; म्हणून सर्व परंपरावाद्यांचा आणि परंपरागत भाष्यांचा मौलानांना तिरस्कार होता.

मौलानांचे हे सगळेच विवेचन तेराशे वर्षांच्या इस्लामच्या इतिहासात क्रांतिकारक होते. या विवेचनाचा दृढ पाया धरून मौलानांनी जर मुस्लिम धर्मपंडितांच्या ठिकठिकाणी ठिकऱ्या उडवण्यास आरंभ केला असता तर कदाचित मौलानांना थोडे पण प्रामाणिक अनुयायी मिळाले असते; पण हे घडायचे नव्हते. १९२० नंतर मौलाना आझाद राजकारणाच्या प्रत्यक्ष धकाधकीत उतरले. या प्रत्यक्ष धकाधकीत नवशिक्षित मुसलमान त्यांना जवळचे वाटेनात. कारण नवशिक्षित मुसलमान सर सय्यद अहमदखानापासून प्रेरणा घेतलेले होते. त्यांना इंग्रज आपले मित्र वाटत. भारतात लोकशाहीचा आरंभ त्यांना नकोसा वाटे. सर्व नवशिक्षित मुस्लिम समाज मवाळ, हिंदू बहुसंख्येची धास्ती घेतलेला आणि इंग्रज-धार्जिणा होता. स्वातंत्र्याचा लढा आणि स्वतंत्र भारताचे पुरस्कर्ते व इंग्रजांचे कडवे शत्रू धर्मवेडे मुसलमान पंडित होते. या मुल्ला–मौलवींना दुखवीत बसण्याऐवजी मौलाना आझाद त्यांच्याशी तडजोडी करत, त्यांचे नेतृत्व स्वीकारीत क्रमाने वाहवत गेले. अडचण सर्वांचीच होती. महात्मा गांधींना नवशिक्षित जिनांपेक्षा धर्मवेडे जवळचे मानावे लागले. कारण तेच इंग्रजांच्या विरोधी लढण्यास तयार होते. जे इंग्रजांच्या विरुद्ध लढण्यास तयार होते, त्यांना भारत अखंड व स्वतंत्र हवा होता. त्यांचा पाकिस्तानला किंवा फाळणीला कडवा विरोध होता. पण हा अखंड भारत या धर्मपंडितांना कशासाठी हवा होता ? त्यांना संपूर्ण भारत मुसलमान करून त्या ठिकाणी परंपरेप्रमाणे चालणारे मुस्लिम धर्मराज्य निर्माण करावयाचे होते. ज्यांना संपूर्ण भारतात फक्त इस्लामच हवा होता त्यांचे साहाय्य घेऊन उम्मतुलवाहिदापर्यंत व सर्वधर्मीय राष्ट्रापर्यंत आपण पोचू शकू असे मौलानांना वाटले, ही त्यांची सर्वांत मोठी चूक होती. कित्येकदा असे वाटते की, या धर्मवेड्यांशी मिळतेजुळते घेण्यापेक्षा आमच्या नेत्यांनी सुशिक्षित मुसलमानांशी मिळते जुळते का घेतले नाही ? याचे कारण प्रत्येकाच्या मनात दडलेल्या सुप्त हिंदुत्ववादात शोधावे लागेल. वेगळा तुकडा न मागणारे लढ्यात भाग घेणारे लोक इंग्रज निघून गेल्यानंतर आपण नीट सांभाळू शकू, स्वतंत्र भारतात चालू असणारी लोकशाही ७५ टक्के हिंदू बहुसंख्य आणि इंग्रजांच्या हस्तक्षेपाचा असंभव या नव्या संदर्भात आपण मुस्लिम जातीयवाद आवरू शकू, नवशिक्षितांशी सहकार्य करणे कठीण आहे;

कारण ते राष्ट्र तोडण्यास निघाले आहेत, हा विचार आमच्या नेत्यांच्या मनात प्रभावी ठरला असला पाहिजे! अगदी आरंभापासूनच अलीगढ व सर सय्यद अहमदखानांचे अनुयायी काँग्रेसचे विरोधक होते. अगदी आरंभापासून म्हणजे टिळक–गांधी यांच्याही युगाच्या पूर्वीपासून देवबंद हे धर्मपीठ काँग्रेसला पाठिंबा देत होते.

भारतीय राजकारणाचा विचार करताना ही चूक सर्वांनी केलेली आहे. हिंदुस्थानातील धर्मभोळी अंधःश्रद्ध जनता धर्मपंडितांच्या मागे जाईल असे सर्वांनी मानले. आपल्या स्वतःच्याच नेतृत्वाचा विचार काँग्रेसने कधी केला नाही. तिचे नेते साधु–संत, मठाधीश किंवा शंकराचार्यांचा आशीर्वाद प्राप्त झालेले नव्हते. काँग्रेसचे हिंदू नेते वकील, बॅरिस्टर, ९०
डॉक्टर, प्रोफेसर असे नवशिक्षित होते.

अंधःश्रद्ध जनता त्यांच्यामागे गेली. हीच गोष्ट मुस्लिम समाजातही घडली. नवशिक्षित मुसलमान लीगमागे गेला. हळूहळू मुस्लिम जनताही लीगमागे गेली. धर्मपंडितांच्या मागे फारशी जनता केव्हाच गोळा होऊ शकली नाही. ती गोळा होणेही शक्य नव्हते. कारण धर्मपंडितांच्या जवळ मध्ययुगाच्या खेरीज दुसरी भाषा नव्हती. मुल्ला–मौलवी नेहमी सुशिक्षितांचे नेतृत्व असलेल्या राजकारणाला उपकारक होऊ शकतात. ही भूतकालग्रस्त मने वर्तमानाची आव्हाने स्वीकारू शकत नाहीत. आरंभापासून फाळणीला मान्यता, की शेवटपर्यंत अखंड भारत टिकवून धरण्याचा प्रयत्न, या भूमिकेतून काँग्रेसकृत धर्मपंडितांचा अनुनय समजून घ्यावा लागतो. मौलानांच्या तडजोडीही समजून घ्याव्या लागतात.

खिलाफत चळवळीनंतर मौलानांनी– जमियतुल उलेमा संघटित करून मुस्लिम धर्मपंडितांना इंग्रजविरोधी लढ्यासाठी एकत्रित आणण्याचा प्रयत्न केला. मौलाना, महमदअली, शौकतअली, अन्सारी, किचलू ही माणसे यातूनच एकत्र आलेली होती. डॉ. किचलू हे स्वतःला आजच्या सय्यद महमूदप्रमाणे फार मोठे राष्ट्रीय नेते समजत; पण त्यांचा मुस्लिम धर्मप्रचार व प्रसार यावर विश्वास होता. मुस्लिम धर्माच्या प्रसारास कोणताही अडथळा जर भारतीयांनी केला तर आपण जगातील वाटेल त्या मुस्लिम सत्तेचे साहाय्य घेऊन हा अडथळा मोडून काढू, असे या सद्गृहस्थांचे म्हणणे होते; व ते त्यांनी कैकदा जाहीर सभेत सांगितले होते. महमदअली तर म्हणत, चारित्र्यशून्य फाटका मुसलमान मी गांधींपेक्षा श्रेष्ठ मानतो. कारण तो मुसलमान आहे. असल्या प्रकारची मुक्ताफळे उधळणारे लोक राष्ट्रीय मुसलमान या नावाने एकत्र जमलेले होते. हमीद दलवाई ज्या वेळी राष्ट्रीय मुसलमान हा डोके व शेपूट नसलेला

भयंकर धोकेबाज अक्करमाशा प्राणी आहे असे म्हणतात, त्या त्यांच्या म्हणण्यात खूप मोठे तथ्य आहे. मुसलमानांची भारतात निरनिराळी पंडित-केन्द्रे होती. देवबंद, फिरंगीमहल, बरेली, रामपूर, लखनौचे नवदतुल उलेमा ही सगळीच धर्मपीठे खिलाफत चळवळीच्या निमित्ताने राष्ट्रीय मुसलमान म्हणून एकत्र आलेली होती. खिलाफतमुळे मुस्लिम धर्मपंडितांना काँग्रेसने जी प्रतिष्ठा दिली, त्याचे परिणामी धर्मपंडित नसणारे बॅरिस्टर जीना, बॅ. असफअली यांच्यासारखे लोक मागे पडल्यासारखे वाटू लागले. ही राष्ट्रीय मुसलमानांची संघटना मुस्लिम लीगने मागितलेल्या आणि इंग्रजांनी दिलेल्या विभक्त मतदार संघाची कट्टर पुरस्कर्ती होती. काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून हे तथाकथित राष्ट्रीय मुसलमान नेते हिंदूंनी सर्व अस्पृश्य स्वतःच्या पोटात आत्मसात करावेत किंवा त्यांना मुसलमान होण्यास मदत करावी अशा सूचना देत असत. मोपल्यांचे बंड झाले. या बंडात मोपल्यांचे कौतुक करण्यात व त्यांचे अभिनंदन करण्यात जमेतुल उलेमा पुढे होती. स्वामी श्रद्धानंदांचा खुनी अब्दुल रसीद हा धार्मिक हुतात्मा आहे, तो थोर धर्मसेवक आहे, अशी जाहीर घोषणा जमिएतुल उलेमा व देवबंद करीत असे. हेही सगळे स्वातंत्र्यलढ्यासाठी मुसलमानांचे साहाय्य हवे म्हणून खपवून न्यायचे ठरले. ९१

इ. स. १९०१ ला अहमदिया पंथ कायम झाला. या पंथातील एकूण एक माणूस मृत्युदंडाच्या शिक्षेला पात्र आहे; म्हणून त्याचा खून करणे गुन्हा नव्हे असे देवबंदचे मत होते; व हीच जमिएतुल उलेमात प्रमुख घटक संस्था होती. ख्यातनाम कायदेपंडित व पाकिस्तानी नेते सर महमद जाफरुल्ला अहमदी या पंथाचे होते. इतकेही सांभाळून घेऊन फिरंगी महल व बरेलीचे उलेमा जमिएतमधून बाहेर पडले व त्यांनी लीगशी हातमिळवणी सुरू केली. १९३१ ला अहरार व अन्सार हिंदूंचे नेतृत्व नको ही सबब सांगून जमिएतुल उलेमातून बाहेर पडले. इ. स. १९४१ साली मौलाना मोदुदी बाहेर पडले. आजच्या भारतातील मुसलमानांच्या मनावर प्रभुत्व गाजविणारी सर्वांत मोठी संघटना जमाते इस्लाम ही आहे. या संघटनेचे मौदुदी हे संस्थापक. पाकिस्तानवर प्रेम करणे हे भारतीय मुसलमानांचे धर्मकर्तव्य आहे असे मौलाना मौदुदींचे मत. १९४१ पर्यंत हाच माणूस जमिएतुल उलेमाच्या मुखपत्राचा संपादक होता. १९४९ साली मौलाना अहमद उस्मानी जमिएतमधून फुटले. क्रमाने जमियतही दुबळी होत जाणारी संघटना अशीच राहिली. या जमिएतुल उलेमाने मुस्लिम लोकमत आपल्याकडे खेचण्यासाठी वाटेल ती योजना करावी आणि तिचे समर्थन मौलानांनी काँग्रेस कार्यकारिणीत करावे हा उद्योग सतत सत्तावीस वर्षे चालू होता. महमदअली जीना १९२८ पर्यंत विभक्त मतदार संघाचे विरोधक होते. ते जातीयवादी,

स्वातंत्र्यद्रोही! आणि विभक्त मतदार संघाची पुरस्कर्ती जमिएत ही मात्र राष्ट्रीय, अशीही चमत्कारिक परिस्थिती होती. १९२८ साली मोतीलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली नेहरू रिपोर्ट बनवण्यात आला. या समितीसाठी सर्वपक्षीय सभा बोलावली होती. तिला राष्ट्रीय मुसलमानांसकट सर्व पक्ष गैरहजर होते. फक्त एकुलता एक मुस्लिम पक्ष खिलाफत कॉन्फरन्स या बैठकीला हजर राहिला, तो फक्त सर्व मुसलमानांच्या वतीने नेहरू रिपोर्टाला विरोध करण्यासाठी म्हणून. जीना मात्र हजर होते. त्यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मुसलमानांना ३३ टक्के जागा असाव्यात अशी मागणी केली. पण नेहरू रिपोर्टाला पाठिंबा दिला. नेहरू रिपोर्टाच्या विरुद्ध लीगने सर्व मुसलमानांची कॉन्फरन्स बोलावली. हिला जमियतचे अध्यक्ष मौलवी किमायतुल्ला हजर होते. त्यांनी सभेत हिरीरीने भाग ९२
घेतला. फक्त जीनाच सभेला हजर नव्हते.

मुस्लिम लीग सदैव ३३ टक्क्यांचा आग्रह धरत होती. लीगने १९४० पासून ४५ टक्के जागांची मागणी सुरू केली व विभाजनाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. राष्ट्रीय मुसलमानांनी म्हणजे जमिएतुल उलेमाने लगेच प्रांतांना शेषाधिकार असणारे दुबळे केंद्र, राज्य विभक्त मतदार संघ, मुस्लिमांना ४५ टक्के जागा; पण अखंड भारत अशी भूमिका घेतली. दर वेळी राष्ट्रीय मुसलमान अखंड भारताच्या नावे अशा मागण्या करीत व अशा योजना आखीत की, ज्यामुळे या राष्ट्रीय मुसलमानांच्यापेक्षा लीग परवडली असे वाटू लागे. राष्ट्रीय मुसलमानांचे तर असेही म्हणणे होते की, अखंड भारतातील कोणताही कायदा जर $\frac{2}{3}$ मुस्लिम सदस्यांना अमान्य असेल तर तो रद्द समजावा. म्हणजे धर्माशी संबंध नसणारासुद्धा कायदा बहुसंख्याक, मुसलमानांना पटल्याशिवाय करू नये. अशी ही मागणी होती. भारतातील जमिएतुल उलेमाचे लोक मोकळ्या मनाने बोलत नाहीत, पण कालतागायत इथे असणारे लोक आज पाकिस्तानात आहेत. अहीरार अनाउल्लाशहा बुखारी, जमियतचे मौलाना अबुलहसन हे सर्व जण १९४७ पर्यंत राष्ट्रीय मुसलमान मानले जात. यांचे मत आहे की, कोणताही मुसलमान बिगर मुसलमान राजवटीशी एकनिष्ठ राहू शकत नाही.

स्वतःला राष्ट्रीय म्हणवून घेणाऱ्या मुसलमानांची ही वागणूक काही जणांना संतापजनक वाटते; पण तशी ती संतापजनक नाही. या वागणूकीत एक सुसंगती आहे. इंग्रजांचे कट्टे शत्रू हे भारताचे मोठे अभिमानी पुत्र आहेत असे समजण्यातच चुकते. इंग्रज विरोध जपानलाही होता, जर्मनीलाही होता, फ्रेंच, नेपोलियनलाही होता. पण हा विरोध भारत स्वतःला हवा यासाठी म्हणून होता. सर्व मुस्लिम धर्मपंडितांना इंग्रज राजवट शत्रुस्थानी

होती; पण त्यांना हिंदुस्थान संपूर्णपणे मुसलमानांच्यासाठी हवा होता. त्यांच्या धार्मिक महत्त्वाकांक्षांच्यासाठी त्यांना स्वातंत्र्य हवे होते. त्यांची वागणूक याला सुसंगत होती. या मुल्ला-मौलवींनी स्वातंत्र्य-लढयात फारसा भाग कधी घेतला नाही. मौलाना दर लढयात अग्रभागी राहिले. स्वातंत्र्याच्या प्रत्येक आंदोलनात मौलानांनी त्याग केलेला आहे. बेजबाबदार हुच्च अशी धर्मवेडी भाषा मौलानांच्या समग्र आयुष्यात त्यांनी कधी वापरलेली दिसत नाही. जास्तीत जास्त मौलाना एवढेच म्हणाले की, बहुसंख्य मुस्लिम प्रांतांतील हिंदू ही बहुसंख्य हिंदू प्रांतांतील मुसलमानांच्या रक्षणाची हमी आहे. मुस्लिम बहुसंख्येने हिंदूंचे हित जपावे, त्या हिंदूंच्या हिताच्या रक्षणासाठी उरलेल्या भारतात मुसलमानांचे संरक्षण करणे हिंदूंना भाग पडेल; पण त्यासाठी पाकिस्तान वेगळे मागण्याची गरज नाही. त्यात मुसलमानांचे अहित आहे. यापेक्षा पुढे जाऊन मौलाना कधी बोलले नाहीत. हिंदुस्थानात धार्मिक राज्य असावे असे तर ते म्हणालेच नाहीत; पण पाकिस्तान हे इस्लामिक स्टेट होणार असेल तर त्याला आमचा पाठिंबा आहे, ते धर्मशून्य आधुनिक राज्य होणार आहे. म्हणून पाकिस्तानला आमचा विरोध आहे, असे मौलाना आसदमदनी बरळले तसेही कधी आझाद म्हणाले नाहीत. आझादांचा पाकिस्तानला विरोध देशाची विभागणी हिंदू मुसलमान दोघांच्या अहिताची आहे यासाठी होता. त्यांना अखंड भारत मुस्लिम धर्मराज्यासाठी नको होता. सर्वधर्मीय उम्मतुलवाहीदाच्या प्रयोगासाठी हवा होता. या उम्मतुलवाहीदात आधुनिक तंत्रशिक्षणावर, विज्ञानावर भर देण्यात येणार होता. हादीसवर भर देण्यात येणार नव्हता. ९३

पण ज्या वातावरणात मौलाना वावरले त्यांच्या धर्मवेड्या संधीसाधू राजकारणाचे शिंतोडे मौलानांच्या अंगावर पडल्याशिवाय राहिले नाहीत. हळूहळू वेळ अशी आली की, काँग्रेसमध्येसुद्धा अव्वल दर्जाच्या नेत्यात अखंड भारताचा आग्रही पुरस्कार करणारे शेवटी फक्त मौलाना आझाद एकटेच उरले. महात्मा गांधींचा फाळणीला आशीर्वाद होता. सरदार व नेहरू हे फाळणीचे पुरस्कर्ते झालेले होते. मौलाना सरदारांच्या विरोधी बोलू लागले म्हणजे हिंदूंना राग येतो मौलानांचे मत सरदारांनी अर्थखाते सांभाळावे व मंत्रिमंडळ व्हेटो करण्याचा, सगळेच कामकाज खोळंबून टाकण्याचा अधिकार लीगच्या हाती जाऊ नये असे होते. सरदारांना अर्थखाते लीगने घेऊन सगळे कामकाज बंद पाडले तरी गृहखाते सोडावयाचे नव्हते. मध्यवर्तीचे गृहखाते निरुपयोगी आहे. कारण प्रांतिक सरकारे दंगलींना पाठीशी घालू लागली तर हे गृहखाते प्रांतातील जनतेचे संरक्षण करू शकणार नाही असे मौलानांचे म्हणणे होते. फाळणी डोळ्यांसमोर दिसत होती. उरलेला भारत संघटित करण्यासाठी सर-

दारांना गृहखाते हवे होते. मौलानांना फाळणी नको होती. ती टाळण्यासाठी केन्द्रीय मंत्रिमंडळाचा कारभार सुरळीत चालणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. हा दोन दृष्टिकोणांतला फरक होता. मौलानांचा दृष्टिकोण अखंड भारत टिकवण्याचा होता. इंग्रज निघून गेल्यानंतर जर अखंड भारत राहिला असता तर त्या उम्मतुलवाहीदाचे नेतेच मौलाना झाले असते. महंमदाने केलेला प्रयोग पुन्हा त्यांनी करून पाहिला असता. मौलाना एकच विसरले की, जे प्रेषितालाही टिकवता आले नाही, ते निर्माण करून टिकवण्याचा हव्यास आपण मर्त्य असून धरतो आहोत.

स्वतंत्र भारतात दहा वर्षे मौलाना मंत्री होते. पण याही काळात त्यांनी कधी आजच्या मुस्लिम धार्मिक संघटना जे वेडे उद्योग करतात ते केले नाहीत. त्यांनी शिक्षणखात्याचे अंदाजपत्रक दोन कोटींवरून तीस कोटींवर नेले; पण वाढलेले अठ्ठावीस कोटी धर्मशिक्षणासाठी वापरले नाहीत. काँग्रेसने मुसलमानांना तेहतीस टक्के जागा अखंड भारतात कबूल केल्या होत्या. खंडित भारतात मौलानांनी नेहमी लोकसंख्येच्या प्रमाणात दहा टक्के जागा मागितल्या, व फक्त सहाच टक्के मुसलमान निवडून आले तरी तक्रार केली नाही. भाषावार प्रांतरचनेत त्यांनी कधी उर्दूला प्रांत मागितला नाही. हैद्राबाद संस्थानच्या विभाजनाला विरोध दाखवला नाही. जमिएतुल उलेमा म्हणजे मौलानांचे पूर्ण चित्र नव्हे. उम्मतुलवाहिदाशी एकनिष्ठ राहणारा, पण व्यवहारात जमिएतुल उलेमांशी तडजोडी करणारा, हे त्यांचे पूर्ण चित्र आहे.



मौलाना म्हणजे प्रचंड अपयश! ते मुस्लिम जनतेला राष्ट्रीय चळवळीत आणू शकले नाहीत. मुस्लिम धर्मपंडितांना नव्या पद्धतीचे विचार करण्यास शिकवू शकले नाहीत. मुस्लिम धर्मात वैचारिक परिवर्तन घडवून आणणारी चळवळही ते करू शकले नाहीत. हिंदू आणि मुसलमान दोघेही वाचण्यास जिथे टाळाटाळ करतात असे एक कुराणचे अपूर्ण भाष्य भाषांतर करून मौलाना थांबले. मौलानांचे हे अपयश राजकारणी मुत्सद्द्यांचे अपयश नाही. तेरा वर्षांच्या परंपरेला प्रबल आव्हान देण्याचा प्रयत्न करताना, उदात्त स्वप्न पाहताना शूद्रांशी ज्या तडजोडी कराव्या लागल्या. त्या तडजोडीचे हे अपयश आहे. म्हणून मौलानांचे जीवन पाहू लागलो म्हणजे मला अत्यंत हळहळ वाटते. एक त्यागी कार्यकर्ता, प्रभावी लेखक व वक्ता, महान धर्मपंडित समाजावर कोणताही ठसा न उमटवता सत्तर वर्षे जगूनही नामशेष व्हावा, याहून अनुकंपनीय घटना दुसरी कोणती असेल? आजचे सनातनी हिंदू मन मौलानांचा विचार जमालुद्दीनच्या वंशात, खैरुद्दीनचा पुत्र म्हणून जन्माला येऊनसुद्धा जन्मभर उम्मतुलवाहीदाचा ध्यास घेणारा एक महापुरुष म्हणून करत नाही, तर खऱ्या-खोट्या

मुस्लिम जातीय वादावर सदैव पांघरूण घालणाऱ्या एखाद्या मुस्लिम भोळसटाप्रमाणे तरी लोक मौलानांना समजतात, किंवा लोक मौलानांनाच जमिएतुल उलेमाचे धूर्त जातीयवादी म्हणून पाहू लागतात. मौलानांच्या अनुयायांनीसुद्धा हे चित्र बदलायचा कधी प्रयत्न केला नाही. स्वतंत्र भारताच्या शिक्षणमंत्र्याला अनुयायी होते. कॉंग्रेस-नेता आझादला अनुयायी होते. तफासिरुल कुराण (कुराण-भाष्य) लिहिणाऱ्या अबुल कलामला अनुयायी नव्हते हेच खरे दुर्दैव आहे!

# अच्युत पटवर्धनांच्या सहवासात एक दिवस

अच्युतराव पटवर्धन हे बेचाळीसच्या चळवळीतील तरुणांचे लाडके नेते आणि भारतीय समाजवादी पक्षाच्या संस्थापकांच्यापैकी एक होत. गेली अनेक वर्षे अच्युतरावांनी जवळ जवळ राजकारण-संन्यासच घेतला आहे आणि त्यांचा राजकीय संन्यास जयप्रकाशांच्याप्रमाणे अर्धवट नाही. पक्षीय राजकारणातून जयप्रकाश निवृत्त झालेले असले तरी जवळ जवळ प्रत्येक महत्त्वाच्या राजकीय प्रश्नांविषयी अनेकांना न आवडणारे असे मतप्रतिपादन ते सतत करीत असतात. अच्युतरावांचे असे नाही. कुणाला पटो न पटो, त्यांनी जे साक्षात राजकारणाशी असणारे आपले संबंध कठोरपणे तोडून टाकले, ते तितक्याच निर्धाराने आपले निवृत्तपण जपत आहेत. समाजवादी संस्कारातून जी एक पिढीच्या पिढी तयार झाली, त्या पिढीला अच्युतरावांच्याविषयी ममत्व आणि आपुलकी असणे अगदी स्वाभाविक आहे. तशी एके काळी त्यांच्याविषयी अतीव आदराची भावना माझ्याही मनात होती; पण ज्या पद्धतीने एकाएकी ते राजकारणनिवृत्त झाले, ती पद्धत मनाचा विरस करणारी, अपेक्षाभंग करणारी होती. जे नेते आपले अनुयायी सोडून रणांगणातून पळ काढतात, त्यांच्याविषयी फार मोठी श्रद्धा ठेवणे माझ्या मनाला पटत नाही. त्यामुळे अच्युतरावांच्याविषयी काही रागही मनामध्ये होता. ९६

अलीकडे मी पुण्याला गेलो म्हणजे रावसाहेबांच्याकडे जाण्याचा योग येतच असे. रावसाहेब पटवर्धनांशी कुणाचे कितीही काम असले तरी त्यांच्याशी तासभर गप्पा मारून येणे, यात एक आनंद होता. एक-दोन वेळेला मी रावसाहेबांच्याकडे गेलो. त्यांनी वरच्या मजल्यावर अच्युतराव आहेत याची आठवणही करून दिली; पण मी कटाक्षाने अच्युतरावांची भेट टाळत होतो. देशातील समाजवादी तरुणांचे मन अतिशय भाबडे आहे. त्या भाबडेपणाच्या नादात जे सोडून गेले त्यांच्याकडे पुनःपुन्हा आपण धाव घेतलीच पाहिजे असे समाजवादी नेत्यांना वाटते. समाजवादी पक्षाचा त्याग करून जयप्रकाशांना आता एका तपाहून अधिक काळ

उलटून गेला; पण राष्ट्रपतिपदासाठी पुनःपुन्हा त्यांच्याकडे धाव घेण्याची इच्छा समाजवाद्यांना होते. संसदीय लोकशाहीवर माझा विश्वास नाही, पक्षीय राजकारणावर माझी श्रद्धा नाही, असे कितीदाही जयप्रकाश सांगोत, त्यांनी राष्ट्रपती व्हावे असे समाजवाद्यांना वाटतेच. मोठ्या उत्सुकतेने अच्युतरावांना भेटणे हा त्याच भाबडेपणाचा एक प्रकार ठरला असता. अच्युतराव यांच्याकडे जाऊन आपण काय म्हणणार? आपण पुन्हा राजकारणात यावे व नेतृत्व स्वीकारावे अशी विनंती करण्यात काय अर्थ आहे,– असे मला वाटे, आणि मी शक्य असलेली अच्युतरावांची भेटसुद्धा टाळीत असे. आत्मचिंतनात जे रमलेले आहेत त्यामुळे जे समाजविन्मुख झालेले आहेत, त्यांना वृथा त्रास द्यावा असे मला वाटत नाही. १७

पण ही माझी तटस्थता एका कारणाने भंग पावली. आमचे एक ज्येष्ठ मित्र डॉ. महेश्वर करंदीकर ह्यांनी इस्लामविषयी एक भले मोठे चारशे पानी पुस्तक इंग्रजीतून लिहिले आहे. हे पुस्तक लिहिले जात असताना त्याची कच्ची मुद्रणप्रतही मी पाहिलेली होती. या पुस्तकाच्या निमित्ताने भारतातील इस्लामी राजकारणाचा एक कठोर असा आढावा भारतीय जनतेसमोर येऊ लागला होता. हे सारे विश्लेषणच वेगाने जनतेसमोर यावे यात स्वाभाविकच मला रस होता. मीही माझ्या छोट्या कुवतीनुसार या प्रश्नावर विचार करीत होतो. आणि एक दिवस लेखकाने मला सांगितले की, त्यांची इच्छा या पुस्तकाला अच्युतरावांची प्रस्तावना घ्यावी अशी आहे. अच्युतरावांची प्रस्तावना करंदीकरांच्या पुस्तकाला घेण्याचा विचार मला फारसा आवडला नाही. स्वातंत्र्यपूर्वकाळात हिंदू-मुस्लिम प्रश्नावरील एक अधिकृत ग्रंथ म्हणून अशोक मेहता व अच्युतराव पटवर्धन यांचा Communal Triangle हा ग्रंथ मानला जात असे. डॉ. आंबेडकरांचा ग्रंथ किंवा राजेन्द्रबाबूंचा 'द्विखंड भारत' हा ग्रंथ– हे दोन्ही ग्रंथ फार उशीराचे आहेत. आंबेडकर आणि राजेन्द्रबाबू यांचे ग्रंथ ज्या काळात वाचकांच्या हाती पडले, त्या काळात हिंदू-मुस्लिम समस्या फाळणीच्या उंबरठ्यावर जाऊन पोहोचलेली होती. अच्युतरावांच्या ग्रंथाचे असे नव्हते. या देशातील स्वातंत्र्यचळवळीत भाग घेणाऱ्या व सेक्युलर राजकारणावर श्रद्धा असणाऱ्या बहुतेक सर्व कार्यकर्त्यांनी हिन्दू-मुस्लिम समस्येविषयी आपली मते अच्युतरावांच्या ग्रंथाधारे बनवलेली होती, हा ग्रंथ दोन लेखकांच्या नावे आहे हे माहीत असूनही त्याला मी अच्युतरावांचा ग्रंथ असे मानतो. कारण त्या वेळी अशोक मेहता एक तरुण होते; अजून ते फार मोठ्या पदाला पोहोचलेले नव्हते, तेव्हा ग्रंथाच्या मांडणीवर मुख्य ठसा अच्युतरावांचा होता; आणि तसे असणे भाग आहे.

या दोन्ही बाबी सर्वज्ञात होत्या, या ग्रंथातील विवेचनावर माझा नेहमीच आक्षेप राहिला, जातीय त्रिकोणातील भूमिका ऐतिहासिक पुराव्यावर टिकणारी नव्हे, असे मी ५६–५७ सालापासून गरजेनुसार सौम्य अगर तीव्र भाषेत प्रतिपादन करीत आलो आहे.

करंदीकरांच्या पुस्तकातील भूमिका अच्युतरावांच्या भूमिकेपेक्षा अगदी निराळी होती. तेव्हा या पुस्तकाला जर अच्युतरावांनी प्रस्तावना लिहिली तर ती विरोधी असणार हे मी गृहीत धरले. पण लेखकाने मला सांगितले की, ' तुम्ही अच्युतरावांना ओळखत नाही ! त्यांचे चिंतन सतत चालू असते. ते आपल्या चुका नव्या माहितीच्या आधारे सुधारून घेण्यास नेहमीच तयार असतात. ' अच्युतरावांच्या पिढीतील माणसांविषयी ही ९८
माहिती म्हणजे वेगळीच माहिती होती. अमूक पिढीतील माणसे सत्याच्या बाबतीत अधिक दक्ष असतात आणि अमूक पिढीतील नसतात असा याचा अर्थ नाही. पण ज्या वेळी स्वातंत्र्य-लढा चालू असतो, त्या वेळी माणसे ध्येयवादानें भारलेली असतात. एखादी व्यक्ती जितकी प्रामाणिक ध्येयवादी असेल आणि जितकी उत्कट असेल, त्या प्रमाणात वस्तुस्थिती ओळखण्याची त्या व्यक्तीची शक्ती अंधुक होऊन जाते. हेच ध्येयवादाचे सामर्थ्यही असते, हीच त्याची मर्यादाही असते. जे स्वतःला पटले त्यासाठी सर्वस्व पणाला लावण्याची तयारी, हा जसा या पिंडाचा एक भाग असतो, त्याचप्रमाणे जे असावे असे वाटते ते आहेच असे गृहीत धरण्याकडे मनाचा कायम कल, हा या पिंडाचा दुसरा भाग असतो. अच्युतराव हे या ध्येयवादी पिढीतील असल्यामुळे त्यांनी व इतर सर्वांनी दीर्घकाल प्रमाण मानलेली त्यांची मते मुळातच चुकली हे मोकळेपणाने मान्य करण्याचे धैर्य या उतारवयात ते दाखवतील असे वाटत नाही. हे धैर्य ज्या क्षणी अच्युतरावांच्याकडे आहे ही गोष्ट माझ्या ध्यानात आली त्या क्षणापासून अच्युतरावांना भेटण्याची प्रबळ ऊर्मी मनात दाटून आली.

गत वर्षी माझ्या महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे ते मुख्य पाहुणे होते. या निमित्ताने त्यांच्या सहवासात एक दिवस काढण्याचा मला योग आला. अनेक विषयांवर आम्ही दोघेही दीर्घकाळ बोललो. पण आम्ही बोललो असे म्हणण्यापेक्षा अच्युतरावच बोलले असे म्हणणेच जास्त योग्य ठरेल. अच्युतरावांची भेट झाल्याबरोबर ते काय म्हणणार याची थोडी कल्पना मला होती. माझे मित्र हमीद दलवाई यांच्या एका लेखाबद्दल मिया मोइउद्दीन हॅरिस यांनी फार मोठे आकांड-तांडव केलेले होते. हॅरिस-साहेबांच्यासारख्या देशसेवेत जन्म काढलेल्या प्रखर राष्ट्रभक्ताच्याविषयी हमीद दलवाई या तरुण पोराने बेजबाबदारपणे काही तरी बोलावे याचा जणू सात्त्विक संताप मिया हॅरिस यांना आलेला होता. त्या दृष्टीने त्यांनी

आपल्याविषयी सर्वांची सहानुभूती आणि दलवाईविषयी सात्त्विक संताप निर्माण व्हावा याची काळजी घेतलेली होती. दीर्घकालीन भोळसटपणानंतर हिंदू–मुस्लिम समस्येविषयी काही प्रमाणात कठोर पण प्रामाणिक मत-प्रदर्शनाला मराठीत गेल्या दोन-तीन वर्षांत आरंभ होत आहे. या वेळी जर वेळेवर हॅरिससाहेबांना आवर घातला नाही, तर त्यामुळे एक अनिष्ट पायंडा पडेल असे माझे प्रामाणिक मत होते. मला ज्या भाषेत शक्य होते त्या भाषेत मिया हॅरिस यांचे दांभिकपण मी उघडे केले होते. अच्युत पटवर्धन आणि हॅरिस यांचे दीर्घकालीन निकट मैत्रीचे संबंध मला माहीत होते. सेवादलातील समाजवादी मित्रांत काही प्रामाणिक मनाच्या दिलदार पण भाबड्या मित्रांची अशी एक मनाशी पक्की समजूत आहे की, लीगबाहेर असलेल्या कोणाही मुस्लिम नेत्याला जातीयवादी म्हणणे बरोबर नाही. आणि दीर्घकाळ समाजवादी पक्षात वावरलेल्या एका ज्येष्ठ मुसलमान नेत्याला जातीयवादी म्हणणे तर महान पापच आहे. 

हॅरिसवरील माझ्या लेखावर जनसंघ आणि हिंदू महासभा या पक्षांशी मिळते-जुळते विचार असणाऱ्या वाचकांचे पाठबळ मला मिळणे ही गोष्ट स्वाभाविक होती; पण त्यात मला आनंद नव्हता. ज्या मंडळींनी एका धार्मिक राजकारणाचा आश्रय घेतलेला आहे त्यांना या लिखाणाने आनंद झाला तर त्यात मला काहीच रस नव्हता. जे स्वतःला जाति-धर्मातीत राजकारणाचे अनुयायी मानतात त्यांची प्रतिक्रिया काय होते, त्यांना या लिखाणामुळे आजवर दुर्लक्षिले गेलेले काही सत्य कळते काय, हा माझ्यासमोरचा प्रश्न होता. हॅरिसविषयी पुनर्मूल्यमापन ही गोष्ट सेवादलातील तरुण मित्रांना दुःखद तर होतीच; पण वयस्क समाजवाद्यांना ती फारच यातनामय होती. बहुतेक समाजवादी मित्रांनी याबाबत मला उचलून धरले; पण काहींनी तितकाच तीव्र संतापही व्यक्त केला. अच्युतराव हे समाजवादीही होते, हॅरिसच्या सहवासातही होते. मी हॅरिसचे लिखाण वाचत होतो. प्रत्यक्ष जिवंत माणसाच्या सहवासात दीर्घकाळ वावरलेल्या एका नेत्याची प्रतिक्रिया समजून घेण्याची मला उत्सुकता होती.

माझ्या अपेक्षेप्रमाणे औपचारिक चार-दोन गोष्टी होताच अच्युतराव हॅरिसच्या लेखाकडे वळले. ते मला म्हणाले, "हॅरिसविषयी लिहिताना तुम्ही अतिशय कठोर आणि कडवट लिहिले आहे. ही पद्धत मला आवडली नाही. दलवाईचा लेख तर मला मुळीच आवडला नाही. एखाद्या माणसाच्या एखाद्या भेटीतील चार-दोन वाक्यांच्या आधारे संपूर्ण जीवनाचे मूल्य अमान्य करणारी विधाने करावी, याला मी जबाबदारीने चर्चा करण्याची पद्धत समजत नाही." मला ही प्रतिक्रिया थोडी-फार अपेक्षित होती. मी उत्तर देण्याच्या भानगडीत न पडता

या दोन्ही बाबी सर्वज्ञात होत्या, या ग्रंथातील विवेचनावर माझा नेहमीच आक्षेप राहिला, जातीय त्रिकोणातील भूमिका ऐतिहासिक पुराव्यावर टिकणारी नव्हे, असे मी ५६-५७ सालापासून गरजेनुसार सौम्य अगर तीव्र भाषेत प्रतिपादन करीत आलो आहे.

करंदीकरांच्या पुस्तकातील भूमिका अच्युतरावांच्या भूमिकेपेक्षा अगदी निराळी होती. तेव्हा या पुस्तकाला जर अच्युतरावांनी प्रस्तावना लिहिली तर ती विरोधी असणार हे मी गृहीत धरले. पण लेखकाने मला सांगितले की, 'तुम्ही अच्युतरावांना ओळखत नाही ! त्यांचे चिंतन सतत चालू असते. ते आपल्या चुका नव्या माहितीच्या आधारे सुधारून घेण्यास नेहमीच तयार असतात.' अच्युतरावांच्या पिढीतील माणसांविषयी ही माहिती म्हणजे वेगळीच माहिती होती. अमूक पिढीतील माणसे सत्याच्या बाबतीत अधिक दक्ष असतात आणि अमूक पिढीतील नसतात असा याचा अर्थ नाही. पण ज्या वेळी स्वातंत्र्य-लढा चालू असतो, त्या वेळी माणसे ध्येयवादाने भारलेली असतात. एखादी व्यक्ती जितकी प्रामाणिक ध्येयवादी असेल आणि जितकी उत्कट असेल, त्या प्रमाणात वस्तुस्थिती ओळखण्याची त्या व्यक्तीची शक्ती अंधुक होऊन जाते. हेच ध्येयवादाचे सामर्थ्यही असते, हीच त्याची मर्यादाही असते. जे स्वतःला पटले त्यासाठी सर्वस्व पणाला लावण्याची तयारी, हा जसा या पिंडाचा एक भाग असतो, त्याचप्रमाणे जे असावे असे वाटते ते आहेच असे गृहीत धरण्याकडे मनाचा कायम कल, हा या पिंडाचा दुसरा भाग असतो. अच्युतराव हे या ध्येयवादी पिढीतील असल्यामुळे त्यांनी व इतर सर्वांनी दीर्घकाल प्रमाण मानलेली त्यांची मते मुळातच चुकली हे मोकळेपणाने मान्य करण्याचे धैर्य या उतारवयात ते दाखवतील असे वाटत नाही. हे धैर्य ज्या क्षणी अच्युतरावांच्याकडे आहे ही गोष्ट माझ्या ध्यानात आली त्या क्षणापासून अच्युतरावांना भेटण्याची प्रबळ ऊर्मी मनात दाटून आली.



गत वर्षी माझ्या महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे ते मुख्य पाहुणे होते. या निमित्ताने त्यांच्या सहवासात एक दिवस काढण्याचा मला योग आला. अनेक विषयांवर आम्ही दोघेही दीर्घकाळ बोललो. पण आम्ही बोललो असे म्हणण्यापेक्षा अच्युतरावच बोलले असे म्हणणेच जास्त योग्य ठरेल. अच्युतरावांची भेट झाल्याबरोबर ते काय म्हणणार याची थोडी कल्पना मला होती. माझे मित्र हमीद दलवाई यांच्या एका लेखाबद्दल मिया मोइउद्दीन हॅरिस यांनी फार मोठे आकांड-तांडव केलेले होते. हॅरिस-साहेबांच्यासारख्या देशसेवेत जन्म काढलेल्या प्रखर राष्ट्रभक्ताच्याविषयी हमीद दलवाई या तरुण पोराने बेजबाबदारपणे काही तरी बोलावे याचा जणू सात्त्विक संताप मिया हॅरिस यांना आलेला होता. त्या दृष्टीने त्यांनी

आपल्याविषयी सर्वांची सहानुभूती आणि दलवाईविषयी सात्त्विक संताप निर्माण व्हावा याची काळजी घेतलेली होती. दीर्घकालीन भोळसटपणानंतर हिंदू–मुस्लिम समस्येविषयी काही प्रमाणात कठोर पण प्रामाणिक मत-प्रदर्शनाला मराठीत गेल्या दोन-तीन वर्षांत आरंभ होत आहे. या वेळी जर वेळेवर हॅरिससाहेबांना आवर घातला नाही, तर त्यामुळे एक अनिष्ट पायंडा पडेल असे माझे प्रामाणिक मत होते. मला ज्या भाषेत शक्य होते त्या भाषेत मिया हॅरिस यांचे दांभिकपण मी उघडे केले होते. अच्युत पटवर्धन आणि हॅरिस यांचे दीर्घकालीन निकट मैत्रीचे संबंध मला माहीत होते. सेवादलातील समाजवादी मित्रांत काही प्रामाणिक मनाच्या दिलदार पण भावड्या मित्रांची अशी एक मनाशी पक्की समजूत आहे की, लीगबाहेर असलेल्या कोणाही मुस्लिम नेत्याला जातीयवादी म्हणणे बरोबर नाही. आणि दीर्घकाळ समाजवादी पक्षात वावरलेल्या एका ज्येष्ठ मुसलमान नेत्याला जातीयवादी म्हणणे तर महान पापच आहे.



हॅरिसवरील माझ्या लेखावर जनसंघ आणि हिंदू महासभा या पक्षांशी मिळते-जुळते विचार असणाऱ्या वाचकांचे पाठबळ मला मिळणे ही गोष्ट स्वाभाविक होती; पण त्यात मला आनंद नव्हता. ज्या मंडळींनी एका धार्मिक राजकारणाचा आश्रय घेतलेला आहे त्यांना या लिखाणाने आनंद झाला तर त्यात मला काहीच रस नव्हता. जे स्वतःला जाति-धर्मातीत राजकारणाचे अनुयायी मानतात त्यांची प्रतिक्रिया काय होते, त्यांना या लिखाणामुळे आजवर दुर्लक्षिले गेलेले काही सत्य कळते काय, हा माझ्या-समोरचा प्रश्न होता. हॅरिसविषयी पुनर्मूल्यमापन ही गोष्ट सेवादलातील तरुण मित्रांना दुःखद तर होतीच; पण वयस्क समाजवाद्यांना ती फारच यातनामय होती. बहुतेक समाजवादी मित्रांनी याबाबत मला उचलून धरले; पण काहींनी तितकाच तीव्र संतापही व्यक्त केला. अच्युतराव हे समाजवादीही होते, हॅरिसच्या सहवासातही होते. मी हॅरिसचे लिखाण वाचत होतो. प्रत्यक्ष जिवंत माणसाच्या सहवासात दीर्घकाळ वावरलेल्या एका नेत्याची प्रतिक्रिया समजून घेण्याची मला उत्सुकता होती.

माझ्या अपेक्षेप्रमाणे औपचारिक चार-दोन गोष्टी होताच अच्युतराव हॅरिसच्या लेखाकडे वळले. ते मला म्हणाले, "हॅरिसविषयी लिहिताना तुम्ही अतिशय कठोर आणि कडवट लिहिले आहे. ही पद्धत मला आवडली नाही. दलवाईचा लेख तर मला मुळीच आवडला नाही. एखाद्या माणसाच्या एखाद्या भेटीतील चार-दोन वाक्यांच्या आधारे संपूर्ण जीवनाचे मूल्य अमान्य करणारी विधाने करावी, याला मी जबाबदारीने चर्चा करण्याची पद्धत समजत नाही." मला ही प्रतिक्रिया थोडी-फार अपेक्षित होती. मी उत्तर देण्याच्या भानगडीत न पडता

फक्त हसलो. अच्युतराव म्हणाले, "गंमत म्हणून सांगत नाही. मी खरेच सांगतो. हॅरिसनें या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रामाणिकपणे भाग घेतला. भारतावरून इंग्रजांचे राज्य संपावे याबाबत हॅरिसच्या प्रामाणिकपणावर माझा विश्वास आहे. तो प्रामाणिकपणे पाकिस्तानविरोधक होता. त्याच्या हातून जाणून बुजून राष्ट्रद्रोही किंवा भारताला हानिकारक असे काही घडणार नाही, हे मी आत्मविश्वासानें सांगतो." मी म्हटले, "तुमचे दुःख मी समजू शकतो; पण खरा वादाचा प्रश्न हा नाही. खरा वादाचा प्रश्न फार निराळा आहे. इस्लाम हा परिपूर्ण धर्म आहे, इस्लामी समाजरचना म्हणजे आदर्श समाजवादी समाजरचना व आदर्श परिपूर्ण लोकशाही असे हॅरिस यांना वाटते. एकदा ही भूमिका स्वीकारली म्हणजे मध्ययुगातील इस्लामची राजेशाही, सरंजामशाही, सरंजामशाहीबरोबर येणारी मानवी गुलामी, इस्लामचा आक्रमक युद्धाचा इतिहास, आपला धर्म सक्तीनें लादण्याची पद्धत या सर्वच प्रश्नांकडे वेगळ्या नजरेनें पाहावे लागते. हिंदुस्थानात मुसलमानांनी हल्ला करून राज्य केले व त्या राजवटीतील सरंजामशाहीनें जनतेचे व तिच्या धर्माचे कठोर दमन केले, हे सत्य मान्य करण्याची गरज उरत नाही. कोणताही खराखुरा समाजवादी आणि लोकशाहीवादी माणूस मध्ययुगीन धर्मसंस्थेत परिपूर्ण समाजवाद आणि परिपूर्ण लोकशाही शक्य आहे असे मानणार नाही. त्या काळच्या समाजव्यवस्थेत परिपूर्ण व कामापुरते तर सोडाच, पण किमान समाजवाद आणि किमान लोकशाहीचाही आढळ होत नाही असे मला वाटते."



अच्युतराव म्हणाले, "दुर्दैवाने तुमचे म्हणणे बरोबर आहे. हॅरिसला आपला धर्म, आपला समाज, आपला इतिहास याचे स्वतः ऐतिहासिक विश्लेषण करावे असे वाटत नाही. इतरांनी मांडलेले ऐतिहासिक विश्लेषण तो मान्य करीत नाही. इस्लाममध्ये काही अपूर्णता असेल, असे त्याच्या धार्मिक मनाला वाटतच नाही. धर्मश्रद्धेच्या बाबतीत हॅरिस अतिशय हळवे आहेत." मी म्हटले, "इस्लाम हा परिपूर्ण धर्म आहे. ती परिपूर्ण लोकशाही आहे, तो परिपूर्ण समाजवाद आहे असे म्हणणारी मंडळी वेगळ्या भाषेत इतर सर्वांनी आपापले धर्म सोडावे आणि इस्लाम स्वीकारून स्वतःचे जीवन परिपूर्ण करावे हेच सांगत नाहीत काय?" अच्युतराव म्हणाले, "इस्लामचा प्रचार करणे हा मुसलमानांचा पवित्र धार्मिक हक्क आहे. अशीच कोणत्याही धार्मिक मुसलमानाची श्रद्धा असणार हे उघड आहे. आणि हॅरिस मनाने धार्मिक आहे!"

पुढे बोलताना अच्युतराव म्हणाले, "तुमच्या लेखातील विधाने चुकीची आहेत, असे मला वाटत नाही. मुस्लिम प्रवाहाचे तुम्ही केलेले विश्लेषण मला स्थूलपणे मान्य आहे. माझी तक्रार भाषा कडवट आणि कठोर

आहे, याबाबत होती. बाकी तुम्ही हॅरिसबद्दल जे म्हटले आहे, ते दुःखद असले तरी खरे आहे. आझादांच्याइतकीही पुरोगामी दृष्टी हॅरिसजवळ नसावी, हेच दुःखद आहे. ”

मौ. आझाद यांच्याविषयी माझ्या मनात अतीव आदर आहे. जाहीर सभेत ते काय बोलले, त्यांनी कोणत्या ठरावांना पाठिंबा दिला, या बाबी मला गौण वाटतात. त्यांच्या बंडखोर कुराण-भाष्यावर मी लुब्ध आहे. मौ. आझाद आणि अच्युतराव यांचा निकट व्यक्तिगत परिचय असेल, याची मला कल्पना नव्हती. आझाद हे चार माणसांत मिसळणारे म्हणून कधीच प्रसिद्ध नव्हते. महात्मा गांधींच्या समोर बसूनसुद्धा ते चिरूट ओढीत असत आणि कॉंग्रेस कार्यकारिणीतसुद्धा अधिकृत ठरावांना फक्त पाठिंबा देत. कॉंग्रेसच्या मोठमोठ्या नेत्यांना आझादांच्या फार जवळ जाण्याचा कधी योग आला नाही; पण अच्युतराव म्हणाले, “ माझे व मौलानांचे संबंध बरेच निकट होते. कित्येक दिवस एकत्र प्रचार-दौऱ्याच्या निमित्ताने आम्ही एकमेकांच्या सहवासात काढलेले आहेत. एकदा तर सतत तीन दिवस आम्ही दोघे आगगाडीच्या एकाच डब्यात एकत्र होतो. मी सतत एका गोष्टीची आठवण करीत आहे, ती म्हणजे मौलाना निमाज पढताना आपणास या एकत्र तीन दिवसांत कसे आढळले नाहीत. ? स्थूलपणे पाहिले तर मौलाना हे धार्मिक गृहस्थ होते. धर्मशास्त्राचे गाढे पंडित होते. मुस्लिम धर्मशास्त्र व कुराणाची वचने त्यांच्या जिभेवर खेळत असत; पण सूक्ष्मपणे पाहताना असे वाटे की, गांधीजी जसे प्रवृत्तिधर्माने आम्हा पुरोगाम्यांना जवळ होते, तसे मौलाना हेही आम्हांला जवळ होते. कधी चर्चा चालू असताना मौलानांनी चर्चा मध्येच सोडली आणि ते निमाज पढू लागले असे मला आठवत नाही. मौलाना धार्मिक होते. वेळ मोकळा असला, ते निमाज पढत असत. वेळ मोकळा नसला— त्यांचा त्रास नसे. प्रचारदौऱ्यात सकाळ असो, संध्याकाळ असो, शुक्रवार असो, मौलानांच्या निमाजासाठी कोणत्या कार्यक्रमाचा खोळंबा झाला, असे मला कधी आठवत नाही. ’



तासन् तास अनेक प्रश्नांच्यावर आम्ही त्यांच्याशी बोललो; पण धार्मिक माणसांच्याजवळ भूतकाळाचे उदात्तीकरण करण्याची जशी प्रवृत्ती असते, तशी मौलानात दिसली नाही. मुसलमान राजांच्याविषयी ते समतोल भाषा वापरीत. मुस्लिम खलीफांच्याविषयी त्यांची भूमिका अशीच समंजस होती. जगातले सर्वच धर्म खरे आहेत, सर्वच प्रेषित परमेश्वराचे आहेत ही श्रद्धा म्हणजे खरा इस्लाम, असे त्यांचे मत होते. कोणत्याही प्रश्नावर त्यांच्याशी बोलताना, देशाच्या व्यापक कल्याणाची काळजी वाहणाऱ्या राष्ट्रनेत्याशी आपण बोलत आहोत, असे मला कधीच वाटले

नाही. धार्मिक माणसे सामान्यत्वे उजव्या गटाची असतात. मौलानांना मी समाजवादी म्हणणार नाही; पण ते नेहरूंच्या आर्थिक कार्यक्रमासकट सर्वच कार्यक्रमांशी मनाने जास्तीत जास्त समरस झालेले होते.

मी अच्युतरावांना म्हटले, "आधुनिक काळात, विसाव्या शतकात जी नवी परिस्थिती निर्माण झाली आहे तिच्या संदर्भात मुस्लिम कायद्याचा विचार करण्यासाठी म्हणून पॅलेस्टाइनला एक जागतिक मुस्लिम पंडितांची परिषद भरली होती. या परिषदेला मौलानांनी जो संदेश पाठवला आहे, त्यात या परिषदेच्या कामकाजात काही मुस्लिम स्त्रिया सहभागी असाव्यात व विधिविधान बनवण्यात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने सहभागी असावे याचा खास उल्लेख आहे. मौलानांची ही सूचना इस्लाम-विरोधी आहे. कारण इस्लामी धर्मशास्त्राप्रमाणे कोणतीही स्त्री धर्मसभेची सभासद असू शकत नाही." अच्युतराव म्हणाले, "हेच तर मी सांगतो आहे. मौलाना इस्लाममध्ये स्त्रियांना पूर्ण समानता आहेच असे म्हणाले नसते. ते म्हणाले असते, 'समता हा इस्लामचा महान् संदेश आहे. ही समता साकार करण्यासाठी आजचे सर्व स्त्री-पुरुष समतेच्या बाजूने जी पावले टाकतील, ती इस्लामची सेवाच असते."



मी विचारले, "परिपूर्ण लोकशाही निर्माण करणे यासाठी आपण जो कार्यक्रम घेऊ ती नव्या संदर्भात इस्लामची उचित सेवा आहे ही मौलानांची बाजू, आणि इस्लाम हीच परिपूर्ण लोकशाही असल्यामुळे अधिकात अधिक इस्लामी जीवनपद्धतीचा स्वीकार करणे हीच लोकशाहीची सेवा आहे, ही हॅरिस यांची बाजू असे आहे काय?" अच्युतराव म्हणाले, "हॅरिसवर बोलण्यात मला फारसा आनंद नाही, मौलानांवर बोलण्यात मला रस वाटतो."

मी विचारले, "शेवटच्या काळात मौलाना व सरदार पटेल यांचे संबंध फारसे चांगले राहिले नव्हते, पण १९२२ ते १९४५ ही पंचवीस वर्षे दोघांनीही एकत्र काढलेली होती. एका संघटनेत, एका नेतृत्वाखाली दोघेही वावरत होते. दीर्घकाळ गांधीजींचे खास विश्वासू म्हणून वावरलेले सरदार वयाची ६५ वर्षे ओलांडल्यानंतर एकाएकी हिंदुत्ववादी झाले असतील असे वाटत नाही. आज सरदारांचे जे चित्र जनतेसमोर उभे करण्यात येत आहे ते लोकशाहीवर विश्वास नसणाऱ्या उजव्या मनोवृत्तीच्या हिंदुत्ववाद्यांचे चित्र आहे. सरदारांची ही प्रतिमा तुम्हांला योग्य वाटते काय?" अच्युतराव म्हणाले, "सरदारांना ओळखणारा कोणीही माणूस त्यांची ही प्रतिमा मान्य करणार नाही. संसदीय लोकशाहीवर सरदारांचा दृढ विश्वास होता. सर्व जाती-धर्म-पंथाच्या नागरिकांना

नागरिकत्व समान असावे. या देशात दुय्यम कुणीही नागरिक असू नये. मुसलमानांनासुद्धा हिंदूंच्या बरोबरीचे हक्क असावेत याविषयी सरदार निःशंक होते. समान नागरिकत्व, प्रौढ मतदानावर आधारलेली लोकशाही, संसदेला जबाबदार असणारे मंत्रिमंडळ, आणि भारताच्या घटनेचे संघ-राज्यात्मक स्वरूप– या सर्वच बाबी सरदारांना मान्य होत्या. त्यांना जातीयवादी राजकारणाचे लाड चालवणे मान्य नव्हते. शेकडा ९९ च्या वर मुसलमान मुंबई प्रांतात लीगच्या बाजूने मतदान करीत, ही परिस्थिती पाहिल्यानंतर एकूण मुस्लिम राजकीय नेत्यांनी वाटेल ती बेजबाबदार विधाने करावीत, फुटीर प्रवृत्ती वाढवावी, या पाकिस्तानी मनोवृत्तीला सरदारांचा विरोध होता; पण त्यामुळे सरदार हिंदुत्ववादी ठरत नाहीत. त्यांची भूमिका उदार नसेल, त्यांची भाषा कठोर असेल; पण ते कठोर राष्ट्रवादी होते, जातीयवादी नव्हते. ” 

सरदारांच्या आर्थिक भूमिकेतील उजव्या मनोवृत्तीविषयी मी प्रश्न काढला. अच्युतराव म्हणाले, “ सैद्धान्तिकदृष्ट्या सरदार समाजवादी नव्हते, ही गोष्ट उघडच आहे. पण म्हणून ते भांडवलशाही व भांडवलदार यांचे चाहते आणि भांडवलधार्जिणे होते, या आरोपात फारसे तथ्य नाही. जो जो समाजवादी विचारसरणीचा नाही, तो तो भांडवलदार मनोवृत्तीचा, ही विचार करण्याची पद्धत ठोकळेबाज व साचेबंद आहे. आजचे नेतृत्व ज्या पद्धतीने निर्माण होते, त्यापेक्षा स्वातंत्र्यपूर्व काळातील नेतृत्व अगदी वेगळ्या पद्धतीने व वेगळया वातावरणात निर्माण होत होते, हे आपण समजून घेतले पाहिजे. सरदार बारडोलीच्या लढ्यातून पुढे आले. या लढ्याच्या निमित्ताने ग्रामीण जनतेशी आणि शेतकऱ्यांशी त्यांची एक गाढ जवळीक निर्माण झाली होती. खेडी आणि खेड्यात राहणारा शेतकरी यांच्या हिताचे काय आहे, हा प्रश्न नेहमी सरदारांच्या मनात असे. वेळेवर पावसाळा सुरू झाला नाही तर सरदार अस्वस्थ होत. पावसाळा वेळेवर सुरू झाला पाहिजे, नाही तर शेतकऱ्यांचे काय ? या एकाच चिंतेने दरसाल जून महिन्याच्या आरंभी सरदार भयंकर हळवे झालेले असत. त्यांनी दीर्घकाळ कामगार-संघटनेत काम केले होते. ही कामगार संघटना कम्युनिस्टांची– समाजवाद्यांची नसेल, पण शेवटी कामगार संघटनाच होती. हे सगळेच संस्कार सरदारांच्यावर एकत्रित होते. भारतीय लोकशाहीवर खेड्यातील कोट्यवधी मतदारांचे अजस्र दडपण असावे, हे त्यांना रास्त व उचित वाटत होते; भांडवलशाहीचा नायनाट करा, राष्ट्रीयीकरण करा असे कुणी म्हणाले असते, तर सरदार तुच्छतेने हसले असते; पण खेडी सुधारण्यासाठी आवश्यक तितका पैसा कर लादून गोळा केला पाहिजे असे कुणी म्हणाले असते, तर सरदारांनी संमतिदर्शक मान डोलावली असती. ”

सरदार आणि मौलाना आझाद यांच्यातील मतभेद जुने होते. सरदारांच्या मते राष्ट्रीय मुसलमानांची भूमिका नेहमीच बचावाची व Apologetic राहते. आपण मुसलमानांच्या व इस्लामच्या हिताविरुद्ध काहीही करत नाही, हे सिद्ध करण्यातच राष्ट्रीय मुसलमानांचा सगळा वेळ जातो. फुटीर राजकारणाच्या विरुद्ध कणखरपणे झगडण्याऐवजी त्या राजकारणातील शक्य त्या सर्व बाबी आत्मसात करण्याकडे राष्ट्रीय मुसलमानांचा कल असतो. सरदार नेहमी काही भूमिका मांडीत व या भूमिका घेतल्या तरच राष्ट्रीय मुसलमान खऱ्या अर्थानें राष्ट्रीय म्हणता येतील, असे प्रतिपादन करीत. सरदारांना बोलताना 'चावा' घेण्याची, 'चिमटा' काढण्याची सवय होती. मौलाना म्हणत असत, कोणती भूमिका घेणे रास्त आहे यावर मतभेद असू शकतो; काय भूमिका घेतली तर मुस्लिम समाजात शिरणे सोपे हे आम्ही जाणतो. आमची धडपड देश अभंग रहावा आणि हिंदू-मुस्लिम इंग्रजविरोधी लढ्यात एकत्र यावेत ही आहे. हिंदू-मुस्लिम समाजात फूट पाडणारी तिसरी शक्ती जोपर्यंत अस्तित्वात आहे, तोपर्यंत फूट कशी पडणार नाही याची काळजी घेणे आमचे कर्तव्य आहे. आमच्या मनाशी आम्ही प्रामाणिक आहोत;पण इतर कोणी मांडलेल्या कसोट्यांच्यावर आपला प्रामाणिकपणा सिद्ध करावा आणि तुम्ही न्यायाधीश बनून आम्ही प्रामाणिक आहोत की नाहीत याचा न्याय द्यावा, याची गरज आम्हांला वाटत नाही. आम्ही काँग्रेसमध्ये येण्याचा व राहण्याचा हेतू आमच्या प्रामाणिक राष्ट्रवादाविषयी पटेलांनी मत द्यावे हा नाही हा देश अभंग रहावा आणि स्वतंत्र व्हावा हा आमचा हेतू आहे. 'He always wants to sit on judgement seat; we have no wish to provide evidance for our judgement' असे मौलाना म्हणत आणि व्यक्तिशः माझे मत त्या वेळी मौलानांच्या बाजूचे होते. आजही आझादांच्या प्रामाणिक प्रयत्नाविषयी मला आदर आहे. १०४

भारतीय स्वातंत्र्यानंतर समाजवादी पक्ष घाईघाईने काँग्रेसबाहेर पडला, असे माझे पूर्वीपासूनचे मत होते. अधिकृतरीत्या सांगावयाचे तर आम्हांला पक्षाबाहेर पडणे भाग पडले, अशी समाजवादी पक्षाची भूमिका होती. याबाबत अच्युतरावांची प्रतिक्रिया समजून घेण्याची माझी इच्छा होती. कम्युनिस्टांना काँग्रेसमधून हाकून काढावे ह्याबाबत ज्याप्रमाणे सत्ताधीश गट आग्रही होता, त्याप्रमाणे स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर समाजवाद्यांना पक्षाबाहेर हाकलण्याची घाई नेहरूंना व सरदारांना झाली होती काय, आणि तशी झाली असल्यास त्याची कारणे कोणती हे समजून घेण्यास मी उत्सुक होतो. अच्युतराव म्हणाले, "समाजवाद्यांविषयी नेहरूंच्या मनात विलक्षण प्रेम आणि आत्मीयता होती हे तर उघडच आहे." जयप्रकाश, लोहिया, मी, अरुणाबाई यांना पंडितजींनी सदैव

उचलून धरण्याचाच प्रयत्न केला. विशेषतः लोहियांवर तर नेहरूंचे मुलासारखे प्रेम होते. सरदारांनासुद्धा समाजवाद्यांविषयी राग किंवा तिटकारा नव्हता. समाजवादी मंडळी ज्या वेळी आपल्याला देशाचा फार मोठा अभिमान आहे या तोऱ्यात वागत, त्या वेळी सरदार या बलिशपणाची कीव करीत. एवढे सोडल्यास समाजवादी नेत्यांच्या उत्साहीपणाची व प्रामाणिकपणाची सरदारांना खात्री होती. व्यक्तिशः माझ्यापुरते म्हणायचे तर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये त्या वेळच्या मोठमोठ्या व्यक्तींनी मी एक लाख रुपये खाल्ले अशी कुजबूज करण्यास आरंभ केला होता. निष्कारण आपल्यावर हा आरोप यावा याचे अर्थातच मला दुःख होते. मी सरदारांना म्हटले होते, "तुम्ही या आरोपाची शहानिशा करा आणि निदान संशय घेण्याइतका पुरावा आहे काय इतके तरी पहा." 
सरदार मला म्हणाले, "जाऊ दे रे, कुठे क्षूद्र माणसांच्या नादी लागतोस. ते तुझ्या लोकप्रियतेमुळे जळफळत आहेत. जळफळाट नेहमी अशा क्षुद्र मार्गानेच व्यक्त होतो.' समाजवादी नेत्यांच्याकडे सरदार कसे पाहात असत याचे हे उदाहरण आहे. समाजवादी लोक काँग्रेस संघटनेचा ताबा मिळवू शकतील असे सरदारांना कधीच वाटत नव्हते. म्हणून त्यांना भीती नव्हती. आपण आता म्हातारे झालो आहोत, आपण फारच थोड्या दिवसांचे सोबती आहोत, म्हणून तरुणांच्याकडे आस्थेने पहायला पाहिजे असे सरदारांना वाटे.

समाजवाद्यांनी भारतीय संविधान निर्माण करण्यात सहभागी व्हावे, काही जबाबदाऱ्या सांभाळाव्यात, लोहियांनी अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस व्हावे, वर्किंग कमिटीवर अजून एक-दोन समाजवादी लोक घ्यावेत, असेच सरदार आणि नेहरू यांना वाटत होते; पण समाजवाद्यांनी संविधान सभेवर जवळपास बहिष्कार घातलेला होता. या चिडीच्या व रागाच्या पोटी काही कठोर वाक्ये खाजगी बैठकीत सरदार बोलले असतील इतकेच काय ते; पण जेव्हा समाजवाद्यांनी फुटून निघण्याचा निर्णय घेतला व ते पक्ष सोडून बाहेर पडले, तेव्हा सरदारांचा संताप उफाळून आला. आणि मग संतापाच्या भरात त्यांनी समाजवाद्यांना 'कुत्र्या'ची उपमा दिली. हे सगळे जरी खरे असले तरी समाजवाद्यांनी काँग्रेसबाहेर पडावे असे कुणालाच वाटत नव्हते. नेहरूंनाही वाटत नव्हते. सरदारांनाही वाटत नव्हते. पंडित नेहरूंनी तर पहिली सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर पुन्हा एकदा एकत्र येण्याचा प्रयत्न करून पाहिला होता. निवडणुकीत पराभूत झालेल्या समाजवाद्यांनी अटी घालाव्यात आणि विजयी काँग्रेसने अटी मान्य कराव्यात हे शक्यच नव्हते. म्हणून ही बोलणी फिसकटली.

मी विचारले, " काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय व्यक्तिशः तुम्हांला मान्य होता काय ? " अच्युतराव म्हणाले, " हा निर्णय मला मान्य होता आणि नव्हता असेच म्हटले पाहिजे. समाजवादी समाजरचना क्षणिक लोकप्रियतेच्या जोरावर साकार करता येईल असे मला कधीच वाटत नव्हते. त्यासाठी एका ध्येयवादी, शिस्तबद्ध संघटनेची गरज आहे असे मला वाटे. काँग्रेस ही स्वातंत्र्य मिळवण्यासाठी येतील त्या सर्वांना बरोबर घेऊन निर्माण झालेली संघटना होती. ही संघटना ध्येयवादी समाजवाद्यांची शिस्तबद्ध संघटना होणे कधीच शक्य नव्हते. काँग्रेसमधून बाहेर पडूनच समाजवाद्यांना केव्हा तरी आपली संघटना निर्माण करणे भाग होते. या दृष्टीने मी काँग्रेसबाहेर पडण्यास नुसता तयारच नव्हे तर उत्सुक होतो; पण आमच्या सहकाऱ्यांना नव्याने शिस्तबद्ध संघटना 
निर्माण करण्याची स्वस्थता नव्हती. कारण त्यासाठी दीर्घकाळ वाट पाहावी लागली असती. काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्ष विसर्जित करणे व काँग्रेसबाहेर पडून नवी संघटना निर्माण करणे हे सोपे काम नव्हते. त्यासाठी दीर्घकाळ सत्तेपासून दूर राहण्याची मनाची तयारी असणे आवश्यक होते. " मी म्हटले होते, " पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत आपण फक्त दहा टक्के जागा लढवू आणि त्यापैकी पाच टक्के जागा निवडून येतील खात्री बाळगू. एकीकडे कम्युनिस्ट आणि दुसरीकडे काँग्रेस या दोघांच्याहीपेक्षा निराळी अशी प्रतिमा आपल्याला निर्माण करावी लागेल. त्यासाठी काही वर्षे तरी संसदेत Corrective force या नात्याने आपण काम केले पाहिजे. काँग्रेसला पर्यायी पक्ष म्हणून मैदानात उतरण्याची वेळ अजून फार दूर आहे. "

" सिनेमा-नट्यांना ज्याप्रमाणे एकाएकी उदंड लोकप्रियता मिळालेली असते, तशी बेचाळीसच्या चळवळीने आम्हांला उदंड लोकप्रियता मिळाली होती. नेहरूंच्या बरोबरीने आमच्या सभांना गर्दी जमे; पण ही गर्दी म्हणजे संघटना नव्हती; एक क्रान्ती धीमेपणाने साकार करणे गर्दीला शक्य नसते. ही लोकप्रियता दमादमाने ओसरणारच होती, तशी ती पुढे ओसरली; पण आमच्या सहकाऱ्यांना असे वाटत होते की, पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीतच आपण पर्यायी पक्ष म्हणून उभे राहू शकतो. बिहारमध्ये नक्की आणि उत्तर प्रदेशात बहुधा आपण स्वतःच्या शक्तीवर आपले सरकार बनवू. संसदेत आपल्याला बहुमत मिळणार नाही. त्यासाठी लागणाऱ्या लोकसभेच्या २५६ जागा आपल्याला मिळणार नाहीत; पण १५० पर्यंत जागा आपण सहज मिळवू शकू असे आमच्या सहकाऱ्यांना वाटे. या उद्योगात मिळेल तो माणूस समाजवादी पक्षात दाखल करून घेणे आणि संघटनेला दर्शनी भव्य रूप देणे हा उद्योग करण्यातच आमचे कार्यकर्ते गढलेले होते. असल्या प्रकारची सापडेल

त्यांची संघटना उभारून जर आपण पुढे जाणार असू, तर त्यापेक्षा कॉंग्रेसमध्येच राहून सत्तेत सहभागी होणे काय वाईट, असे मला वाटे. पर्यायी पक्ष होण्याच्या भूमिकेतून कॉंग्रेसबाहेर पडण्याची माझी तयारी नव्हती.

"ज्या पद्धतीने कॉंग्रेसबाहेर पडण्यापूर्वी आमची माणसे बोलत होती, वागत होती व ज्या पद्धतीने पक्षाबाहेर पडल्यानंतर ती वावरत होती ते पाहता पक्षासमोर प्रचंड पराभव आणि वैफल्य लवकरच वाढून येणार आहे हे मला दिसत होते. या पक्षाच्या संस्थापनेपासून त्याच्याशी माझा संबंध होता. तो पक्ष सोडून इतरत्र मी कोठे जगावे ही कल्पनाही मला सहन होणे शक्य नव्हते. मला सत्तेचा मोहही नव्हता. ज्यांच्या भवि- १०७
तव्याशी आपले भवितव्य निगडित झाले आहे त्यांना आपण काही पटवून देऊ शकत नाही हे जेव्हा मला कळले तेव्हा निवृत्त होणे हा एकच पर्याय माझ्यासमोर शिल्लक होता. राजकीय नेत्यांच्यावर अनुयायांची जबाबदारी असते. संकटाच्या प्रसंगी किंवा बुडणाऱ्या बोटीतून कॅप्टनला पळता येत नसते. पक्षाचा पराभव झाल्यानंतर हवालदिल कार्यकर्त्यांना सोडून जर मी पळालो असतो, तर ते नेत्याला शोभणारे वर्तन झाले नसते, ते बुडणाऱ्या बोटीतील उंदरांचे झाले असते. मी अशा वेळी वेगळा झालो की, ज्या वेळी 'चला, ब्याद मिटली' म्हणून अनेकांना हायसे वाटले. माझ्या जाण्यामुळे कुणाचे नीतिधैर्य खचले नाही. जयप्रकाशांच्याप्रमाणे एका मोहक स्वप्नरंजनाच्या नादी लागून मी पक्षाचा प्रचंड पराभव ओढवून घेतलेला नव्हता आणि खडकावर आदळून तारू फुटल्यानंतर पहिल्यांदा कॅप्टननेच पळावे, तसा मी पक्षीय राजकारणातून एकाएकी निवृत्त झालेलो नव्हतो. पराभवाच्या वैफल्याने ग्रस्त होऊन मी माझा मोर्चा सत्ताधारी पक्षाकडेही वळवला नाही. मी गप्प बसलो, आणि माझ्या मित्रांची वाट मी मोकळी करून दिली.

"आजही मला असे वाटते की, समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष या संघटना एकदा विसर्जित करून टाकाव्यात आणि नव्याने ध्येयवादी शंभर कार्यकर्ते घेऊन पुन्हा एकदा पक्षाची मांडणी करावी. व्यावहारिक राजकारणात हे शक्य नसते; पण हे करण्याचा निर्णय जर समाजवाद्यांनी घेतला, तर त्या दलात शिपाई म्हणून दाखल होण्याची माझी तयारी आहे. जगापासून दूर राहून योगसाधना करण्यावर माझा कधीच विश्वास नव्हता. मी निवृत्त होऊन काशी येथे जाऊन बसलो, पण तिथे माझा प्राणायाम आणि योगसाधना यात वेळ मी खर्चिला नाही. मी कॉलेज काढले. निवृत्त झालेल्या एकाकी माणसाला एवढेच करता येणे शक्य होते."

अच्युतरावांच्या स्वतःच्या राजकारण-निवृत्तीचे दिलेले हे स्पष्टीकरण मला अनपेक्षित होते. समाजवादी पक्षातील खालचे कार्यकर्ते सत्ता जवळ आली आहे या भावनेतच ५२ साली वावरत होते, हे मी पाहिलेले आहे. पण सर्वोच्च नेतेही याच पद्धतीने विचार करत होते. त्यांना आपला पराभव दिसत नव्हता, ही गोष्ट आश्चर्यकारक मानली पाहिजे. प्रौढ मतदानावर आधारलेल्या निवडणुकांत काय घडत असते याची कल्पना समाजवादी सर्वोच्च नेतृत्वालाही नव्हती हे एक ऐतिहासिक सत्य दिसते.

मी अच्युतरावांना विचारले, आपण निवृत्त झाल्यानंतर एकदम काशीकडे का गेलात ? आपल्याला महाराष्ट्रात रहावेसे का वाटले नाही ? अच्युतराव म्हणाले, "मी जन्माने महाराष्ट्रीय, पण स्वातंत्र्यपूर्वकाळीही दीर्घकाळ मी काशीतच होतो. विद्यार्थी म्हणून, प्राध्यापक म्हणून, नंतर राजकीय कार्यकर्ता म्हणून माझा काशीशीच संबंध आला. महाराष्ट्राच्या राजकारणाशी माझा संबंध प्रत्यक्षपणे फार उशीरा आला. महाराष्ट्रात माझे मन कधी रमू शकले नाही. आजही महाराष्ट्रात आलो की मला गुदमरल्यासारखे होऊ लागते. 

"काशीच्या परिसरात मी इतकी वर्षे राहिलो, त्यात अनेक बरे-वाईट प्रसंग आले. भांडणे-मारामाऱ्या झाल्या, तरुण वयात मार दिला, मार खाल्ला; पण मला कधी कुणी 'ए मराठ्या, तू काशीत कशाला मरायला आलास ?' असे विचारले नाही. 'तुम्ही महाराष्ट्रीय का ?' असे कुणी इतर प्रांतीयांनी विचारले की माझे मन व्याकुळ होऊन उठते. अखिल भारतीय एकात्मता आमची पिढी या देशात फारशी रुजवू शकली नाही, याची खंत जाणवत राहते. ठिकठिकाणी महाराष्ट्रातला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद आपल्याला चोहोबाजूने घेरतो आहे असे मला वाटते. मी सनातनी कधीच नव्हतो, आरंभापासून माझ्या श्रद्धा समाजवादीच राहिल्या; पण हे महाराष्ट्रातील बहुजनसमाजाला मनापासून पटू शकेल काय ? स्वातंत्र्यपूर्वकाळातही काँग्रेसमध्ये ब्राह्मणेतर पक्ष होताच; पण त्या वेळी एक लढाई चालू होती. लढाई चालू असली म्हणजे क्षुद्र गोष्टी दबलेल्या असतात. लढा संपला म्हणजे त्या बावी उफाळून येतात. अनेक कारणांनी मला काशी शहर आवडत होते. मी तिथे गेलो. माझ्या भूमिका अचूक ठरल्या या गोष्टीचेच मला दुःख आहे. माझ्या मित्रांच्या भूमिका अचूक ठरून समाजवादी पक्ष पर्यायी पक्ष म्हणून उभा राहता तर माझी मते चूक ठरली असती; पण त्यात मला आनंद व समाधान लाभले असते."

माझी इच्छा पुन्हा एकदा अच्युतरावांचे विवेचन हिन्दू-मुस्लिम प्रश्नाकडे वळवावे अशी होती. म्हणून मी त्यांना विचारले, "आपण दुसऱ्या

विषयाकडे वळू या काय? मला Communal Triangle च्या संदर्भात अजून काही विचारावयाचे आहे." त्यांची संमती घेऊन मी विचारले, "खरोखर, हिंदू-मुस्लिम संघर्ष इंग्रजांनी निर्माण केला, आणि इंग्रज जाताच तो संघर्ष संपेल असे त्या काळी तुम्हांस वाटत होते काय? की राजकारणाच्या दृष्टीने ही सोयीस्कार भूमिका म्हणून त्या काळी तुम्ही स्वीकारलेली होती? तुम्हांला इंग्रज येण्यापूर्वीच्या– भारत-इतिहासातील हिन्दू-मुस्लिम संघर्ष दिसत नव्हता काय?" अच्युतराव म्हणाले, "एक गोष्ट तुम्ही स्पष्टपणे समजून घ्या. हिन्दू-मुस्लिम समस्येचे रूप ओळखण्यात आमची चूक झालेली आहे. ती चूक आज आम्हांला स्पष्टपणे दिसत आहे. इतर कुणी हे मान्य करणार नाही. मी माझ्या विवेचनाची चूक जाहीर रीत्या मान्य केली आहे; पण या प्रश्नाचे स्वरूप आम्हांला त्या वेळी कळले होते, सत्य तेव्हाही ज्ञात होते; फक्त ते मांडणे सोयीस्कार नव्हते, म्हणून आम्ही मांडीत नव्हतो. ही भूमिका दांभिकपणाची ठरेल. खरोखरच, त्या वेळी आम्हांला वाटे, इंग्रज निघून गेले तर हा प्रश्न समाप्त होईल." १०९

अच्युतराव म्हणाले, "आमची मुख्य चूक मानवी मनाचा चिवट परंपरावाद आणि त्याचे तितकेच बळकट स्वरूप ओळखण्यात झाली आहे. त्या काळीं आम्हांला प्रामाणिकपणे असे वाटे की, आपल्या प्रजेला गुलाम करणारे, लुटणारे, त्यांना मागासलेले ठेवणारे, व या लुटीवर स्वतःचा चैनभोग, विलास चालवणारे संस्थानिक तिरस्कारार्ह आहेत. या मंडळींच्याविषयी आमच्यासारखाच तिरस्कार पिळल्या जाणाऱ्या, लुटल्या जाणाऱ्या सामान्य जनतेला वाटत असणार याविषयी आमची खात्री होती. सर्वसामान्य जनतेला मतदानाचा हक्क दिला, तर अंधश्रद्ध परंपरावादी मन श्रद्धेने, प्रचंड बहुमताने आपल्या नालायक राजांना निवडून देईल, असे आम्हांला कधीच वाटले नव्हते. शेतमजुराच्या मतांवर जमीनदार निवडून येतो आणि दरिद्री जनतेच्या मतावर स्वातंत्र्यद्रोही राजे निवडून येतात. इतका परंपरावाद बळकट असतो, असे आम्हांला कधीच वाटले नाही. आम्ही स्वप्नाळूच होतो. पुरोगामी कार्यक्रम जनतेच्या कल्याणाचा असतो. तिची गुलामी संपवणारा असतो; म्हणून जनता नेहमीच त्या बाजूने उभी राहते, व उभी राहील असे आम्हांला वाटे. प्रौढ मतदानाने जनतेच्या शक्ती मोकळ्या होतील व हितसंबंधियांचा पाडाव होईल, अशी आमची खात्रीच होती. प्रौढ मतदानाने सगळा सुधारणावाद उद्ध्वस्त होतो, संधिसाधू परंपरावाद बळकट होतो, हे भयानक सत्य आज आम्ही पाहतो आहोत. परंपरेने मानवी मन किती गुलाम झालेले असते, या परंपरेला जाती, प्रांत, धर्म, संस्कृती यांचा किती बळकट आधार असतो याची जाणीव तेव्हा आम्हांला

आलीच नाही. निदान मला आली नाही.

“ मुसलमान झाला तरी सामान्य माणूस असतो. त्यालाही दारिद्र्य नको असते. त्यालाही स्वातंत्र्य हवे असते. त्यालाही विकासाची संधी हवी असते. हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांत शतकानुशतके शहरात व खेड्यात मुसलमान राहिले आहेत. समान नागरिकत्वाची, समान विकासाची व उदार शांततेची हमी मिळाल्यानंतर त्यांना काय म्हणून फुटावेसे वाटेल, असे आम्हांला वाटे. मुस्लिम संस्थाने संपल्यानंतर, विभक्त मतदारसंघ गेल्यानंतर व यू. पी. तील मुस्लिम जमीनदारी संपल्यानंतर इंग्रज नसलेल्या स्वतंत्र भारतात मुस्लिम जातीयवाद टिकेल तरी कसा ? थोडी उदार वागणूक ठेवून मुसलमानांच्या मनातील भीती दूर केली, तर हा मुस्लिम ११० समाज राष्ट्रप्रवाहात आपोआप विलीन होऊन जाईल, असे नेहरूंना वाटे. प्रौढ मतदानाच्या आरंभामुळे अल्पसंख्य मुस्लिम समाज परंपरावाद उफाळून पुन्हा नव्याने संघटित होईल असे आम्हांला वाटतच नव्हते. परिणामी भांडणे लावणारी तिसरी सत्ता गेली म्हणजे हा प्रश्न आपोआप मावळेल असे आम्हांला वाटे. ही आमची प्रामाणिक भूमिका होती. आमच्या भूमिका कितीही प्रामाणिक असोत, इतिहासाने त्या खोट्या ठरवल्या; म्हणून सगळाच विचार नव्याने केला पाहिजे. ”

मी विचारले, “ आज तुम्ही घटना करायला बसलात तर प्रौढ सार्वत्रिक मतदान द्याल काय ? ” अच्युतराव म्हणाले, “ पुरेसे आधुनिक शिक्षण दिल्याशिवाय आणि काही महत्त्वाच्या मूलभूत सुधारणा समाजात रुजल्याशिवाय मी प्रौढ मतदानाचा अधिकार देणार नाही. अस्पृश्यता शिल्लक ठेवणाऱ्या खेड्याला किंवा समान नागरिकत्व, समान कायदा, संसदेचे सार्वभौमत्व या मूलभूत कल्पनाच ज्यांना मान्य नाहीत, त्यांना मी मतदानाचा अधिकार देणार नाही. तेव्हा मात्र प्रौढ सार्वत्रिक मतदान हे जीवनाला पुरोगामी वळण देण्यास योग्य ते सामर्थ्य प्रदान करील असे आम्हांला वाटत होते.

“ गोंधळातून संघटना ( Chaos मधून Order ) आपोआप निर्माण होते, असे त्या वेळी मला वाटे. आज वाटत नाही. शतकानुशतके Chaos तसाच शिल्लक राहू शकतो, तो आपोआप संपत नसतो. Order ही प्रयत्नाने निर्माण करावी लागते, असे मला वाटू लागले आहे. म्हणून गेली वीस वर्षे हा भारतीय लोकशाहीचा संक्रमणकाळ आहे, ती क्रमाने शुद्ध होत जाईल, गाळ आपोआप खाली बसेल असे मला वाटत नाही. त्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज आहे. ”

सहज बोलता बोलता विज्ञानाचाही विषय निघाला. अच्युतराव म्हणाले, " मला अणुयुद्धाची फारशी भीती वाटत नाही. त्याहून जास्त भीती इतर शोधांची वाटते. निकामी झालेले अवयव बदलून आपण त्याच शरीरात हळूहळू नवे अवयव बसवू लागलेलो आहोत. हाड तुटले, नवे हाड; डोळा गेला, नवा डोळा; हृदय बंद पडले, नवे हृदय; ही प्रगती मला जास्त भयानक वाटते. कारण यामुळे माणसाचा यंत्रासारखा विचार होण्यास आरंभ होतो. यंत्रांना उपयोगिता असते, बाजारभाव असतो; त्यांना मूल्य आणि पावित्र्य नसते. विज्ञानाचे प्रगत रूप माणसाचे माणूसपणच नष्ट करील की काय, याची मला भीती वाटू लागली आहे; पण देशातील एकाही जबाबदार नेत्याला हा प्रश्न सचिंत करीत असताना दिसत नाही, हे पाहिल्यानंतर तर मला अधिकच चिंता वाटू लागली आहे." मी म्हटले, " आईचे आणि बापाचे साहाय्य घेतल्याविना प्रयोगशाळेत माणसांचे उत्पादन करता येणे शक्य होण्यासाठी अजून फार अवकाश आहे." अच्युतराव म्हणाले, " या ' फार 'ला अर्थ नसतो; हे केव्हा जमेल याची खात्री देता येत नाही. हे जमल्यानंतर माणसाची किंमत काय राहील ? "



वर जे लिहिले आहे ती म्हणजे अच्युतरावांची मुलाखत नव्हे. कित्येक तास आम्ही बोलत होतो. त्यामधील हे ठळक ठळक विचार आहेत, आणि तेही स्मरणाच्या आधारे नोंदलेले आहेत. अच्युतराव सोयीसोयीने मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषा वापरीत होते. त्यांचा प्रत्येक शब्द जसाच्या तसा सांगणे मला शक्य नाही. म्हणून वरील विचार ज्या भाषेत मांडलेले आहेत त्यांचा विचार शब्दशः अक्षरशः असा करायचा नाही. स्थूलमानाने मी त्यांचा आशय माझ्या शब्दात व जसा मला समजला तसा नोंदवलेला आहे. अच्युतराव इतकेच बोलले नाहीत. इतर अनेक गप्पा-गोष्टीही झाल्या. त्यात अनेक व्यक्तींचे बरेवाईट उल्लेखही आले. सार्वजनिक दृष्टीने जे ठळक ठळक विचार मला महत्त्वाचे वाटले त्यांचीच फक्त ही नोंद आहे. इतर वैयक्तिक बाबी या माझ्या जिज्ञासेच्या समाधानासाठी होत्या. समाजवादी नेत्यांच्या व्यक्तिगत माहितीच्या संदर्भात होत्या. वर अच्युतरावांचे जे विचार मांडण्यात आलेले आहेत, त्यात न कळत एखादी काही गोष्ट झाली असेल तर तशी काही चूक होण्याचा संभव मी गृहीत धरला आहे. त्या चुकीची जबाबदारी अर्थातच मी घेतली पाहिजे.

# आधुनिक भारतीय राजकारणात मुसलमानांचा प्रश्न



भारतीय राजकारणात मुसलमानांच्या प्रश्नाकडे आजतागायत राजकीय विचारवंत अल्पसंख्याकांचा प्रश्न या नात्यानें पाहत आले. अल्पसंख्याकांचा प्रश्न हे स्वरूप मुस्लिम राजकारणाला लागू आहेच. स्वातंत्र्यपूर्वकाळी किंवा स्वातंत्र्योत्तरकाळी भारतात मुसलमान अल्पसंख्य होतेच, आजही ते अल्पसंख्यच आहेत. या देशात मुसलमान अल्पसंख्य आहेत, ही एक वस्तुस्थिती असल्यामुळे ( Matter of Fact ) मुस्लिम राजकारणाला अल्पसंख्याकांच्या राजकारणाचे काही पदर आहेत; पण हे त्या प्रश्नाचे मुख्य स्वरूप नाही किंवा मध्यवर्ती स्वरूपही नाही. अल्पसंख्य राजकारणात नेहमी काही मुद्दे असतात. आपण अल्पसंख्य आहोत म्हणून आपल्या अस्तित्वावर घाला घातला जाईल, आपल्याला विकासाची समान संधी मिळणार नाही, नागरिक म्हणून समानतेने वागवले जाणार नाही, या भीतीतून अल्पसंख्याकांचे राजकारण निर्माण होत असते. म्हणून अल्पसंख्य लोक समान हक्क, समान नागरिकत्व, विकासाची समान संधी व अस्तित्व टिकवण्याचा हक्क या मागण्या करीत असतात. अल्पसंख्याकांच्या राजकारणाचा उदय भीतीपोटी होत असतो. सर्वसामान्यांच्या हिताशी आपली वागणूक सुसंगत आहे, हे बहुसंख्याकांना पटवून देऊन त्यांच्या मनात स्वतःविषयी विश्वास जागा करावा आणि त्या मोबदल्यात समतेचे हक्क मिळवावेत ही अल्पसंख्याकांची रीत असते. बहुसंख्येची भीती हा या राजकारणाचा पाया असल्यामुळे, बहुसंख्याक समाजाकडून अल्पसंख्याकांना दिली जाणारी उदार, समंजस व सहिष्णू वागणूक हा या ठिकाणी रोग निवारण्याचा उपाय असतो.

जर भारतीय राजकारणातील मुस्लिम प्रश्नाचे स्वरूप असे केवळ अल्पसंख्य राजकारणाचे असते, तर पाकिस्तानात अल्पसंख्याकांना जी वागणूक मिळाली त्याचा सूड भारतात घेतला जाऊ नये यासाठी भारतीय नेते सतत दक्ष राहिले, याची कृतज्ञता मुस्लिम राजकारणात आढळली असती. नागरिकत्वाचे समान हक्क मिळाल्यानंतर सर्वोच्चपदी आवर्जून

काही मुस्लिम सदस्य घेण्याची प्रथा पाहिल्यानंतर या अल्पसंख्येला स्वतंत्र भारताचे संविधान आणि पंडित नेहरूंच्यासारख्यांचे नेतृत्व हा फार मोठा आधार वाटला असता. आपण भारताशी, येथील लोकशाहीशी अत्यंत एकरूप झालो आहोत, हे बहुसंख्येला पटवून देण्याची धडपड मुस्लिम समाजाने केली असती. तसे घडत असल्याचे भारतात दिसत नाही. याचे कारण असे की, मुस्लिम प्रश्न हा गौणत्वाने अल्पसंख्याकांचा प्रश्न आहे, प्राधान्याने त्या प्रश्नाचे स्वरूप निराळे आहे. केवळ संख्या मोजूनच सारे प्रश्न समजत नाहीत. ऱ्होडेशियासारख्या देशात केवळ संख्येच्या दृष्टीने पाहिले तर युरोपियन गोरे लोक अल्पसंख्यच आहेत; पण म्हणून ऱ्होडेशियातील गोऱ्यांचे राजकारण हे अल्पसंख्याकांचे राजकारण आहे असे म्हणणे हास्यास्पद ठरेल. संख्येने अल्प असलेल्या जेत्यांच्या वरिष्ठ अहंतेचे ते राजकारण आहे. आपण जेते असल्याची, एकमेव वरिष्ठ संस्कृतीचे पाईक असल्याची प्रखर जाणीव भारतीय मुसलमानांच्यामध्ये आहे. हा दहा-अकरा टक्के समाज दरमहा अधून मधून रक्तपाताच्या धमक्या देतच असतो, त्याचे कारण हे आहे. 

ऱ्होडेशियातील गोरे लोक आणि भारतातील मुसलमान यांच्या प्रश्नाचे स्वरूप एकच आहे काय ? तसे ते एक नाही हे स्वच्छ आणि उघड आहे. ऱ्होडेशियातील गोरे लोक शिक्षणात पुढारलेले, तंत्रज्ञानात पुढारलेले, शस्त्रबळ व संपत्ती या दृष्टीने सुसज्ज असे आहेत. शिवाय सत्ताही त्यांच्याच ताब्यात आहे, सैन्यही त्यांचेच आहे. भारतीय मुसलमानांची परिस्थिती यापेक्षा अगदी निराळी आहे. त्यांच्या ताब्यात सत्ता नाही, सेना नाही, शस्त्रसज्जता नाही. इतरांच्या मानाने म्हणजे ख्रिश्चन, पारशी व सवर्ण हिंदूंच्या मानाने भारतीय मुस्लिम समाज शिक्षणात मागासलेला आहे, तंत्रज्ञानात मागे आहे, आर्थिक दृष्टीने गरीब आहे. त्यामुळे ऱ्होडेशियाच्यापेक्षा भारतीय मुसलमानांचा प्रश्न सर्वस्वी निराळा आणि स्वतंत्र आहे. ऱ्होडेशियात शस्त्रबळाने प्रतिकार याखेरीज इयान स्मिथच्या राजवटीला दुसऱ्या कुण्या मार्गाने प्रतिकार शक्य नाही. भारतीय परिस्थिती याहून मूलतः निराळी आहे. येथे शस्त्रबळाचा विचार करण्याची गरजच निर्माण होत नाही. तरी मी ऱ्होडेशियातील गोऱ्या लोकांचे उदाहरण दिले. परिस्थिती कितीही भिन्न असली किंवा परिस्थिती संपूर्ण एकमेकांच्या विरोधी असली तरी मनोवृत्तीत असणारा वरिष्ठत्वाचा अहंकार हा दोन्ही ठिकाणी समान आहे. मुसलमान स्वतःला जगातील सर्वोच्च, सर्वश्रेष्ठ धर्माचा पाईक मानतो. म्हणून तो स्वतःची संस्कृती सर्वोच्च व आदर्श मानतो. हिंदूंचा धर्मच सदोष, अपूर्ण व मिथ्या असल्यामुळे या धर्मात परिवर्तन व क्रांती संभवते हे त्याला मान्य आहे. हिंदू धर्मात

ज्या विविध सुधारणा होत आहेत आणि झाल्या, त्या मुसलमान समाजाला समर्थनीय व रास्त वाटतात. प्रश्न फक्त स्वतःच्या समाजाचा आहे. आपल्या समाजात कोणत्याही सुधारणेला वाव नाही, असे त्याला वाटते. या राजकारणाचे हे स्वरूप दुहेरी गुंतागुंत निर्माण करते. एक तर त्यामागे मुस्लिम समाजाच्या श्रेष्ठत्वाची अहंता उभी आहे, दुसरी म्हणजे या अशा मुस्लिम राजकारणामुळे हिंदू समाजातील उदार मतवादाच्या परंपरा क्रमाने दुबळ्या होतात.

म्हणून मुस्लिम राजकारणाचा विचार बहुसंख्येचा प्रश्न म्हणून करणे भाग पडते. हिंदुस्थानात स्वातंत्र्योत्तर काळात एक भयावह परिस्थिती निर्माण होत आहे. ही परिस्थिती म्हणजे हिंदू जातीयवाद क्रमाने बलवान करणारी परिस्थिती आहे. हिंदू समाजात असणारी परंपराप्रियता आणि धार्मिकता या बाबी निराळ्या आहेत आणि जातीयवादाची वाढ ही निराळी बाब आहे. या दोन्हींतील फरक आपण नीट ओळखला पाहिजे. १९६९ च्या मानाने ५० वर्षांपूर्वी म्हणजे १९१९–२० ला किंवा ७५ वर्षांपूर्वी म्हणजे १८९५–९६ ला आजच्या मानाने जीवनाचे आधुनिकीकरण कमी होते. परंपरेचे सामर्थ्य आणि मनाची धार्मिकता ही आमच्या मानाने जास्त होती. पण जातीयवादी राजकारण अतिशय कमकुवत व दुबळे होते. हिंदूंनी एकत्र यावे, त्यांनी हिंद्वेतरांचा प्रतिकार करावा, हिंद्वेतरांना राजकीय हक्क असू नयेत, आर्थिक हक्क असू नयेत, अशी जाणीव हिंदू समाजात बलवान नव्हती. इ. स. १९२८ सालपर्यंत हिंदू महासभेचे अधिकृत ध्येयधोरणच भारतीय काँग्रेस बलवान करणे हे होते. पुढे सावरकरांच्यासारखा त्यागी देशभक्त, बुद्धिमान नेता जवळ असूनसुद्धा हिंदू महासभा अशिक्षित अगर सुशिक्षित हिंदूंत फार मोठे बळ निर्माण करू शकली नाही. मुस्लिम समाजात काँग्रेसला पाठिंबा नव्हताच. हिंदू समामाजातील पाठिंबा, हिंदू सुशिक्षितांतील पाठिंबा हेच काँग्रेसचे खरे बळ होते. आज ही परिस्थिती बदललेली आहे. सुशिक्षित हिंदूंतील मोठा तरुण वर्ग झपाट्याने जातीयवादी राजकारणाकडे वळत आहे, आणि सर्वसामान्य जनतेतही या वर्गाची प्रतिष्ठा मोठ्या प्रमाणात वाढत आहे. हा जातीयवादी राजकारणाचा प्रवाह म्हणजे धार्मिक मनोवृत्तीचा आविष्कार नव्हे. आधुनिक जातीयवादी संघटनांत असणारा तरुण मनाने धार्मिक नाही. रूढ परंपरांच्याविषयी त्याच्या मनात आस्था नाही; मात्र तो हिंद्वेतरांच्या बरोबरीच्या हक्कांना मान्यता देण्यास तयार नाही.

थोडक्यात या प्रश्नाचे स्वरूप असे आहे की, परंपरेने विशेषाधिकार उपभोगीत आलेल्या मुस्लिम समाजाला आपण गमावले काय याची अधिक चिंता आहे. समान नागरिकत्वावर मुस्लिम राजकारणाला संतोष

नाही. प्रतिक्रिया म्हणून हिंदू जातीयवादी राजकारण समान नागरिकत्वाचा हक्कच अमान्य करण्याच्या दिशेने वळू लागलेले आहे. याचा शेवट फक्त यादवी युद्धात होऊ शकतो. ही परिस्थिती भयावह आहे.

मुस्लिम राजकारणात वरिष्ठत्वाचा अहंकार हा एक फार मोठा भाग आहे. या अहंकाराचा प्रश्न असला म्हणजे त्याला उत्तर उदारमतवाद हे नसते. अहंकाराला उत्तर चोंभाळणे नसून निर्भय व कठोर चिकित्सा हेच असू शकते. भारतातील सेक्युलर विचारसरणीची सर्वांत दुबळी जागा ही आहे. मुस्लिमांच्यामधील वरिष्ठत्वाच्या अहंकाराची चिकित्सा करणे ही पद्धत स्वतःला सेक्युलर मानणाऱ्या मंडळींनी सदैव टाळलेली आहे. सेक्युलर म्हणणाऱ्यांचा उदार-मतवाद आणि मुस्लिम राजकारणातील  वरिष्ठत्वाचा अहंकार या दोन बाबी एकत्र आल्या म्हणजे जातीयवाद्यांशी तडजोडीच नवे राजकारण सुरू होते. सेक्युलर म्हणवणाऱ्या मंडळींनी सतत या तडजोडीची प्रथा ठेवल्यामुळे मुस्लिम समाजात उदार-मतवादी परंपरा निर्माण होणे अशक्य झाले आहे. त्याचप्रमाणे हिंदू समाजातील वाढणाऱ्या जातीयवादी प्रभावाला आवर घालण्यास सेक्युलर संप्रदायाची मंडळी असमर्थ ठरलेली आहे. चुकीच्या गृहीतकृत्यातून निर्माण झालेल्या भूमिका मूळ प्रश्न सोडवू शकत नाहीत. मुस्लिम राजकारणातील अल्पसंख्याकांच्या राजकारणाच्या सर्व रास्त धाग्यादोऱ्यांना भारतीय संविधान हे उचित उत्तर आहे. म्हणून संविधानावर निष्ठा बळकट करीत नेणे हा पूर्वार्ध, आणि अहंकाराला चिकित्सा हेच उत्तर असू शकते, हा उत्तरार्ध. ही दोन सूत्रे जर स्वीकारली नाहीत तर भारतीय राजकारणात सेक्युलर विचारधारेचा पराभव आता अटळ दिसू लागलेला आहे.

वर ' कठोर चिकित्सा ' असा शब्दप्रयोग केलेला आहे. हा शब्दप्रयोग म्हणजे अधिक्षेप, अवमान, व अप्रतिष्ठा करण्याचा हक्क असा कुणी गैर-समज करून घेऊ नये. कारण अधिक्षेपातून फक्त कटुता वाढतात, परिवर्तनाची शक्यता कमी होते. आपण हृदय-परिवर्तनाच्या, विचारपरिवर्तनाच्या नेहमी गोष्टी सांगतो. विचारपरिवर्तनासाठी औदार्यपूर्वक विश्वास संपादन करणे आणि हित समजावून देणे हाच एकमेव मार्ग आहे ही समजूत चुकीची आहे. चिकित्सेतूनसुद्धा सत्यच कळत असते. वास्तवाचे नवे अर्थ कळू शकतात, त्यामुळे विचारपरिवर्तन होतेच. चिकित्सेच्या दृष्टीने मुस्लिम प्रश्न मी चार गटांत विभागतो. या प्रश्नाचा पहिला भाग आद्य इतिहासाचा आहे. ज्यात प्रेषित महमद पैगंबर यांचे जीवनचरित्र, त्यांचे शेवटचे प्रेषित असणे, पवित्र कुराण या ग्रंथाचा परंपरेने लावलेला अर्थ, या ग्रंथांची चिकित्सा, पवित्र चार खलीफा, त्यांच्या कार्याचे ऐतिहासिक रूप, चार मुस्लिम न्यायसंप्रदाय व त्यांच्या भूमिका यांबाबत

सामाजिक व ऐतिहासिक मूल्यमापन या प्रश्नाचा होईल. दुसरा भाग महमद घोरीपासून इ. स. १८५७ पर्यंतच्या मुस्लिम राजसत्तेच्या, त्याच्या वागणुकीच्या आढाव्याचा होईल. तिसरा भाग इंग्रजी अमदानीतील मुस्लिम राजकारणाचा, व चौथा भाग स्वातंत्र्योत्तर काळातील मुस्लिम राजकारणाचा आहे. या चारही भागांत चिकित्सेच्या परंपरा सुरू करण्यात झालेली टाळाटाळ, हे आजच्या मुस्लिम राजकारणाचे सर्वांत मोठे दुखणे आहे.

या सर्व बाबतींत मोठे चमत्कारिक व अडचणीचे प्रश्न आहेत. स्वातंत्र्यपूर्व-काळातील मुस्लिम राजकारणाचा विचार करताना मुसलमानांचे म्हणणे असे असते की, हिंदूंच्या आक्रमक जातीयवाद्यांना कंटाळून नाइलाजानें मुसलमानांनी फुटून निघण्याची भूमिका घेतली, आणि काँग्रेसनें फाळणीला मान्यता दिली म्हणून फाळणी झाली. फाळणीचा दोष सर्वस्वी हिंदू जातीयवाद्यांचा आहे, अशी ही मीमांसा आहे. मुसलमानांनी कधीच भारत हे एक राष्ट्र आहे हे मान्य केले नाही. त्यांचे राजकारण नेहमी स्वतंत्र राष्ट्रवादाच्या पायावर आधारलेले राहिले. मुस्लिम समाजात काँग्रेसला वजन नव्हते. चार प्रांत मुस्लिम बहुसंख्येचे होते. बहुसंख्याक मुसलमान किंबहुना जवळ जवळ सर्वच जण स्वतःला राष्ट्र मानीत. या वरिष्ठत्वाच्या अहंकारावर काँग्रेसचा उदार-मतवाद हा तोडगा नव्हता, म्हणून फाळणी झाली, हे तथ्यच मुसलमानांना मान्य नाही. ऐतिहासिक सत्याच्या बाबतीत तर काही बोलण्याची सोयच नाही. कुतुबुद्दीन ऐबक आपल्या शिलालेखात सांगतो, मी भोवतालची देवळे पाडून त्या दगडांनी ही मशीद बांधतो. समकालीन इतिहास-लेखक मोकळेपणानें आपल्या कत्तलीचे वर्णन करतात. अहमदशहा बहामनी सांगतो, मी विजयनगर-मध्ये तीन लाखांची कत्तल केली, त्यात दहा हजार ब्राह्मण होते. या घटनांच्याकडे मध्ययुगीन सरंजामशाहीतील क्रौर्य, मध्ययुगात असणारी शत्रूंना गुलाम करण्याची प्रथा, त्या युगातील धर्माच्या नावे झालेल्या कत्तली या संदर्भात पाहण्याची व वागण्याची पद्धत केवळ मुसलमानांची नव्हती. सम्राट अशोकासारखा शांततावादी राजाही लक्षावधींना गुलाम करीत असे; असे कुणी म्हटले तर ते मी समजू शकतो. कारण हे म्हणणे सत्याच्या जवळ जवळ जाईल. पण मुसलमानांचे म्हणणे असे की, भारतातील मुस्लिम राज्य औदार्य, सहिष्णुता व न्याय यांवरच आधारलेले होते; तर समंजसपणा हे या प्रश्नाचे उत्तर होऊ शकणार नाही.

ज्या ठिकाणी पवित्र कुराण आणि प्रेषित महमद पैगंबर यांचा संबंध येत नाही त्या ठिकाणी ही परिस्थिती आहे, तर मग ज्या ठिकाणी धर्माचा संबंध येतो त्या ठिकाणी तर परिस्थिती याहून नाजूक असणार हे उघड

आहे. नुकताच अर्नोल्ड टॉयन्बीच्या लेखावर बंगालमध्ये प्रक्षोभ माजला. टॉयन्बी हा काही मुसलमान नव्हे. तेव्हा महमद पैगंबरांना तो माणूस मानणार, परमेश्वराचा प्रेषित मानण्याची टॉयन्बीची जबाबदारी नाही. माणूस म्हटल्याच्या नंतर एका कर्तबगार माणसाची दुसऱ्या कर्तबगार माणसाशी तुलना होणारच. याबद्दल चिडून जाण्याचे काही कारण नाही, हे सांगण्याची जबाबदारी सेक्युलर मंडळींची होती, ती त्यांनी पार पाडलेली नाही.

यामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो तो असा की, मला मुसलमान नसण्याचा हक्क आहे की नाही ? या ठिकाणी 'हक्क' हा शब्द उचित व समर्थनीय यांच्याशी समकक्ष आहे. मी मुसलमान नाही हे सर्वच जण मान्य करतील; पण हे मान्य करणे म्हणजे वास्तवता (Reality) मान्य करणे, हक्क मान्य करणे नव्हे. समाजात काही माणसे चोरी करतात, ती चोर असतात. समाजात चोर असतात, चोर आहेत हे मान्य करणे म्हणजे वास्तवता मान्य करणे; पण ज्या क्षणी आपण चोरांचा चोर असण्याचा हक्क मान्य करू त्या क्षणी परिस्थिती बदलते. हक्क मान्य केल्यानंतर चोरी हा गुन्हा उरत नाही. परमेश्वर आहे, तो एक व सर्वश्रेष्ठ आहे, महमद त्याचा प्रेषित आहे, हा प्रेषित शेवटचा आहे, या प्रेषिताला दिलेला ग्रंथ म्हणजे पवित्र कुराण, हा एकमेव ईश्वरीय परिपूर्ण ग्रंथ आहे. म्हणून तो निर्दोष आहे. या श्रद्धा बाळगणारे उघडच मुसलमान असतात. मुसलमान नसणाऱ्यांना महमद पैगंबर प्रेषित नव्हे, कुराण ईश्वरी ग्रंथ नव्हे, असे म्हणण्याचा हक्क निर्माण होतो. हा हक्क मुसलमानांना मान्य आहे काय ? हा हक्क मुसलमानांनी मान्य करीपर्यंत मुसलमान समान नागरिकत्वाला अधिकारी होत नाहीत. हा मुद्दा जे मुस्लिम विचारवंत मान्य करण्यास तयार नाहीत त्यांच्या उदारमतवादाविषयी व त्यांच्या सेक्युलॅरिझमविषयी मी फार साशंक आहे. ११७

मुसलमान असे मानतात की, काही लोक अडाणी आहेत, त्यांचे अडाणी धर्म आहेत. आपल्या अडाणीपणाचा त्यांना अभिमान आहे, म्हणून ते मुसलमान नाहीत. हे काही जणाचे मुसलमान नसणे आम्ही क्षम्य मानू. त्यांना मुसलमान धर्माची श्रेष्ठता पटवून देऊ. ही त्यांना पटली नाही व अज्ञानातच ही माणसे मेली तर ती कायमच्या नरकाची धनी होतील हे उघड आहे. म्हणून म. गांधी स्वर्गात गेले असतील हेच मुसलमानांना मान्य नाही. अशा परिस्थितीत इतरांनी समंजसपणा दाखवावा ही मागणीच निरर्थक होत नाही काय ? सर्वश्रेष्ठ धर्माचे पाईक असल्याचा हा अभिमान पृथक राष्ट्रवादाचा पाया आहे व जेते असल्याचा इतिहास हा श्रेष्ठ संस्कृतीचे पाईक असल्याचा पुरावा आहे. या सूत्रातून सुसंगतपणे

भारतीय संसदेला मुस्लिम समाजाविषयी कायदे करण्याचा अधिकार निर्माण होत नाही ही भूमिका उगम पावते. धर्माच्या सामाजिक व ऐतिहासिक चिकित्सेची गरज यासाठी निर्माण होते. पहिल्या चार खलीफांच्या राजवटीची निर्दोषता सांगून आजच्या संसदेचे सार्वभौम अमान्य केले जाऊ लागले म्हणजे धर्माची चिकित्सा हा केवळ ज्ञानाचा ( Academic ) विषय न राहता राजकारणाच्या गरजेचा भाग होतो. मग हे सांगावे लागते की, ज्या कालखंडात हजरत अलीविरुद्ध हजरत आयेशा युद्धाला उभी राहिली त्या कालखंडात सगळेच काही ठीक होते असे नव्हे. मुसलमान झाल्यामुळे जीवन निर्दोष निर्माण होते असे नाही. आयेशाच्या शुद्धतेची ग्वाही ईश्वरी ग्रंथच देतो, आणि अली तर पवित्र खलीफा होता. कुणी तरी एक जण इस्लामचा गुन्हेगार म्हटला पाहिजे. हा प्रश्न विचारणाऱ्यांच्या विरुद्ध दगडफेक हे प्रश्नाचे उत्तर नव्हे ! ११८

समान नागरिकत्व ही कल्पनाच मुसलमानांना आवडत नव्हती. त्यांचा उदारमतवाद जास्तीत जास्त समान वाट्यापर्यंत जाऊ शकत होता. १८८९ पासून ही समान वाट्याची कल्पना पुनःपुन्हा सांगितली जाते. जमियत-उल्-उलेमाचीसुद्धा शेवटची भूमिका हीच होती. ७० टक्के हिंदूंना ४० टक्के जागा, २२ टक्के मुसलमानांना ४० टक्के जागा, इतर सर्व मिळून ८ टक्के, अल्पसंख्याकांना १० टक्के जागा, यावर फार तर उदारमतवादी मुसलमान तयार होता. कर्मठांना सर्वच भारत इस्लामसाठी हवा होता. सुशिक्षित मुस्लिम लीगच्या मुसलमानांना वेगळा तुकडा हवा होता. हिंदू हे एक राष्ट्र, मुसलमान हे दुसरे राष्ट्र; दोघांचा सत्तेत समान वाटा, म्हणजे दोघांनाही सत्तेत ५०-५० टक्के भाग ही खरी आदर्श समता आहे, असे मुसलमानांना वाटते.

समान नागरिकत्व म्हणजे एका गटाला पृथक मान्यता देऊन सत्तेत समान वाटा नव्हे, ही गोष्ट उदारमतवादी मुसलमानांना अजून पटावयाची राहिलेली आहे. मग उरलेल्यांचा प्रश्नच काय? म्हणून माझ्यासमोर आजचा मध्यवर्ती प्रश्न मूलतः वरिष्ठत्वाच्या अहंकाराचा भ्रम समाप्त करण्याचा आहे. मुसलमान नसण्याचा माझा हक्क प्रस्थापित करण्याचा आहे. हा हक्क प्रस्थापित करण्यात जर सेक्युलॅरिझमला अपयश आले, तर मुसलमान असण्याचा मुसलमानांचा हक्क नाकारला जाणे एवढा एकच पर्याय शिल्लक राहतो. उभय जमातींतील विचारवंतांच्या लाघवी व मधुर भाषेमुळे, मूळ प्रश्न टाळण्यामुळे, किंवा फसव्या वादशैलीमुळे हे सत्य बदलले जाणार नाही.

# मुसलमानांच्या विचारासाठी काही प्रश्न



( नान्देड येथे डिसेंबर १९६८ मध्ये भरलेल्या जमाते इस्लामीच्या अधिवेशनात 'राष्ट्रीय ऐक्य' या विषयावर परिसंवाद झाला. त्या परिसंवादातील मूळ उर्दू भाषण विस्तार व सुधारणा करून खाली दिलेले आहे. )

मी एक अधार्मिक माणूस आहे. अधार्मिक माणसाला कोणत्याच धर्माविषयी फारशा श्रद्धा नसतात, तशा मलाही श्रद्धा नाहीत. धार्मिक दृष्टिकोणातून पाहिले तर माझी गणना केवळ धर्म सोडणारा, धर्माचरण सोडणारा, म्हणजे 'तारिकेदिन' या गटात करता येणार नाही. मी केवळ सोडणारा म्हणजे 'तारिक' नसून अमान्य करणारा म्हणजे 'मुन्किरेदिन'सुद्धा आहे. उघडच आहे की, असा माणूस ज्या वेळी एखाद्या प्रश्नावर आपले विचार मांडू लागतो, त्या वेळी ते विचार ऐकून घेणे ही बाबसुद्धा धार्मिक मंडळींच्या कानांना आवडत नाही, ही गोष्ट मलाही लपलेली नाही. तुमच्यापासूनही लपलेली नाही. तरीसुद्धा आपण जाणून बुजून माझ्यासारख्या माणसाला या ठिकाणी येण्याचे व आपले विचार तुमच्यासमोर ठेवण्याचे आवाहन केलेले आहे. आपल्या या उदारतेबद्दल सर्वप्रथम मी आपले आभार मानू इच्छितो.

या ठिकाणी जमलेले आपण सर्वजण मुसलमान आहात. समोर बसलेल्या मेळाव्यातील फारच थोडे जण मुस्लिम समाजाच्या बाहेरचे आहेत. मुसलमान म्हणजे काय, या प्रश्नाचा निश्चित निर्णय आपण आपल्या मनाशी घेऊन ठेवलेला असेल. परमेश्वर अस्तित्वात आहे, तो एकच एक सर्व स्तुतीला पात्र आहे. तो परमेश्वर निराकार असून त्याने हे जग निर्माण केले आहे. तो या जगताचा स्वामी व नियंत्रक आहे. मृत्यूनंतर शेवटच्या न्यायदानाच्या दिवशी तो परमेश्वर न्यायनिवाडा करून पुण्याला पारितोषिक आणि पापाला प्रायश्चित्त देईल अशी आपली श्रद्धा आहे. ही श्रद्धा वहिदतची श्रद्धा म्हणून ओळखली जाते. याखेरीज आपण असे

मानतो की, परमेश्वराने माणसाला उपदेश करण्यासाठी वेळोवेळी प्रेषित पाठवले. हे प्रेषित सर्व जगात, सर्व देशात परमेश्वराने पाठवले आहेत. या प्रेषितांपैकी सर्व मानवजातीसाठी परमेश्वराने पाठवलेला शेवटचा प्रेषित सलीवुल्ला वसल्लम महमद पैगंबर आहे. आता यानंतर नवा प्रेषित येणार नाही म्हणून शेवटच्या प्रेषिताने जे सांगितले आहे, तेच शेवटपर्यंत म्हणजे मानवजातीच्या अंतापर्यंत सर्व मानवजातीला वंदनीय व आचरणीय असले पाहिजे. या श्रद्धेला खातमुल्नबुवतची श्रद्धा म्हणतात. ही मुसलमानांची दुसरी श्रद्धा आहे. पवित्र कुराण हा परमेश्वरी ग्रंथ असून तो शेवटचा शुद्ध निर्दोष ईश्वरी ग्रंथ आहे, अशी आपली तिसरी श्रद्धा आहे. इस्लाम म्हटल्याबरोबर निमाज, रोजा, हज यांची आठवण होणे अपरिहार्य आहे; पण मी त्याचा उल्लेख केला नाही. कारण निमाज, रोजा, हज इत्यादी अराकीने-खमसा यांना आधार पुन्हा प्रेषिताच्या आज्ञा व परमेश्वरी ग्रंथातील आज्ञा यांचाच आहे. थोडक्यात, आपण मुसलमान आहात याचा अर्थ वहिदत्त, खातमुलनबुवत, आणि किताबे इल्हामी या तीन तत्त्वांवर आपली श्रद्धा आहे असा मी करतो. कोणताही मुसलमान मग तो शिया असो की सुनी असो, किंवा ज्याला आपण मुसलमानच समजत नाही असा कादियानी ऊर्फ अहमदीय असो, या तीन तत्त्वांना आक्षेप घेणार नाही. ठीक आहे. आपण मुसलमान आहात, आपल्या श्रद्धा ठेवण्याचा आपला हक्क निदान तुम्हांला स्वतःला मान्य आहे. १२०

मी मुसलमान नाही. तुम्हांला जर तुमचा मुसलमान असण्याचा हक्क प्रामाणिकपणे मान्य असेल तर तेवढ्याच प्रामाणिकपणे माझा मुसलमान नसण्याचा हक्क तुम्ही मान्य केला पाहिजे. प्रथमदर्शनी ही गोष्ट मोठी चमत्कारिक दिसते. हिंदुस्थान देशात बहुसंख्याक लोक मुसलमान नाहीतच, हे मुसलमानांनाही माहिती आहे. मुसलमान स्वतःला दर भाषणात अल्प-संख्यच म्हणवून संबोधित असतात. अशा अवस्थेत माझा मुसलमान नसण्याचा हक्क मुसलमानांनी मान्य करावा म्हणजे नेमके काय करावे ? माझे मुसलमान बंधू म्हणतील, तुम्ही मुसलमान नाहीत हे आम्हांला माहीत आहे; आम्ही इस्लामची श्रेष्ठता तुम्हांला समजावून देऊ, पटवून देऊ; पण इतक्याउपरही तुम्ही मुसलमान झाला नाहीत तर आम्ही काय करणार आहोत ? हेच मला आपणास सांगावयाचे आहे. परिस्थितीमुळे लोक मुसलमान नाहीत हे सत्य तुम्ही कबूल केले आहे. कारण ते कबूल केल्याविना तुम्हांला दुसरा रस्ताच नाही; पण समाजात चोऱ्या होत असतात हे कबूल करणे निराळे आणि चोराचा चोर असण्याचा हक्क मान्य करणे निराळे. आपण चोरांचा चोर असण्याचा हक्क कधीच मान्य करणार नाही. चोर आहेत इतके मान्य कराल. तुम्ही स्वतःच्या छातीवर हात ठेवून याचे उत्तर शोधा की, आपण लोकांनी मी मुसलमान नाही

इतकेच मान्य केले आहे की माझा मुसलमान नसण्याचा हक्क मान्य केला आहे ?

मुसलमान नसण्याचा हक्क मान्य करणे ही सोपी गोष्ट नाही. अडाणीपणाने एखादा मौलवी हा हक्क आपणास मान्य आहे असे गफलतीने बोलून जाईल. मी या मुद्द्यावर कोणताही संदिग्धपणा ठेवू इच्छित नाही. वहिदत्, नबुवत्, आणि इल्हामी किताब या मुसलमानांच्या तीन मूलभूत श्रद्धा आहेत. मुसलमान नसण्याचा हक्क मान्य करणे या तीन श्रद्धांच्यापैकी एक, दोन, अगर तीनही अमान्य करण्याचा माझा हक्क तुम्ही मान्य करणे. मी म्हणेन परमेश्वर एक आहे, तो सर्वश्रेष्ठ आहे. त्याने जग निर्माण केले. महमद त्याचा प्रेषित आहे; पण कुराण मात्र परमेश्वरीच ग्रंथ नव्हे, तो मानवी ग्रंथ आहे. त्यातील काही बाबी बरोबर आहेत, काही चूक आहेत. असे म्हणणे म्हणजे तीनपैकी एक श्रद्धा अमान्य झाली. किंवा मी असे म्हणेन की, परमेश्वर श्रेष्ठ आहे. जगत् निर्माता आहे, पण महमद त्याचा प्रेषित नाही. कदाचित मी म्हणेन शेवटचा येशू त्याचा प्रेषित होता. कदाचित मी म्हणेन महमद प्रेषित होता; पण शेवटचा नव्हता. शेवटचा अजून येणार आहे. महमद प्रेषित नव्हता असे म्हटले की, त्यासह कुराण ईश्वरी ग्रंथ आहे, हे आपोआपच अमान्य होते. असे म्हणणे म्हणजे दोन श्रद्धा अमान्य करणे. कदाचित माझ्यासारखा जडवादी म्हणेल, मला ईश्वरच अमान्य आहे. जिथे ईश्वरच नाही, तिथे त्याचा प्रेषित, त्याचे पुस्तक– सगळेच गळून पडले. अशी अनेक मते असू शकतील. ही मते बाळगण्याचा माझा हक्क तुम्हांला मान्य आहे काय, असा माझा प्रश्न आहे. समजा, मी ईश्वराचे अस्तित्व अमान्य केले तर त्यामुळे काय होईल? सलीवुल्ला वसल्लम महमद पैगंबर परमेश्वराचे प्रेषित आहेत, ही गोष्ट अमान्य होईल. प्रेषितत्व अमान्य झाले तरी माणूसपण शिल्लकच राहते. एक कर्तबगार, चारित्र्यवान, प्रभावशाली आणि जगाच्या इतिहासावर परिणाम करणारा एक मोठा माणूस म्हणून महमद पैगंबराचे जीवन अभ्यासाचा विषय राहीलच; पण माणूस म्हणून या चरित्राकडे पाहू लागलो तर दोन बाबी घडतील. पहिली बाब म्हणजे महमदसाहेबांची काही कृत्ये आम्हांला चांगली वाटतील, त्यांची आम्ही स्तुती करू. काही कृत्ये वाईट वाटतील, त्यांची आम्ही निंदा करू. माणसाची माणसांशी तुलना होईल, काही माणसांच्यापेक्षा महमद पैगंबर मोठे ठरतील, काही माणसांच्यापेक्षा त्यांना लहान ठरवण्यात येईल. पवित्र कुराणाचाही याच पद्धतीने एक पुस्तक म्हणून अभ्यास होईल; आणि पुस्तक म्हटल्यानंतर ते चांगले म्हटले जाईल, वाईट म्हटले जाईल.

मी जर परमेश्वराच्या अस्तित्वावर शंका घेतली, किंवा महमद पैगंबर

'पैगंबर' असण्यावर जर शंका घेतली, तर माझ्या शंका तुम्ही मान्य कराल असे मी म्हणणार नाही. मला शंका असतील, तुम्हांला शंका असणार नाहीत. आपण एकमेकांशी चर्चा करू; एकमेकांची मते एकमेकांना पटवून देण्याचा प्रयत्न करू; पण माझी मते मला बाळगण्याचा व तुमची मते तुम्हांला बाळगण्याचा एकमेकांचा हक्क मुसलमान मान्य करणार आहेत काय याचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे. अर्नोल्ड टॉयन्बीने एक लेख लिहिला. त्या लेखात टॉयन्बीने ख्रिस्त व गांधी, गांधी व महमद पैगंबर यांची तुलना केली. टॉयन्बीने काढलेले निष्कर्ष तुम्ही मान्य करा, अमान्य करा. त्यावर दंगली करण्याचे काय कारण? टॉयन्बी मुसलमान नाही म्हणून महमद पैगंबर अल्लाचे प्रेषित मानण्याची त्यांच्यावर जबाबदारी नाही. टॉयन्बी मुसलमान असते तर हा लेख लिहिल्यामुळे त्यांना तुम्ही मुसलमान धर्मातून बहिष्कृत करून टाका; पण कोणत्याही परिस्थितीत दंगलीचे कारण काय? दंगलीचा एकच अर्थ आहे; तो अर्थ म्हणजे, मुसलमान महमद पैगंबराला ईश्वराचे शेवटचे प्रेषित मानतात. इतरेजन मुसलमान असोत की नसोत, त्यांनी महमदाची दुसऱ्या माणसाबरोबर तुलना करून तो माणूस महमदापेक्षा श्रेष्ठ आहे असे म्हणू नये. मुसलमानेतरांनीसुद्धा महमदाची प्रतिष्ठा सांभाळलीच पाहिजे. कुराणाची सामान्य पुस्तकाबरोबर तुलना करू नये. कुराणाची प्रतिष्ठा सांभाळलीच पाहिजे. आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, मुसलमानांना पवित्र कुराण आणि महमद पैगंबर यांच्याविषयी जितके प्रेम आहे तितके प्रेम अल्लाविषयी दिसत नाही. तुम्ही देव माना न माना, तो सगुण साकार माना किंवा निराकार माना, या मुद्द्यावर मुसलमान दंगली करणार नाहीत.



स्वतः मुसलमान मात्र याहून निराळे वागतात. जलालुद्दीन उमरी या नावाचे एक मुस्लिम लेखक आहेत. त्यांचे म्हणणे असे की, प्रभू रामचंद्र आणि भगवान कृष्ण यांची जीवनचरित्रे परमेश्वरी अवताराची चरित्रे असू शकत नाहीत. कारण परमेश्वर अवतार धारण करीत नसतो. रामकृष्ण ईश्वरी प्रेषितही असू शकत नाहीत. कारण कुराणामध्ये प्रेषितांचे जे जीवन सांगितले आहे, तसे त्यांचे जीवन नाही. गीता, पुराणे व वेद ईश्वरीय ग्रंथ असू शकत नाहीत. कारण त्यांची रचना प्रमाणित ईश्वरी ग्रंथ कुराण यासारखी नाही. राम परमेश्वराचा अवतार आहे की नाही, हे जर कुराणाच्या आधारे ठरणार असेल तर महमद पैगंबर प्रेषित आहेत की नाहीत याला पुराणात आधार शोधावा लागेल. इतरांचे धर्मग्रंथ, इतर धर्मातील वंदनीय स्थाने यांची चर्चा करण्याचा मुसलमानांना हक्क आहे. कारण मुसलमान या इतर धर्मांचे अनुयायी नाहीत, हे मुसलमानांना मान्य आहे. मात्र इतर धर्माच्या लोकांनी इस्लामचा ग्रंथ, इस्लामचा प्रेषित यावर

चर्चा करणे मुसलमानांना मान्य नाही. कारण इस्लाम हा एकमेव परिपूर्ण धर्म आहे असे मुसलमानांचे म्हणणे आहे. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा होतो की, माझा मुसलमान असण्याचा हक्क तुम्ही मान्य करा, तुम्ही मुसलमान नाहीत इतकेच मी मान्य करीन. तुमचा मुसलमान नसण्याचा हक्क मात्र मी मान्य करणार नाही.

ज्या देशात मुसलमान बहुसंख्याक आहेत, त्या देशात मुसलमानेतरांचा मुसलमान नसण्याचा हक्क मुसलमानांना मान्य असल्याचे दिसते. कारण अशा देशात मुसलमानेतरांना इस्लामविषयी विरोधी बोलण्याचा हक्क असला तर राजसत्तेनेच विरोधकांचे डोके फोडण्याचा हक्क तेथील मुसलमानांना दिलेला असतो. जुन्या काळच्या गोष्टी सोडा. आधुनिक काळात महमद शेवटचा प्रेषित नव्हे, असे म्हटल्याबद्दल अहमद यांना ठार करण्यात आले. मुस्लिम बहुसंख्य देशात मुसलमान नसण्याचा हक्क म्हणजे राजकारभारातून व महत्त्वाच्या नोकऱ्यांतून वगळले जाणे; ते मान्य करण्यास हरकत काहीच नाही. मुसलमानांनी हा हक्क मान्य केलेला आहे. भारतासारख्या मुसलमान अल्पसंख्य असलेल्या देशात मुसलमानांनी बिगर मुसलमानांचा मुसलमान नसण्याचा हक्क जर मान्य केला नाही तर मुसलमानांचा मुसलमान असल्याचा हक्क इतर मंडळी सुखाने मान्य करतील, अशी अपेक्षा त्यांनी बाळगू नये. एकमेकांचे हक्क एकमेकांनी मान्य केल्याशिवाय 'राष्ट्रीय एकात्मता' या प्रश्नाच्या चर्चेलाच अर्थ नाही.



भारतासमोरील प्रश्नात राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न हा केवळ एक महत्त्वाचा प्रश्न नाही, तर तो एक अत्यंत मूलभूत असा प्रश्न आहे; आणि हा प्रश्न जितका मूलभूत आहे, तितकाच गुंतागुंतीचा आहे. सामाजिक आणि राजकीय जीवनात कोणताच प्रश्न पोकळीत उभा असलेला एकाकी प्रश्न नसतो. प्रश्न समाजाच्या प्रवाहात निर्माण होतात, आणि त्यांची उकल त्या प्रवाहाच्या संदर्भात होत असते. कोणताही सामाजिक प्रश्न पोकळीमध्ये सुटत नसतो, किंवा स्वप्नातही सुटत नसतो. काही लोक स्वप्नात राहण्यातच आनंद मानतात. आपण स्वतः स्वप्नात राहतात, इतरांना याच स्वप्नाळू जगात येण्याचे आमंत्रण देतात. स्वप्नसृष्टीत वावरणाऱ्या या मंडळींच्याबाबत सर्वांनीच हे समजून घेतले पाहिजे की, या स्वप्न-रंजनवाद्यांना प्रश्न सुटावेत अशी इच्छा नाही. उलट प्रश्न शिल्लक राहावेत आणि प्रश्नांचा फायदा आपल्या राजकारणाला उचलावा, असे या मंडळींना वाटते. समाजातील कोणताही प्रश्न एकाकी नसतो, तो एकाकीपणे सुटतही नाही. राष्ट्रीय ऐक्याचा प्रश्न असाच एक प्रश्न आहे. इतर अनेक प्रश्नांशी हा प्रश्न जोडला गेलेला आहे, आणि तो तसाच जोडला जाणार आहे. एका

बाजूला आमच्या राजकीय जीवनात जी लोकशाही आम्ही मान्य केलेली आहे, त्या लोकशाहीशी म्हणजे सेक्युलर लोकशाहीशी हा प्रश्न जोडला गेलेला आहे. दुसऱ्या बाजूला आमच्या आर्थिक जीवनातील जीवनमानाचे प्रश्न, शिक्षणाचे प्रश्न, आणि एकूणच जीवनमान उंचावण्याचे प्रश्न एकमेकांवर बरेवाईट परिणाम करीत असतात; आणि क्रमाक्रमाने सारेच प्रश्न कुठल्या तरी एका काठाला जाऊन पोहचत असतात. राष्ट्रीय एकात्मता हा असा सामजिक प्रवाहात उत्पन्न होणारा प्रश्न आहे. ज्या राजकीय व सामाजिक जीवनात या प्रश्नाची सुटका सापडेल, त्याची दिशा आणि त्या जीवनाचा प्रवाह यांचाही आपण विचार केला पाहिजे.

ही भारतीय जीवनाची दिशा भारताच्या संविधानाने निर्धारित केलेली १२४
आहे. या दिशेची गती आपण योग्य विचार करून वाढवू शकू. अयोग्य मार्गाने वाटचाल करताना ही गती आपण कमी करू शकतो; पण संविधानाने जी गती भारतीय जीवनाला दिलेली आहे ती गती आपण थांबवू शकत नाही, किंवा संविधानाची दिशा उलट बदलली जाऊ शकत नाही. हा मुद्दा नीट समजावून घेतला पाहिजे. परवाच एका मुसलमान पंडिताने अलिगड विद्यापीठातील डॉ. गजेंद्रगडकरांच्या व्याख्यानावर टीका करताना असे विधान केले की, मुसलमानांना समान नागरी कायदा लागू करण्याचा प्रश्न संविधानातील कलम ४४ मुळे पुनःपुन्हा उपस्थित होतो. हे ४४ कलम भारतीय संविधानातून गाळून टाकण्याची चळवळ आता मुसलमानांना सुरू करावी लागेल. भारतीय संविधानातील अनेक कलमे यापूर्वी बदलली गेलेली आहेत. जुनी कलमे गाळणे आणि नवी कलमे त्या ठिकाणी प्रविष्ट करणे हे तर नित्याचेच चालू आहे. एकदा कलम ४४ भारतीय संविधानातून गाळून टाकले, म्हणजे कायमची समान नागरी कायद्याची बडबड समाप्त होईल. ज्या विद्वानांनी ही मते मांडली त्यांच्या विद्वत्तेचे मी कौतुक करू शकत नाही. कारण ही भूमिका ज्ञानावर आधारली नसून अज्ञानावर आधारलेली आहे. कलम ४४ भारतीय संविधानात कसे व का आले, हे मुसलमानांनी स्वच्छपणे एकदा समजून घेण्याची गरज आहे. ज्या वेळी संविधान सभेत हे कलम मांडण्यात आले त्या वेळी या कलमाला मुस्लिम सदस्यांनी पाठिंबा दिलेला नव्हता. कठोर शब्दांत अनेक मुस्लिम सदस्य या कलमाच्या विरोधी बोलले. या विरोधी बोलणाऱ्यांत प्रसिद्ध मुसलमान नेते हझरत मोहानी हेही होते. मोहानी म्हणाले, या कलमानुसार मुसलमानांच्यावर नवा कायदा लागू करता येईल आणि शरियतचा कायदा रद्द करता येईल, अशी जर कुणाची समजूत असेल, तर ती चुकीची आहे. अशा कोणत्याही प्रयत्नाच्या विरुद्ध मुसलमानांचा फौलादी दृढ निश्चय उभा राहील. या कायद्याची अंमलबजावणी मुसलमानांच्या प्रेतावरूनच करावी लागेल. हे कलम मंजूर होताना शरियतचा

कायदा या कलमाला अपवाद राहील; अशी उपसूचनाही मांडण्यात आली होती. ही उपसूचना फेटाळून लावून सदर कलम मान्य करण्यात आलेले आहे. तेव्हा कलम ४४ हे साधेसुधे कलम नाही, हे मुसलमानांनी लक्षात घ्यावे. भारतीय संविधानाचा पाया समान नागरिकत्व हा आहे. हा समान नागरिकत्वाचा पाया बदलल्याशिवाय संविधानातून कलम ४४ बदलता येत नाही. संविधानातील इतर कलमांनी सर्व नागरिकांना समानता दिली आहे. कायदा त्यांच्यात भेदभाव करणार नाही, हे सांगितलेले आहे. कायद्यासमोर सर्व नागरिक समान असतील याचाही स्पष्ट उल्लेख आहे. कलम ४४ नागरिकत्वाच्या आश्वासनाची पूर्तता करते.

मुसलमानांना समान नागरिकत्व नको आहे काय? स्वतंत्र देशात १२५
अल्पसंख्येला समान नागरिकत्व नसले तर कनिष्ठ नागरिकत्व मिळत असते. हे दुय्यम दर्जाचे नागरिकत्व मुसलमानांना हवे आहे काय? की त्यांना हिंदुस्थानात वरिष्ठ नागरिकत्व मिळेल असे वाटते? आपल्याला वरिष्ठ नागरिकत्व मिळेल या भ्रमात जे वावरतात ते स्वप्नरंजनवादी आहेत. कलम ४४ रद्द करण्याची चळवळ सुखासुखी करता येत नाही. अशा चळवळी संविधान समाप्त करणाऱ्या चळवळी असतात. जे लोक संविधानाची दिशा बदलू इच्छितात त्यांना संविधानच संपवण्याची तयारी करावी लागते. मुसलमान हाही झगडा देण्याची भाषा कधी कधी बोलतात. या झगड्याचे स्वरूप त्यांनी समजून घेतले पाहिजे. तोंडाने घोषणा करणे सोपे असते. काही जण म्हणतात, आम्ही हुतात्मा होण्यासाठी डोक्याला उत्तरीय गुंडाळूनच बसलेलो आहोत. ठीक आहे, ज्यांनी डोक्याला उत्तरीयच बांधलेले आहे, त्यांना चर्चा कशा काय उत्तर देऊ शकतील? अशा वेळी कालप्रवाहच योग्य उत्तर देत असतो. ज्या वेळी संविधान संपवण्याची चळवळ सुरू होते, त्या वेळी हा एक असा झगडा असतो. ज्यात संविधान आणि राष्ट्र दोन्हीही एकदमच संपून जातात, किंवा संविधान संपवणाऱ्या शक्ती कायमच्या समाप्त केल्या जातात. उघडच आहे की, जेव्हा हा झगडा सुरू होतो तो सनदशीर लोकशाही मार्गाचा झगडाही असत नाही. या झगड्यात अहिंसेचा विश्वासही दिला जात नाही. हा झगडा सुरू झाल्यानंतर कायद्याची कलमे अल्पसंख्यांकांचे हितरक्षण करू शकत नाहीत. अशा झगड्यात बहुसंख्याकांचा फार मोठा फायदा होतो, असे मी मानत नाही; परंतु जे नुकसान अल्पसंख्याकांचे होते त्याला सीमा नसते. हा झगडा सुरू करावयाचा आहे काय? हा प्रश्न मुस्लिम जनतेने आपल्या नेत्यांना स्पष्टपणे विचारला पाहिजे; आणि त्याचे परिणाम काय होतील याचाही गंभीरपणे विचार केला पाहिजे.

यामुळेच संविधानावर निष्ठा असण्याची गरज असते, व ही निष्ठा

जाणीवपूर्वक समजून उमजून असावी लागते. भारतीय संविधानात भारताच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनाचे एक चित्र दडलेले आहे. हे दडलेले चित्र कोणते आहे, हे प्रयत्नपूर्वक समजून घेणे आणि ते चित्र वास्तवात साकार करण्याचा प्रयत्न करणे याची फार मोठी गरज आहे. या भारतीय संविधानाच्या चौकटीतच साऱ्या प्रश्नांचे चिंतन होऊ शकते. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न या चौकटीत राहून सोडवणे, हीच प्रश्न सोडवण्याची एकमेव पद्धत आहे, असा माझा विश्वास आहे. संविधानाच्या चौकटी बदलून काही करता येईल असे ज्यांना वाटते, त्यांनी पुन्हा एकदा परिणामांचा विचार करावा इतकेच मी सांगेन. काही लोकांना या चौकटी विसरून विचार करणे आवडते. ते आपल्या स्वप्नांच्या जगात, नशेत दंग असणारे लोक आहेत. असल्या प्रकारच्या नेतृत्वाला फक्त निराशा पदरी घ्यावी लागेल, यापेक्षा कोणतेही निराळे फळ मिळण्याची शक्यता नाही. १२६

राष्ट्रीय एकात्मता ही कोणती घटना नसते ? घटना एका दिवशी घडून जातात. ही घटना घडण्यापूर्वी घटना घडलेलीच नसते; म्हणून अस्तित्वात नसते. ही घटना घडून गेल्याच्या दिवसानंतर विचार करण्याचा उपयोग नसतो. कारण घटना घडून गेलेली असते. दुर्गापूर, शोभापूरसारख्या जातीय दंगली या घटना असतात. काळजी घेऊन त्या घटना थांबवता येतात. घटना घडून गेल्यानंतर फार तर नुकसानभरपाई देता येत असते. नुकसान होऊन गेलेले असते. राष्ट्रीय एकात्मता ही अशी घटना नसते. म्हणून घटनांच्या पद्धतीने या प्रश्नांचा विचार करणे चूक आहे. ती एक सतत चालणारी प्रक्रिया असते. एखाद्या राष्ट्रात ही प्रक्रिया शतकानुशतके चाललेली असते. ही प्रक्रिया चालू असताना हिंदूंचे काय होईल, मुसलमानांचे काय होईल असा विचार करणारे लोक एका समाजाचा, जमातीचा, पंथाचा विचार करीत आहेत. असा पंथीय विचार करणारी मंडळी एकात्मता वाढवत नाहीत, ती फुटीरपणा वाढवत आहेत. फुटीरपणा वाढवणारे हे घटक यांचा विचार तुम्ही काय करणार आहात ? अल्पसंख्याकांना फुटीरपणा परवडत असतो काय ? त्यात त्यांचा फायदा होऊ शकतो काय ? याचा विचार तुम्ही काय करणार आहात ? तुम्ही स्वतःला पुष्कळ राखीव जागा मागाल, स्वतःसाठी विभक्त मतदारसंघ मागण्याचेही तुम्हांला स्वातंत्र्य आहे; पण जे काही तुम्हांला मिळेल ते बहुसंख्याकांच्या मनात स्वतःविषयी विश्वास निर्माण करून मिळेल. लोकसभा बहुसंख्येच्या मान्यतेखेरीज तुम्हांला काही देऊ शकणार नाही. आणि तुम्ही तर बहुसंख्याक हिंदूंचा विश्वास संपादन करण्याऐवजी त्यांच्यावर आरोप करीत बसणार, त्यांच्या हेतूविषयी संशय घेत बसणार. आरोप दोन्ही पक्षी करता येईल. हिंदूंच्या विरोधी मुसलमानांची गाऱ्हाणी काय आहेत, याची परिपूर्ण यादी करता येईल; हिंदूंच्या गाऱ्हाण्यांचीही अशीच यादी

करता येईल. या दोन्ही याद्या तपासून पुरावा पाहून कोणती तिसरी शक्ती न्यायदान करणार आहे, आणि आपण कोर्टात उभे आहोत हा भ्रम डोक्यातून काढून टाकावा. प्रश्न आहेत, ते खरे आहेत, हे मान्य करून ते योग्य मार्गाने आपापसात सोडवले पाहिजेत. नाही तर अयोग्य मार्गाने ते आपापसात सोडवले जातील. न्यायदान करणारी तिसरी शक्ती १९४७ ला समुद्रमार्गे लंडनला निघून गेली!

राष्ट्रीय एकात्मतेच्या या प्रक्रियेत आर्थिक व शैक्षणिक प्रश्न असतात, तसेच राजकीय प्रश्न असतात हे नीट समजून घेऊन या प्रश्नांबाबत गती वाढवता येते. चुकीच्या मार्गाने जाऊन गती कमी करता येते. समाजपरिवर्तनात विचारांचा प्रभाव इतकाच असतो. खरे ताण परिस्थितीचे असतात. 
व्याख्याने देऊन या ताणांचे उत्तर देता येत नाही. चित्र आणि संगीत इस्लामला मान्य नाही. भले मान्य नसेल; शेकडो गायक पेटी, तबला, सारंगी, सतार यांत गुरफटलेले असणार. त्यावर त्यांचा चरितार्थ अवलंबून आहे. शेकडो मुसलमान नट—नट्या सिनेमात राहणार. मग दिलीपकुमार जरी असला तरी तो हिंदू जोग्याचे काम करतो, देवळांत जातो, घंटी वाजवतो, आणि नटी मुसलमान असली तरी कुंकू लावते, आरती घेऊन देवाची पूजा करू लागते. भले धर्माला हे सर्व अमान्य असो. एकेकाचे लक्षावधीचे उत्पन्न यात गुंतलेले आहे! ते कोणी सोडणार नाही. शाळांमधून, महाविद्यालयांमधून हजारो मुसलमान मुली व मुलगे शिकत असतात. हजारो जणांना नोकरीत सामील व्हावे लागते. मजुरीच्या धंद्यात लाखो स्त्री-पुरुष असतात. त्या ठिकाणी गोषाही पाळता येत नाही. शुक्रवारची निमाज पढण्यासाठी महाविद्यालयांना सुटी असू शकत नाही. बँकांना सुटी असू शकत नाही. सुट्या धर्मपंडित देत नाहीत, राजसत्ता देते; आणि त्याच पाळाव्या लागतात. हे जे परिस्थितीचे ताण असतात त्याला जाहीर सभेतील व्याख्याने हे उत्तर नसते. जीवनाच्या या बदलणाऱ्या प्रवाहात हट्ट व्याख्यानात राहतात आणि जीवन बदलते.

खरे ताण या परिस्थितीचे असतात. या ताणांमधून हळूहळू जीवन बदलून जाते. राष्ट्रीय एकात्मता उदय पावू लागते व दृढ होते. या प्रक्रियेच्या दिशा संविधानाने निश्चित केलेल्या असतात. यासाठी संविधान समजून घेण्याची गरज असते, वस्तुस्थिती समजून घेण्याची गरज असते. पवित्र कुराणाने एके ठिकाणी म्हटलेले आहे की, जे लोक अल्लाला समजून घेत नाहीत, ते अल्लाचे काही नुकसान करीत नाहीत; स्वतःचेच नुकसान करून घेतात. अल्लाला न समजून घेणारे लोक स्वतःचे नुकसान करतात काय? या प्रश्नाचे उत्तर धार्मिक श्रद्धेनुसार दिले जाते; पण संविधानाला न समजणारे लोक संविधानाचे नुकसान करीत नाहीत, स्वतःचेच नुकसान

करून घेतात. हा प्रश्न मृत्यूनंतरचा नाही. त्याचे उत्तर ' याची देही, याची डोळा ' मिळणारे असते.

काही मंडळींना तुम्ही भारताच्या संविधानाशी एकनिष्ठ आहात काय? असा प्रश्न विचारला म्हणजे भयंकर राग येतो. भारतीय संविधानाशी जाणीवपूर्वक एकनिष्ठ राहणे ही क्रिया वाटते तितकी सोपी नाही. भारतीय नागरिकांपैकी ग्रामीण व शहर भागात पसरलेली प्रचंड जनसंख्या तर सोडाच; पण सुशिक्षितांनाही जाणीवपूर्वक भारतीय संविधानाशी निष्ठा म्हणजे काय हे नेहमीच नीटसे आकलन होते असे नाही. हा परिसंवाद ज्या जमाते इस्लामी या संघटनेने आयोजित केला आहे ती संघटना भारतीय संविधानाशी एकनिष्ठ आहे काय? याचे उत्तर जमाते इस्लामीचे 
लोक होकारार्थी देतील. ते सांगतील, अमुक तारखेचा या संविधानावर निष्ठा जाहीर करणारा आमचा ठरावच आहे. संविधानावरील निष्ठा अशा ठरावांनी जाहीर होत नसते. संविधान-निष्ठा हा काही राजकीय डावपेचाचा भाग नसतो. या निष्ठेचा संबंध मूलभूत श्रद्धेशी असतो. संविधान-निष्ठा म्हणजे संविधानांतील या किंवा त्या कलमाशी निष्ठा नसते. संविधान ज्या श्रद्धांवर उभे आहे, ज्या भूमिकांवर उभे आहे त्या श्रद्धा व भूमिका यांच्याशी निष्ठा आहे काय?— हा खरा महत्त्वाचा प्रश्न असतो. मुसलमान विचारवंत बोलू लागले म्हणजे वेळोवेळी संविधानात जे बदल झाले, त्याचा फार मोठा गाजावाजा करतात. संविधानात वीस वर्षांत बावीस बदल झाले, त्या संविधानातील प्रत्येक बाब बदलणारी आहे; म्हणून गरज पडल्यास संविधानातील कलम ४४ बदलून टाकता येईल असे या पंडितांना वाटते. संविधानात बदल झालेले आहेत हे कुणीच अमान्य केलेले नाही, किंबहुना याहीपुढे संविधानात अनेकदा बदल होतील; पण हे बदल वरवरचे असतात. प्रौढ मतदानावर आधारलेले संघराज्य आणि समान नागरिकत्व हा जो घटनेतील गाभ्याचा भाग आहे तो तर सोडाच, पण सरकारच्या रचनेतील कोणताही महत्त्वाचा भाग बदलणे इतके सोपे नाही. संविधानाचा जो भाग कोणत्याही लोकसभेतील त्या कामासाठी बोलावलेल्या अधिवेशनात दोन-तृतीयांश बहुमताने बदलला जातो त्या बदलाचे स्वरूप भारतीय लोकशाहीच्या मूळ श्रद्धेच्या मानाने फार वरवरचे असते. या वीस वर्षांत कोणताही मूलभूत बदल न होता हे संविधान टिकले आहे हीच एक महत्त्वाची बाब आहे. लोकसभेत काँग्रेस पक्षाला असलेले प्रचंड बहुमत जसजसे संपुष्टात येत आहे, तसतसे वरवरचे बदल करणेही आता दिवसेंदिवस कठीण होत चाललेले आहे.

जमाते इस्लामीचे कार्यकर्ते मोठ्या गंभीरपणे सांगतात की, या संविधानाच्या आरंभी असणाऱ्या सरनाम्याशी ( प्रीॲम्बलशी ) आम्ही एकनिष्ठ आहोत.

त्यांना असे वाटते की, हे सांगून आपण फार मोठी हुशारी दाखवत आहोत. संविधानाशी एकनिष्ठ असल्याची शाब्दिक घोषणा एकीकडे, आणि संविधानाच्या कोणत्याच कलमाशी खरोखरी निष्ठा नसल्याची घोषणा दुसरीकडे, अशी किती चतुराईने आपण वाट हुडकून काढली या समाधानात जमाते इस्लामीचे कार्यकर्ते मशगूल असतात. त्यांना हे कळतच नाही की, त्यांच्या भाषेचा बहुसंख्याक हिंदू लोक अर्थ काय करतात? बहुसंख्येच्या मते संविधानाच्या सरनाम्याशी निष्ठा, कलमाशी मात्र निष्ठा नाही; याचा एकच अर्थ आहे व तो म्हणजे– संविधानाशी जमाते इस्लामी थोडीसुद्धा निष्ठावंत नाही. मुसलमानांच्या जीवनावर चतुराईची वाक्ये परिणाम करणार नाहीत. बहुसंख्येने या वाक्याचा जो अर्थ केला आहे त्याचे परिणाम अल्पसंख्येच्या जीवनावर होतील, हे समजून घेतले पाहिजे. १२९
जमाते इस्लामीचे नेते मौलाना मौदुदी आहेत. मौलाना मौदुदी हे जमाते इस्लामी पाकिस्तानचे नेते आहेत. जमाते इस्लामी हिंदचे नेते नाहीत, या खुलाशावर कोण श्रद्धा ठेवील? मौदुदींची पुस्तके हिंदुस्थानात छापणे व विकणे, मौदुदींचे लेख सर्व मासिकांमधून छापणे हेच प्रमुख काम जमाते इस्लामीची नियतकालिके करत असतात. जमाते इस्लामीने वीस वर्षांत कधी मौदुदींचे खंडन केलेले नाही. आणि मौदुदी सांगतात, सेक्युलर लोकशाही आम्हांला मान्य नाही. मग अशा लोकशाहीचे नेतृत्व हिंदू करोत की मुसलमान करोत. जमाते इस्लामी हिंदचे प्रसिद्ध नेते मौ. सदरुद्दीन इस्लाही आपल्या 'फरिजाये अकामते दिन' या पुस्तकात सांगतात, जमाअतचे ध्येय अकामते दिन हे आहे. हिंदूंनाही 'अकामते दिन' म्हणजे धर्माचे वर्चस्व इतकाच अर्थ कळत असतो. याच पुस्तकात अकामते दिन म्हणजे हुकुमते इलाही शब्द वेगळे असले तरी दोन्हींचा अर्थ एकच आहे असेही स्पष्टीकरण दिलेले आहे. जमाते इस्लामीच्या अधिकृत पुस्तकात अकामते दिनचे स्पष्टीकरण करताना हिंदुस्थानवर मुसलमानांचे राज्य आणणे असे ध्येय-धोरण तुम्ही जाहीर करणार, आणि सभेतून बोलताना आमची निष्ठा फक्त प्रीॲम्बलशी आहे असे तुम्ही सांगणार. या तुमच्या घोषणांमुळे तुम्ही संविधानाशी एकनिष्ठ आहात अशी हिंदूंची खात्री पटेल असे तुम्हांला वाटते काय?

म्हणून संविधानाशी निष्ठा एक राजकीय पवित्रा नसतो, ही भूमिका नीट समजून घेतली पाहिजे. स्वतःच्या मनाशीच हा प्रश्न मुसलमानांनी विचारला पाहिजे की, या देशात सार्वभौम अधिसत्ता कुणाची आहे? भारतीय संविधानाने सार्वभौम अधिसत्ता जनतेच्या नावे, जनतेच्या प्रतिनिधींनी सिद्ध होणाऱ्या व घटनेच्या चौकटीत चालणाऱ्या संसदेची अधिसत्ता घोषित केलेली आहे. तत्त्वतः जनतेची सार्वभौम अधिसत्ता

म्हणजे व्यवहारतः संसदेची अधिसत्ताच असते. भारतीय संविधानाचे हे गृहीतकृत्य आपणाला मान्य आहे की आपण सार्वभौमत्व परमेश्वराचे मानता ? परमेश्वराचे सार्वभौमत्व ही कल्पना तुम्ही भासवता त्याप्रमाणे धार्मिक नाही. ती कल्पना पूर्णपणे राजकीय आहे. परमेश्वराचे सार्वभौमत्व म्हणजे काय ? परमेश्वराच्या आज्ञेचे सार्वभौमत्व. या परमेश्वराच्या आज्ञा शोधाव्या कुठे ? तर पवित्र कुराणात म्हणून कुराणाच्या आज्ञेचे सार्वभौमत्व हेच आपण मानतो. संसदेचे सार्वभौमत्व आपण मानीत नाही, असा याचा अर्थ आहे. हिंदुस्थानात गैर-मुस्लिम लोक बहुसंख्य असताना इथेही सार्वभौमत्व कुराणाच्याच आज्ञेचे आहे. निदान असणे रास्त आहे असे तुम्हांला म्हणावयाचे आहे काय ? होय; हेच तुम्हांला म्हणावयाचे आहे. तुमचा एक लेखक अफझल हुसेन म्हणतो, हिंदुस्थानात लोकशाहीला भवितव्य नाही, समाजवादाला भवितव्य नाही, हिंदुस्थानला भवितव्य फक्त इस्लामचा स्वीकार करण्यात आहे. आणि तरीही तुम्ही म्हणता, आम्ही संविधानाच्या प्रीॲम्बलशी एकनिष्ठ आहोत. या देशात सार्वभौमत्व कोण्या धर्माचे, धार्मिक कायद्याचे, किंवा ईश्वराचे नाही, संसदेचे आहे. उघडच आहे की, संविधानाशी निष्ठा म्हणजे सर्व सार्वजनिक जीवनाच्या क्षेत्रात संसदेचे सार्वभौमत्व हे तुम्हांला मान्य आहे काय ? संसदेने अमुक कायदा करावा, अमुक कायदा करू नये ही चर्चा मी समजू शकतो; पण संसदेला अमुक विषयात कायदा करण्याचा हक्क नाही ही भाषा बोलणाऱ्याने तरी आपण संविधानाशी एकनिष्ठ आहोत असे म्हणू नये. समान नागरिकत्व देणाऱ्या भारतीय संविधानाशी जे एकनिष्ठ नाहीत त्यांच्याशी राष्ट्रीय ऐक्य या विषयावर चर्चा काय करणार ?

आमच्या संविधानाने प्रत्येक व्यक्तीला धार्मिक स्वातंत्र्य दिलेले आहे. संविधानाने दिलेल्या या धार्मिक स्वातंत्र्याचा खास अर्थ आहे. आमच्या संविधानाने प्रत्येक धर्माला स्वातंत्र्य दिलेले नाही, आणि धर्माला स्वातंत्र्य देणे शक्यही नव्हते. एकेक धर्म इतर धर्मांच्या जिवावरच उठलेला आहे. सर्वांनाच नष्ट करून मी एकटाच शिल्लक राहीन ही एकेका धर्माची प्रतिज्ञा. अशा धर्मांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावयाचे म्हणजे नागरिकांना आपापसांत लढाया करण्याचे स्वातंत्र्य द्यावयाचे. हे स्वातंत्र्य संविधानाने दिलेले नाही. संविधानातील धर्मस्वातंत्र्याचा विशिष्ट पारिभाषिक अर्थ आहे. स्वप्नात रमलेल्यांना हा अर्थ पटो, न पटो, तो अस्तित्वात आहे. उदाहरण म्हणून आपण अहद् फातमी यांचे नाव घेऊ. त्यांचे म्हणणे आहे, मी सलीबुल्ला व सल्लम यांना परमेश्वराचे प्रेषित तर मानतोच; पण शेवटचे प्रेषित मात्र मानीत नाही. प्रश्न असा आहे की, हे म्हटल्याबद्दल अहद् फातमीला इस्लाममधून बाहेर काढण्याचा हक्क कोणाला आहे काय ? हमीद दलवाई यांचा तर कलमे तोहिदवरच विश्वास नाही. म्हणून

दलवाईंना इस्लाममधून बाहेर काढता येईल काय ? फातमी आणि दलवाई जे सांगत आहेत ते बरोबर का चूक हा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो असा की, ह्यांना धर्मबहिष्कृत करता येईल काय ? एखाद्याला मुसलमान मानणे किंवा न मानणे हा नुसता धार्मिक प्रश्न नाही. तिथे जायदादी व वारस हक्काचे प्रश्न उपस्थित होतात. समजा, उद्या एक मुसलमान इस्लाम सोडून इसाई झाला तर या धर्मपरिवर्तनामुळे त्याच्या ताब्यात आलेल्या पैतृक इस्टेटीवरील त्याचा हक्क बदलतो काय ? या सर्व प्रश्नांचे उत्तर संविधानाचे कलम देते. प्रत्येक व्यक्तीला आपल्या धार्मिक श्रद्धा ठेवण्याचा अधिकार आहे. धार्मिक श्रद्धा कोणत्या ठेवाव्यात, किती प्रमाणात ठेवाव्यात, धर्मश्रद्धा बदलाव्यात काय, हे व्यक्तीने ठरवावयाचे आहे. या ठिकाणी व्यक्तीचे श्रद्धापरिवर्तन झाले तर त्याच व्यक्तीच्या हक्कावर परिणाम होता उपयोगी नाही, अशी संविधानाची भूमिका आहे. हा प्रश्न केवळ इस्लामचा नाही, तो हिंदुस्थानातील सर्वच धर्मांचा आहे. धर्मांजवळ व्यक्तींना धर्मबहिष्कृत करून इहलोकात छळण्याची शक्ती होती. ही शक्ती समाप्त करून भारतीय संविधानाने धर्माला व धार्मिक समाजाला सामाजिक सुधारणेच्या सर्व वाटा मोकळ्या करून दिलेल्या आहेत. संविधानाचे हे कलम जगातील सर्व धर्मांत जबरदस्त हस्तक्षेप करणारे कलम आहे. आणि गेली वीस वर्षे सर्व शक्तीनिशी हे कलम अस्तित्वात आहे.



घटनेतील ४४ व्या कलमाप्रमाणे समान नागरी कायदा निर्माण करणे हे या संविधानाचे ध्येय आहे. म्हणून त्या दिशेने वाटचाल करणे हे या संविधानावर आधारलेल्या सरकारचे कर्तव्यच ठरते. या समान नागरी कायद्यातून शरियत अपवाद नाही. उलट शरियतचा कायदा रद्द करणे त्यात गृहीतच आहे. शिवाय संविधानातील कलम २५–२–ए व बी मध्ये असे म्हटलेले आहे की, धर्माशी संबंधित असणाऱ्या अगर नसणाऱ्या इहलौकिक जीवनातील प्रश्नाबाबत कायदा करणे हा सरकारचा हक्क आहे. पुन्हा इहलौकिक बाब कशाला म्हणावे हे तर संसदच ठरवणार. हे सगळेच कायदे एकत्रित वाचले तर त्याचा अर्थ आहे, सर्व भारतीय नागरिकांना नागरी कायदा, गुन्ह्याचा कायदा, आर्थिक कायदा एकच व समान असावा. समान नागरिकत्व या कल्पनेतच हे गृहीत आहे. इतर कायदे सर्वांच्यासाठी एकच आहेत. शिल्लक राहिलेले काम फक्त नागरी कायद्याचे आहे. तेवढे स्पष्टपणे कलम ४४ ने जाहीर केलेले आहे. या संविधानाने पूर्ण स्मृतिग्रंथातील हिंदू कायदा, पूर्ण इसाई कायदा, पूर्ण शरियतचा कायदा भारतीय नागरिकांमधून रद्द करणे व त्या जागी एकच धर्मातील कायदा आणणे असा आपला हेतू जाहीर केला आहे. हा हेतू पूर्ण होण्यास काही उशीर लागू शकतो; पण दिशा स्पष्ट आहे. या

धोरणाशी आपण एकनिष्ठ आहोत काय याचे उत्तर दिले पाहिजे. संविधाननिष्ठा जाणीवपूर्वक बाळगावयाची असते, जाहीर करावयाची असते. आपल्या आचरणाने ही निष्ठा सिद्ध करावयाची असते. शाब्दिक घोषणांनी ही निष्ठा सिद्ध होत नसते.

मी स्वतः अधार्मिक माणूस आहे; त्यामुळे माझा प्रश्न नाही. पण मी संविधान समजून घेऊन त्यावर श्रद्धा ठेवणारा माणूस आहे. सदर परिसंवादात एक वक्ते प्रा. देवदत्त तुंगार होते. ते म्हणाले, ' मी धार्मिक माणूस आहे. शिवाय यथामती संविधान समजून घेतलेले आहे. कुरुंदकर सांगतात तोच संविधानाचा अर्थ आहे हे माहीत असूनसुद्धा, व मी धार्मिक असूनसुद्धा या संविधानावर श्रद्धा ठेवणारा माणूस आहे. धार्मिक हिंदू जर या संविधानावर श्रद्धा ठेवू शकतो तर धार्मिक मुसलमानांना अशी श्रद्धा ठेवणे जड का जाते हे त्यांनी समजावून सांगितले पाहिजे. ' आणखी एक वक्ते माझे मित्र नवबौद्ध कार्यकर्ते श्री. लक्ष्मण गायकवाड होते. ते म्हणाले, ' मी धर्माने बौद्ध आहे, बौद्ध धर्मावर माझी श्रद्धा आहे. आम्हीही अल्पसंख्यच आहोत. सर्वांच्यापेक्षा जास्त अन्यायपीडित आहोत. अन्यायपीडितांवरील अन्याय दूर व्हावा व अल्पसंख्याकांचे रक्षण व्हावे यासाठी म्हणून तर या संविधानावर धर्मग्रंथाइतकी माझी श्रद्धा आहे. मुसलमान अल्पसंख्य आहेत, त्यांचे म्हणणे असे की, तेही अन्यायपीडित आहेत, मग माझ्यासह ते या संविधानाचा पूर्ण स्वीकार श्रद्धेने का करीत नाहीत ? ' पण हा प्रश्न धार्मिक असण्या–नसण्याचा नाही, प्रश्न प्रवृत्तीचा आहे. खरी अडचण या ठिकाणी धर्माची नाही, ती उघड व राजकीय आकांक्षांची आहे. जे लोक शाब्दिकरीत्या संविधानाशी एकनिष्ठा जाहीर करतात; पण व्यवहारात मात्र संविधानाच्या गृहीत आशयाविरुद्ध वागतात, त्यांच्या निष्ठेच्या घोषणा एक राजकीय चाल मानल्या जातात. आम्ही आपल्याच मनाला हे विचारले पाहिजे की, आमची संविधाननिष्ठा कोणत्या पातळीची आहे ? आशयनिष्ठेच्या पातळीची की शब्दनिष्ठेच्या पातळीची ? 

या सर्व बाबी मी आपणासमोर काय म्हणून सांगत आहे ? प्रथम मी माझ्या मुसलमान नसण्याच्या हक्काबद्दल बोललो. नंतर मी संविधाननिष्ठेविषयी सांगितले. आजचा विषय राष्ट्रीय एकात्मता आहे हे मला माहीत नाही काय ? ते माहीत आहेच, व त्यासाठीच मी हे सारे सांगत आहे. राष्ट्रीय एकात्मता सर्वांना एका धर्माचे करून होत नसते. सगळा युरोप खिश्चन झाल्यामुळे युरोपचे एक राष्ट्र झाले नाही; युरोपमधील खिस्ती राष्ट्रांनी आपापसांत लढाया करणे सोडले नाही. धर्म कोणताही स्वीकारला म्हणजे माणूस बदलतो थोडाच ? खिश्चनांना लागू आहे तेच इस्लामला

लागू आहे. माणूस मुसलमान झाला म्हणजे सद्‌गुणी होतो याची हमी कोण देणार ? मुसलमानांमध्ये अतिशय सद्‌गुणी, अतिशय चांगले, पापभीरू व सज्जन लोक मागे होऊन गेले, आज आहेत, पुढे होतील; पण मुसलमानांमध्ये वाईटही लोक झाले, त्यांच्यातही इतर सर्व धर्मांतील लोकांप्रमाणे चोर आहेत, खुनी आहेत, गुंडही आहेत. उलट हिंदू व मुसलमान चोर एकदिलानें, परस्पर सहकार्यानें आपला धंदा करतात. अशा अवस्थेत– या, सर्व जण इस्लाममध्ये या, अशा दावत कशासाठी ? ही आमंत्रणे दिल्यामुळे कुणी इस्लाममध्ये येणार नाही, आणि इस्लाममध्ये आल्यामुळे सगळे प्रश्न सुटतील याची खात्री नाही. मुसलमान झाला म्हणजे माणूस सज्जन होतो असे थोडेच आहे ! राज्य मिळवण्यासाठी आपले बंधू मारणारा अशोक हे करताना हिंदू होता. गादी मिळवण्यासाठी बंधू मारून बाप कैदेत घालणारा औरंगजेब मुसलमान होता. सगळ्याच धर्मांत हा प्रकार चालू आहे. हे प्रकरण आजचे नाही, जुन्या काळापासून चालू आहे. अगदी पवित्र खलीफाच्या काळात जरी गेलो तरी वंदनीय अली व वंदनीय आयेशा एकमेकांविरुद्ध युद्धाला उभे राहिले. हसन-हुसेनचा वध करणारेही मुसलमान होते. उस्मान आणि अलीचा वध करणारे मुसलमानच होते. सर्वांना सज्जन करण्याच्या प्रयत्नापेक्षा सर्वांना मुसलमानच करण्याची आपली आकांक्षा का असावी ? का असावी याचे उत्तर आपण द्यावयाचे आहे. या आकांक्षेला यश येण्याचा संभव नाही,–ही वस्तुस्थिती समजून घ्या इतकेच मला म्हणावयाचे आहे. १३३

नुकतेच हजरत अली आणि हजरत आयेशा यांच्यातील युद्धाबद्दल मी बोललो. असे काही बोललो की आमचे मुसलमान मित्र म्हणतात, चुकीचे ग्रंथ वाचून तुमची मते बनलेली आहेत. आपण सत्य ग्रंथ वाचा. मी हे माझ्या मित्रांना सांगू इच्छितो की, मौलाना नदवी, मौलाना मौदुदी यांचे सत्य ग्रंथ मी पुष्कळ प्रमाणात वाचले, पण त्या सत्य ग्रंथांत जे सत्य नाही आणि अजीज अहमद यांच्या पुस्तकात मात्र सांगितले आहे त्याचे खंडन करणारे मला कुठेच काही आढळले नाही. ज्या घटना इतर ग्रंथकार सांगतात त्या घटनांपेक्षा निराळ्या घटना इस्लामच्या धार्मिक वाङ्मयातही नाहीत; मुसलमानांच्या राजकीय लिखाणातही नाहीत. हजरत आयेशा आणि अली यांच्यात कडवे शत्रूत्व होते, ही गोष्ट चुकीची माहिती देणाऱ्या असत्य पुस्तकांची नोंद नाही. धर्मश्रद्ध मुसलमानांनी लिहिलेल्या धार्मिक ग्रंथांतच ही नोंद आहे. राष्ट्रीय एकात्मतेसारखे प्रश्न आपण अज्ञानाने बोलता आहात, आपला गैरसमज झाला आहे, असे म्हटल्याने सुटत नसतात. आम्ही अज्ञानी आहोत हे तर खरेच. कारण आमचा जन्म मूर्तिपूजकांच्या ‘ अडाणी ’ व ‘ निमजंगली ’ परंपरेत झालेला आहे. मी वापरलेली दोन्ही विशेषणे आपल्या अधिकृत प्रकाशन ग्रंथातील

आहेत. पण आपण तर ज्ञानी आहात, ज्ञानाच्या प्रकाशात जन्म घेऊन आपण सत्य कोणते हुडकून काढले ? नवीन असे सत्य आपल्या लिखाणात मला एकच दिसते, ते म्हणजे, आपण भारताच्या फाळणीची जबाबदारी मुसलमानांवर न टाकता काँग्रेस व हिंदू यांच्यावर टाकता हे होय. ज्ञान इतके आत्मवंचक असावे काय ? हिंदूंमध्ये दोष नाहीत, हिंदूकडून चुका घडलेल्या नाहीत, ते मोठे निष्पाप आहेत, असे मी आपणास सांगणार नाही; पण फाळणी हिंदूंनी मागितलेली नव्हती, फुटून निघालेले प्रांत हिंदू बहुसंख्येचे नव्हते, इतके तर तुम्ही समजून घ्या. हिंदूंच्या जातीयवादी भूमिकेमुळे एकदा फाळणी झाली; हिंदू लोक असेच वागत राहिले तर पुन्हा फाळणीची वेळ येईल असे आपल्यातील काही पंडित सांगतात. पुन्हा फाळणीची वेळ येण्यासाठी मुस्लिम बहुसंख्य प्रांत असावा लागतो. १३४
राज्य तोडून देणारा इंग्रज असावा लागतो. हा इंग्रज हजर नसला तर मुस्लिम राष्ट्रांच्या फौजांना काश्मिरही घेता आले नाही. श्रीनगर घेण्याच्या प्रयत्नात लाहोर धोक्यात आले हे तर आता समजून घ्यावे लागेल !

सामाजिक प्रश्न नुसत्या सहिष्णुतेने, नुसत्या औदार्याने सुटत नसतात. परस्परांवर आरोप करून, चतुराईने मुद्दे डावलून तर मुळीच सुटत नसतात. प्रश्न सर्वसामान्य तत्त्वे आणि औदार्य यांनी सुटतात. राष्ट्रीय एकात्मतेचा आधार तुम्ही सर्वांनी हिंदू होणे हा आहे, असे मी म्हटले तर आपण चिडाल व हसाल. कारण हिंदू समाजात जाती खूप आहेत, त्यांच्यात विस्कळितपणाही आहे, हे तुमच्याइतकेच मलाही मान्य आहे; पण हा प्रश्न आम्ही सर्वांनी मुसलमान झाल्याने तरी सुटेल काय ? सगळ्या जगातील मुसलमान एक राष्ट्र म्हणून निर्वेधपणे जगू शकले असते, तर अफगाणिस्थान इराणहून निराळा राहिला नसता. निदान तिथे शिया-सुन्नी भेद तरी होता; पण जॉर्डन आणि सौदी अरेबिया हे तर दोन्हीही सुन्नी अरब देश आहेत. ते एक राष्ट्र का होत नाहीत ? सारे मुसलमान झाले तर जग सज्जन होईल हेही इतिहासाने खरे दिसत नाही. सारे मुसलमान झाले तर राष्ट्र एकजीव होईल हेही खरे दिसत नाही. मोगल साम्राज्यापासून फुटून निघणारे बंगाल, अयोध्या आणि हैद्राबादचे सुभेदार बिगर मुसलमान होते काय ?

म्हणून प्रश्न भारतीय संविधानाच्या चौकटीत व समान नागरिकत्वाच्या पायावरच सुटू शकतो. मुसलमानांच्या राजकीय संघटना आणि मुसलमान समाज यांच्यातील अंतर आता यापुढे अधिक वाढत जाणार आहे; याची कृपा करून आपण शांत चित्ताने नोंद घ्या. फार दिवस झाले नाहीत,— महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत एक विधेयक आले होते, या विधेयका-मुळे मुसलमानांवर एकाधिक पत्नी करण्यावर बंधन टाकले जाणार होते.

हा सवतबंदीचा कायदा मुस्लिम समाजाला लागू करण्याचा प्रश्न होता. हे विधेयक विधानसभेत स्वीकारले गेले नाही; पण या निमित्ताने चर्चा करताना, महाराष्ट्र शासनाने ही गोष्ट जाहीरपणे घोषित केली की, महाराष्ट्र शासन असल्या प्रकारचे विधेयक उचित व रास्त समजते. त्यावर चर्चा करताना जनाब बनातवाला म्हणाले, "आम्ही शरियतच्या कायद्यात हस्तक्षेप सहन करणार नाही. अशा कायद्याचा अंमल फक्त आमच्या प्रेतावरच होऊ शकतो." महाराष्ट्रात सर्वत्र बनातवालांच्या या विधानावर तीव्र खेद व संताप व्यक्त करण्यात आला. मला मात्र बनातवालांविषयी राग आला नाही. ही प्रेतावरून चालण्याची धमकी भारतात काही नवीन नाही आमच्या देशातील विधानसभांमध्ये व बाहेर या धमक्या अनेकदा दिल्या गेलेल्या आहेत. हिंदू कोड बिल बनत असताना हिंदू खासदारांनी अशा धमक्या दिलेल्या आहेत. हजरत मोहानीने ही धमकी दिलेली आहे. निदाये मिल्लत, दावतसारखी उर्दू नियतकालिके तर मंत्र जपल्याप्रमाणे दरमहा निदान एकदा प्रेतावरून चालण्याची धमकी देतात. राजकीय नेत्यांना अशा धमक्या देण्याची सवयच असते. या धमक्या दिल्या गेल्या म्हणजे माझ्यासारखा माणूस फक्त गालातल्या गालात हसतो. अशा धमक्या गंभीरपणे मनावर घ्यावयाच्या नसतात. चर्चा होतच असतात, कायदे बनत जातात. समाज बदलून जातो, कोणी मरत नसतो. नेते व अनुयायी दोघेही बहुधा जिवंत असतात.



याबाबत वस्तुस्थिती काय आहे हे एकदा आपण समजून घ्या. ज्याला इस्लामचा कानून किंवा शरियतचा कानून म्हणतात, हा एक संपूर्ण असा कायदा. ज्या काळात हा कायदा अस्तित्वात आला आणि ज्यांनी हा कायदा अस्तित्वात आणला, त्यांना संपूर्ण जीवनाचा विचार करणे भागच होते; म्हणून सगळाच कायदा करावा लागला. कारण त्यांना राज्य करावयाचे होते. शासनसंस्थेचे रूप हा या कायद्याचा एक भाग होता. ही शासनसंस्था खलीफा, सुलतान, इजमा इत्यादींवर आधारलेली अशी होती. आज हिंदुस्थानात शरियतच्या कायद्याचा हा भाग अस्तित्वात नाही. या कायद्याचा दुसरा भाग आर्थिक भूमिकेचा होता. त्यात खिरात, जकात, जिझिया असे अनेक कर होते. हाही भाग भारतात अस्तित्वात, नाही. तिसरा भाग विदेशी नीतीचा होता. या विदेशनीतीत जिहाद हा एक महत्त्वाचा भाग होता; हाही भाग अस्तित्वात नाही चौथा भाग गुन्ह्याच्या कायद्याचा होता. या भागात हात तोडणे, पाय तोडणे, दगडांनी ठेचून मारणे अशा शिक्षा होत्या. हाही भाग आता अस्तित्वात नाही. एकूण शरियतच्या कायद्याचा हा चार-पंचमांश भाग म्हणजे ऐंशी टक्के भाग होता. यातील पुष्कळसा भाग मुसलमानांनीच रद्द करून टाकला. या रद्द करण्यात काही प्रमाणात आलमगीर औरंगजेब हाही सहभागी होता.

त्याने शिवाजीला मुसलमान होण्याचे आमंत्रण दिलेले नव्हते. शिवाजीने ते स्वीकारलेले नव्हते. तरीही त्यांचा परस्पर मैत्रीचा संधी होताच. आणखी काही भाग इंग्रजांनी रद्द करून टाकला. आमच्या कायद्यात हस्तक्षेप होणे आम्ही सहन करणार नाही, त्यासाठी आमच्या प्रेतांवरून जावे लागेल, ही घोषणा करता करताच हिंदुस्थानमध्ये शरियतचा ऐंशी टक्के भाग रद्द होऊन गेला आहे. त्यासाठी कुठेही सर्वांच्या प्रेतावरून जावे लागले नाही. कधी कधी काहींच्या प्रेतांवरून होणारी वाटचाल तर शरियतचा प्रश्न उपस्थित नसला तरी राजकारणात चालू असते.

जो वीस टक्के नागरी कायद्याचा भाग आहे, तो तरी पूर्णपणे अस्तित्वात कुठे आहे? या नागरी कायद्याचा एक भाग पुराव्याचा कायदा होता. हा भाग आज अस्तित्वात शिल्लक नाही. असाच एक भाग धर्मपरिवर्तनाचा कायदा होता. या मुद्द्यावर शरियतचा कायदा आता मुसलमानांनाही लागू नाही. ह्या गोष्टी फार जुन्या झाल्या. इतक्या सगळ्या बाबी भारतीय संविधान प्रारंभ होण्यापूर्वीच होऊन गेलेल्या होत्या. आज चालू असणाऱ्या बाबींत शरियतचा इतका भाग शिल्लक नाही. हे तत्त्व गृहीत आहेच; पण भारतीय संविधान बनल्यानंतर थोडे बदल आणि हस्तक्षेप शरियतच्या कायद्यात झालेले नाहीत. संविधानातील निरुपद्रवी भासणारी कलमे मध्येच इस्लामच्या परंपरांना उपद्रवी सिद्ध होताना दिसतात. संविधानातील कलम १९ एफ असे आहे. हे कलम पास होताना मुसलमानांनीही विरोध केलेला नव्हता; पण या कलमला आधारून सर्वोच्च न्यायालयाने एक न्यायनिवाडा दिला. त्याबरोबर दीर्घकाल प्रचलित असणारा हक्केशफा हा इस्लामी रिवाज रद्द झाला; पण असे रिवाजच रद्द होतात असे नाही; कायदेही रद्द होतात. भारतीय संविधानामुळे धर्मबहिष्कृत करण्याचा शरियतचा भाग रद्दच झाला आहे. स्पेशल मॅरेज ॲक्टमुळे शरियतच्या कायद्याचा काही भाग रद्द झाला आहे. आज भारतातून व्हिसा मिळाल्याशिवाय हाजयात्रेला जाता येत नाही. यात्रेकरूंची संख्या सरकार ठरवते, व्हिसाही सरकार देते, मौलवी देत नाहीत. कानूने– इस्लामपैकी लग्न, घटस्फोट, वारसाहक्क इतकाच भाग आता कायदा म्हणून अस्तित्वात आहे. एवढ्याच बाबी सांगण्यासाठी शेवटचा प्रेषित आलेला नव्हता. त्याचे कार्य याहून फार मोठे व व्यापक असले पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात शरियतमध्ये हस्तक्षेप होत गेलाच. हे कायदे बदलताना रक्तपाताच्या धमक्या देणारे लोक काय करीत होते? प्रेतांवरून जाण्याची वेळ कितीदा आली?

समजा, यापुढे शिल्लक राहिलेल्या एका छोट्याशा भागात हस्तक्षेप करावयाचा नाही असे ठरले, तर मुसलमान शरियतच्या गुन्ह्याचा कायदा

आम्हांला लागू करा किंवा आमच्या प्रेतांवरून चालण्यास तयार व्हा. असे सांगणार आहेत काय ? हिंदू चोर असेल तर त्याला सहा महिन्यांची शिक्षा द्यावी, मुसलमान चोराचा मात्र हातच तोडला पाहिजे. नाही तर आमच्या प्रेतांवरून चालण्याची तयारी ठेवा, अशी मागणी मुसलमान करणार आहेत काय ? भारताचे एक सोडा; पण पाकिस्तानच्या मुसलमानांनी तरी अशी मागणी केलेली आहे काय ? शरियतचा ऐंशी टक्के भाग संपून जाणे ज्यांनी स्वस्थ चित्तानें सहन केले, ते वीस टक्क्यांसाठी धमक्या देऊ लागले, तर त्या गंभीरपणे कशा घ्यावयाच्या ?

मी आपणाला खात्रीलायकपणे सांगतो, हे सांगण्यात माझा हेतू चेष्टा किंवा उपहास करण्याचा नाही; माझा हेतू वास्तवता समजावून सांगण्याचा आहे. १३७
याच वर्षी सरकारी नोकरांच्यावर लग्नासंबंधी नवे नियम लागू करण्यात आलेले आहेत. ज्या संविधानाचा हेतू समान नागरी कायदा बनवणे हा आहे, ते संविधान मान्य करणारे सरकार याहून वेगळ्या प्रकारे वागूच शकत नाही. समाजपरिवर्तन हाच प्रवाहाचा निर्णय आहे. या प्रवाहात वाहणे सर्वांना भागच आहे. आम्ही स्थिर उभे आहोत, समाज-प्रवाहात वाहणारे नाही, असे म्हणणाऱ्यांनासुद्धा या प्रवाहाबरोबर ओघात वाहणेच भाग असते. परिवर्तनाची कोणतीही वेळ आली म्हणजे आरडाओरडा सुरू करण्यास प्रारंभ होतच असतो. हिंसेची धमकी देणे सोपे असते. राजकीय नेते हे काम करीत असतात. हिंसा इतकी सोपी नसते; आणि हिंसेचे फळ नेहमीच अनुकूल मिळत नसते. लोकशाहीत विचार व्यक्त करण्याचा हक्क तर बनातवालांनाही आहे; परंतु असल्या प्रकारच्या विचाराची अभिव्यक्ती संविधानाने निर्माण केल्यास प्रवाहाची दिशा बदलू शकत नाही. प्रश्न असा आहे की, ही दिशा आपण रास्त मानतो काय ? याचे मोकळेपणाने उत्तर दिले गेले पाहिजे.

या प्रश्नाला अजून एक रूप आहे. काही पंडित मंडळी असे सांगतात की, आम्ही घटनेशी एकनिष्ठ आहोत; पण संविधानाचा अर्थ तुम्ही सांगता तो नसून आम्ही गृहीत धरलेला अर्थ काही निराळा आहे. संविधानाचा जो अर्थ तुम्ही करता त्याच्याशी आम्ही एकनिष्ठ नाही, जो अर्थ आम्ही समजतो त्याच्याशी आम्ही एकनिष्ठ आहोत. आपण संविधानाचा अर्थ काय करतो, हे सांगताना ही मंडळी एका नव्या भाषेत बोलू लागतात. अशा विविध स्पष्टीकरणांच्या पैकी एक स्पष्टीकरण मौलाना हुसेन अहमद मदनी यांनी दिलेले आहे. मदनींच्या मते भारतीय संविधान हा एक मॉहिदा आहे. मॉहिदा या शब्दाला इस्लामच्या इतिहासात एक स्वतंत्र अर्थ आहे. ज्या वेळी महमद पैगंबरांनी बिगर-मुसलमानांशी अरबस्तानमध्ये एक करार केला, त्या करारान्वये अरबस्तानातील बिगर-मुसलमान मॉहिद ठरले.

त्यांच्यात व मुसलमानांत झालेला करार म्हणजे मॉहिदा. उलेमा ज्या वेळी बोलू लागतात, त्या वेळी त्यांच्या बोलण्याचा अर्थ मुसलमानेतरांना तर कळत नाहीच; पण हा अर्थ मुसलमानांना तरी किती कळतो याविषयी माझ्या मनात दाट शंका आहे. भारतीय संविधान मॉहिदा आहे, याचा अर्थ भारतीय मुसलमान या देशाचे मूळचे रहिवासी आहेत, ते विजित लोक नव्हते किंवा हिंदूही विजित नव्हते असा होतो, इतके मला मान्य आहे; पण त्यापुढे जाऊन हिंदू हे एक स्वतंत्र राष्ट्र, मुसलमान हे एक स्वतंत्र राष्ट्र– या दोन राष्ट्रांनी परस्परांशी हस्तक्षेप न करता समझोत्याने रहावे, असाही त्याचा अर्थ होतो. मुसलमान हे राष्ट्र असून त्यांना स्वायत्तता आहे; त्याचा धर्म, संस्कृती व परंपरा ह्यांत हस्तक्षेप केला जाणार नाही, याची संविधानाने हमी घेतलेली आहे. अशी ही भूमिका आहे. त्यामुळेच मुसलमान, संविधानाने दिलेले आमचे अधिकार, असा शब्दप्रयोग सतत करतात. भारतीय संविधान जर मॉहिदा असेल, तर त्यांचा अजून एक अर्थ होतो, हे पंडितांनी लक्षात घेतलेले नाही. अरबस्तानात जेव्हा करार झाला, तेव्हा बिगरमुसलमानांना संरक्षणाची हमी मिळाली; पण त्यांना समान नागरिक म्हणून सत्तेत सहभागी करण्यात आलेले नाही. भारतीय संविधान जर मॉहिदा असेल तर मग लोकसभा, विधान सभा, आणि सर्व कार्यकारी सत्ता, न्यायसत्ता, सेना, पोलिस, महत्त्वाचे उद्योगधंदे मुसलमानांना बंद होतील. मुसलमान पंडितांचे काय, आपल्या धर्मवेडापायी सर्व जनतेचे कोणतेही नुकसान झाले तरी त्याची त्यांना फिकीर नसते. मौलाना मौदुदी न्यायालयात म्हणाले नाहीत काय की, हिंदुस्थानने हिंदू राज्य निर्माण करावे, स्मृतीचा कायदा लागू करावा. त्याच्या परिणामी भारतीय मुसलमानांना म्लेंच्छ शूद्रांप्रमाणे वागवले गेले, तरी माझा आक्षेप राहणार नाही. मौदुदींना पाकिस्तानात राहावयाचे असल्यामुळे भारतीय मुसलमान शूद्र झाले तर मौदुदींचे काय बिघडणार ? धर्मपंडित हे असे धर्मवेडे असतात. १३८

मुस्लिम पंडित काहीही म्हणोत, सर्व भारतीय मुसलमानांनी जरी एकमुखाने मागणी केली, तरी भारतीय मुसलमानांना हिंदू राज्यातील शूद्रांप्रमाणे वागवता येणार नाही. एका माणसाला आत्महत्येचा हक्क आम्ही देत नाही, पाच कोटी लोकसंख्येला जनतेची इच्छा म्हणूनसुद्धा आत्महत्येचा हक्क देता येणार नाही. संविधानाचा अर्थ तुम्ही आम्ही किंवा कोणत्या पंडिताने समजून घेण्यावर अवलंबून नसतो. संविधानाचा अर्थ– संविधानाचे शब्द, संविधान सभेतील चर्चा, संविधानाचा संदर्भ या बाबी विचारात घेऊन सुप्रीम कोर्ट लावीत असते. गरज पडल्यास लोकसभा संविधान दुरुस्तीने संविधानाला नवा अर्थ प्राप्त करून देत असते. प्रत्येक पंडिताने आपल्या सोयीनुसार अर्थ करावयाला संविधान हे काही धर्मशास्त्राचे

पुस्तक नाही. हे एक असे ठिकाण आहे की, ज्या ठिकाणी समजून घेण्यात चूक झाली तर एका विफल, हताश राजकारणाखेरीज मुसलमानांच्या हाती काहीच लागणार नाही.

भारतीय संविधानात अल्पसंख्याकांना आपली भाषा, परंपरा, पूजागृहे, रिवाज टिकवण्याचा हक्क दिलेला आहे. संविधानातील ही कलमे समान नागरिकत्वाच्या व सेक्युलर लोकशाहीच्या संदर्भात वाचावयाची आहेत. या कलमांच्या संदर्भात नागरिक हक्क आणि सेक्युलर डेमॉक्रसी ह्या कल्पना समजून घेण्याची मुसलमानांची इच्छा आहे. कशाच्या प्रकाशात काय वाचावे, हे समजून घेण्यात गफलत झाली तर त्यामुळे सगळी दिशा चुकते. मुसलमानांना असे वाटते की, उर्दू ही त्यांची भाषा आहे, ही भाषा टिकवण्याचा त्यांना हक्क आहे. म्हणून मुसलमानांचे शिक्षण उर्दू माध्यमातून व्हावे, आणि उर्दू माध्यमातून शिक्षण झाल्याबद्दल मुसलमानांच्या हिताची कोणतीही हानी होऊ नये. ही परिस्थिती निर्माण करावयाची असेल, तर केंद्र सरकारने उर्दूला हिंदीच्या बरोबरीने जोड राष्ट्रभाषा, आणि सर्व प्रांतांत त्या त्या प्रांतभाषांच्या बरोबरीने उर्दूला जोड प्रांतभाषा केले पाहिजे. उर्दू टिकवण्याचा मुसलमानांचा मूलभूत अधिकार गृहीत धरून आता सर्व ठिकाणी समानता म्हणजे बरोबरी द्या अशी मुसलमानांची मागणी असते, व ही मागणी करताना आपण भारतीय संविधानाचा खराखुरा प्रामाणिक अर्थ लावीत आहो अशी मुसलमानांची समजूत असते. भारतीय संविधानाने मुसलमानांना हिंदूंच्या बरोबरीचे किंवा हिंदूंना मुसलमानांच्या बरोबरीचे हक्क दिलेले नाहीत. असे हिंदू मुसलमानांना बरोबरीचे हक्क लोकसभेत पन्नास टक्के राखीव जागा, मंत्रिमंडळात निम्मे मंत्री, सेनेत निम्मे सैन्य, नोकऱ्यांत पन्नास टक्के नोकऱ्या, अशा सोयी लावून देता येतात. ते संविधानाने दिलेले नाही, हे मुसलमानांना मिळणारे नाही, हे मिळवण्याच्या प्रयत्नात निराशेखेरीज वाट्याला काही येणार नाही. उर्दू ही मुसलमानांना स्वतःची भाषा वाटत असेल, तर असे वाटण्याचा त्यांना हक्क आहे. राष्ट्रभाषा व प्रांतभाषा यांचे स्थान उर्दूला मिळणार नाही. काश्मिरमध्ये उर्दूला प्रांतभाषेचा दर्जा राहील. इतर प्रांतांत ती मुसलमानांची मातृभाषा आहे, तिचा अभ्यास मुसलमानांनी करावा, वाङ्मय वाढवावे, हायस्कूलमध्ये, कॉलेजमध्ये, उर्दू हा अभ्यासविषय राहील; हा विषय मुसलमानेतरांनाही शिकता येईल; आणि एखाद्या मुसलमानाला उर्दू शिकावयाचे नसेल, तर उर्दू टाळता येईल. भारतीय संविधानात उर्दू इतकेच मिळू शकेल; पण हेही व्यवस्थितपणे मिळण्यासाठी बहुसंख्येच्या मनात विश्वास असावा लागतो. नुसती महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण घेण्याचीसुद्धा उर्दूमधून सोय नाही. या परिस्थितीत बदल होऊ शकत नाही. एकूण भारतात खेडी विभागात तीन कोटी बेचाळीस लक्ष मुसलमान राहतात.

यांतील बहुतेकांना मातृभाषेतून म्हणजे उर्दूतून शिकण्याची सोय उपलब्ध झाल्याशिवाय उर्दू भाषा शिल्लक राहू शकणार नाही. अवास्तवाच्या मागे लागून मुसलमान एका वैभवशाली महान वाङ्मयीन वारसा असणाऱ्या भारतीय भाषेचे अहित करीत आहेत. फार काळ ते त्यांना करू दिले जाणार नाही. उर्दू ही केवळ मुसलमानांची भाषा नाही, ती हिंदूंचीही भाषा आहे, एक भारतीय भाषा आहे. या भाषेविषयी बहुसंख्याक जनतेच्या मनात तिटकारा निर्माण करून तिच्या अस्तित्वावर घाला घालण्याचा मुसलमानांना काय हक्क आहे ? स्वतःची भाषा म्हणून मुसलमानांना उर्दू जपता येईल, टिकवता येईल,—नष्ट करता येणार नाही.

हीच गोष्ट अलिगड विद्यापीठाबाबत आहे. अलिगड विद्यापीठ कोण्या १४०
एका वेळी, विद्यापीठ आरंभ करताना, जे तीस लाख रुपये देण्यात आले त्यावर चालत नाही. तीस लाख रुपयांसारखी रक्कम विद्यापीठाच्या व्यवहारात दात कोरण्याइतकीसुद्धा महत्त्वाची नसते. विद्यापीठाचा तोटा सरकारे भरून देतात. हे सरकारी अनुदान आणि त्या विद्यापीठाचा स्वतःचा तोटा, दोन्हींचे आकडे तेच असतात. अलिगड विद्यापीठ चालवण्यासाठी भारत सरकार दरसाल सुमारे साठ लाख रुपये खर्चत असते. कोणे एके काळी दिलेल्या तीस लाखांमुळे विद्यापीठ मुसलमानांची धार्मिक जायदाद होत नसते. शिवाय विद्यापीठाच्या पदव्यांना सरकारी मान्यता असली, तरच नोकरीला त्या विद्यापीठाचा उपयोग असतो. या परिस्थितीत अलिगड विद्यापीठ मुसलमानांच्यासाठी आहे असे कुणी म्हटले तर ते पटले नाही तरी समजून घेता येईल; पण अलिगड विद्यापीठ मुसलमानांचे विद्यापीठ आहे हा मुद्दा समजणेच कठीण आहे. मुसलमानांचे आणि मुसलमानांच्यासाठी यांत मालकी हक्काचा फरक आहे. विद्यापीठात नोकरी कुणास द्यावी, अभ्यासक्रम कोणता असावा हे मुस्लिम समाज स्वतः ठरवणार आहे, की सरकारने संमत केलेल्या ॲक्टच्या चौकटीत विद्यापीठाच्या समित्या ठरवणार आहेत ? या देशात कोणतेच विद्यापीठ एका जातीचे नसते, धर्माचे नसते. विद्यापीठे सरकारी कायद्यांनी अस्तित्वात येतात. सर्व जनतेच्या करातून त्यांचा खर्च चालतो. अलिगड विद्यापीठ हे मुसलमानांच्यासाठी आहे असे म्हटले तर ते समजले जाऊ शकते. कारण या विद्यापीठात मुस्लिम धर्मशास्त्र, संस्कृती व इतिहास ह्यांच्या अध्ययनाच्या विशेष सोयी आहेत; पण या सोयींसह आधुनिक विद्येच्याही सोयी आहेत. आरंभापासूनच विद्यापीठात मुसलमानेतरांना वाव होता, आजही आहे, पुढेही राहील. या विद्यापीठात मुसलमानांना स्वतःच्या धर्म, संस्कृती, परंपरांच्या अध्ययनांच्या सोयी मागता येतील, इतकाच त्याचा अर्थ आहे. न्यायालयीन खुर्चीवर वांछू बसोत की छगला बसोत, किंवा

न्यायमूर्ती हिदायतुल्ला त्या ठिकाणी असोत, अलिगड विद्यापीठ भारत सरकारचे विद्यापीठ आहे, मुसलमानांचे विद्यापीठ नव्हे, हाच संविधानाचा निर्णय येणार. कारण अल्पसंख्येच्या संरक्षणाचे हक्क समान नागरिकत्वाच्या व संसदेच्या सार्वभौमत्वाच्या प्रकाशात स्पष्ट करावयाचे आहेत, तसे केले जात असतात. न्यायमूर्तींचे निर्णय वैयक्तिक लहरींवर येत नाहीत, त्यांचे हात कायद्याने बांधलेले असतात. वस्तुस्थिती अशी असते. इतक्याउपर संविधानाचा अर्थ अमुक नसून तमुक आहे, ही स्वप्नेच कुणाला बाळगावयाची असतील, तर ही स्वप्ने त्यांची त्यांनाच मुबारक असोत, इतकेच मी म्हणेन.

मुस्लिम विचारवंतांची अशी समजूत आहे की, मुसलमानांच्या दृढ, बळकट १४१
संघटना करून ते संविधानाची दिशा बदलू शकतील. मुसलमानांच्या दृढ, बळकट संघटना करण्याचा उद्योग फक्त हिंदू समाजातील उदारमतवाद कमकुवत करतो, व त्याचे परिणाम मुस्लिम समाजाला भोगावे लागतात. ही परिस्थिती बदलावी अशी माझ्यासारख्यांची इच्छा आहे. मुसलमानांनी माझ्याबरोबर या देशाचे समान नागरिक म्हणून नांदावे अशी माझी इच्छा आहे. त्यांना मी दुय्यम नागरिक समजणार नाही. असे समजण्याच्या प्रत्येक प्रयत्नाला मी कडवा विरोध करीन. पण मला स्वतःला दुय्यम नागरिक करण्याचा प्रयत्न यशस्वी होऊ देण्यासाठी मीच मदत करीन या भ्रमात कुणी राहू नये. परस्परांच्याविषयी परस्परांच्या मनात विश्वास जागा करण्याची जबाबदारी एकतर्फी नसते; दुतर्फी असते. भारतीय संविधानाच्या चौकटीत समान नागरिकत्व उपभोगीत आपण राष्ट्रीय एकात्मता निर्माण करू, या तत्त्वावर आणि या आशयावर तुमचे–माझे एकमत झाले तर मग बहुसंख्यांक जातीचा प्रतिनिधी म्हणून औदार्याची पहिली नैतिक जबाबदारी माझी आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न हा भारतीय संविधान आणि त्यातील श्रद्धा जनमानसात रुजवण्याचा प्रश्न आहे. समान नागरिकत्व व सार्वजनिक जीवनावर संसदेचे सार्वभौमत्व या कल्पना बळकटपणे सर्व जनतेच्या मनात रुजू लागल्या म्हणजे राष्ट्रीय ऐक्य क्रमाने साकार होते. संविधानात आधुनिक भारताचे जे स्वप्न दडलेले आहे ते वेगाने साकार करावे, यावर तुमचे–माझे एकमत होणार आहे काय, हा खरा प्रश्न आहे.

आपल्या मनात जे चार प्रश्न या विवेचनाच्या संदर्भात उभे राहणार आहेत, त्यांचीही उत्तरे मी थोडक्यात नोंदवतो; म्हणजे गैरसमजाला जागा राहणार नाही. पहिला प्रश्न असा आहे की, राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न हा केवळ हिंदू–मुसलमानांचा प्रश्न आहे काय ? हिंदुस्थानात पारशी, ख्रिश्चन, बौद्ध असे अनेक धर्मपंथ आहेत. हिंदू-मुस्लिम ऐक्य झाले तरी हे पंथ वेगळेच राहतील. हिंदू समाजात जाती व पंथोपपंथ आहेत.

प्रांतोप्रांतीच्या भाषा, भाषिक राष्ट्रवाद, अस्पृश्य आणि आदिवासी जमाती, गरीब-श्रीमंत, अशी फुटीरता विविध प्रकारची आहे. ही सर्व फुटीरता समाप्त झाल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता निर्माण कशी होणार? अशा अवस्थेत या प्रश्नाचा विचार केवळ हिंदू–मुस्लिम संदर्भात आपण का करीत आहोत? हा आपला प्रश्न बरोबर आहे. म्हणूनच मी आरंभाला हा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा आहे, असे उत्तर दिले होते. या सर्व गुंतागुंतीच्या प्रश्नांना माझे उत्तर– भारतीय संविधानाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करणे, व संविधानाच्या गृहीत भूमिका जनतेत रुजवणे हेच आहे. कारण भारतीय संविधान नागरी कायद्यात समान नागरी कायदा करताना फक्त शरियतचा कायदा रद्द करणार नाही, हिंदूंचाही कायदा रद्द होईल. सर्व धार्मिक कायदेच रद्द होतील. समान नागरिकत्व केवळ हिंदू–मुसलमानांच्यासाठी नाही, सर्वांनाच लागू आहे. संसदेचे सार्वभौमत्व मनात रुजणे हे केवळ धार्मिक झगड्यालाच उत्तर नाही, तर प्रांतवादालाही आहे; आणि संविधानाच्या प्रामाणिक अंमलबजावणीत आर्थिक विषमता दूर करणे, औद्योगिक विकास घडवणे, हेही आहे. म्हणून भारतीय संविधान हा राष्ट्रीय एकात्मतेचा रस्ता असे मी मानतो. आपल्या मनातील दुसरा प्रश्न असा की, लोकशाहीत आपण आम्हांला समजावून सांगून, आमची संमती घेऊन कायदे करणार आहात की बहुमताच्या जोरावर कायदे लादणार आहात? कुटुंबनियोजन, समान नागरी कायदा इत्यादी बाबी तुम्ही मुस्लिम समाजाला समजावून सांगा, पटवून द्या, त्यांची संमती घ्या व ते अंमलात आणा. हे करण्याच्याऐवजी तुम्ही सर्व बाबी लादणार आहात काय? आपला प्रश्न महत्त्वाचा आहे; आणि त्याला माझे उत्तर स्पष्टपणे होय असे आहे. मुस्लिम समाजाचे हृदयपरिवर्तन मी करीत बसावे व आपण सर्वांनी मुस्लिम समाजात परिवर्तनविरोधी प्रचार करावा, ही प्रक्रिया अखंड चालेल. मुस्लिम समाज बदलणार नाही, आणि त्याची संमती नाही म्हणून परिवर्तन घडणार नाही. हीच लोकशाही आहे असे आम्हांला वाटत नाही.



मागासलेल्या देशात लोकांची मनेही मागासलेली असतात. सर्व नागरिकांना बरोबरीचे नागरी हक्क द्यावेत की नाही, हे मागासलेल्या समाजातील जनतेला विचारून ठरवता येत नाही. हितसंबंधीय नेते आपले हितसंबंध सांभाळण्यासाठी नागरिकांच्या समान हक्काच्या विरोधी नागरिकांचेच मतदान घडवून आणतात. अज्ञ जनतेला आपण कशाच्या बाजूने मत देत आहोत हेच कळत नसते; आणि म्हणून परंपरागत नेत्यांनाच ते आपले कल्याणकर्ते मानीत असतात. मागासलेल्या देशात मनाची गुलामी हाच तर मुख्य प्रश्न असतो. म्हणून जगभरच्या लोकशाहीचा अनुभव लक्षात घेऊन समान नागरिकत्व रुजवले जाते, व लोकशाही

हक्काला लायक असा नागरिक निर्माण केला जातो. ही प्रक्रिया लोकप्रतिनिधी बहुमताने ठरवतात. दर वेळी लोकांचे मत घेतले जात नसते. यालाच संसदीय लोकशाही म्हणतात. आपल्या संविधानात प्रतिनिधी असोत की कायदे असोत, जनतेला रिकॉल व इनिशिएटिव्ह हे अधिकार दिलेले नाहीत. भारतीय संसदेत जो हिंदू प्रतिनिधी असतो, तो केवळ हिंदूंचा नसतो. मुसलमानांचाही असतो, किंबहुना सर्व जनतेचा तो प्रतिनिधी असतो. समान नागरी कायद्याला या प्रतिनिधीचे मन अनुकूल करण्याची जबाबदारी घेता येते. जनतेचे मन अनुकूल करण्याची जबाबदारी घेता येते. समान नागरिकत्व दिल्यानंतर हिंदूंचे वेगळे हृदयपरिवर्तन, मुसलमानांचे वेगळे हृदयपरिवर्तन अशी गटवार हृदय परिवर्तने करता येत नसतात. आणि मुस्लिम समाज पूर्ववत जसाच्या तसा उरला आहे, या भ्रमात राहण्यात काय अर्थ आहे? एकपत्नीत्वाच्या कायद्याला सुशिक्षित मुस्लिम स्त्री-पुरुषांच्यातूनच क्रमाने पाठिंबा मिळत आहे. मुस्लिम समाजात विचारपरिवर्तनाचे कार्य हा जागृत मुस्लिम तरुण व सेक्युलर बिगर मुस्लिम तरुण परस्पर सहकार्याने करीतच राहतील. पण हृदयपरिवर्तन होईपावेतो सुधारणा अडून राहणार नाहीत; आणि ही भूमिका घेण्यात लोकशाहीला काही विरोधी आहे असे आम्हांला वाटतही नाही. 

आपल्या मनातील तिसरा प्रश्न असा आहे की, मुस्लिम कायदा रद्द करू इच्छिणारे, मुस्लिम परंपरा व धर्म धोक्यात आणणारे तुम्ही सेक्युलर, व मुसलमानांचे शत्रू हिंदू जातीयवादी यांच्यात फरक काय राहिला? तुम्ही दोघेही इस्लाम नष्ट करण्यासच उद्युक्त आहात. म्हणून सेक्युलॅरिझम ही हिंदू जातीयवाद्यांचीच एक नवी आघाडी आहे, हा विचार तुम्ही आपल्या पक्षसभेत मांडलेला आहे. तुमच्या पक्षाच्या नियतकालिकातून हा विचार आलेला आहे. आपण गजेंद्रगडकरांना हिंदू जातीयवाद्यांचे एकरूप मानता, व छगलांना मुस्लिम शत्रूच्या हातातील एक खेळणे मानता, हे मला माहीत आहे. तरीसुद्धा हिंदुत्ववाद व सेक्युलॅरिझम यांतील फरक मी आपल्याला सांगू इच्छितो. हिंदुत्ववादी मुसलमानांना या देशात विदेशी मानतात, व आपण स्वतः म्हणजे मुस्लिम धर्मवादी दररोज स्वतःची आपुलकी अरबियात व जगातील मुसलमान यांच्याशी सांगत असता. हिंदू जातीयवादी मुसलमान विदेशी आहेत, म्हणून या देशात त्यांना हक्क नसावेत असे मानतो. मुस्लिम जातीयवादी मनातल्या मनात स्वतःला सर्वश्रेष्ठ धर्माचा अनुयायी व या देशात विजेता मानतो; म्हणून त्याला विशेष हक्क हवे असतात. आम्ही मुसलमानांना हिंदूंच्याइतकेच स्वदेशी मानतो, आणि सर्वांनाच म्हणजे सर्व धर्मांना नव्हे तर सर्व नागरिकांना समान हक्क देऊ इच्छितो. समान हक्क पाहू इच्छितो. हिंदूंना या देशात हिंदू कायदा हवा, हिंदू कायद्यानुसार ते मुसलमानांचा विचार करतील. मुसलमानांना

प्रांतोप्रांतीच्या भाषा, भाषिक राष्ट्रवाद, अस्पृश्य आणि आदिवासी जमाती, गरीब-श्रीमंत, अशी फुटीरता विविध प्रकारची आहे. ही सर्व फुटीरता समाप्त झाल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता निर्माण कशी होणार? अशा अवस्थेत या प्रश्नाचा विचार केवळ हिंदू-मुस्लिम संदर्भात आपण का करीत आहोत? हा आपला प्रश्न बरोबर आहे. म्हणूनच मी आरंभाला हा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा आहे, असे उत्तर दिले होते. या सर्व गुंतागुंतीच्या प्रश्नांना माझे उत्तर– भारतीय संविधानाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करणे, व संविधानाच्या गृहीत भूमिका जनतेत रुजवणे हेच आहे. कारण भारतीय संविधान नागरी कायद्यात समान नागरी कायदा करताना फक्त शरियतचा कायदा रद्द करणार नाही, हिंदूंचाही कायदा रद्द होईल. सर्व धार्मिक कायदेच रद्द होतील. समान नागरिकत्व केवळ हिंदू– मुसलमानांच्यासाठी नाही, सर्वांनाच लागू आहे. संसदेचे सार्वभौमत्व मनात रुजणे हे केवळ धार्मिक झगड्यालाच उत्तर नाही, तर प्रांतवादालाही आहे; आणि संविधानाच्या प्रामाणिक अंमलबजावणीत आर्थिक विषमता दूर करणे, औद्योगिक विकास घडवणे, हेही आहे. म्हणून भारतीय संविधान हा राष्ट्रीय एकात्मतेचा रस्ता असे मी मानतो. आपल्या मनातील दुसरा प्रश्न असा की, लोकशाहीत आपण आम्हांला समजावून सांगून, आमची संमती घेऊन कायदे करणार आहात की बहुमताच्या जोरावर कायदे लादणार आहात? कुटुंबनियोजन, समान नागरी कायदा इत्यादी बाबी तुम्ही मुस्लिम समाजाला समजावून सांगा, पटवून द्या, त्यांची संमती घ्या व ते अंमलात आणा. हे करण्याच्याऐवजी तुम्ही सर्व बाबी लादणार आहात काय? आपला प्रश्न महत्त्वाचा आहे; आणि त्याला माझे उत्तर स्पष्टपणे होय असे आहे. मुस्लिम समाजाचे हृदयपरिवर्तन मी करीत बसावे व आपण सर्वांनी मुस्लिम समाजात परिवर्तनविरोधी प्रचार करावा, ही प्रक्रिया अखंड चालेल. मुस्लिम समाज बदलणार नाही, आणि त्याची संमती नाही म्हणून परिवर्तन घडणार नाही. हीच लोकशाही आहे असे आम्हांला वाटत नाही. १४२

मागासलेल्या देशात लोकांची मनेही मागासलेली असतात. सर्व नागरिकांना बरोबरीचे नागरी हक्क द्यावेत की नाही, हे मागासलेल्या समाजातील जनतेला विचारून ठरवता येत नाही. हितसंबंधीय नेते आपले हितसंबंध सांभाळण्यासाठी नागरिकांच्या समान हक्काच्या विरोधी नागरिकांचेच मतदान घडवून आणतात. अज्ञ जनतेला आपण कशाच्या बाजूने मत देत आहोत हेच कळत नसते; आणि म्हणून परंपरागत नेत्यांनाच ते आपले कल्याणकर्ते मानीत असतात. मागासलेल्या देशात मनाची गुलामी हाच तर मुख्य प्रश्न असतो. म्हणून जगभरच्या लोकशाहीचा अनुभव लक्षात घेऊन समान नागरिकत्व रुजवले जाते, व लोकशाही

हक्काला लायक असा नागरिक निर्माण केला जातो. ही प्रक्रिया लोकप्रतिनिधी बहुमताने ठरवतात. दर वेळी लोकांचे मत घेतले जात नसते. यालाच संसदीय लोकशाही म्हणतात. आपल्या संविधानात प्रतिनिधी असोत की कायदे असोत, जनतेला रिकॉल व इनिशिएटिव्ह हे अधिकार दिलेले नाहीत. भारतीय संसदेत जो हिंदू प्रतिनिधी असतो, तो केवळ हिंदूंचा नसतो. मुसलमानांचाही असतो, किंबहुना सर्व जनतेचा तो प्रतिनिधी असतो. समान नागरी कायद्याला या प्रतिनिधीचे मन अनुकूल करण्याची जबाबदारी घेता येते. जनतेचे मन अनुकूल करण्याची जबाबदारी घेता येते. समान नागरिकत्व दिल्यानंतर हिंदूंचे वेगळे हृदयपरिवर्तन, मुसलमानांचे वेगळे हृदयपरिवर्तन अशी गटवार हृदय परिवर्तने करता येत नसतात. आणि मुस्लिम समाज पूर्ववत जसाच्या तसा उरला आहे, या भ्रमात राहण्यात काय अर्थ आहे? एकपत्नीत्वाच्या कायद्याला सुशिक्षित मुस्लिम स्त्री-पुरुषांच्यातूनच क्रमाने पाठिंबा मिळत आहे. मुस्लिम समाजात विचारपरिवर्तनाचे कार्य हा जागृत मुस्लिम तरुण व सेक्युलर बिगर मुस्लिम तरुण परस्पर सहकार्याने करीतच राहतील. पण हृदयपरिवर्तन होईपावेतो सुधारणा अडून राहणार नाहीत; आणि ही भूमिका घेण्यात लोकशाहीला काही विरोधी आहे असे आम्हांला वाटतही नाही.



आपल्या मनातील तिसरा प्रश्न असा आहे की, मुस्लिम कायदा रद्द करू इच्छिणारे, मुस्लिम परंपरा व धर्म धोक्यात आणणारे तुम्ही सेक्युलर, व मुसलमानांचे शत्रू हिंदू जातीयवादी यांच्यात फरक काय राहिला? तुम्ही दोघेही इस्लाम नष्ट करण्यासच उद्युक्त आहात. म्हणून सेक्युलॅरिझम ही हिंदू जातीयवाद्यांचीच एक नवी आघाडी आहे, हा विचार तुम्ही आपल्या पक्षसभेत मांडलेला आहे. तुमच्या पक्षाच्या नियतकालिकातून हा विचार आलेला आहे. आपण गजेंद्रगडकरांना हिंदू जातीयवाद्यांचे एकरूप मानता, व छगलांना मुस्लिम शत्रूच्या हातातील एक खेळणे मानता, हे मला माहीत आहे. तरीसुद्धा हिंदुत्ववाद व सेक्युलॅरिझम यांतील फरक मी आपल्याला सांगू इच्छितो. हिंदुत्ववादी मुसलमानांना या देशात विदेशी मानतात, व आपण स्वतः म्हणजे मुस्लिम धर्मवादी दररोज स्वतःची आपुलकी आराबियात व जगातील मुसलमान यांच्याशी सांगत असता. हिंदू जातीयवादी मुसलमान विदेशी आहेत, म्हणून या देशात त्यांना हक्क नसावेत असे मानतो. मुस्लिम जातीयवादी मनातल्या मनात स्वतःला सर्वश्रेष्ठ धर्माचा अनुयायी व या देशात विजेता मानतो; म्हणून त्याला विशेष हक्क हवे असतात. आम्ही मुसलमानांना हिंदूंच्याइतकेच स्वदेशी मानतो, आणि सर्वांनाच म्हणजे सर्व धर्मांना नव्हे तर सर्व नागरिकांना समान हक्क देऊ इच्छितो. समान हक्क पाहू इच्छितो. हिंदूंना या देशात हिंदू कायदा हवा, हिंदू कायद्यानुसार ते मुसलमानांचा विचार करतील. मुसलमानांना

याही देशात मुस्लिम कायदा हवा. आम्हांला कोणत्याच धर्माचा कायदा नको. कायदे करण्याचा हक्क संसदेला हवा. मला वाटते, ही भूमिका आता पुरेशी स्पष्ट व्हावयाला हरकत नाही. पण इतके सांगूनही ज्यांना ही भूमिका स्पष्ट वाटत नाही, त्यांच्याविषयी मी इतकेच नम्रपणे सांगेन की, झोपी गेलेल्यांना जागे करण्याची जबाबदारी माझ्यासारखा छोटा माणूस घेऊ शकतो, जागेपणी झोपेचे सोंग घेणाऱ्यांना जागे करण्याची जबाबदारी उचलण्यास फार मोठी माणसे लागतात,– तितका मी मोठा माणूस नाही. अशा मोठ्या माणसाची गरज जर काळाला भासू लागली तर काळ ही माणसे जन्माला घालीलच.

आपल्या मनातील चौथा व शेवटचा प्रश्न म्हणजे खरोखरी शेवटचा आहे. तो प्रश्न असा : ठीक आहे; तुम्ही सांगता ते आम्हांला मान्य नाही. तुम्ही सांगता आहात हाच जर संविधानाचा अर्थ असेल तर तो आम्हांला मान्य नाही. सेक्युलॅरिझमची भूमिका आम्हांला मंजूर नाही, पुढे काय? खरे म्हणजे हा सगळ्या चर्चेचा शेवटचा प्रश्न असतो. हा प्रश्न विचारल्यानंतर चर्चेची गरजच संपते, चर्चेची शक्यताही संपते. चर्चेची गरज व शक्यता संपलेली आहे याची खात्री पटवून देण्याचा उद्योग सर्वांनाच फार हानिकारक होईल. म्हणून हा शेवटचा प्रश्न आपण उपस्थित करू नये इतकेच त्याला माझे उत्तर आहे. १४४

अध्यक्षमहाराज, मी प्रथमच हे निवेदन केले होते की, माझ्यासारख्या माणसाला बोलावल्यानंतर तो जे बोलेल ते आपल्याला फारसे आवडते असणार नाही. म्हणून प्रथमच मी इथे बोलावल्याबद्दल सभाचालकांचे आभार मानले होते. आपल्यापैकी पुष्कळसे लोक असे असतील, ज्यांना माझे विचार पटणार नाहीत, आवडणार नाहीत; पण त्यांनी हे विचार शांततेने ऐकून घेतले, याविषयी त्यांचाही मी आभारी आहे. पवित्र कुराणात सूरे काफरून या नावाचा एक सूर आहे. त्यात म्हटले आहे की, तुझे विचार मला पूज्य वाटणार नाहीत, माझे विचार तुला पूज्य वाटणार नाहीत पण म्हणून काय झाले? तुझा धर्म तुला असो, माझा धर्म मला असो. 'लकूम् दिनुकुम् वलीये दिन्' आपण मंडळी परमेश्वर एक मानता व तोच शेवटचा निर्णय देईल असे मानता. मी परमेश्वराचे अस्तित्व मानीत नाही; पण परमेश्वर असलाच तर तुमचा आणि माझा एकच असेल. त्याच्यासमोर आपण सत्यमार्गी ठरावे अशी माझीही इच्छा आहे. त्याच्या स्तवनाने मी आपली रजा घेतो.

'अल्हम् दुलील्लाह इ रब्बुल् आलमिन मालिके योमुद्दिन'

(सर्व स्तुतीला पात्र तो एकच परमेश्वर आहे. तोच विश्वाचा एकमेव नियंता असून, तोच शेवटच्या न्यायनिर्णयाचा अधिपती आहे.)

## इस्लामिक राज्य

ह्या छोट्या लेखात "इस्लामिक राज्य" ही कल्पना एका मर्यादित कक्षेत समजून घ्यावयाची आहे. मुसलमान राजांची इतिहासातील राज्ये अगर मुसलमानांची बहुसंख्या असणाऱ्या आजच्या वर्तमान राष्ट्रातील राज्य-पद्धती व राज्ये ह्यांचा येथे संबंध नाही. राजा हिंदू असला किंवा राष्ट्रातील बहुसंख्य जनता हिंदू असली म्हणजे तेथे हिंदू राज्य असणारच असा काही नियम नाही. उलट 'हिंदू राज्य' नसण्याचाच संभव फार. तोच प्रकार मुसलमानांच्या बाबतीतही समजावा. 'इस्लामिक राज्य' म्हणजे मुसलमानांचे राज्य नव्हे तर इस्लामवर अधिष्ठित असे धर्मराज्य. स्वतः प्रेषित मुहंमद व पवित्र चार खलिफा सोडल्यास असे इस्लामिक राज्य क्वचितच अस्तित्वात होते असे मुस्लिम धर्मपंडिताचे मत आहे. हे इस्लामिक राज्य अस्तित्वात आणावयाचे आहे. मुसलमान धर्मीय लोक बहुसंख्येने जेथे आहेत तेथे हे राज्य अस्तित्वात येण्याचा संभव जास्त आहे हे जरी खरे असले तरी मुस्लिम बहुसंख्या ही इस्लामिक राज्याची अपरिहार्य अट आहे असे त्यांचे धर्मपंडित म्हणजे उलेमा मानीत नाहीत. प्रत्यक्ष अरबस्थानातसुद्धा 'धर्मराज्य' आधी आले व 'सद्धर्मा'च्या अनुयायांची बहुसंख्या नंतर झाली. नेमक्या ह्याच कारणामुळे जर कुणी असे म्हटले की, भारतात मुसलमान अल्पसंख्य आहेत म्हणून येथे इस्लामिक राज्य निर्माण करण्याची आकांक्षा न्याय्य नव्हे, तर हे म्हणणे उलेमांना पटत नाही.

धर्मराज्याची कल्पना इष्ट आहे की नाही हा फार निराळा प्रश्न आहे. पण ही कल्पना सर्व धर्मीयांच्या मनात कमीअधिक प्रमाणात वावरलेली आहे. ज्यूंनी त्यांचे जे राष्ट्र अस्तित्वात आणले त्यांचा धर्म हा आधार होता व आरंभी त्यांची कल्पना इस्रायल हे केवळ 'ज्यूंचे राष्ट्र' न करता 'ज्यूंचे धर्मराज्य' करण्याची होती. ख्रिश्चनांच्या मनात दीर्घकाळ धर्मराज्य होतेच, व सम्राट हा पोपद्वारे ज्ञात झालेल्या धर्माज्ञा अमलात आणणारा

अधिपती असावा ही भूमिकाही होती. हिंदूंच्या धर्मपंडितांनाही धर्मराज्य हवेच आहे. रामराज्य परिषद व वर्णाश्रम स्वराज्य संघ ह्या संघटना त्या कल्पनेचा पुरस्कार करतात. अशा रीतीने सार्वत्रिक असणाऱ्या ह्या कल्पनेचे स्थान इस्लाममध्ये मात्र मध्यवर्ती असे आहे. हिंदूंचे धर्मराज्य ही कल्पना हिंदू धर्माचे अविभाज्य अंग नाही इतर सर्व धर्मांचेही असेच आहे. इस्लाम धर्म मात्र ह्याला अपवाद आहे. इस्लामचे प्रेषित मुहंमद ह्यांना शस्त्र हाती घेऊन लढावे लागले व राज्य निर्माण करावे लागले. इस्लामच्या आरंभीच्या काळात राजा व धर्मगुरू ही दोन्ही पदे एकत्र झाली. आणि हा खलिफा दीर्घकाळ 'अमीरुल मोमीन' (श्रद्धाधारकांचा नेता) राहिला. कुराण ह्या धर्मग्रंथाचे स्वरूपही निराळे आहे. वेद, उपनिषदे, ब्राह्मण व स्मृती ह्यांना एकत्र करणारे म्हणजे धर्म, आचार, अध्यात्म व कायदा एकत्र सांगणारे असे ह्या धर्मग्रंथांचे स्वरूप आहे. ह्या सर्व बाबींच्यामुळे धर्मराज्याची कल्पना मुसलमान समाजात अधिक प्रबळ आहे. १४६

मुसलमान समाज सांस्कृतिक आणि धार्मिक मूल्यांची निर्मिती मानवीय आहे असे समजत नाही. सर्व विश्वाचे प्रभुत्व ईश्वराकडे असल्यामुळे व मुसलमानांचे सर्व जीवित ही ईश्वराची बिनशर्त उपासना असल्यामुळे आपले व समाजाचे जीवन ईश्वरी इच्छेनुसार असावे ह्यावर त्यांचा फार आग्रह असतो. पै. जीना व पै. लियाकत अलीखान ह्यांना पाकिस्तान 'मुसलमानांच्यासाठी' हवे होते. दोघांच्याही मनात धर्मश्रद्धा प्रबळ नव्हत्या. पण पृथक राष्ट्राचा पुरस्कार करणारा जमालुद्दीन अफगाणी किंवा डॉ. इकबाल ह्यांना पाकिस्तान इस्लामसाठीच हवे होते. पाकिस्तानच्या कल्पनेला फिरंगी महल, रामपूर, नदवतुल उलेमा ह्या धर्मपीठांनी पाठिंबा दिला तो इस्लामसाठी आणि देवबंदी, अहरार उलेमांनी विरोध केला तो पाकिस्तान 'इस्लामिक राज्य' होणार नाही म्हणूनच. ह्याच कारणासाठी जमीयत-उल-उलेमा व जमाअते इस्लामीचा पाकिस्तानला विरोध होता. इस्लामच्या सामर्थ्याविना मुसलमानांचे कल्याण होईल ही कल्पना, इस्लामचे कल्याण आणि मुसलमानांचे कल्याण ह्या दोन भिन्न बाबी आहेत ही कल्पना, ह्या दोन्ही कल्पना उलेमांना व म्हणून सर्वसामान्य मुसलमानांना समजणेच कठीण आहे, पटण्याचा प्रश्न तर दूरच राहिला. कारण 'अल्लाची बंदगी' हेच मुसलमान जीवितसर्वस्व आणि जीवित सार्थक्य समजत आला आहे.

आजही भारतात जमाअते-इस्लामीसारख्या वजनदार संघटना स्वतःचे ध्येय 'इस्लामिक राज्याची स्थापना' हेच मानतात. जमाअते-इस्लामी ही संघटना मौ. मौदुदीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यपूर्व काळात इ. स.

१९४१ ला स्थापन झाली. अखंड भारतात त्या वेळीही ह्या संघटनेचे ध्येय सर्व भारतात इस्लामिक राज्य निर्माण करणे हेच होते. अलिगढ विद्यापीठात चर्चा करताना प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ प्रो. हबीब ह्यांना मौदुदींनी स्पष्टपणे सांगितले होते की, भारतावर जर इस्लामिक राज्य स्थापन झाले तर त्यात फक्त मुसलमानांनाच नागरिकत्वाचे हक्क असतील; इतरांचे संरक्षण होऊ शकेल; नागरिकहक्क त्यांना असणार नाहीत. पुढे स्वातंत्र्योत्तर काळी जमाअतचे दोन विभाग झाले. जमाअते इस्लामी पाकिस्तानचे नेते स्वतः मौ. मौदुदी होते व आजही आहेत. त्यांनी आपले ध्येय 'इस्लामिक राज्याची पाकिस्तानात निर्मिती' हे घोषित केले. हेच ध्येय घेऊन ही संघटना पाकिस्तानच्या येत्या निवडणुकांत सहभागी होत आहे. मुस्लिम बहुसंख्य राष्ट्र असले म्हणजे तेथे 'इस्लामिक राज्य' असतेच असे नाही. तेथेही अशा राज्यासाठी झगडावेच लागते त्याचा हा पुरावा आहे. 

भारतात जमाअते-इस्लामी हिंदचे नेते मौ. अबुल लैस झाले; आजही तेच नेते आहेत. ह्या संघटनेने 'हुकूमते इलाही' व अकामते दीन' हे आपले ध्येय घोषित केले. पहिल्या शब्दाचा अर्थ ईश्वराची अधिसत्ता व दुसऱ्याचा अर्थ धर्माचे आधिपत्य असा आहे. आपल्या संविधानात ह्या शब्दाचे स्पष्टीकरण करताना ह्या संघटनेने असे स्पष्ट नोंदवलेले आहे की, ईश्वराच्या इच्छा पवित्र कुराणद्वारेच कळतात. धर्म शब्दाचा इस्लाम हाच अर्थ आहे. म्हणजे जो अर्थ इस्लामिक राज्याचा झाला तोच ह्याही शब्दरचनेचा झाला. मग 'इस्लामिक राज्य' असे सरळच का म्हटलेले नाही? स्पष्टीकरण देताना ह्या संघटनेचे नेते मौ. सदरुद्दिन इस्लाही म्हणतात की 'इस्लामिक राज्य' ह्या शब्दाचा चुकीचा अर्थ बिगर मुसलमानांच्या मनात रूढ झाला आहे. रुजला आहे. त्यांना असे वाटते की 'इस्लामिक राज्य' म्हणजे मुसलमानांचे राज्य. हा गैरसमज टाळण्यासाठी ही शब्दरचना करण्यात आली आहे. खऱ्या व योग्य अर्थाने पाहिल्यास 'हुकूमते इलाही', 'अकामते दीन', 'इस्लामिक राज्य' ह्यांचा अर्थ एकच आहे. एक गोष्ट मान्यच केली पाहिजे की जमाअते-इस्लामी हिंदने आपल्या उद्दिष्टात कोणतीही संदिग्धता ठेवलेली नाही. मुसलमान धर्मीयांची बहुसंख्या ही इस्लामी राजवटीसाठी अपरिहार्य अट नाही ह्याचा हा पुरावा आहे.

जमाअते-इस्लामी हिंदने जाहीररीत्या आपले ध्येय असे काय म्हणून घोषित करावे. त्यामागे बहुसंख्य प्रजेला डिवचावे असा त्यांचा हेतू आहे काय? हिंदूंना ह्या घोषणेचा कितीही राग आला तरी त्यांनी हे समजून घेतले पाहिजे की कोणाला राग यावा म्हणून ही घोषणा नाही. हिंदुस्थानात

मुसलमान आहेत. त्यांचे हितरक्षण करण्याची जबाबदारी मुस्लिम संघटनेला घेतलीच पाहिजे. 'इस्लामिक राज्या 'खेरीज मुसलमानांचे हितरक्षण अशक्य आहे असे तर उलेमांना वाटतेच. पण यांचा प्रेषित शेवटचा आणि त्यांचा धर्म अंतिम व परिपूर्ण असल्यामुळे हा प्रश्न संख्येचा नसून श्रेष्ठ गुणवत्तेचा आहे. व म्हणून इस्लामला आधिपत्याची संधी मिळणे रास्त आहे असेही त्यांना वाटते. 'इस्लामिक राज्यातच' बिगर मुसलमानांचेसुद्धा खरेखुरे कल्याण होईल, त्यांचा विकास व रक्षण होईल असेही त्यांना वाटते. जमाअते इस्लामी हिंदसुद्धा 'इस्लामिक राज्या 'चे उद्दिष्ट डोळ्यासमोर का ठेवते ते ह्या पार्श्वभूमीवर समजून घेतले पाहिजे.

१४८

'इस्लामिक राज्य' ह्या कल्पनेचा एवढा मोठा पुरस्कार चालू असला तरी त्या कल्पनेचे व्यवस्थित व सांगोपांग विवेचन मात्र फारसे कुठे आढळत नाही. हिंदू राज्य ह्या कल्पनेचेही असेच आहे. तिचेही कुणी स्पष्टीकरण देत नाही. असे स्पष्टीकरण उपलब्ध नसले म्हणजे मग इतिहासाकडे वळावे लागते. विक्रमादित्य अगर शिवाजी महाराजांच्यासारख्या वंदनीय राजांनी अगर कौटिल्य, मनूसारख्या ग्रंथकारांनी जे चित्र समोर ठेवले ते म्हणजे हिंदुराज्य समजून टीका व समर्थन असा दुहेरी व्यापार चालतो. हेच इस्लामिक राज्यालाही लागू आहे. ह्या राज्याची स्पष्टीकरणे 'खलिफा' व 'मुस्लिम राजे' विशेषतः गझनवी व औरंगजेब ह्यांच्या वर्तनावरून, व्यवस्थेवरून किंवा 'शरियत' (मुसलमानांचा धार्मिक कायदा) ह्यांतून घ्यावी लागतात. एखादी कल्पना समजून घेण्यात अशा प्रकारे एक मूलभूत दोष समाविष्ट असतो तो नेहमी ध्यानात येतोच असे नाही.

हा मूलभूत दोष कोणता? धर्मराज्याचा पुरस्कार करणारे धर्मपंडित नेहमीच वास्तवाची दोन गटांत विभागणी करतात. पहिला गट अविनाशी वास्तवाचा असतो. दुसरा गट विनाशी वास्तवाचा असतो. ह्या विनाशी वास्तवात जे एका काळीं रूढ होते पण आज बदलले आहे किंवा बदलले पाहिजे असा एक भाग असतो. एक आपद्धर्माचा भाग असतो. आजचा 'हिंदुराज्य' मागणारा स्त्रीशिक्षण विरोधीच आहे अगर अस्पृश्यता निवारणाचा शत्रूच आहे असे सरधोपटपणे समजणे धोक्याचे आहे. शिवाय तो रथात बसून बाणांनी लढण्याचा आग्रह धरील असे मानणेही धोक्याचे आहे. जे धर्मराज्याचा पुरस्कार करीत आहेत त्यांना काय अभिप्रेत आहे हे समजून घेण्याऐवजी त्यांचे म्हणणे इतिहासाच्या आधारे समजून घेणे म्हणजे 'विनाशी वास्तवाचे समर्थन' त्यांच्यावर लादणे आहे. शेवटी धर्मराज्याच्या पुरस्कर्त्यांना नेमके काय हवे आहे हे कळणेच महत्त्वाचे असते. समजून न घेता टीका करणे सोईचे असले तरी हिताचे

नसते. मुस्लिम धर्मपंडित त्यांच्या राज्यकल्पनेत विनाशी काय मानतात व अविनाशी काय मानतात ते समजावून न घेता टीका करण्यात फारसे औचित्य नाही.

ह्या प्रसंग योगायोगाने पाकिस्तानात आला. पाकिस्तानच्या संविधान सभेचे उद्घाटन करताना पै. जीनांनी स्पष्ट शब्दांत पाकिस्तानचे सरकार हे प्रौढमतदानावर आधारलेले ' आधुनिक लोकशाही सरकार ' असेल, अशी घोषणा केली. उलेमांना हे एक प्रकारचे आव्हान होते. लवकरच जीना वारले. जीनांच्या मानाने पंतप्रधान लियाकत अलीखान सावध होते. उलेमांना शक्य तितके समाधानी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पण हा प्रयत्न करताना ' आधुनिक, लोकशाही सरकार ' ही भूमिका मात्र त्यांनी कायम ठेवली. उलेमांची आवडती कल्पना म्हणजे " ईश्वराचे सार्वभौमत्व ". ही कल्पना त्यांनी स्वीकारली, पण हे सार्वभौमत्व जनतेच्या व तिच्या प्रतिनिधींच्या द्वारा व्यक्त होते अशी भूमिका घेतली. सर्व नागरिकांच्यासाठी ' शरियत 'चा कायदा लागू असावा असे म्हणण्याऐवजी सर्व नागरिकांना समानता व मुसलमानांना शरियत अनुसार जीवन घडवण्याची संधी अशी भूमिका घेतली. ह्या भूमिका संविधानाची उद्दिष्टे म्हणून इ. स. १९५१ साली लियाकतअलीखानांनी मांडल्या व संविधान सभेकडून स्वीकृतही झाल्या. जीनांच्या मृत्यूमुळे उलेमांचे धैर्य वाढले होते. पाकिस्तानचे संविधान बनत असताना इस्लामिक राज्य म्हणजे काय हे विचारले जाऊ लागले. उलेमांच्यामध्ये ह्या प्रश्नांची प्रदीर्घ चर्चा झाली. शेवटी सर्व उलेमांचे एक संमेलन इ. स. १९५१ जानेवारी २१ ते २४ ह्या तारखांना कराची येथे भरले. ह्या संमेलनास विविध मतांचे, पंथांचे सर्व प्रमख हजर होते. ह्या सर्वांनी इस्लामिक राज्य म्हणून २२ सूत्रे एकमताने संमत केली. 

ह्या सूत्रांच्या आधारे उलेमांचा सरकारविरोधी लढा सुरू झाला. लियाकत अलीच्या खुनानंतर ह्या लढ्याची तीव्रता क्रमाने वाढतच गेली. ह्या लढ्यातून दोन वर्षांनी कादियानीविरोधी दंगली झाल्या. राज्य अस्थिर झाले. सारी लोकशाही संपली व पाकिस्तानात लष्करी राजवट आणावी लागली. तो त्या वेळी थांबलेला प्रश्न येत्या निवडणुकांच्या निमित्ताने पुनः चर्चिला जात आहे. पाकिस्तानमधील निवडणुकांत उलेमांना क्वचितच बहुमत मिळेल, पण त्यांच्या २२ सूत्रांचे महत्त्व राहीलच. आज तरी आधुनिक काळात मांडली गेलेली ' इस्लामिक राज्यां 'ची जास्तीत जास्त स्पष्ट कल्पना हीच आहे. ह्या सूत्रांच्याकडे अतिविचारपूर्वक मांडलेली भूमिका म्हणून पाहणे भाग आहे. तेथील संदिग्ध जागा जाणीवपूर्वक तशा ठेवलेल्या आहेत. आणि मौनही तितकेच विचारपूर्वक आहे.

उलेमांच्या सूत्रांपैकी काही सूत्रांतील क्रमिक नाव न घेता अयुब राजवटीने अनुसरल्या होत्या.

उलेमांच्या सभेने मान्य केलेल्या सूचनांचा पहिला गट इस्लामिक राज्याच्या मूलतत्त्वाचा आहे. त्यात एकूण सहा सूत्रे आहेत ती अशी :

१. सर्व विश्वाचे व विधानांचे अंतिम सार्वभौमत्व ' अल्ला 'कडे ( म्हणजे ईश्वराकडे ) व एकट्या त्याच्याकडे आहे. तो सर्व विश्वाचा प्रभू आहे.

२. ह्या भूमीचे सर्व विधान कुराण व सुन्नावर आधारित राहील. त्याविरुद्ध कोणताही कायदा अगर शासकीय आज्ञा असणार नाही. आज अस्तित्वात असणारे सर्व कायदे क्रमाने एका ठराविक मुदतीत रद्द होतील अगर सुसंगत केले जातील. ही मुदत संविधानात निर्दिष्ट असावी.



३. राष्ट्राचा आधार भौगोलिक, वांशिक, भाषिक, अगर इतर कोणत्याही ऐहिक बाबी असणार नाहीत. राष्ट्राची उभारणी इस्लामचे प्राणतत्त्व असणाऱ्या तत्त्वांवर व आदर्शांवर होईल.

४. कुराणामध्ये जे न्याय्य ( मारूफ ) म्हणून सांगितले आहे त्याचे संरक्षण व संवर्धन आणि जे अनुचित ( मुनकर ) म्हणून सांगितले आहे त्याचे निराकरण करणे राज्यसंस्थेचे कर्तव्य असेल. इस्लामी संस्कृतीचे पुनरुज्जीवन आणि तिचा विकास करणे इस्लामी शिक्षणाची मान्य संप्रदायाच्या गरजांनुसार व्यवस्था करणे हे राज्यसंस्थेचे कर्तव्य आहे.

५. सर्व जगातील मुसलमानांत आपआपसांत भ्रातृभाव वाढवणे आणि राज्यातील मुसलमानांच्या मनांत प्रदेश, भाषा आणि वंशामुळे जे हानिकारक अपसमज निर्माण झाले आहेत त्यांचे निराकरण करणे राज्याचे कर्तव्य आहे. जगातील मुस्लिमांची एकता टिकवणे, वाढवणे, ह्यासाठी राज्य प्रयत्नरत असेल.

६. धर्म अगर वंशाचा भेदभाव न करता सर्व नागरिकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, औषधी, शिक्षण ह्या प्राथमिक गरजांची पूर्तता करणे आणि कायम वा तात्पुरत्या अपंगांची सोय करणे हे सरकारचे उत्तरदायित्व आहे.

दुसऱ्या गटात नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे स्पष्टीकरण आहे. ह्या

सूचना एकूण पाच आहेत, व त्यांना अनुक्रम सलग दिलेला आहे. ह्या सूचनांची सूत्रे अशी आहेत :

७. इस्लामी कायद्याने दिलेले सर्व अधिकार नागरिकांना त्या कायद्यानुसार असतील. कायद्याच्या कक्षेत सर्वांना जीवित, वित्त, प्रतिष्ठेच्या सुरक्षिततेची हमी, धर्मस्वातंत्र्य, आचार, विचार, उच्चार व संघटना स्वातंत्र्याची हमी आणि संधीची व धंद्याची हमी त्यांना दिली जाईल.

८. कोणत्याही नागरिकास कायद्याखेरीज अधिकारवंचित केले जाणार नाही. कोणासही बचावाची संधी दिल्याविना व न्याय-निर्णयाविना कोणत्याही आरोपाखाली कोणतीही शिक्षा दिली जाणार नाही. १५१

९. मान्य मुस्लिम संप्रदायांना कायद्याच्या कक्षेत संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य राहील. आपल्या अनुयायांना धर्मशिक्षण व आपल्या मतांचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य त्यांना असेल. त्यांच्या त्यांच्या परंपरेप्रमाणे नागरिक कायदा असेल व त्याबाबत न्यायदानासाठी त्यांचे न्यायाधीश असणे उचित राहील.

१०. राज्यातील बिगर मुसलमानांना कायद्याच्या कक्षेत पूर्ण धर्मविषयक स्वातंत्र्य व परंपरा टिकवण्याचे स्वातंत्र्य असेल. धर्मशिक्षण स्वातंत्र्य असेल. त्यांना त्यांच्या धर्माप्रमाणे, प्रथेप्रमाणे नागरी कायदा असेल.

११. शरियतच्या कायद्यानुसार बिगर मुस्लिम प्रजेबाबत जी कर्तव्ये राज्यावर आवश्यक आहेत त्यांची संपूर्ण पूर्तता केली जाईल. कलम ७ मधील सर्व अधिकार त्यांनाही उपभोगण्यास मिळतील.

तिसऱ्या गटात सरकारच्या यंत्रणेचे स्पष्टीकरण करणारी अकरा सूत्रे आहेत व त्यांना सलग अनुक्रम आहे.

१२. राज्याचा प्रमुख मुसलमान पुरुष असेल. त्याची धार्मिकता, ज्ञान व निर्णयशक्ती यावर प्रतिनिधींचा व जनतेचा पूर्ण विश्वास असेल.

१३. सर्व कार्यकारी शक्तीचे केन्द्र व कार्यकारीचे अधिपत्य प्रमुखाकडे असेल. मात्र हा प्रमुख आपले अधिकार व्यक्ती अगर संस्थांना प्रदत्त करू शकेल.

१४. कार्यकारी प्रमुखाचे कार्य एकसत्ताक नसून त्यात प्रमुख शासकीय

अधिकारी व जनप्रतिनिधी व चर्चा विचारविनिमय अंतर्भूत आहे.

१५. कार्यकारी प्रमुखास अंशतः अगर पूर्णतः संविधान रद्द अगर स्थगित करता येणार नाही. व विचारविनिमयाशिवाय कार्य करता येणार नाही.

१६. जी सभा कार्यकारी प्रमुख बहुमताने निवडील तिला हा प्रमुख बहुमताने पदच्युत करण्याचा अधिकार असेल.

१७. नागरी अधिकाराबाबत कार्यकारी प्रमुखाचे नागरी अधिकार कोणत्याही मुसलमानाइतकेच असतील.



१८. सर्व नागरिक– मग ते सरकारी अधिकारी असोत वा नसोत सर्वांच्यासाठी कायद्याची समानता आहे. कायद्यासमोर समान आहेत.

१९. न्यायालये कार्यकारीपासून भिन्न व स्वतंत्र आहेत. त्यांच्या कार्यावर कार्यकारीचे ह्यामुळे दडपण येऊ शकणार नाही.

२०. इस्लामिक राज्याच्या मूलतत्त्वांना व आदर्शांना विरोधी असणारा प्रचार व प्रसिद्धी यांना प्रतिबंध असेल.

२१. देशाचे विविध घटक हे शासकीय विभाग आहेत. त्यांना वांशिक, भाषिक आधार नसावेत. त्यांचे अधिकार केन्द्राने दिले तितकेच असतील. हे अधिकारही शासनाची सोय म्हणून आहेत. त्या घटकांना फुटून वेगळे होण्याचा अधिकार असणार नाही.

२२. संविधानाचे कुराण अगर सून्नीविरोधी स्पष्टीकरण अवैधानिक असेल.

उलेमांच्या सभेने स्वीकृत केलेल्या ह्या सूचनांचा विचार एक दृष्टिकोण म्हणूनच केला पाहिजे. कायदे असे असले तरी व्यवहार कसा असेल– हा संशय घेणे अशा वेळीं न्याय्य ठरणार नाही. व्यवहाराबाबतच्या शंका सर्व ठिकाणी संभवतात. त्याला धर्मातीत लोकशाहीसुद्धा अपवाद नाही ही बाब आणि शंका ज्या इतिहासाच्या आधारे, पूर्वानुभवाच्या आधारे घेतली जाणार तो मुसलमान राज्यांचा इतिहास असला तरी ‘इस्लामिक राज्या’चा इतिहास नाही. ‘इस्लामिक राज्य’ मुसलमानांच्या राज्याहून निराळे असेल असे तर उलेमांचे म्हणणेच आहे, ही दुसरी बाब.

त्यामुळे ह्या सूचनांचा विचार एक वैचारिक भूमिका म्हणूनच करणे भाग आहे. शिवाय हा विचार करताना पुरेसे औदार्य व सहानुभूतीचीही गरज आहे. कारण संदिग्ध जागांच्याबाबत गैरसमजाला वाव मिळणे उचित नाही. उदाहरणार्थ, ह्या सूत्रातील गृहीत निवडणूक पद्धती विभक्त मतदार संघावर आधारलेली असेल की समान व संयुक्त मतदार संघावर असेल? अल्पसंख्याकांना राखीव जागा अगर संयुक्त मतदार संघ ह्या कल्पनांवर आधारलेली पद्धती उलेमांना मान्य नाही. मुसलमान अल्पसंख्य आहेत म्हणून त्यांना विभक्त मतदार संघ असावा ही कल्पना धर्मपंडितांना मुळींच मान्य नव्हती. मुसलमान अल्पसंख्य असोत की बहुसंख्य असोत त्यांचे एक स्वयंपूर्ण राष्ट्र आहे. बिगर मुसलमानांचीही पृथक राष्ट्रे आहेत. एका राष्ट्राचे प्रतिनिधी इतर राष्ट्रांच्या सहकार्यावर अवलंबून असणे ही कल्पना उलेमांना मान्य नाही. त्यांची राष्ट्रकल्पना धर्मानुसारी आहे. पण इतरांनी त्याचे अनुकरण करावे असा त्यांचा आग्रह नाही. मुसलमान हे एक राष्ट्र आहेत इतकाच त्यांचा आग्रह. सर्व हिंदू हे एक राष्ट्र आहेतच असा त्यांचा आग्रह नाही. वाटल्यास हिंदूंचे राष्ट्र ' धर्मवार ' ठरवा. वाटल्यास ' जातवार ' ठरवा, वाटल्यास ' भाषावार ' ठरवा. आपण किती राष्ट्रे आहो, कोणती राष्ट्रे आहोत हे हिंदूंनी ठरवावयाचे आहे. हिंदूंनी निर्णय घ्यावा. मुसलमान तो मान्य करतील असे उलेमांचे म्हणणे आहे. ते पाहता संयुक्त मतदारसंघ जरी मुसलमानांना फायद्याचा असला तरी बिगर मुसलमानांना विभक्त मतदारसंघ मिळेल हे समजून घेतले पाहिजे.



संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व ही कल्पना इस्लामला मान्य नाही. त्यांची भूमिका महत्त्वानुसार प्रतिनिधित्वाची आहे. त्यानुसार इस्लामिक राज्यात महत्त्वाचा क्रम ( १ ) मुसलमान, ( २ ) ज्यू व ख्रिश्चन, ( ३ ) अग्निपूजक, ( ४ ) मूर्तिपूजक असा लागतो. हे पाहता पाकिस्तानात हिंदूंचे प्रतिनिधित्व पारशी व ख्रिश्चनांपेक्षा कमी राहील. पण अल्पसंख्येच्या मनात विश्वास निर्माण व्हावा म्हणून त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व उदारपणे दिले जाईल हेही समजून घेतले पाहिजे.

वरील बावीस सूत्रे वाचताना अजून एक बाब ध्यानात घेतली पाहिजे ती म्हणजे, ही सूत्रे मुळात उर्दू भाषेत मांडलेली आहेत. त्यात काही पारिभाषिक शब्द अरबी व फारशीतील आहेत. त्यांचा इंग्रजी अनुवाद व त्याचा हा मराठी अनुवाद. म्हणून मुद्दाम जर स्पष्टीकरण केलेले नसेल तर सगळी शब्दरचना सैल व आशयानुसारी समजायला हवी. हा कायद्यांचा काटेकोर भाषेतील अनुवाद नव्हे. मुळात ही सूत्रेच काटेकोर कायद्याच्या भाषेत नाहीत. त्या सूचना आहेत. उदा.— राज्याचा प्रमुख

कार्यकारी शक्तीचा प्रमुख असे जे म्हटले आहे तिथे मूळ शब्द ' अमीर ' असा आहे. त्याचा शब्दशः अर्थ सेनापती, टोळीचा नेता, श्रीमंत असा होईल व संदर्भानुसार अर्थ राष्ट्राध्यक्ष, राजा, धर्मगुरू असा होईल. असाच एक शब्द कलम १४ व १५ मधील चर्चा, विचार-विनिमय आहे. मूळ शब्द ' शौराई ' असा आहे. त्याचे इंग्रजी भाषांतर ' ॲडव्हायजरी ' असे न करता प्रसिद्ध राज्यशास्त्रज्ञ व इस्लामचे पंडित इश्ताक हुसेन कुरेशी ह्यांनी ' कन्सल्टेटिव्ह ' असे केले आहे. प्रा. कुरेशी हे पाकिस्तानमध्ये उलेमांचे विरोधक म्हणूनच प्रसिद्ध आहेत. त्यांनी केलेल्या भाषांतराचा अर्थ असा होतो की, कुणाशी चर्चा करावयाची हे प्रमुख ठरवील आणि ही फक्त चर्चा आहे. निर्णय प्रमुख घेईल. त्यांच्यावर चर्चा बंधनकारक नाही. उलेमांनी वापरलेला शब्द शब्दशः घेतला तर प्रा. कुरेशींचा अर्थ बरोबर आहे.



पण आशयाच्या दृष्टीने हे बरोबर नाही. इस्लामिक राज्याला मंत्रिमंडळ असावे काय? एकेक मंत्री एकेका खात्याचा प्रमुख असावा काय? की प्रत्येक खात्याला सेक्रेटरीच असावेत? ही माणसे संसदेचे सभासद असावीत की नसावीत इत्यादी मुद्द्यांवर उलेमा संविधान सभेला सोयीस्कर रचनेचे स्वातंत्र्य देत आहेत. संविधान सभा जी रचना करील ती रचना विचार-विनिमयासाठी प्रमुखाला बंधनकारक राहील, तिचा सल्ला बंधनकारक राहील असे उलेमांना म्हणावयाचे आहे. कलम १५ वरून हे स्पष्ट आहे. उलेमांच्या परंपरागत भाषेत सांगावयाचे तर त्यांनी संविधान सभेला ' इजमा ' अगर ' मजलिसे शौरा ' कशी असावी हे ठरवण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. पण ' मजलीसे शोरा 'चा ' मशविरा ' ( सल्ला ) प्रमुखावर बंधनकारक मानला आहे.' मशविरा ' शब्दाचा शब्दशः अर्थ विचारविनि-मय होतो. पण इथे त्याचा अर्थ सल्ला असा आहे. उलेमांना एकतंत्री हुकूमशहा नको आहे. म्हणून त्यांनी संसद अगर संविधान रद्द करण्याचा अधिकार प्रमुखाला दिलेला नाही. उलट साध्या बहुमताने प्रमुख पदच्युत करण्याची सोय आहे. व त्याला सल्ला बंधनकारक आहे. प्रा. कुरेशीचे भाषांतर मुद्दामच एकतंत्रीपणाला अधिक वाव करून देते. असे भाषांतर अन्यायकारक आहे.

वरील सर्व बाबी नजरेसमोर ठेवून आपण ह्या सूत्रांचा विचार करू लागलो म्हणजे पहिली बाब जर इस्लामिक राज्याविषयी दिसत असेल तर ही की, इस्लामिक राज्य हे एककेन्द्री ( युनिटरी ) राज्य आहे. बलवान केन्द्र असणारे संघराज्यसुद्धा नाही. म्हणून उलेमांनी प्रांतांना कोणतेही अधिकार ठेवलेले नाहीत. सगळेच विषय केन्द्रसरकारच्या आधिपत्याखाली आहेत. प्रांतांना कोणते अधिकार नाहीत हे सांगितल्यानंतर प्रांतरचनेचा

आधार भाषा अगर वंश नसावा हे मुद्दाम सांगितले आहे. उलेमांच्या समोर एक वर्तमान वास्तव म्हणून सिंधी व पंजाबी यांच्यातील संघर्ष एकीकडे व दोघांच्याही विरुद्ध असणारा बलुची आणि पठाण मुसलमानांचा संघर्ष दुसरीकडे वावरत होता. वायव्य सरहद्द प्रांताची व बंगालची मागणी संपूर्ण अंतर्गत स्वायत्तता आणि प्रांताचे खास अधिकारक्षेत्र ही आहे. ह्या कल्पना मान्य केल्या तर पाकिस्तानचे अस्तित्वच नाहीसे होईल ही भीती उलेमांना जाणवत होती. म्हणून त्यांनी एकीकडे शासकीय घटक ह्या पलीकडे प्रांताचा दर्जा मान्य केलेला नाही ( कलम २१ ) व दुसरीकडे भाषिक, प्रांतिक, वांशिक भेद संपवण्याची जबाबदारी सरकारवर टाकली आहे ( कलम ५ ). इतक्याने समाधान झाले नाही म्हणून पुनः स्पष्टपणे ह्या घटकांना फुटून निघण्याचा हक्क नाही असे प्रतिपादन केलेले आहे. १५५
प्रांतांना कोणतेच विशेष अधिकार नाहीत हे ओघाने आलेच. पण त्याची स्वतंत्र नोंद केल्याविना समाधान नव्हते. खरे म्हणजे इस्लाम हा एका भाषेचा, एका प्रदेशाचा अगर एका वंशाचा धर्म कधीच नव्हता. पण त्याबरोबरच तो भाषा, प्रदेशाचा शत्रूही नव्हता. पवित्र खलिफांनी सिरिया जिंकला. इराण जिंकला व प्रांत म्हणून मान्य केला. फारशी, तुर्की ह्या भाषांनाही ऐहिक बाबतीत अरबीच्या बरोबरीने दर्जा दिला. ज्या काळात मध्यवर्तीची सत्ता सेना सामर्थ्यावर आधारित होती तोवर हे ठीक होते. मध्यवर्ती सत्ता दुबळी होताच पुन्हा तुर्की, इराण स्वतंत्र झाले. उलेमांच्या समोर हा इतिहास आहे. म्हणून आता ते भाषाभेदांना वाव देण्यास तयार नाहीत. धर्माच्या प्रमुख आधिपत्याखाली नाना देश, भाषा, वंशाचे मुसलमान जर त्यांचा एकच नागरी व गुन्ह्याचा कायदा व एक उपासना पद्धती असेल तर ऐक्याने नांदू शकतील असे प्राचीन परंपरेला वाटे. परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्या आधुनिकांना इस्लामिक राज्य भाषिक अभिमान, वांशिक अभिमान व प्रांतिक अभिमान ह्यांचे कठोर विरोधक असणे भाग वाटते. हा काळाने घडवलेला बदल आहे. पाकिस्तानातील लोकशाही संपून अयुबखानाची लष्करी राजवट येतात उलेमांची ही सूचना अयुबखानांनी मान्य केली. सिंध, पंजाब इत्यादी प्रांत रद्द करून पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान असे दोनच शासकीय घटक त्यांनी ठेवले. भाषेच्या बाबतीत मात्र बंगालीला वाव द्यावाच लागला. आणि पश्चिम पाकिस्तानात सिंधी, पंजाबीच्या अभिमान्यांनी उर्दूला शह म्हणून शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच चालू ठेवले.

निवडणुकीची कल्पना इस्लामच्या परंपरेत मुळातच नाही. कारण महंमदाची प्रेषित म्हणून निवड अल्लाने केली. त्याच्या अनुयायांनी त्याला आपला नेता मानले. प्रेषिताच्या नंतर अबुबकरची पहिला खलिफा म्हणून निवड झाली असे जरी म्हटले तरी निवड करणारे प्रमुख सहकारी

व धार्मिक होते. इस्लामच्या परंपरेत मुसलमान व्यक्तीला नव्हे तर मुस्लिम धर्मपंडितांना महत्त्व आहे; आणि त्यांचेही महत्त्व ईश्वरीय आदेशाची त्यांना माहिती असते इतक्यामुळेच असते. त्यामुळे खलिफा निवडण्याचे काम प्रमुख धर्मपंडित व नेते करतात. हा खलिफा आयुष्यभरच्यासाठी निवडावयाचा असतो. त्याच्याशी एकनिष्ठ राहावयाची शपथ घ्यावयाची असते. हा खलिफा सर्व जगातील मुसलमानांचा सम्राट व धर्मगुरू असतो. अनेक मुस्लिम राज्यांना अनेक सुलतान असू शकतात; पण सर्वांचा खलिफा मात्र एकच असतो. हे गृहीत धरूनच खिलाफत चळवळीच्या-वेळी तुर्कीच्या खलिफासाठी भारतातील उलेमा चळवळीत आले. काळाच्या ओघात साऱ्या बाबींचा त्याग करण्यास उलेमा सिद्ध झाले आहेत. आपल्या प्रमुखाला खलिफा म्हणण्याचा आग्रह त्यांनी सोडला आहे. (१९ व्या १५६
शतकात या आग्रहासाठी उलेमांनी एक खलिफा निर्माण केला होता.) इतर कोणा राष्ट्रप्रमुखाला खलिफा मानण्याचा आग्रह त्यांनी सोडला आहे. (हा आग्रह खिलाफत चळवळीत होता.) हा राष्ट्रप्रमुख आयुष्य भरासाठी असावा हा आग्रह सोडून त्याला बहुमताने पदच्युत करण्याचे तत्त्व स्वीकारले आहे. तो प्रमुख उलेमांनी निवडावा हा आग्रह सोडून जनतेला मतदानाचा हक्क व प्रतिनिधींना प्रमुख निवडण्याचा हक्क दिला आहे. ह्या मतदारांत उलेमा अल्पसंख्य असले तरी इस्लामी राज्यप्रमुख निवडणे, काढणे ह्या प्रश्नावर ईश्वरी आदेशाचे ज्ञान असल्याची अपरि-हार्यता पूर्वी उलेमांना वाटे. तेच सर्व प्रकारचे फतवे देत. आता उलेमांनी ही अपरिहार्यता बाजूला सारली आहे. राज्यप्रमुख मुसलमान धर्माचा पुरुष असावा इतक्यावर समाधान मानण्यास उलेमा तयार झाले आहेत. परंपरावाद्यांनी ह्या सर्वांत मोठ्या अधिकाराचा परंपरेच्या रक्षणार्थ त्याग केला आहे.

कार्यकारी प्रमुखाची धार्मिकता सर्वमान्य हवी असे एके ठिकाणी नोंदवले आहे. हे जरी खरे असले तरी ही धार्मिकता कोणाला मान्य हवी? मतदार धर्मपंडित असण्याची गरज नाही. प्रतिनिधी धर्मपंडित असण्याची गरज नाही. अशा ह्या प्रतिनिधींना प्रमुखाची धार्मिकता मान्य असली म्हणजे पुरे. खरे म्हणजे इस्लामी परंपरेचे व धर्माचे ज्ञान व त्यावर शाब्दिक नव्हे तर खरीखुरी श्रद्धा ह्या दोन अटी परिपूर्ण करणाऱ्या उलेमांचा धर्मप्रमुखाच्या धार्मिकतेवर विश्वास असायला हवा. पण हा आग्रह सोडला गेला आहे. उलेमांना वाटल्यास स्वतःचे अधिकार सोडून देता येतील; पण ईश्वरी आदेशांपैकी काही सोडण्याचा अधिकार उलेमांना आहे का? असा अधिकार असू शकत नाही. कारण तो धर्मशास्त्रात ‘इरतदाद’चा गुन्हा आहे. ह्या गुन्ह्याला प्राणदंडाची शिक्षा आहे. पण उलेमा सर्व मतांनी ह्यासही तयार झाले आहेत. इस्लामिक

राज्यावर व राज्यप्रमुखावर इस्लामचा प्रचार करण्याची परंपरासिद्ध जबाबदारी आहे. ह्यामुळेच 'जिहाद–बा–सैफ' (शस्त्रांच्यासह धर्मयुद्ध) ही कल्पना इस्लाममध्ये स्थिरावली आहे. मुसलमानांचा एक पंथ कादीयानी म्हणून आहे. तो ह्या शस्त्राधिष्ठित जिहादच्या आज्ञेला विसाव्या शतकात रद्द मानतो. म्हणून ह्या पंथाच्या लोकांना प्राणदंड द्यावा असे उलेमांचे म्हणणे. पण त्यांनी राज्याबाहेर धर्मप्रचार करण्याच्या जबाबदारीतून राज्य व राज्यप्रमुख मुक्त केला आहे. शाब्दिक धर्मप्रमाणता राज्यप्रमुखाला पुरेशी आहे म्हटल्यावर धर्मप्रचाराचे उत्तरदायित्व त्याच्यावर नसावे हे ओघाने आलेच.

उलेमांच्या सभेला आपण नेमके काय करीत आहो ह्याचे संपूर्ण भान १५७
आहे. म्हणून त्यांनी न्यायदान स्वतंत्र केले आहे. सगळ्याच आधुनिक लोकशाहीत न्यायदानाची स्वायत्तता व न्यायालयाचे स्वातंत्र्य रक्षिले जाते. इस्लामिक राज्याचे वेगळेपण ह्या ठिकाणी निर्माण झाले आहे. त्यांनी न्यायदान कार्यकारी सत्तेपासून भिन्न ठेवले आहे. इतकेच नाही तर न्यायालये कार्यकारीच्या हस्तक्षेपापासून अलग ठेवली आहेत. ह्याचा व्यावहारिक अर्थ असा की न्यायाधीश सरकार पदच्युत करणार नाही. इतकेच नव्हे तर सरकार न्यायाधीश नेमणार नाही. परंपरागत कायद्याविरोधी असणारे कायदे सुधारले जाणार वा रद्द होणार असल्यामुळे न्यायदान परंपरेच्या कायद्यानुसार होईल म्हणजे उलेमांच्यावाचून कोणालाही न्यायाधीश होता येणार नाही. प्रत्येक मान्य संप्रदायाच्या अधिकारात फक्त नागरी कायदाच असेल असे नाही. गुन्ह्याचा कायदाही असेल. सरकारचे कोणते निर्णय कुराण व शरीयतविरोधी आहेत ते ठरवून रद्द करण्याचा अधिकार असेल. न्यायालयाची कक्षा कार्यकारी मर्यादित करू शकत नसल्यामुळे निवडणुकीच्या कल्पनेला मान्यता देऊन ते उलेमांनी गमावले आहे. ते सारे व्यवहारात न्यायालयांना पूर्ण स्वातंत्र्य व स्वावलंबी करून उलेमांनी परत मिळवले आहे; म्हणून ह्या इस्लामिक राज्यातील खरा गाभ्याचा भाग सरकार नाही, तर न्यायालय आहे.

कार्यकारी प्रमुखाला संविधान पूर्णतः अगर अंशतः रद्द करताच येत नाही. म्हणून हे कलमही रद्द करता येत नाही. इस्लाममधील नागरी कायदा असो, की गुन्ह्याचा कायदा असो, तो परमेश्वरी आहे. तो कुराण व सुन्नात आहे. त्यापैकी काही संसदेला अगर कार्यकारी प्रमुखाला रद्द करता येत नाही. ह्या कायद्यात विकास करण्याचे काम न्यायनिर्णयच करतात. म्हणून कार्यकारी व संसद ह्या दोहोंनाही परंपरेच्या कायद्यानुसार काम करावे लागते, निराळे काही करता येत नाही. परंपरेच्या विरोधी गेले की ते काम रद्द करण्यात येते. मागच्या इतिहासात शेख-उल-इस्लाम

आणि असेही वाटते की, गुन्ह्याचा कायदा सर्वांना समान व सरकारने बनवलेला असा धर्मातीत राहील. हे वाटणेही खरे नव्हे. गुन्ह्याचा कायदा सर्वांना समान असेल ह्या न नोंदलेल्या कलमाचा अर्थ व्यवहारात सर्वांना गुन्ह्याचा हनाफी कायदा लागू असेल असा होतो. नागरी कायद्या-प्रमाणे गुन्ह्याचा कायदा सर्वांना परंपरेनुसार असणार नाही, तर सर्वांना समान असेल. हा कायदा कुराण व सुन्नीविरोधी असणार नाही. शे. ८५ च्या वर मुसलमान सुन्नी व हनाफी आहेत. म्हणून हा कायदा हनाफीच असणार हे उघड आहे. कारण तो धार्मिक कायदाही आहे व बहुमान्यही आहे. महंमद गझनवी शाफी होता. तो सोडल्यास सर्व मुस्लिम परंपरा (अखंड भारतातही) हनाफी किंवा शियाच आहे. हंबली व मालीकी परंपरेचे येथे कधीच कोणी नव्हते. शाफी आज कोणीही नाहीत. १५९

ह्याच मुद्द्याकडे अजून एका मार्गाने जाता येते. शियाने कधीच आपल्या गुन्हयाच्या कायद्याचा आग्रह धरलेला नाही. कारण त्यांची संख्या अल्प आहे, व सर्व देशाला गुन्ह्याचा कायदा एकच असावा हे तत्त्व मान्य आहे. शाफी, हंबली व मालीकी ह्या परंपरेप्रमाणे मूर्तिपूजकांना मृत्यू अगर इस्लामचा स्वीकार ह्याशिवाय तिसरा पर्याय नाही. ज्या अर्थी ही सूत्रे मूर्तिपूजकांनाही त्यांच्या धर्म व परंपरा टिकवण्याचा अधिकार देतात त्या अर्थी हनाफी शरियतखेरीज इतर कोणताही कायदा सूत्रांना सुसंगतच होत नाही. म्हणून ह्या राज्याच्या गुन्ह्याचा कायदा हनाफी असणार हे उघड आहे. गुन्ह्याचा कायदा धार्मिक असावा हे सूत्र ह्या संविधानाने सोडून दिले आहे असा जो भास होतो तो बरोबर नाही.

हे चित्र वाटते तितके निराशाजनक नाही. हनाफी कायदा म्हटल्या-बरोबर मध्ययुगातील शिक्षण प्रचारात येईल असे समजण्याचे कारण नाही. चोराचा हात तोडलाच पाहिजे किंवा गुलामांची खरेदी-विक्री सुरू केलीच पाहिजे असे बंधन नाही. कोणताही कायदा गुन्हा कशाला म्हणावे हे प्रामुख्याने सांगतो व त्या गुन्ह्याची शिक्षा नोंदवतो; पण ही शिक्षा कमी-अधिक करता येते. हात तोडण्याऐवजी वर्षभर सक्त मजुरी देता येते. शिक्षांच्या स्वरूपात बदल करता येतो. हनाफी कायद्याचा आग्रह शिक्षेच्या स्वरूपाविषयी किंवा शिक्षेसाठी नसतो. तर वंशपरंपरागत धर्म इस्लाम सोडणे. इस्लामच्या खरेपणाविषयी शंका घेणे इत्यादी बाबी गुन्हा आहेत हे सांगण्यासाठी असतो. कलम ९ मध्ये मुसलमानांना धार्मिक स्वातंत्र्य दिलेले आहे पण त्यांना धर्मविषयक स्वातंत्र्य दिलेले नाही; उदा.— मुसलमानांना वाटल्यास चार बायका करता येतील, पण चारच कराव्या असे बंधन नाही. अविवाहित राहता येईल. विधुर राहता येईल. एक, दोन, तीन अगर चार बायका करता येतील. त्यांना घटस्फोट देता येईल. असे

स्वातंत्र्य धर्मानेच दिले आहे. ते मुसलमानांना राहील परंतु त्यांना धर्म बदलता येणार नाही; नास्तिक होता येणार नाही; मुस्लिम धर्म आपल्या सभासदांना शफाचा हक्क देतो. म्हणजे लगतची जायदाद विकत घेण्याचा अग्रहक्क देतो तो मिळेल. आपल्या धर्मप्रचारासाठी इतर धर्मावर टीकेचा अधिकार देतो, तो मिळेल. पण स्वधर्माच्या टीकेचा अधिकार देत नाही, तो मिळणार नाही.

बिगर मुसलमानांना धर्मविषयक स्वातंत्र्य कलम दहाने दिले आहे. त्यांना स्वतःच्या धर्माचे पालन करता येईल, वाटल्यास धर्म बदलता येईल, वाटल्यास धर्माचे आचरण सोडता येईल. पण धर्माचा प्रचार करता येणार नाही. त्यांचे धर्मशिक्षण त्यांना द्यावे लागेल. ती सरकारची जबाबदारी नाही. त्यांना स्वतःच्या परंपरेचा नागरी कायदा मिळेल, पण न्यायाधीश मात्र मुसलमान असेल. हा सगळा आशय ' आझादीये मजाहब 'मध्ये आहे. कोणताही धर्म आपल्या नागरिकांचे काही हक्क ठरवतो. ते हक्क मुसलमानांना मिळतील, इतरांना मिळणार नाहीत. १६०

ह्या ठिकाणी इस्लामी धर्मशास्त्राची बिगर इस्लामी प्रजेकडे पाहण्याची भूमिका लक्षात घेतली पाहिजे. ह्या धर्मशास्त्रानुसार मुस्लिम राज्यातील जे मूळचे बिगर मुसलमान असतात त्याना ' मॉहिद ' असे म्हणतात आणि मुस्लिम फौजांनी जिंकलेल्या राज्यातील जे बिगर मुसलमान असतात त्यांना ' झिम्मी ' असे म्हणतात. मॉहिद किंवा झिम्मी कोण होऊ शकतो ह्यावर त्यांच्या परंपरेत मतभेद आहेत. बिगर मुसलमानांचे हे धर्मशास्त्र दोन गट टाकते. ईश्वरी पुस्तक टिकवले म्हणजे अहलूल किताब. ह्यांना किताबी म्हणतात. ईश्वरी पुस्तक गमावलेले म्हणजे नाअहलूल किताब. ह्यांना गैरकिताबी म्हणतात. परमेश्वराने सर्व मानव समाजाला आदेश दिलेलेच आहेत. तेव्हा ईश्वरीय ग्रंथ सर्वांना मिळालेलाच आहे. काहींनी भ्रष्ट रूपात का होईना तो टिकवला. उदा.– ज्यू किंवा खिश्चन काहींनी तो ग्रंथ गमावलाच. उदा.– हिंदू, बौद्ध अगर पारशी. शाफी, मालीकी व हंबली. परंपरा फक्त किताबींना म्हणजे ज्यू व खिश्चनांना झिम्मी अगर मॉहिद होण्याचा अधिकार मान्य करते. इतरांनी मुसलमान धर्म स्वीकारावा अगर मृत्यू पत्करावा. हनाफी परंपरा सर्वांचाच झिम्मी अगर मॉहिद होण्याचा अधिकार मान्य करते.

भारतीयांना विचाराचा प्रश्न म्हणजे इस्लामिक राज्यात हिंदू, बौद्ध, जैन, पारशी, शीख, लिंगायत ह्यांचे स्थान काय राहील हा आहे. कारण हे सर्व गैरकिताबी म्हणजे ग्रंथहीन आहेत. झिम्मी म्हणून ह्यांचे स्थान काय राहील ? १४ व्या शतकातील शेख हमदानीने आपल्या ' जिकरातुलमुल्क '

ह्या ग्रंथात झिम्मीचे स्थान स्पष्टपणे नोंदवले आहे. इतर सर्व भारतीय उलेमांनी त्याचा अनुवाद केला आहे. पण शेख हमदानी म्हणजे सून्ना नव्हे. त्याच्या विवेचनाला प्रामाण्य कोणते? शेख हमदानीने आपली भूमिका खलिफा उमरच्या आधारे मांडलेली आहे, म्हणून 'झिम्मी'चे स्थान काय याला प्रमाण खलिफा उमरची पद्धती हे आहे. अबू हनीफा व अबू युसूफ (हनाफी परंपरेचे प्रमुख आचार्य) हीच भूमिका प्रमाण मानतात.

शेख हमदानी म्हणतो, 'जीझिया दिल्यानंतर किताबी व गैरकिताबी दोघेही झिम्मी होतात. त्यांना खलिफा उमर प्रतिपादित वीस अटी लागू आहेत. त्याचे संपूर्ण प्रतिपालन ही झिम्मींची जबाबदारी आहे. एरवी ते संरक्षणास अपात्र होतात. त्या वीस अटी अशा : 

१. मुस्लिम राज्यात नवी पूजागृहे त्यांनी बांधू नयेत. २. पाडलेली पूजागृहे पुन्हा बांधू नयेत, पुन्हा दुरुस्त करू नयेत. ३. ह्या पूजागृहात जर मुस्लिम प्रवासी निवास करतील तर त्यांना अडथळा करू नये. ४. जर झिम्मीच्या राहत्या घरी मुसलमान पाहुणा म्हणून राहिला तर कारण न देता तीन दिवस आणि कारण असेल तर तोपर्यंत राहण्याचा मुस्लिम पाहुण्याचा अधिकार आहे. त्याला अडथळा करू नये. ५. त्याने मुस्लिम राज्यात हेरगिरी करू नये, हेरांना आश्रय देऊ नये. ६. त्यांच्यापैकी कोणास इस्लामचा स्वीकार करावयाचा असेल तर अडथळा करू नये. ७. त्याने मुसलमानांचा आदर करावा. ८. त्यांच्या कोणत्याही सभेत मुसलमानांना येऊ दिले पाहिजे. ९. त्याने मुसलमानाप्रमाणे वेष करू नये. १०. त्याने मुस्लिम नावे ठेवू नयेत. ११. खोगीर व लगाम लावून घोड्यावर बसू नये. १२. त्याने तलवारी व बाण बाळगू नयेत. १३. त्याने बोटात मोहोर असणाऱ्या अंगठ्या घालू नयेत. १४. अज्ञ म्हणून जो खुणेचा वेष दिला आहे त्याचा त्याग करू नये. १५. जाहीररीत्या दारू पिऊ नये, विकू नये. १६. आपल्या धर्ममतांचा प्रचार मुसलमानांत करू नये. १७. मुसलमानांच्या घराशेजारी घरे बांधू नयेत. १८. आपल्या मृतांना मुस्लिम कबरस्तानात आणू नये. १९. आपल्या मृताविषयी मोठ्याने शोक करू नये. २०. मुस्लिम गुलाम विकत घेऊ नयेत.

ह्याखेरीज जिझिया घेताना प्रत्येकाचा अपमान करावा असे एक सूत्र मुसलमानांनी पाळावयाचे आहे. ह्या अटी बारकाईने विचारात घेतल्या तर क्रमाक्रमाने बिगर मुसलमानांना मुसलमान होण्यास भाग पाडणे हा त्यामागचा हेतू आहे हे उघड होय. ग्रंथहीनांनासुद्धा असे क्रमाक्रमाने

मुसलमान होण्यास भाग पाडावे. घाई करून मारून टाकू नये. इतकेच अबू हनीफांना म्हणावयाचे आहे. ह्याच बाबी थोड्या फरकाने मॉहिदांना लागू होतात. मॉहिदांना जिझिया द्यावा लागत नाही. म्हणून त्यांना अपमानित करावे लागत नाही. वरील अटींपैकी कलम २, ३, ४, ११, १४, १७, १९ ह्या अटी मॉहिदांना लागू नसतात. उरलेल्या १३ अटी त्यांनाही लागू आहेत.

मुस्लिम राज्यात व इतिहासात मॉहिदांना फार अल्प स्थान आहे. कारण अरबस्तान सोडल्यास इतर सर्व मुसलमान फौजांनी जिंकलेला प्रदेश होता. म्हणून तिथे मॉहिद असूच शकत नव्हते. त्यांचे अस्तित्व फक्त अरबस्तानात होते. खलिफा उस्मानने अरबस्तान ही पवित्र भूमी असल्यामुळे तिथे मुसलमानांखेरीज इतरांना राहण्यास मनाई केली म्हणून तिथेही मॉहिद कुणी उरले नाहीत. पुढे सर्व झिम्मीचीच वर्णने आहेत.



इस्लामिक राज्यात हनाफी भूमिकेचे प्राधान्य असेल हे वर आलेच आहे. तेथील हिंदू प्रजेचे काय ? उलेमांच्या मते इस्लामिक राज्य आज निर्माण होईल. म्हणजे असलेले राज्यच इस्लामिक होईल. ही क्रिया संविधानाने घडणारी आहे. सेनाबलाने घडणारी नाही. म्हणून ह्या राज्यातील सर्व बिगर मुसलमान झिम्मी नाहीत, मॉहिद आहेत. हे स्पष्ट करण्यासाठीच कलम अकरा आहे. ह्या कलमात इंग्रजी शब्द obligations आहे. मूळ उर्दूत ' लवाजिम ' असावा. ह्या कलमाने इस्लामिक राज्याने काही जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत. ही शब्दरचनाच ' मॉहिद 'च्या संदर्भात सार्थ होते.

म्हणूनच ह्या राज्यात बिगर मुसलमान गुलाम केले जाणार नाहीत, त्यांना जिझिया द्यावा लागणार नाही, त्यांना नवे मंदिर बांधता येणार नाही; पण असलेली पाडली जाणार नाहीत. त्यांच्या खाजगी जीवनावर आक्रमण होणार नाही. त्यांच्या सर्व प्राथमिक गरजांची पूर्तता केली जाईल. म्हणूनच त्यांना कलम सातमधील अधिकार आहेत. ह्याचा अर्थ ह्या राज्यात सर्वांना समान नागरिकत्व राहील असा आहे का ? तर तसे नाही. बिगर मुसलमान मुसलमानांच्या बरोबरीचे नागरिक नाहीत. ते न्यायाधीश होऊ शकत नाहीत. धर्मप्रचार करू शकत नाहीत. कलम २० पाहता ते इस्लामवर टीका करू शकत नाहीत. स्वतःच्या धर्मावरील टीकेचे उत्तर देऊ शकत नाहीत. त्यांना कार्यकारी प्रमुख होता येत नाही. मुसलमानांना बिगर मुसलमानांची ताबेदारी नाकारणे हा धार्मिक हक्क असल्यामुळे जेथून धोरण ठरवले जाईल, जिथे इतरांना आज्ञा देता येतील अशा ठिकाणी हे बिगर-मुसलमान नोकर अधिकारी असू शकणार नाहीत. पण

कनिष्ठ नोकऱ्या, शेती व इतर उद्योगधंदे त्यांना मोकळे आहेत. ह्याचा अर्थ असा की, बिगर-मुसलमानांचे संरक्षण होईल. त्यांना समानता मिळणार नाही, त्यांच्या धर्माचे सरकार रक्षण करील; पण धर्माची इतर जबाबदारी सरकार घेणार नाही. हा सगळा फरक धार्मिक स्वातंत्र्य आणि धर्मविषयक स्वातंत्र्य ह्या शब्दरचनेमुळे होतो.

ह्या सूत्रांनी मतदारांच्या वयाचा आग्रह धरलेला नाही. हे वय १८ अगर २१ असे कोणतेही संविधान सभेने ठरवावयाचे आहे. मताचा अधिकार शिक्षण अगर संपत्ती ह्या आधारे असणार नाही. म्हणून हे मतदान सर्व प्रौढांच्यासाठी असेल. खरे म्हणजे इस्लामी धर्मशास्त्रानुसार स्त्रियांना मतदानाचा अधिकार असू नये; पण प्रमुखाबाबत जसा तो पुरुष असावा अशी तरतूद आहे तशी तरतूद इतर कुठेही नाही. म्हणून स्त्रियांना मतदानाचा अधिकार, बिगर मुसलमानांना मतदानाचा अधिकार इत्यादी बाबींना ही सूत्रे अडथळा आणीत नाहीत. अशा प्रकारे निवडलेल्या प्रतिनिधींच्या कालमर्यादेबाबत संविधान सभेने सोयीस्कर अशी मर्यादा ठरवावयाची आहे. प्रांत हे फक्त शासकीय घटक असल्यामुळे त्यांना विधानसभा असू शकत नाही. राज्यप्रमुखाला नेहमी सल्ल्यानुसारच काम करावे लागणार असल्यामुळे व विधानसभा त्याला रद्द करता येणार नसल्यामुळे संसद व कार्यकारी प्रमुख ह्यांचे संबंध ठरवणे आवश्यक आहे. त्याबाबतचे नियम संविधान सभेने करावयाचे आहेत. मात्र ज्याप्रमाणे न्यायदान आणि कार्यकारीचे संपूर्णपणे भिन्नत्व व परस्परांपासून स्वातंत्र्य प्रतिपादन केले गेले आहे तसा कोणताही फरक कार्यकारी सत्ता व वैधानिक सत्ता ह्यांत केला गेलेला नाही. उलेमांच्या भूमिकेत असा फरक असू शकत नाही. १६३

प्रथमदर्शनी पाहता ही सारी राज्यरचना अध्यक्षीय लोकशाहीसारखी दिसते; पण ही अध्यक्षीय लोकशाहीची रचना नसून संसदीय लोकशाहीची रचना आहे हे समजून घेतले पाहिजे. अध्यक्षीय लोकशाहीत न्यायाधिशांची संख्या ठरवणे व न्यायाधीश नेमणे हे काम अध्यक्ष करतो. येथे न्यायविभाग पूर्ण स्वतंत्र आहे. इतकेच माझ्या नजरेसमोर नाही, त्याहून मूलभूत मुद्दा हा आहे की, दर वेळेस संसदेत आपले बहुत टिकवणे व म्हणून प्रत्येक कार्याला संसदेची संमती घेणे ह्या रचनेत अनिवार्य झाले आहे. दोन तृतीयांशाची आडकाठी न ठेवता संसद साध्या बहुमताने प्रमुख बदलू शकते. म्हणजे संसदेच्या कालमर्यादेवर प्रमुखाचा अंकुश नाही. तो मुदतपूर्व निवडणूक घेऊ शकत नाही. संसद मात्र ठरावाने आपली कालमर्यादा वाढवू शकते, कमी करू शकते, प्रमुख बदलू शकते. ही रचना अपरिहार्यपणे संसदीय लोकशाहीची रचना आहे; पण ती तशी दिसत

नाही. जनतेखेरीज प्रांतांना निराळे प्रतिनिधित्व ह्या सूत्रात नाही. म्हणून दुसरे सभागृह नाही. म्हणून दोन्ही सभागृहांच्या मधील संघर्षाचा प्रश्नच नाही. पण उलेमांना ‘ द ज्युरो ’ आणि ‘ द फॅक्टो ’ हे भेदही मान्य नाहीत. कारण हा भेद केला तर ‘ द ज्युरो ’ प्रमुख संविधानात मुस्लिम पुरुष असला पाहिजे हा उल्लेख येईल, व खऱ्या सत्तेचा उल्लेख संविधानात येऊ शकणार नाही. म्हणून त्यांना राज्याचा प्रमुख हा खराखुरा प्रमुख हवा आहे. शिवाय दुसरी एक अडचण आहे. त्यामुळे ह्या सूत्रात उपप्रमुखाचा उल्लेखही नाही. प्रमुख पूर्वेचा असला की, उपप्रमुख पश्चिमेचा असावा ही मागणी सुरू होते. त्याचप्रमाणे अध्यक्ष आणि पंतप्रधान ह्यांबाबतसुद्धा रस्सीखेच सुरू होते. नेमक्या ह्याच कारणामुळे अयूबखानांनी लागू केलेल्या संविधानात पाकिस्तानला उपाध्यक्ष नव्हता. ह्या अडचणीचे निवारण करणे हाही उलेमांचा हेतू आहे. एवढी अडचण निवारण करण्यासाठी केलेली उपाययोजना सोडल्यास सरकार हे संसदीय राहील. कारण मुळातच इस्लाममध्ये लोकशाही आहे असा उलेमांचा दावा आहे.



उलेमांच्या समोरच्या अडचणी इतक्यानेच संपत नाहीत. पाकिस्तानची एक महत्त्वाची अडचण सर्वांच्या समोर आहे. त्याची ५४% लोकसंख्या पूर्व पाकिस्तान म्हणजे बंगालमध्ये राहते. ह्या विभागाला बंगाली शिकवणे आणि पंजाबी वर्चस्वाखालून सुटका करून घेणे ही गोष्ट जितकी महत्त्वाची वाटते तितकी महत्त्वाची गोष्ट पाकिस्तान टिकवणे ही वाटत नाही. ह्या देशात जर लोकसंख्येला अनुसरून प्रतिनिधित्व दिले तर फुटीरपणा वाढेल. ह्यासाठी काय करावे ह्याचे नक्की उत्तर उलेमांना देता आले नाही. म्हणून प्रतिनिधित्व कोणत्या प्रमाणात असावे ह्याबाबत ह्या सूत्रांनी मौन स्वीकारले आहे. प्रांतांना महत्त्व देण्यास मात्र विरोध दाखवलेला आहे. इस्लामिक राज्याची राज्यव्यवहार भाषा कोणती असावी यावरही उलेमांना मौन ठेवणे भाग पडते. कारण उर्दूला बंगालचा विरोध व अरबीला शियांचा विरोध आहे. शिवाय हे अरबी जनतेला मान्य होणे कठीणच, पण त्यांनी कलम ४ च्या अन्वये इंग्रजी संपवण्याची जबाबदारी मात्र सरकारवर टाकली आहे.

इस्लामही मूलतः लोकशाही आहे असा जसा उलेमांचा आग्रह आहे, तसाच ती मूलतः समाजवादी समाजरचना आहे, असाही आग्रह आहे. ह्या आग्रहातूनच कलम ६ ची निर्मिती झाली आहे. राज्यसंस्थेने सर्व नागरिकांना प्राथमिक गरजांच्या पूर्तीची हमी दिली पाहिजे, ह्यावर उलेमांचा अत्यंत आग्रह आहे. एखादा शहाणा मौलवी जर उद्या असे म्हणाला की इस्लामिक राज्याचे दर्शन कुराण व सुन्नात दिसते, पण त्या राज्याचा आत्मा हे कलम आहे तर

मला आश्चर्य वाटणार नाही. कारण इस्लाम सर्व उम्मत म्हणजे धर्म-समूह रक्षण करणे ही खलिफाची जबाबदारी मानतो. सावकार व व्याजावर जगणारे ह्यांचा इस्लामने तिरस्कारच केला आहे. संपूर्ण समाजाच्या विरोधी व्यक्तीचे अधिकार इस्लामला मान्य नाहीत. अपंगांची जबाबदारी नेहमीच सरकारची आहे. त्यासाठीच कर असतात. दानांची सोय असते, त्यामुळे इस्लामी राजवटीत समाजवाद असला पाहिजे हा उलेमांचा आग्रह रास्त आहे; पण त्याबरोबरच वैयक्तिक जायदादीची हमीही इस्लाम देतो. राष्ट्रीयीकरण, सरकारीकरण ह्या कल्पनांना उलेमांचा विरोध नाही; पण त्या त्यांना फारशा आवडत नाहीत.

खरे म्हणजे उलेमांनी अर्थरचनेचा व अर्थशास्त्राचा फारसा विचारच कधी केला नाही. अर्थकारणामुळे सारी समाजरचना बदलते ह्यावर त्यांचा विश्वास नाही. समाजातील संपत्तीचा व मुस्लिम बहुसंख्य राष्ट्रात मुसलमानांच्या संपत्तीचा फार मोठा भाग ताब्यात घेतल्या-शिवाय सरकार जनतेच्या प्राथमिक गरजांची पूर्ती करू शकणार नाही असे त्यांना वाटते. सर्वांच्या प्राथमिक गरजांच्या पूर्तीची हमी देण्यासाठी सरकारला आरंभीच्या काळात अमर्याद अधिकार हाती घ्यावे लागतात. न्यायदान-स्वातंत्र्य रद्द करावे लागते असा विचारही उलेमांच्या मनात येत नाही. सरंजामशाही समाजरचनेत पूर्णतेला गेलेला इस्लामी कायदा व तो अक्षरा अक्षराने जतन करण्यास झटणारे उलेमा हाच समाजवादाला खरा अडथळा ठरणार आहे हे उलेमांना जाणवतच नाही. 

ह्याचे कारण ‘ कायदा ’ ह्या कल्पनेबाबतच्या अज्ञानात आहे. सारा नागरी व गुन्ह्याचा कायदा परंपरेतच आहे, न्यायालये त्याचे रक्षण करतात. ह्या कायद्यातच सरकारचे कर कोणते हे नमूद केलेले आहे. कराचे प्रमाणही आहे. हे कर सरकारला मिळतील. सरकारची कामे उलेमांनी दाखवून दिली आहेत. ती सरकारने पार पाडावीत. इतक्या सुगम व एकेरी पद्धतीनेही हा विचार चालतो. सरकारवर जर सर्वांना शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी टाकली तर हे काम करण्यासाठी सरकारला धर्मशास्त्रात नसणारे कर लादावे लागतील. कारण प्राचीन काळातील इस्लामी सरकारने अशा जबाबदाऱ्या कधी घेतल्याच नव्हत्या. शांतता रक्षणाची जबाबदारी घेणाऱ्या आणि युद्धाचा खर्च लुटीतून वसूल करणारे सरकार आपल्या नागरिकांच्याकडून जितके कर घेते त्या रकमेत सार्वत्रिक शिक्षणाची सोय होत नसते. सर्वांना, निदान सर्व मुसलमानांना समान हक्क दिल्यानंतर स्त्रियांना एक पती तर पुरुषांना एक पत्नी हे ओघानेच येते असे उलेमांना वाटत नाही. बिगर मुसलमानांना दुय्यम नागरिकत्व दिल्यानंतर संधीची समानता निरर्थक होते. किंबहुना व्यक्तीचा

इस्टेटीचा अमर्याद हक्क मान्य केल्यावर मुसलमानांनासुद्धा संधी-समानतेचा लाभ मिळत नसतो हे उलेमांच्या ध्यानातच येत नाही. म्हणूनच त्यांना वैधानिक सत्ता ह्या नावाची निराळी सत्ता मानवी वाटत नाही. त्यांच्या न्याय्य-सत्तेत सगळेच विधान गृहीत आहे म्हणून त्यांची संसद कार्यकारी सत्तेचेच एक अंग आहे. इस्लाम हा केवळ परिपूर्ण धर्मच आहे, असे नसून ती परिपूर्ण समाजरचना आहे असे म्हटल्यावर हे घडणे अपरिहार्य असते म्हणूनच बारकाईने ही सूत्रे पाळताना हे लक्षात येईल की, ह्या भूमिकेत नोकरशाही व कार्यकारी प्रमुख हाही भेद नाही व म्हणून स्थिर-पक्ष निरपेक्ष नोकरशाहीची शक्यता नाही.

परंपरागत इस्लामला मूर्ती, वास्तू, चित्र, संगीत, नाट्य, नृत्य ह्यांपैकी १६६
काहीच मान्य नाही. तो साधेपणाचे महत्त्व मानणारा धर्म आहे. पण मुसलमान राजांनी भव्य मशिदी, प्रासाद, इमारती बांधल्या. नृत्य, संगीताला उत्तेजन व आश्रय दिला. इराणमधील, तुर्कीमधील मुसलमान सम्राटांनी चित्रकलेचेही संगोपन केले. मुस्लिम कवींची परंपरा शृंगार-प्रधान, भावनाप्रधान व धर्माच्या बाबतीत प्रायः अश्रद्धच आहे. ह्या साऱ्या संस्कृती व परंपरेचे जतन करायचे की नाही ? अरबस्थानातील टोळीवाल्यांचे जीवन आदर्श म्हणून इस्लामपुढे आहे; पण मुसलमानांनी ह्यापेक्षा कितीतरी मनोहर, विविध, भव्य आणि समृद्ध वारसा निर्माण केला आहे. जेव्हा सांस्कृतिक जीवनात मुसलमानांचा वारसा जतन करावा की इस्लामचा वारसा ? हा प्रश्न उद्‌भवतो त्या वेळी उलेमांची फार मोठी अडचण होते.

इस्लामिक राज्य ह्या आदर्श राज्याचे स्वप्न उलेमांच्या नजरेसमोर तरळत असते. आज आधारासाठी सत्य म्हणून इस्लामची उपासना-पद्धती व फायदे तेवढे आहेत. मुसलमानांची संस्कृती स्वीकारवतही नाही, सोडवतही नाही असा स्वप्न व सत्याचा संघर्ष त्यांच्यासमोर चालू असतो. दर वेळी एक नवी अडचण समोर येते. हिंदूंना त्यांच्या परंपरेचा कायदा लागू करावा काय ? हिंदूंना मुस्लिम कायदा लागू करावा तर मुसलमान न होता मुसलमान असण्याचे फायदे मिळतात. त्यांना त्यांच्या परंपरेचा कायदा लागू केला तर इस्लामिक सरकारवर इस्लामबाह्य मूर्तिपूजकांच्या संरक्षणाची जबाबदारी येते. त्यांचे धर्मस्वातंत्र्य नाकारले तर इस्लाम ही लोकशाहीच नाही असे ठरते. जर धर्मस्वातंत्र्य दिले तर इस्लामचा प्रचार सफल होत नाही. अशा अडचणी समोर आहेत. ह्या अडचणींपैकी एक अडचण पाकिस्तानची संविधान सभा होती. ह्या संविधान सभेला संविधान बनवण्याचा हक्क नाही असे म्हणणे म्हणजे ज्याने पाकिस्तान अस्तित्वात आणले त्यांना तो हक्क नाही असे म्हणावे लागले असते म्हणजे बरे.

संविधान सभेचा हक्क मान्य करावा तर ती इस्लामिक राज्य अस्तित्वात आणीत नव्हती. आपण संपूर्ण संविधान निर्माण करावे तर आधुनिक घटनापटुत्व नव्हते. म्हणून त्यांना २२ सूत्रे मांडून इतर रचनेसाठी संविधान सभेला मोकळीक द्यावी लागली.

ह्या अडचणींच्या परिणामी उलेमांना तपशीलवार खूप तडजोड करावी लागली. स्त्रियांना मताधिकार, बिगर मुसलमानांना मतधिकार अशा किरकोळ तडजोडी सोडा. मुख्य तडजोड ही की, इस्लामिक राज्याचा गाभा त्यांना राज्यप्रमुख न ठेवता न्यायालयाच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेवर इस्लामी राज्य उभारावे लागले. उलेमांना इस्लामी राज्य कशासाठी हवे आहे, ह्या राज्याचे उद्दिष्ट काय ? सर्वांना परिपूर्ण मुसलमान करून त्यांचे जीवन ईश्वर इच्छेचे वाहन करणे हे सोडून देऊन सर्वांना मुस्लिम कायद्याखाली आणून सर्वांचे ऐहिक संरक्षण व संगोपन करणे हे ध्येय ठेवावे लागले आहे. माणसे परिपूर्ण व प्रामाणिक मुसलमान झाली म्हणजे समाजरचना निर्दोष होईल असे म्हणण्याऐवजी सर्वांना न्याय्य, समान व सुरक्षित जीवन उपलब्ध करून दिले म्हणजे माणसे परिपूर्ण व निर्दोष मुसलमान होतील असे गृहीत धरावे लागले आहे. 'खऱ्या मुसलमानाच्या नेतृत्वाखाली' 'शाब्दिक' मुसलमानाचे पारलौकिक कल्याण व हे करताना इहलौकिक समाधान ह्या शब्दरचनेऐवजी 'शाब्दिक' मुसलमानाच्या नेतृत्वाखाली सुन्नतच्या कायद्याच्या आधारे 'खरा' मुसलमान निर्माण करण्याचा कार्यक्रम स्वीकारावा लागला आहे. १६७

ह्यासाठी कुराण व सुन्नत ह्यावर उलेमांनी अतिरेकी भर दिला आहे. कलम २, ४, ७, ९, ११, २२ ह्यांत तर तसा स्पष्ट उल्लेख आहे. पण कलम ३, १२, १९, २० ह्यांतही कुराण व सुन्नत गृहीत आहे. ह्या आग्रही अतिरेकाने उलेमा एक गोष्ट साध्य करू शकतील– ती म्हणजे, इस्लामिक राज्यात सारेच राजकीय पक्ष कुराण व सुन्नतच्या आधारे मांडतील, निर्माण होतील; कार्य करतील. व्यवहारात सर्व राजकीय पक्षांच्या वर वेगवेगळ्या मौलवींचे आधिपत्य राहील ह्यापेक्षा निराळा दुसरा कोणताही राजकीय पक्षच अस्तित्वात असू शकणार नाही ही सोय कलम २० ने केलेली आहे. बिगर मुसलमानसुद्धा कुराण व सुन्नतचा आधार घेऊनच आपापले अधिकार मागतील ते खलिफा, अबुबकर, उमर व प्रेषितांच्या हकीकती सांगून न्याय मागतील; पण हे करताना उलेमा एक गोष्ट गमावण्याची भीती आहे. ह्या राज्यात बिगर मुसलमानांचे जे व्हायचे ते होईल. त्यांना मुसलमान होण्याची मोकळीक आहे. पण मुसलमानांचे काय होईल ? इस्लामच्या तेराशे वर्षांच्या इतिहासात निर्दोष धर्मराज्याचा काळ ६० वर्षांहून अधिक नाही. पण ह्या साठ वर्षांत

बिगर मुसलमान, गुलाम मुसलमान होऊन पुन्हा गुलामच राहिले. प्रेषितांचे सहकारीसुद्धा प्रचंड इस्टेट जमा करण्याच्या मोहापासून अलिप्त राहू शकले नाहीत. बंडे व युद्धे चालूच राहिली. त्यात खलिफांचे खून झाले. खलिफा ‘ कुरेश ’ टोळीतील असावा हा आग्रह निर्माण झाला. हा भाग मुसलमानांच्या इतिहासाचा नाही, इस्लामच्या इतिहासाचा आहे. तरी ह्या वेळी सुन्नत नव्हती. फक्त कुराणाचे मार्गदर्शन होते. सुन्नतच्या काळात निर्दोष जग संपले होते. सुन्नतने सरंजामशाही बळकट केली. सुन्नतच्या अति आग्रहातून उलेमा इस्लाममधील समानता व समाजवाद गमावण्याची भीती आहे.



ही भीती उलेमांना मात्र वाटत नाही. ईश्वरावरील संपूर्ण विश्वास ह्या अडचणीतून तारून नेईल असे त्यांना वाटले. सर्व जगाचा निर्माता, नियंता असणारा जो प्रभू त्याचे विशेषनाम ‘ अल्ला ’ आहे. म्हणून ‘ अल्ला ’चे भाषांतर होत नाही. हा अल्ला सर्व भवितव्यतेचा एकमात्र धनी म्हणून ‘ कादिरे मुतलक ’ आहे. अल्लाचा अंतिम व परिपूर्ण संदेश कुराणमध्ये आहे व अंतिम प्रेषित महंमद आहे. ह्या ईश्वरीय ग्रंथात अल्लाच्या श्रद्धाधारकांचाच अंतिम विजय होईल अशी ग्वाही देण्यात आली आहे. म्हणून सर्व अडचणी ओलांडून आपण विजयी होऊ असे उलेमांना वाटते. ह्यासाठीच पूर्ण निष्ठेची व प्रभूच्या सार्वभौमत्वाची घोषणा आहे. म्हणून ह्या बावीस सूत्रांपैकी पहिले सूत्र अल्लाच्या सार्वभौमत्वाचा उद्‌घोष करते.

ज्यांच्याजवळ उलेमांची ही श्रद्धा नाही त्यांनी साशंक असणे तितकेच स्वाभाविक आहे.

# श्री. बनातवाला यांच्या मुलाखतीच्या निमित्ताने-



सध्या देशात निवडणुकीचे वारे पूर्ण वेगाने वाहत आहेत. त्याचा परिणाम म्हणून वैफल्यातून जन्मणाऱ्या आवेशाने सर्व राजकारण भारले गेलेले आहे. कॉंग्रेस पक्षाच्या राजवटीचा वैताग आणि कंटाळा आला म्हणून नव्हे– तर एकत्र आल्याशिवाय निवडणुकीला उभेदेखील राहता येणे शक्य नाही, या जाणीवेमुळे सर्व जण वेगवेगळी कारणे काढून एकत्र येण्याच्या प्रयत्नात आहेत. कॉंग्रेसविरोधी सर्व पक्षांनी एकत्र यावे या भूमिकेला तत्त्वतः माझा विरोध नाही; पण व्यवहारतः असे एकत्र यायचे तर कोणत्या तरी किमान कार्यक्रमाची एकजूट त्यामागे असावी लागते. सर्व विरोधी पक्षांनी मिळून किमान कार्यक्रमाची एक स्थूल रूपरेखा जर मान्य केली असती तर मग एकत्र येण्याला काही अर्थ होता. असा कोणताही किमान कार्यक्रम नसताना केवळ 'कॉंग्रेसविरोध' या एकाच मुद्द्यावर सर्वांनी एकत्र यावयाचे, या घटनेचे वर्णन 'वैफल्यातून उद्‌भवणारी चीड' व त्याची चढलेली 'नशा' याखेरीज वेगळ्या शब्दांनी करता येणे कठीण आहे. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे तर हा सगळा आवेश कृत्रिम आहे. कॉंग्रेसला पर्यायी सरकार निर्माण होण्याची शक्यता निदान या निवडणुकी-पुरती अजिबात नाही. फक्त एकत्र येऊन निवडणुकी लढवल्यास कॉंग्रेसचे बहुमत काही प्रमाणात महाराष्ट्रात खच्ची करता येईल इतकाच काय तो फायदा आहे. ज्या बेळगाव–कारवारसाठी संपूर्ण महाराष्ट्र समिती निर्माण झाली आहे, त्या प्रश्नावर महाराष्ट्रात वातावरण तापवण्याचे काम आता मागे पडले असून कॉंग्रेसविरोध या एकाच मुद्द्यावर सर्व लक्ष केंद्रित झाले आहे; आणि याची किंमत म्हणून राष्ट्रद्रोही व जातीयवादी शक्तींना उपकारक होण्याचीसुद्धा क्षिती आता वाटेनाशी झाली आहे! संपूर्ण महाराष्ट्र समितीने मुस्लिम लीगशी केलेला समझोता– ह्या घटनेला यापेक्षा निराळा काही अर्थ आहे असे मला वाटत नाही. प्रयत्न करूनही या घटनेचा दुसरा कोणताही अर्थ मला समजू शकत नाही. कॉंग्रेसविरोध करत असताना निदान राष्ट्रद्रोही शक्तींना आपण पाठीशी घालू नये, इतके भान समितीने ठेवावयाला हवे होते.

आजच्या संपूर्ण महाराष्ट्र समितीलाच हा दोष मी देतो असा याचा अर्थ नाही. ही परंपरा प्राचीन आहे! केरळ मुस्लिम लीगशी समझोता करण्याची क्षिती काँग्रेस आणि प्रजासमाजवादी यांपैकी कुणालाच वाटलेली नव्हती. त्या वेळी केरळ मुस्लिम लीग ही जातीयवादी संघटना नव्हे असे समर्थन मोकळेपणाने करण्यात आले. 'मुस्लिम मजलिस मशावरत' या संस्थेचा घटक पक्ष म्हणून आज केरळ मुस्लिम लीग काम करीत आहे; तरी ती जातीयवादी संघटना नव्हे असे म्हणण्याची आमच्या नेत्यांची इच्छा आहे काय? हा प्रश्न मला एकदा समजून घ्यावयाचा आहे. अशा वेळी नेहमी एक प्रश्न विचारला जातो, तो म्हणजे हा की, हिंदू जातीयवाद्यांशी हातमिळवणी करावी काय? या देशातील हिंदूंचा जातीयवाद ही प्रगतीला फार मोठी खीळ आहे असे मी मानतो. धर्माच्या १७०
बुरख्याखाली जनतेला गुलाम व दरिद्री ठेवणाऱ्या जमीनदार व भांडवलदार वर्गाचे हितसंबंध सुरक्षित ठेवणारे राजकारण मी सर्वथैव त्याज्य मानतो. इतर कोणत्याही कारणांमुळे नव्हे, पण फक्त एका कारणामुळे हिंदू जातीयवाद राष्ट्रद्रोही होऊ शकत नाही. हिंदुस्थानबाहेर कुठेच हिंदूंना परंपरा, इतिहास व संख्या यांचे अधिष्ठान नाही. मुस्लिम जातीयवादाची गोष्ट यापेक्षा निराळी आहे. हिंदू जातीयवादी काही निर्णायक प्रश्न उभे राहिले म्हणजे आपला हिंदुत्ववाद गुंडाळून ठेवू शकतात. या संदर्भात जनसंघाने भारत–पाक लढ्याच्या वेळीं दिलेली साथ लक्षणीय मानता येईल. हिंदू सभेने तर राष्ट्रीयीकरणासह सर्व पुरोगामी आर्थिक व्यवस्थेचा सतत पुरस्कार केला, व धर्मसुधारणेचा पाठपुरावा केला. हा प्रकार मुस्लिम जातीयवाद्यांच्याबाबत संभवत नाही. चोवीस तास हवेत वावरणाऱ्या ध्येयवाद्यांना हे म्हणणे आवडणार नाही, याची मला जाणीव आहे; पण वस्तुस्थिती मात्र त्यामुळे बदलत नाही. या देशात सर्व मुस्लिम जातीयवाद्यांनी 'मुस्लिम मजलिस मशावरत' या नावाने आपली आघाडी कायम केलेली आहे. या आघाडीचे असे म्हणणे आहे की, या देशात सातत्याने मुस्लिम वंश समाप्त करण्याचा उद्योग चालू असून सरकार त्याकडे डोळेझाक करीत आहे! पाकिस्तानमधून अल्पसंख्याकांना हाकून काढण्यात आले या घटनेबद्दल निषेधाचा एक शब्दही न सांगता, आणि मुस्लिम बहुसंख्य आहे म्हणून काश्मिर पाकिस्तानला मिळायला पाहिजे, या भूमिकेविषयी एकही विरोधाचा आवाज न काढता अयुबखानांना शांततेची खरीखुरी भूक आहे अशी ग्वाही देणारी ही संघटना आहे! शेख अब्दुल्लांना सोडून द्यावे, काश्मिर प्रश्न संपला असे मानू नये, भारत-पाक मैत्री ज्यामुळे अभेद्य होईल अशी काश्मिर प्रश्नाची सोडवणूक, प्रतिष्ठा आडवी येऊ न देता, करावी हे मजलिस मशावरतचे मत आहे! मुस्लिम बहुसंख्य काश्मिर पाकिस्तानातच जायला हवे, या भूमिकेचा खरा अर्थ पाकिस्तान मुसलमानांचा देश आहे असा होतो, आणि हिंदी मुसलमान,

मुसलमान असल्यामुळे पाकिस्तानवर प्रेम करण्याचे हक्कदार आहेत असा होतो! आसामात सीमा भागात वेकायदा पाकिस्तानी घुसत आहेत हे मशावरतचे मत नसून हिंदुस्थानातील मुस्लिमांना पाकिस्तानी हा शिक्का मारून देशाबाहेर काढण्याचा उद्योग चालू आहे, असे मशावरतला वाटते! **मशावरत** या नावाची जी मुस्लिम जातीयवाद्यांची ख्यातनाम आघाडी तिची केरळ मुस्लिम लीग एक घटक संस्था आहे. बनातवाला यांना माझा जाहीर प्रश्न हा आहे की, त्यांनी आपण मशावरतचे घटक आहोत की नाही हे स्पष्ट सांगावे, आणि वर दिलेल्या मशावरतच्या भूमिकांपैकी कोणत्या भूमिका त्यांना अमान्य आहेत हेही एकदा जाहीर नोंदवावे; म्हणजे मुस्लिम लीग कितपत राष्ट्रीय आहे यावर आम्ही निर्णय घेऊ शकू.

१७१

स्वातंत्र्योत्तर काळात जुनीच माणसे एका दिवशी नव्या घोषणा करू लागली! संपूर्ण भारतात मुस्लिम राजवट निर्माण करणे हे ' जमाते इस्लामी 'चे जाहीर ध्येयधोरण होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जमाते इस्लामीने एकाएकी भारतात सेक्युलर सरकारला पाठिंबा व्यक्त केला! भारतीय मुस्लिम लीगला पंजाब, बंगाल, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत येथे फारसा पाठिंबा नव्हता. उलट उत्तर प्रदेश, बिहार, मद्रास आणि मुंबई हीच लीगची बलस्थाने होती. ज्यांना पाकिस्तानात जाणे शक्य होते ते या भागातून पाकिस्तानात गेले आणि उरलेल्यांनी येथे एका ठरावाने सेक्युलॅरिझम व घटना यांना पाठिंबा व्यक्त केला! ही नवी ' जमाते इस्लामी ' आणि नवी ' मुस्लिम लीग ' परस्परांची मित्र व साहाय्यकर्ती म्हणून काम करीत आहेत की नाहीत? आज बनातवाला म्हणतात, भाषावार प्रांतरचनेला आमचा १९४८ पासून पाठिंबा होता. त्यांच्या या विधानाविषयी माझ्या मनात शंका आहे. माझी त्यांना प्रेमाची विनंती आहे की, १९५४ ते १९५६ या कालखंडातील, ' मुंबई महाराष्ट्राची आहे ' असे सांगणारा अगर ' हैद्राबादचे भाषावार विभाजन करण्यात यावे ' अशी मागणी करणारा मुस्लिम लीगचा अधिकृत ठराव त्यांनी दाखवावा! मुंबईसकट महाराष्ट्राला पाठिंबा देणारा ठराव मुस्लिम संघटनेने १९६० नंतर केला. घडलेल्या घटनांना नाइलाजाने पाठिंबा देण्याचा हा प्रकार होता! एरव्ही हैद्राबादचे विभाजन करण्यात येऊ नये, भाषावार प्रांतरचना हे खूळ आहे, उर्दूचा प्रांत कोणता? इतकेच प्रश्न मुस्लिम जातीयवादी विचारीत असत. महाराष्ट्रात राहून शिवजयंतीला विरोध करता येणे लीगला शक्य नाही; पण बनातवाल्यांच्या मित्रांनी यंदाच्या शिवजयंतीनिमित्त हैद्राबाद शहरात बसून ' शऊर ' या नियतकालिकातून छत्रपतींची भरपूर निंदा करून घेतली! तिचा निषेध कधी बनातवालांनी केला आहे काय? आजही बनातवालांनी "औरंगजेब अखिल भारतीय ऐक्यासाठी प्रयत्न करीत होता. शिवाजीने फुटीरपणा

वाढवला " असे मानतात, की, " जात्यंध हुकूमशाहीविरुद्ध शिवाजी लढला " असे मानतात, हे एकदा स्वच्छ सांगावे.

महाराष्ट्रातील मुसलमानांची भाषा मराठी आहे, हे बनातवालांना मान्य आहे; पण मुसलमानांचे शिक्षण उर्दूतून झाले पाहिजे, असे त्यांना वाटते! यापेक्षा सरळ महाराष्ट्रातील मुसलमानांची मातृभाषा उर्दू आहे असे ते का म्हणत नाहीत? यात छपवाछपवीची गरज काय? समान नागरी कायद्याबद्दल स्पष्ट उत्तर देण्याऐवजी बनातवाला टाळाटाळ काय म्हणून करतात? हिंदूंना हिंदू कोड असावे, मुसलमानांना मुस्लिम कोड असावे, दोन्ही कायदे त्या त्या धर्मानुसार असावेत. समान कायदा नसावा, असे बनातवाला का म्हणत नाहीत? याचे कारण उघड आहे. या देशातील १७२
मुस्लिम जातीयवादी असे मानतात की, इतर धर्म अपूर्ण असल्यामुळे परिस्थितीनुसार त्यांचे कायदे बदलावे लागतात. मुस्लिम धर्म परिपूर्ण असल्यामूळे त्यात मात्र बदलाला जागा नाही. म्हणून हिंदूंच्या धर्मापेक्षा निराळा कायदा गरज असेल तर जरूर करा, मुसलमानांना मात्र शरियतचाच कायदा चालू राहिला पाहिजे. बनातवालांचे हेच मत आहे काय? हे एकदा कळले म्हणजे बरे होईल.

पण बनातवालांचे मत कळण्याची गरजच नाही; कारण ते स्पष्ट आहे. भारताची भाषावार प्रांतरचना व्हावी असे त्यांना वाटते. निदान झाल्यावर ते पाठिंबा देतात. पाकिस्तानची भाषावार प्रांतरचना व्हावी, हा प्रश्न त्यांना परराष्ट्रनीतीचा वाटतो! बरोबर आहे; भारतात सतत मुसलमानांच्यावर अत्याचार चालू आहेत इतकेच बनातवाला बोलणार! पाकिस्तानात झालेल्या हिंदूंच्या कत्तलीवर ते बोलणार नाहीत. कारण तो परराष्ट्रनीतीचा भाग आहे!! इस्राएलला मान्यता देऊ नये, असे मत मांडणे हा परराष्ट्रनीतीचा भाग की नाही? सर्व जगातील मुसलमानांच्या बंधुतेला जनरल नासेर यांचा अडथळा होत आहे, हे म्हणणे परराष्ट्रनीतीचा भाग नाही? हिंदुस्थान–पाकिस्तानच्या लढाईत खोडसाळपणा पाकिस्तानचा होता. भारतीय जवानांनी बलिदानपूर्वक पाकिस्तानला धडा शिकवला याचा आनंद मानणे हाही परराष्ट्रनीतीचा भाग आहे का? बनातवालांनी कधी हे धन्यता व्यक्त करण्याचे कार्य केलेले आहे काय?

' आम्हीही राष्ट्रीय आहोत, आमचाही भारत सरकारला पाठिंबा आहे. ' असल्या शब्दांनी उत्तर स्पष्ट होत नसते. माझे प्रश्न स्पष्ट आहेत, त्यांच्या उत्तरावर बनातवालांची मुस्लिम लीग कितपत राष्ट्रीय आहे याचा निर्णय आम्ही देऊ शकू. पहिला प्रश्न असा आहे की, मुस्लिम धर्माचा तल-

वारीच्या जोरावर प्रचार– जिहाद– या कल्पनेवर विश्वास आहे. ( ‘ जिहाद बसैफ ’ ) अहमदिया पंथ जिहाद बसैफ ही आज्ञा विसाव्या शतकात रद्द समजावी, असे मानतो. ‘ जिहाद ब सैफ ’ या कल्पनेच्या स्पष्टीकरणाच्या नादी कुणी लागू नये. कारण ती कल्पना न्यायमूर्ती मुनीरांनी अतिशय तपशिलाने मांडलेली आहे. जिहाद ब सैफ ’ वर बनातवालांचा विश्वास आहे काय ? असल्यास त्यांना संधी सापडल्यास ते शस्त्रबळाने हिंदूंना मुसलमान करतील असा त्याचा अर्थ होतो. जिहाद बसैफची आज्ञा विसाव्या शतकात गैरलागू आहे, हे जाहीर रीतीने सांगण्यास बनातवाला तयार आहेत काय ? दुसरा प्रश्न असा की, सर्व मुसलमान पवित्र कुराण परमेश्वरीय पुस्तक मानतात; व आपला धर्म शुद्ध, परिपूर्ण असून इतर सर्व धर्म अशुद्ध व अपूर्ण मानतात. इथे दोन मार्ग आहेत : पहिला मार्ग हिंदू धर्मही मुस्लिम धर्माइतकाच परिपूर्ण असून, कुराणाप्रमाणेच वेद हेही अस्सल ईश्वरी पुस्तक मानणे हा आहे. दुसरा मार्ग सगळेच धर्म मानवी आहेत. मुस्लिम धर्मही मानवी आहे. सर्वच धर्म ग्रंथांप्रमाणे पवित्र कुराण आता आजच्या जीवनाचे मार्गदर्शन करण्यास अपुरे आहे, असे घोषित करणे. या दोनपैकी कोणत्या तरी मार्गाने जाण्यास बनातवाला तयार आहेत काय ? तिसरा प्रश्न हा की, हिंदू धर्माची प्रतिष्ठा की भारताची प्रतिष्ठा, असा प्रश्न येईल त्या वेळी धर्म गुंडाळून ठेवून आम्ही भारताच्या बाजूने उभे राहू असे हिंदूंपैकी कित्येकजण सांगतील. या प्रश्नाला बनातवालांचे उत्तर कोणते ? धर्म की राष्ट्र हा प्रश्न येणारच नाही, हे सांगण्याची तसदी बनातवालांनी घेऊ नये. कारण हा प्रश्न कसा येतो हे सर्वजण जाणतात. अशा वेळीं आपण धर्म गुंडाळून ठेवू आणि भारताच्या प्रतिष्ठेसाठी मुसलमानपण विसरू हे स्पष्टपणे म्हणण्यास ते तयार आहेत काय ? या देशातील मुस्लिम जातीयवाद्यांचे मत असे आहे की, कोणत्याही मुसलमानाची पहिली निष्ठा परमेश्वर ( अल्लाह ) प्रेषित आणि त्याचा धर्म याच्याशी असते. दुसरी निष्ठा सर्व जगातील धर्मबांधवांशी असते. कारण मुस्लिम समाज हेच एक विशाल कुटुंब आहे. भौगोलिक निष्ठा, प्रांतीय निष्ठा, वा भाषिक निष्ठा गौण आहेत. अखिल मानवतावादी मुस्लिम मन भूगोलाच्या चौकटीत कोंडले जात नसते. अर्थात मुसलमान आपापल्या देशांशी एकनिष्ठ असतातच; पण हा भाग जीवनातील अगदी सामान्य व गौण भाग होय. या जातीयवादी भूमिकेचे जाहीर रीत्या खंडन करून प्रथम देश-निष्ठा नंतर धर्मनिष्ठा ही भूमिका घेण्याची त्यांची तयारी आहे काय ?



बनातवाला महाराष्ट्रात राहतात; पण त्यांना मराठीतून उत्तरे द्यावयाची नसतात ! भारतात राहतात; पण त्यांना हिंदीतून उत्तरे द्यावयाची नसतात. ऐन निवडणुकीच्या मोसमात उर्दूतून उत्तरे देणे गैरसोयीचे म्हणून त्यांनी

इंग्रजीचा आश्रय घेतला ! आपण मुस्लिमांपुरती संघटना करीत असलो तरी बलाढ्य मुस्लिम संघटना या देशात राष्ट्रीय ऐक्याला उपकारक होईल असे त्यांचे म्हणणे आहे ! या मुद्द्यावर याहून अधिक कठोर लिहिण्याची माझी इच्छा नाही. या टीकेचे लक्ष्य व्यक्ती नव्हे तर प्रवृत्ती आहे, आणि या प्रवृत्तीला टिकून राहण्यासाठी जागा देणारे राजकीय मन हा माझ्या दुःखाचा विषय आहे. सुदैवाने कोणत्याही राजकीय पक्षाचा मी सभासद नाही, म्हणून इतके स्पष्टपणे या निवडणुकीच्या मोसमात मी लिहू शकतो. जिथे हिंदू महासभा संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या व्यासपीठावर लीगबरोबर बसू शकते, तिथे इतर पक्षांविषयी बोलण्याची सोयच राहिली नाही !

१७४

REFBK-0022755

टीप : सदर लेख इ. स. १९६७ च्या निवडणुकीपूर्वी लिहिला. समितीच्या पाठिंब्यावर बनातवाला निवडून आले. गेल्या तीन वर्षांत ह्या घटनेमुळे मुस्लिम जातियवादी संघटना कशा बळकट झाल्या हे चित्र सर्वांच्या समोर आहे. निवडून येताच बनातवालांनी जाहीर केले की, जोपर्यंत मुस्लिम धर्मशास्त्राचा संबंध आहे तोपर्यंत व त्या ठिकाणी आपण भारतीय संविधान सार्वभौम मानीत नाही.